UNIVERSAL
LIBRARY
OU_192810
UNIVERSAL
LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M 83 N 465a Accession No. M 224

Author नेरूरकर, वि. कृ.

Title रागिणीशा

This book should be returned on or before the date last marked below.

# साधना

( सामाजिक कादंबरी )

लेखकः

श्री. वि. कृ. नेरूरकर, बी. ए., एस्. टी. सी.

प्रथमावृत्ति.

मे १९३८

किंमत १॥ रुपया.

प्रकाशकः
**वि. आ. हर्डीकर,**
चालक, साहित्य-सत्कार-संस्था,
महाद्वार रोड, कोल्हापूर.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मुद्रक :
**वा. ना. ठकार,**
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# साधना कशाची ?

कादंबरी हातांत घेतांक्षणींच वाचक तिचें नांव वाचून स्वतःशींच पुटपुटेल—" साधना ! कोणी केली बोवा ! आणि ती कशाची ! "

तेंच सांगण्याचा उद्देश आहे यापुढें. आपल्या मनांतील विचार इतरांसमोर मांडण्याची संधि आल्यास ती घेण्याची इच्छा स्वाभाविकपणेंच होते. ही संधि मला या पुस्तकाचे प्रकाशक **श्री. वि. आ. हर्डीकर** यांनीं आणून दिली. त्यांचे आभार किती म्हणून मानावे !

भाईसाहेब हे साधना करणारे आहेत. त्यांना कलह मिटवावयाचे आहेत. ते नवमतवादी आहेत. निरुपयोगी झालेल्या जुन्या आचारविचारांत त्यांना फरक घडवून आणावयाचे आहेत, त्याबद्दलच त्यांची साधना चालली आहे. पण ते उतावळे आणि अविचारी नाहींत. चढतां उतरतांना ते प्रत्येक पायरीचा उपयोग करून घेतील. उडी टोकावयाचे नाहींत, कीं उड्डाण मारायचे नाहींत. भावनांची खळबळ हृदयांत, पण तिचा परिस्फोट तोंडानें होणार नाहीं कधीं. निरुपयोगी झालेल्या जुन्याच्या जागीं उपयुक्त अशा नव्याची प्रस्थापना हाच जर नवमतवाद असेल तर तो भाईसाहेबांस मान्य आहे. हिरा त्यांची सहकारिणी, पण तिच्याशीं ते मोजक्याच शब्दांनीं बोलले असतील. ते हिराशीं व हिरा त्यांच्याशीं काय बोलली असेल तें त्यांच्या हालचालींवरून अनुमानावें लागेल, तें कुणाला ऐकूं येणार नाहीं.

महायुद्धोत्तर कालांत साऱ्या जगाचें स्वरूप पालटत चाललें आहे. आशियांतील व युरोपांतील निरनिराळ्या देशांच्या प्रगतीकडे आपला हिंदुस्थान पाहत आहे. लाटेखालीं दबून जायचें नसेल तर लाटेवर चढलें पाहिजे—तरंगलें पाहिजे; म्हणजे येणाऱ्या प्रत्येक लाटेचा आपल्याला योग्य प्रकारें उपयोग करून घेतला पाहिजे. पण तरंगणें म्हणजे उफेणें नव्हे, स्वत्व गमावून निष्क्रिय होणें नव्हें. नाहीं तर जमिनीचे पाय सुटतांक्षणींच जोरानें येणारी लाट कांठावरच्या खडकावर नेऊन

आपटून ठिकऱ्या करून टाकायची! तरंगणें म्हणजे हातपाय हालवून इष्ट दिशेनें पोहत राहणें, तरंगणें म्हणजे तरणें.

राजकीय व सामाजिक क्रांतीकडे हिंदुस्थानांत लोकांचें जितकें लक्ष वेधलें आहे, तितकें औद्योगिक व आर्थिक क्रांतीकडे नाहीं. पण आजच्या युगांत सामाजिक व आर्थिक बाबी इतक्या परस्परनिगडित झाल्या आहेत कीं, वर्गकलह मिटवून समानतेचा प्रयत्न करावयाचा झाल्यास प्रथम आर्थिक अडचणींचा प्रश्न सोडविणें क्रमप्राप्त होत असतें.

राजकीय व सामाजिक क्रांतीच्या लाटेमुळें मराठी वाङ्मयांत नवे नवे विचारप्रवाह वाहूं लागले आहेत. मराठी वाङ्मयाची ही खळबळ पहावयास कै. राजवाडे आज हयात पाहिजे होते. " मराठी भाषा मरावयास टेंकली आहे " असे उद्गार काढून त्यांनीं जो चिमटा घेतला होता, तो कांहीं मराठी भाषेचें मरण त्यांना डोळ्यांनीं पहावयाचें होतें म्हणून नव्हे. असला चिमटा अंजनासारखा–मात्रेसारखा देखील–हित-कर ठरतो. तो चिमटा हितकरच ठरला.

नव-विचारांचे वारे वाहूं लागले असतां कोणी आपल्या कानांला बोळ्यांचे पडदे घालतात. कोणी कान पांखारून वारें भरल्या वासरां-सारखे स्वैर धिगाणा घालतात. पण कांहीं थोडेजण एकंदर हवामान पाहून ग्राह्याग्राह्य परिमिततेनें त्यांचा स्वीकार करतात. या तीन प्रका-रांपैकी कोणता प्रकार इष्ट हें सांगावयास नकोच. भाईसाहेब या तिसऱ्या प्रकारांत मोडतील.

बृहन्महाराष्ट्राच्या एकीकरणाची कल्पना आज प्रत्येक साहित्यिकाच्या मनांत घोळत आहे. म्हणून एका ठरीव सांच्याचें वाङ्मय आवडेनासें होऊन नवे विषय, नव्या कल्पना, नवे विचार नव्या पद्धतीनें मांडण्याची जिज्ञासा साहित्यिकांना, आणि ते वाचण्याची मनीषा वाचकांना झाली आहे. तशांतच महाराष्ट्राच्या प्रांताप्रांतांमधील विशिष्ट रीतिरिवाज, बोली-भाषा, सामाजिक व आर्थिक परिस्थिति इत्यादि जाणून घेण्याची जिज्ञा-साहि वाढली आहे. सरकार व राजकीय पुढारी शेतकरी वर्गाच्या उन्नतीसाठीं खेड्यांकडे वळले आहेत आणि शहरांना खेड्यांची आठवण होऊं लागली आहे.

प्रस्तुत कादंबरींतील आंबेखोल हें गांव कोंकण प्रांतांतलें आहे. देशस्थांना कोंकणचें वातावरण अंतरंगांत शिरून प्रथम पहावयास व कोंकणस्थांना तें पडताळावयास मिळेल. आंबेखोलच्या जमीनदारांचे सुशिक्षित चिरंजीव भाईसाहेब हे सावकारीच्या अथवा नोकरीच्या साधनानें द्रव्योपार्जनाच्या मागें न लागतां आपल्या खेड्यांतील भूमिजनांची उन्नति साधण्यासाठीं तळमळत आहेत. अर्थात् ही साधना म्हणजे भाईसाहेबांच्या तळमळीला जें कांहीं मूर्तस्वरूप आजवर आलें तत्संबंधींची हकीगत. भाईसाहेबांना हें कार्य करीत असतां शेतकरी, कर्जदलाल, संपादक, साहित्यिक, कलावंत इत्यादिकांनीं भरलेल्या सभोंवतालच्या जगाचे जे प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुभव पहावयास मिळाले ते आपणालाही येथें पहावयास मिळतील.

प्रकाशकांनीं दिलेली पृष्ठमर्यादा सांभाळतां सांभाळतां शेवटीं थोडें तरी उल्लंघन झालेंच आहे. रसिकांची सेवा यथाशक्ति केली आहे. गोड मानून घेणें रसिकवाचकांच्या मर्जीवर आहे.

पुस्तक वाचून झाल्यावर वाचक पुन्हां पुटपुटेल—“ वाः ! यांतील काका बामण, मावशी, सगुणा, कस्तुरी, वासंती, दाजीसाहेब, येशाप्पा आमच्या परिचयाचे असल्यासारखे दिसतात. पण एकीकडून विधवा कुमारी आणि दुसरीकडून सौ. चारुशीला देशपांडे ज्या डोकावतात त्या कशा काय ? सरबाजी सुभेदार पाहिले आहेत. पण भाईसाहेब कुठें आहेत ? ”

भाईसाहेब ना ? निपजूं लागले आहेत—अथवा निदान पुढें निपजतील. आणि विधवा कुमारी—पण आतांच कशाला ती गोष्ट ? त्या पहा बायका फेर धरून फुगडी घालूं लागल्या आहेत येशाप्पाच्या घरांतील गणपतीसमोर. तुम्ही काका बामणासारखे आंत घुसणार नाहींच म्हणा—पण बाहेरून डोकावलेत तरी ती बिचारी विधवा कुमारी—ती हिरा तुम्हांला फुलवाती करीत बसलेली दिसेल. मी आतां बाजूला सरकतों, तुम्ही त्यांचें बोलणें ऐकाल व हालचाली पहाल. त्यांच्या कोंकणी बोलींतल्या शब्दांचे अर्थ सांगायला फक्त मी शेवटीं तुमच्याकडे येईन.

—वि. कृ. नेरूरकर.

# प्रकाशकाचें निवेदन.

थोड्या अवकाशांतच **साहित्य–सत्कार–संस्थेला** श्री० वि० कृ० नेरूरकर यांची '**साधना**' कादंबरी हें दुसरें प्रकाशन वाचकांच्या सेवेस सादर करण्याचा योग आला, यावरून ही संस्था लोकादरास पात्र झाली असल्याचें दिसून येत आहे. "टाकीचे घाव" या आमच्या पहिल्या प्रकाशनाचें मराठी वाचकवृंदाकडून सन्मानपूर्वक स्वागत झाल्यानें आमचा उत्साह द्विगुणित झाला व त्यामुळेंच इतक्या त्वरेनें हें काम आम्हांस हातावेगळें करतां आलें.

काव्यें, कादंबऱ्या, लघुकथा इ. लेखनानें श्री. वि. कृ. नेरूरकर हे नामवंत लेखक म्हणून मराठी वाचकांना परिचितच आहेत. प्रचलित परिस्थितीचें प्रतिबिंब उमटलेली '**साधना**' कादंबरी आमच्या संस्थेला देऊन त्यांनीं संस्था आजन्म उपकृत करून ठेवली आहे. वाचकांना '**साधनें'त** आत्मप्रत्यय, आनंद, मनरंजन इ. अनुभवण्यास मिळणार असल्यानें ती लवकरच लोकप्रिय होईल असा आम्हांस विश्वास आहे.

प्रकाशनासारखें अवघड कार्य प्रेमळ सहाय्याशिवाय लवकर पार पाडणें अशक्य आहे. तरी या कामीं आमचे स्नेही **श्री. विश्वनाथ गोपाळ भागवत** बी. ए. एल्एल्. बी. **वकील** व **श्री. द. रा. नानिवडेकर** या उभयतांचें अत्यंत सहाय्य झालें आहे त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत.

संस्थेची ही सेवा वाङ्मयप्रेमी लोकांनीं गोड करून घेऊन आम्हांस उत्तरोत्तर मराठी वाङ्मयाचा प्रसार करण्यास आणखी प्रोत्साहन द्यावें अशी विनंति करून हें निवेदन पुरें करतों.

वैशाख शु॥ ६ शके १८६०
साहित्य–सत्कार–संस्था.
**महाद्वाररोड, कोल्हापूर.**

आपला नम्र,
**वि. आ. हर्डीकर.**

# अनुक्रमणिका


| प्रकरणें | | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | गणपतीसमोर फुगडी | १ |
| २ | काका बामणाचा कोप ! | ११ |
| ३ | दस्तऐवजांचा कारखाना ! | २५ |
| ४ | नखरेल तरुणी | ३७ |
| ५ | उग्र वेताळाची फेरी ! | ४९ |
| ६ | पोस्टांतून गडप झालेलें पत्र ! | ६० |
| ७ | डॉ. आंबेडकर हे ब्राम्हणच ! | ७० |
| ८ | झुणकाभाकर संमेलन | ८२ |
| ९ | बंदुकवाला गोरा साहेब ! | ९१ |
| १० | वासंतीच्या मनाचीं आंदोलनें | १०७ |
| ११ | मावशीनें आग फुंकरली ! | ११४ |
| १२ | विधवा कुमारी | १२९ |
| १३ | शृंगारलेल्या खोलींत– | १४३ |
| १४ | चोरावर मोर ! | १५५ |
| १५ | चिकट आंबील ! | १६९ |
| १६ | हरिजनांचा देवालय–प्रवेश | १७४ |
| १७ | खास अंकाचें मुखपृष्ठ ! | १८६ |
| १८ | मंगलसूत्र | २०४ |
| १९ | कोंकणी शब्दांचे अर्थ | २२२ |

# —श्री. वि. कृ. नेरूरकरांचीं पुस्तकें—

**कथावाङ्मयः–**

१ शीलाचें मोल [ कादंबरी ]
२ दुधारी सुरी [ कादंबरी ]
३ तो क्षण [ कादंबरी ]
४ देशाचें वैभव [ कादंबरी ]
५ अकबराचें वेदसाधन [ कादंबरी ]
६ नटीचे नाच [ लघु–कादंबरी ]
७ साधना [ कादंबरी ]
८ नवा नमुना [लौकरच प्रसिद्ध होणारी कादंबरी ]
९ प्रतिबिंबें [ लघुकथा–संग्रह ]

**काव्यवाङ्मयः–**

१ राधाकृष्ण–रहस्य [ काव्य ]
२ सिंहगडदर्शन [ काव्य ]
३ पर्वती [ काव्य ]
४ कवीची भेट [ काव्य ]
५ श्रीक्षेम–राज्याधिरोहण [ काव्य ]
६ श्रीसयाजी सुवर्णमहोत्सव [ काव्य ]
७ उत्कंठा [ कवितासंग्रह ]

**प्रबंधवाङ्मयः–**

१ मराठीचा संसार
२ टॉलस्टॉयचें तत्त्वज्ञान
३ उत्कर्ष–सोपान

**बाल–वाङ्मयः–**

१ श्रीसरस्वतीचा प्रसाद
२ माणूस आणि पशु
३ पहिलें पुस्तक
४ पाढ्यांचे खेळ
५ गमतीच्या गोष्टी [ ४ भागांत ]

जीवनकलेचें ध्येय ! गृहसौख्य !

विमा उतरणें हें एक आयुष्यांतील आद्य कर्तव्य आहे. ही जाणीव प्रत्येक व्यक्तीस झाली पाहिजे, व त्याची सांगोपांग माहिती व फायदेशीर योजना विमातज्ञाकडूनच घेतली पाहिजे. तेव्हां कोणत्याही सुप्रसिद्ध कंपनीविषयीं

## य. श्री. मुजुमदार

C/o मालती कटपीस स्टोअर

महाद्वार रोड, कोल्हापूर.

एजंट—वेस्टर्न इंडिया ला. इन्शु. कं. सातारा,

यांचेकडे अगोदर चौकशी करावी.

---

सुबक व टिकाऊ सर्व डिझाईन्सचें—

## – रबरी शिक्के व पितळी सीलें –

* स्वस्त भावांत मिळण्याचें १च ठिकाण *

व्ही. डी. कुलकर्णी अ‍ॅन्ड सन्स—

C/o एम्. एम्. मणेर

भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

---

*Recognized by Government*

## THE NEW SHORT HAND & TYPEWRITING INSTITUTION

**New Market Road, Kolhapur City.**

Well known for EXPERT tution and moderate fees.
Special arrangement is made for Lady-Students.
For particulars see the undersigned or apply to:—

proprietor—***S. B. HAVAL,*** B. A. LL. B.

मोहक पातळें आणि सुंदर कापड
—योग्य भावांत मिळण्याचें १ च ठिकाण—

# महिला-स्टोअर्स

महाद्वार रोड, कोल्हापूर.

The Home of !! ~~~~
Fancy Cloth !!

प्रोप्रायटर :: माधवराव व्ही. कुलकर्णी

को
ल्हा
पु
रां
त

अल्प काळांत लोकप्रिय झालेले

# बोंगाळे-ब्रदर्स

—कॅप्‌मेकर्स—

महाद्वार रोड, कोल्हापूर.

सर्व तऱ्हेच्या **टोप्या** योग्य भावांत
मिळण्याचें एकच प्रमुख ठिकाण.

## काव्यशास्त्रविनोद ग्रंथमाला

(१) रतिशास्त्रमीमांसा कि. ३ रु. वात्सायनकृत.
(२) परिचय भाग १ ला कि. १२ आ. ,,
(३) वंचना (प्रेमकथा—कादंबरी) कि. १ रु.

—आगामी प्रकाशनें—

(१) अढळपद (नाटक) (२) मानसशांति (काव्य-संग्रह)

कर्ता — दि. चिं. देशपांडे, बी. ए. एल्‌एल्. बी.

सर्वोत्तम 'सरस्वती' मासिक वा. व. २। रु.

आजच वर्गणीदार व्हा—

डी. आणि कंपनी, महाद्वार रोड, कोल्हापूर.


# यशवंत गणेश नाईक एम्. ए.

यांचा

— लघुकथासंग्रह —

# ❀ गुलमोहोर ❀


प्रकाशक—बी. जी. शिंदे, कोल्हापूर

मिळण्याचें ठिकाण:—बॉंबे बुकडेपो, मुंबई.

लक्षांत असूं द्या !!— स्वस्त व टिकाऊ !!!

साईन बोर्ड पेंटिंग काम करून देऊं.

पेंटर—मंत्री, गंगावेश, कोल्हापूर.

## — नाविन्यपूर्ण फॅशनचीं पातळें —

जरी रेशमी सुती लुगडीं शर्टिंग, कोटिंग,
धोतरजोड्या वगैरे माल योग्य दरांत
मिळण्याचें खात्रीलायख
.... ठिकाण ....

## - प्रतिभा स्टोअर्स -

महाद्वार रोड, कोल्हापूर.

फौंऊटन रिपेअरीमध्य अनेक सर्टिफिकेटस् मिळविलेले
कोल्हापुरांत एकटे व एकच—व्ही. एन्. वणकुद्रे.
" आजचें कोल्हापूर " या ग्रंथाचे संपादक वणकुद्रे.

विक्रीस तयार ! ! !
शिंपी वर्गाचा आजीव साहाय्यक
— शास्त्रशुद्ध —
**शिंपीशास्त्र-ग्रंथ** भाग १ ते ३.
सवलतीच्या किंमतीची माहिती मागवा.
पत्ता—काकडे टेलरिंग कॉलेज विलसन रोड, कोल्हापूर.
स्वावलंबी बनण्याकरितां वरील कॉलेजची आजच माहिती मागवा.



कोल्हापुरांत

## फोटोचें सर्व प्रकारचें
## सामान आणि कॅमेरे

मिळण्याचें

मुख्य ठिकाण म्हणजे

## गोकर्णीकर अँड सन्स

लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

कॅमेरे घेणाऱ्यास फोटोची माहिती फुकट देण्यास येते. प्रिंटिंग, डेव्हलपिंग, एन्लार्जींगचीं कामें उत्तम आणि वेळेवर केली जातात. दर माफक.

डॉ. एल्. बी. सूर्यवंशी बी. डी. एस्सी.
यांची डेन्टिस्ट—कोल्हापूर.

## औषधी

## टूथ पावडर

वापरल्यानें सर्व प्रकारचे दंतरोग नाहींसे होतात.

सोलएजंट—शा. डी. एस्. अत्तरवाला, बिन्सनरोड—कोल्हापूर.

डॉ. सूर्यवंशी-यांचा—दांतांचा दवाखाना.

महाद्वार रोड, कोल्हापूर.

आपला विमा

# - प्रेसिडेन्सी प्रॉव्हिडंट अँड — जनरल इन्शुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस मुंबई

मध्येंच उतरा. विम्या संबंधीं सर्व माहिती समक्ष दिली जाईल.

एजंट:—आर. व्ही. कोटीभास्कर,

शाहूपुरी कोल्हापूर.

---

कोल्हापूरांत—

पब्लिसिटी कॉन्ट्रॅक्टर अॅन्ड जनरल

## कमिशन एजंट

## खंडेराव बिडकर

यांच्या तर्फेच योग्य दरात उत्तम जाहिरात व आपल्या मालाचा उठाव करण्याबद्दल अगोदर चौकशी करा.

पत्ता—डी. अँड को. महाद्वार रोड कोल्हापूर.

---

Govt. Registered.

## MODERN SHORTHAND & TYPEWRITING COLLEGE

Mahadwar Road Kolhapur.

Shorthand;— 30 Days. Typewriting:— 3 Months

*SAVE MONEY & TIME*

**B. G. Parandekar** M. S. D. S. (Eng.)
Principal

---

नांवाच्या पाट्या, सिने-स्लाईडस, ब्लॉक-डिझाईन्स व खडी-काम वेळेवर व माफक दरांत मिळण्याचें

## १ च ठिकाण -खटावकर पेंटर

गुजरी-कोल्हापुर



ए. बा. शेटे. बावडेकर—यांच्या

# अनंत आर्योषधि

## फार्मसींत

शास्त्रोक्तरीत्या बनविलेलीं औषधें

(१) बाळंत काढा नं. १ व २ (२) कुमारी आसव (३) दाक्षासव. (४) कडकीवर काढा. (५) डांग्या माकड खोकल्यावर. (६) बालजीवनामृत. (७) हिस्टेरिया क्युअर. (८) च्यवनप्राशावलेह [क्षयनाशक बलवर्धक]

आमची 'गृहवैद्य' ही उपयुक्त बारा औषधांची पेटी अवश्य संग्रही ठेवा. शिवाय सर्व भस्में, रसायनें, मात्रा, तेलें, अर्क, चूर्णें, आसवें वगैरे मिळतात. [गावोगांव एजंट्स पाहिजेत]

---

बुकवर्क व पब्लिकेशनसाठीं लागणारे ब्लॉक्स व चित्रें सवलतीच्या दरांत करून मिळतात.

# कवताळकर ब्लॉक-मेकर

## भेंडे गल्ली-कोल्हापूर.

---

दंतरोगांवर हमखास गुणकारी !

बाबुराव अग्निहोत्री यांचें

# दंतमंजन

वापरा
सर्वत्र मिळतें.

बाजारांत मिळणाऱ्या कोणत्याही टुथपावडरपेक्षां उंची
-असून भरपूर बक्षिसें असलेलें-
याने कोणताही दंतरोग तावडतोब बरा होतो. भरपूर
तीन महिने पुरणारी बाटली किंमत ५ आणे.

—रजिस्टर्ड—

# सूर्यछाप दंतमंजन

फक्त १५ रुपये गुंतविणारे एजंट पाहिजेत. माल न
खपल्यास परत घेण्याची लेखी हमी.

## भागवत आणि कंपनी,

कांच मालाचे प्रमुख व्यापारी, कांचलाईन कोल्हापूर.



सर्वोत्कृष्ट शाकाहारी !!!

**'HOME OF HEALTH'**

## ओ. के. रेस्टॉरंट

महाद्वार रोड, कोल्हापूर.

लेडीजकरितां स्पेशल व्यवस्था.



—कोल्हापुरांत स्टायलिश कपडे शिवून—
-मिळण्याचें ठिकाण-

# -दि रेक्स टेलरिंग कंपनी-

महाद्वार रोड, कोल्हापूर.

प्रो. जी. एस्. पित्रे.

साईन अँड डिझाईन पेंटर

आर. के. लेले

ले

ले

लक्ष्मीपुरी-कॉर्नर, कोल्हापूर.

आकर्षक साईनबोर्डस्, मोहक डिझाईन्स व सुंदर चित्रें करून मिळण्याचें १च ठिकाण!

-: डॉ. पार्टेंज लॅबॉरेटरी :-

विल्सनरोड, कोल्हापूर.

सर्व रोगांकरितां होमिओपाथिक तयार रामबाण पंचवीसशें पेटंट औषधें. असाध्य रोग बरे होतात.

——असा तज्ञ डॉक्टरांचा अनुभव आहे——

NEW ADVERTISING SYNDICATE

Signboard Painters, Advertisers and Cine-Slide-Makers.

Prop. N. RAKTWAN & SONS. ( RAXONS ) KOLHAPUR.

-मेसर्स सरनाईक ब्रदर्स-

—गंगावेश कोल्हापूर—

देशी व विदेशी खेळांच्या सामानाचे प्रमुख व्यापारी— कॅटलॉग मागवा.

# बुलबुल कॅप्स ७०० मध्ये ०० क्रांति !!!

—सवलतीचे दर—

सीलस्कीन, जरीच्या व इतर जातींच्या सर्व टोप्या अत्यंत स्वस्त दरांत विकत मिळतात.

**बुलबुले यांच्या दुकानांत येऊन ७०००० नंबरचा माल गॅरंटीसह आजच खरेदी करा.**

## निळकंठ भिमाजी बुलबुले.

महाद्वार रोड, कोल्हापूर.

घाऊक घेणाऱ्यास भरपूर कमिशन.



DRESS MAKES A MAN

—दक्षिण महाराष्ट्रांतील फॅशनेबल तयार कपडे—

## मिळण्याचें १ च ठिकाण !

## एल्. जी. पोवार

फेरीस मार्केट कोल्हापूर.

आमचेकडे ड्रायव्हर सूटस्, टांगेवाल्यांचे ड्रेस, कोट, शर्ट, पॅटस्; कोटिंग, शर्टिंग व इतर कपडा

**तसेंच स्त्रियांकरितां—झंपर व ब्लाऊज**

**मुलांकरितां—फ्रॉक्स**

सेलरसूट, वगैरे कपडे मनपसंत तयार मिळतात.

**तयार कपडे वापरून वेळेची व पैशाची बचत करा.**

कोणताही कपडा ऑर्डरप्रमाणें ६ तासांत तयार मिळेल.

कोल्हापुरांत ] -५०१ टॉमको एजंट्स- [ १ च ठिकाण

## -पाटें ढवळे आणि कंपनी-

वुइल्सन रोड कोल्हापूर.

हिजमास्टर्स व्हॉईस, यंग इंडिया, न्यू थिएटर्स व
ओडियन वगैरे सुप्रसिद्ध कंपन्यांचे

अधिकृत विक्रेते

ग्रामोफोन, त्याम लागणारा माल, व
त्याच्या दुरुस्तीबद्दल अगोदर
आमचेकडे चौकशी करावी.

याशिवाय

५०१ टॉमको, पैसाफंड,
(ओगलेवाडी) व एव्हर सिल्व्हरची
भांडीं वगैरे माल मिळण्याचें कोल्हापुरांतील
आमच्या शोरूमला भेट द्या.

१ च ठिकाण

# --काठेवाड स्टोअर्स--

म्हणजेच

## योग्य भावांत तयार कपडे मिळण्याचें

## १ च ठिकाण !

आमचेकडे फॅन्सी, रेशमी, सुती, लोकरी, तयार केलेले
कपडे व कापड मिळतें. ब्लाऊज, झंपर्स, फ्रॉक्स,
सेलरसूटस्, ड्रायव्हर-सूटस्, इत्यादि आधुनिक फॅशनचे
तयार कपडे, कोटिंग, शर्टिंग, धोतरजोड्या इ.
घेण्यापूर्वी अगोदर चौकशी करा.

भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

— कोल्हापूरचा प्रातिनिधिक कथासंग्रह —

# ✻ करवीराच्या कळ्या ✻

पृष्ठें १७५ ] संपादक—न. ना. देशपांडे [ कि. १। रु.

प्रो. ना. सी. फडके, श्री. रं. कृ. चिंचलीकर, श्री. र. गो. सरदेसाई, मा. धं. बागल, वगैरे नामवंत लेखक लेखिकांच्या २० निवडक लघुकथा.

प्रकाशक—साहित्यचर्चा मंडळ, कोल्हापूर

सोल एजंट्स—महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

# प्रभाकर मोटार स्कूल अँड वर्क्स



लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

मोटार व मोटार-सायकल ड्रायव्हींगचें सशास्त्र व अल्प खर्चांत शिक्षण मिळण्याचें

— एकच ठिकाण —

शिवाय सर्व प्रकारच्या मोटारींची दुरुस्ती, बॅटरीचार्जिंग व वेल्डिंगचें काम केलें जातें.

प्रो.—ए. जी. बेकनाळकर ॲन्ड सन्स

# साधना

## १ : गणपतीसमोर फुगडी

" तिळाचं फूल कसं माणीक मोतीं
माणीक मोतीं
गौराई तुला ग नेयाला येती
न्हेयाला येती
येती पण येती पण कोण कोण येती
कोण कोण येती
येती ग येती ग मामोजी येती
मामोजी येती– "

फुगडीला नुकताच आरंभ झाला असावा. आठ दहा बायका जमून फेर धरून फुगडीचें आरंभीचें वरील गाणें म्हणत होत्या. त्यांचे पाय सर्वांचे एकदम सारखे पडत होते; पण त्यांत बिनचूक तालबद्धता होती असें मात्र नाहीं. ठराविक वेळीं वर्तुळाकृति फेराच्या आंतल्या बाजूस सगळ्या जणी ओणव्या होऊन वांकत व वांकून उभ्या होईतों दोन्ही हात भोंवडल्यासारखे करीत असत. नंतर पुन्हां कांहीं पावलें उभ्यानें टाकून पुन्हां फेराच्या आंतल्या बाजूस ओणव्या होत. अशा प्रकारचा तो फुगडीचा नाच होता.

खरें म्हटलें तर फुगडीचा हा पूर्वरंग म्हणायचा. फुगडीचा नाच असा पुढेंच होता. गवई जसा बैठकीच्या आरंभीं राग आळविण्याकरितां प्रथम टायींतली चीज म्हणतो व त्यांतच घसा साफ करीत असतो आणि मग त्रितालांतलें गाणें म्हणून रंग भरीत जातो; तसाच हा कोंकणांतल्या बायकांचा फुगडीचा प्रकार असावा, कारण वरीलप्रमाणें भोंवडीची फुगडी सरासरी अर्धापाऊणतास झाल्यावर मग वयस्क किंवा पोक्त बाया त्यांतून अंग काढून घेतात व उत्साही दमदार तरुणीच तेवढ्या बैठकीच्या फुगडींत भाग घेतात. खरी करामत असते ती ह्या बैठकीच्या फुगडींतच.

जसें कलगीतुऱ्याचें गाणें, तशीच बैठकीची फुगडी. कलगीतुऱ्याच्या गाण्यांत पुरुष शाहीर सवाल टाकून एकमेकांवर चढ टाकीत असतात. बैठकीच्या फुगडींत असेच एकमेकांवर चढाई करण्याचें उखाण्यांचे सवाल जबाब असतात. बैठकीची फुगडी सुरू व्हावयाच्या आधींची ही भोंवड्याची फुगडी चालू होती.

**मामोजी येऊनी काय काय आणीती**
**काय काय आणीती ?**
**आणीती आणीती पाटल्यांचा जोड**
**पाटल्यांचा जोड**
**पाटल्यांचा जोड मी घेयाची नाहीं**
**घेयाची नाहीं**
**मामोजीं संगें मी जायाची नाहीं**
**जायाची नाहीं.**

फुगडीच्या गाण्यांतली ही माहेरीं येऊन रुसून बसलेली सूनबाई 'मामोजी' बरोबर जात नाहीं, 'भावोजी' बरोबर जात नाहीं. त्यानीं आणिलेले कसलेही उंची उंची दागिने घेत नाहीं. पण शेवटीं जेव्हां घरधन्यांची स्वारी स्वतःच न्यायला येते तेव्हां मात्र त्यांच्याबरोबर राजीखुषीनें जाते!

घरोघर, गणेशोत्सवांत घातल्या जाणाऱ्या कोंकणांतील फुगडीचें हें गाणें बायकांत सर्रास सर्वतोमुखीं आहे. आज गणपतीचा तिसरा दिवस.

मधल्या खणांतील पूर्वेकडची भिंत रंगविलेली होती. त्या ठिकाणीं एक लाकडी चौफळा टेवून त्यावर चौरंग टेविला होता. त्या चौरंगाच्या दोन बाजूस दोन समया तेवत होत्या. चौरंगावर गणपतीची मूर्ति विराजत होती. वरती मंडपीला हरणाचीं फुलें, कांगलांचे घोस, पोफळीचीं शिपतरें, कंवडळें, कांकड्या वगैरे आणि बाकीच्या सर्वच आंब्याच्या डहाळ्या बांधल्यामुळें ती फार सुशोभित दिसत होती. त्या ऋतूंत कोंकणांतील वनस्पतिसृष्टींत जितकें म्हणून कांहीं सुंदर असेल तितकें सर्व प्रातिनिधिक स्वरूपात श्रीगणरायाच्या मस्तकावरील मंडपींत आणून बांधलेलें असतें. म्हणून ती मंडपी म्हणजे चार सहा हात लांबीरुंदीच्या क्षेत्रांत संक्षिप्तपणें अवतरलेली जणुं फळपुष्पपल्लवसृष्टीच झुलत राहिली आहे असें कोणासही वाटावें.

गणदेवासमोर फुगडी चालू होती. एका बाजूस दोन तीन मुलें आपापसांत खेळत होतीं. त्यांतील एका मुलाच्या खिशांत फटाके होते. पण त्या मुलाला फटाका उडवावयास फार भीति वाटत असावी. त्यानें सभोंवार पाहिलें तों जवळच खिडकीच्या उजेडांत फुलवाती करीत बसलेल्या हिराकडे त्याचें लक्ष गेलें. आरतीच्या वेळीं नीरांजनांत घालण्यासाठीं फुलवाती पाहिजे होत्या; त्या ती करीत बसली होती. तरी पण तिच्या कानांत ती फुगडी घुमत होती.

नुसती घुमतच नव्हती, तर फुगडीच्या गाण्यांतील प्रत्येक ओळ तिच्या मनाला अस्वस्थ करीत होती. तें फुगडीचें गाणें तिला खेदजनक वाटत असावें. तितक्यांतच तो मुलगा फटाका आणि उदबत्ती घेऊन तिच्याकडे आला आणि तिला फटाका उडवावयास सांगूं लागला. पण तिला आधीं फुलवाती करून संपवावयाच्या होत्या, म्हणून तिनें त्याच्या सांगण्याकडे लक्ष दिलें नाहीं.

मुलगा छानदार गुटगुटीत होता. त्याचा तोंडवळा देखील जवळ जवळ हिरासारखाच दिसे. गौरवर्ण तितकाच. नाकाडोळ्यांची ठेवण देखील तशीच. म्हणूनच शेजारणीपाजारणी म्हणत " किशा कसा आतेसारखा झाला आहे; छान दिसतो. "

पण हे शब्द कानांत पडले कीं, किशाच्या आईच्या आंगाचा संताप होई. आपला मुलगा आपल्यासारखा नसून आपल्या परतून आलेल्या नणंदेसारखा म्हणजे सुंदर म्हटलेला तिला खपावें कसें ? ती तिला घालून पाडून बोले. पण घरांतल्या घरांत, बाहेर ऐकूं जाईसें बोलण्यास ती धजत नसे. कारण सासरा ऐकेल तर—

हो. येशाप्पाचा तसा वचकच होता सगळ्यांना. तो घरांत सुनेलाच तेवढा होता असें नव्हे. वाड्यांत साऱ्या जणांना त्याचा वचक होता. त्याच्या शब्दाबाहेर सहसा कोणी जात नसे. तो पडवींत चिलीम ओढीत बसला होता. फुगडीच्या गाण्याचे सूर त्याच्या कानांत पडत होते. मांजरी उन्हात ओसरीला बसली आणि तिचीं पिलीं पिलीं तिच्या आंगावरून नाचूं बागडूं लागलीं कीं, त्या माजरीला जसा एका प्रकारचा आनंद होतो, तसाच समाधानाचा आनंद या क्षणाला त्याच्या मनाला होत होता.

त्याच्या कानांत फुगडीच्या गाण्यांचे व नाचाचे ध्वनि पडत होते. खळ्यांतील मंडपापासून लोंबणारे दोडके पडवळ त्याच्या नजरेला पडत होते. घरांत घुमणारा ध्वनि व दारांत दिसणारें हें दृश्य सारखेंच समाधानकारक होतें. पण तितक्यांतच त्याच्या आनंदी चेहऱ्यावर किंचित् असमाधानाची छटा उमटली.

" नको रे किश्या माकां असां इचारूं ! " असें केविलवाणेपणें उच्चारलेले उद्गार येशाप्पाच्या कानीं आले. ते शब्द हिराच्या तोंडचे होते. धाकट्या किशाच्या प्रश्नाला उत्तर देणें अशक्य झाल्यामुळें तिनें तें वाक्य उच्चारलें होतें.

आपली आत्या फटाके उडविण्यास मदत करीत नाहीं असें पाहून त्यानें एक फटाका पडवींतल्या पेळेवर ठेविला; आणि उदबत्ती पेटविण्यास तो देवघरांत जाऊं लागला. तिथेंच फुगडी ऐन भरांत आली होती. सगळ्यांनीं त्यांत भाग घेतला होता. त्याची आई देखील त्या बायकांत सामील झाली होती. पण हिरा आते मात्र फुलवाती करीत बसली होती.

आपली आवडती आते फुगडी कां घालीत नाहीं हें त्याच्या बाल मनाला समजेना. त्यानें फुगडी घालणाऱ्या सगळ्या बायकांकडे कौतु-

कानें पाहिलें. सगळ्याजणी उत्तम उत्तम लुगडीं नेसल्या होत्या. त्यांनीं छान केस विंचरून कोणी केवड्याचीं तर कोणी सोनचाफ्याचीं अशीं फुलें माळलीं होती. त्या सगळ्या जणींनीं कपाळाला कुंकूं लाविलें होतें. पण आपल्या आतेच्या कपाळाला मात्र कुंकूं कां नाहीं बरें ?

त्यानें त्या सगळ्या बायकांकडे वांकून वांकून पाहिलें व नंतर तो हिराकडे आला. हिराच्या कपाळाकडे त्यानें वांकून पाहिलें. पण हिराचें कपाळ पटपटीत !

तिच्या दोन भुंवयांच्या मध्यें टांचणीच्या पृष्ठभागाएवढा हिरवा तिलक गोंदलेला होता तेवढाच. पण किशानें आपली शंका आतेला विचारलीच. तिनें ती प्रथम ऐकलीच नाहीं. पण त्यानें जेव्हां हट्टच धरला तेव्हां हिरा त्रागून वरील वाक्य उद्गारली. त्याचा परिणाम येशाप्पाच्या समाधानसुखांत व्यत्यय आणण्यास कारणीभूत झाला.

तितक्यांतच त्या अजाण मुलानें एक चाफ्याचें फूल लडिवाळपणानें आणून आपल्या आत्याच्या बुचड्यांत खोंवलें. त्या फुलाकडे ती आशाळभूतपणानें पहात राहिली होती. फुलवाती करण्यांत आपण गुंतलों आहोंत असें जनदृष्टीला भासविण्यापुरता थोडासा ढोंगीपणा तिच्यानें केल्याशिवाय राहवेना. फुलवाती करण्यांत ती इतकी गुंतली आहे कीं, किशानें केसांत खोंवलेलें फूल देखील तिच्या लक्षांत आलें नाहीं, असें पाहणाऱ्यास वाटावें अशा रीतीनें तिनें वाती करण्याचें काम चालविलें होतें.

फुलवातीचीं फुलें तेवढींच आपल्यासारख्याच्या नशीबीं. फुलझाडाचीं फुलें आपल्याला कधींच नाहीं कां भोगावयास मिळणार ? फुलवातीचीं फुलें आरतींतून ओवाळण्याकरितां, पण तीं का स्वत: माळण्याकरितां असतात ? असे विचार तिच्या मनांत घोळूं लागले.

समुद्राच्या तळाशीं रत्नांची पखरण असते आणि त्याच्या पृष्ठभागावर रात्रींच्या शांत प्रहरीं चंद्रतारका प्रतिबिंबित होतात. तळच्या वस्तूंचीं प्रतिबिंबें पृष्ठभागावर कधींही दिसत नाहींत. मनःसागराची स्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. जाणतेपणांतलीं भूतकाळचीं चित्रें जितकीं स्पष्टपणें नजरेसमोर उभीं राहतात, तितकीं भविष्यकाळचीं कल्पनाचित्रें स्पष्ट

स्वरूप धारण करीत नाहींत. कारण भूतकाळ हा आपण अनुभवून सोडिलेला असतो.

फुलें माळण्याची कल्पना येतांच, फुलें माळण्याचे ते आपले थोडेसे दिवस कसे अकल्पित रीतीनें आले आणि कसे केव्हांच्या केव्हांच संपून गेले, याची तिला आठवण झाली. दहा वर्षांपूर्वी वयाच्या फक्त आठव्या वर्षी आपलें लग्न झालें आणि अकराव्या वर्षीच आपल्याला वैधव्य आलें. तो चित्रपट तिच्या डोळ्यांसमोरून सर्रकन निघून गेला.

आणि त्याच्याही पूर्वी ? सहा सात वर्षांचें वय असतांना केव्हां केव्हां आपल्या बाळपणांच्या खेळांत कोण बरें तो भागीदार होत असे ? तो थोरांचा असला तरी आपल्याला कसा आवडे, आणि खळ्याच्या पेळेवरील गुलाबाचें फूल त्यानें एकदां आपणास कसें माळलें होतें ? आपल्या आईनें आपणांस जेव्हां कांहीं तरी गमतीचें म्हटलें, तेव्हां तो कसा हांसला आणि आपणाला कशी लाज वाटली ? पण पांढरपेशांतला मुलगा आणि कुळवाड्याची मुलगी ! लग्न कसें व्हायचें ? आणि असल्या गोष्टी थट्टेत देखील आपण गरीब माणसांनीं बोलूं नयेत असें बाबांनीं आईला कसें बजावलें ? त्या साऱ्या गोष्टी तिला आठवूं लागल्या आणि ती खिन्न झाली.

तिचें मन शून्य झालें असलें, तरी फुगडीचे ध्वनि तिच्या कानांत पडतच होते. तिलाही फुगडींत भाग घ्यावा असें मनांतून वाटत होतें. पण त्या वाटण्याचा काय उपयोग ? पण त्या ध्वनीचा उपयोग काल्पनिक चित्रें पुसून टाकून वस्तुस्थितीकडे लक्ष देण्यास तिला प्रवृत्त करावयास झाला.

आपल्याकडे कोण बघत नाहींसें पाहून तिनें माथ्यांतलें फूल झटकन् काढून टाकलें आणि उसना राग आणून तिनें किशाला दटावलें. किशाला आतेचा उसना राग समजला असावा. म्हणूनच त्यानें भ्यायच्या ऐवजीं हिराच्या गळ्याभोंवतीं मिठी घातली.

" असां काय रे किशा ? जा खेळुंक भायर. " असे प्रेमळ शब्द हिराच्या तोंडून निघालेले येशाप्पाच्या कानीं आले. चिलमीवरील इंगळा विझत जाऊं लागलासें पाहून त्याला येशाप्पा फुंकर मारीत होता. खिन्नतेची छटा त्याच्या मुखावरून ओसरली.

त्यानें चिलीम फुंकावयास सुरवात केली. त्याची नजर समोरच्या मंडपाकडे लागली होती. गणपतीच्या मस्तकावर मंडपींतून जशीं फळें लोंबत होतीं, तशींच दारांतील मंडपावरून रसभरित पडवळ आणि दोडके लोंबत होते.

भाद्रपदमासांत वनस्पतिसृष्टींत आणि फळफळावळींत व भाजी-पाल्यांत जें जें कांहीं चांगलें म्हणून आढळेल तें गणपतीस अर्पण करावयाचें अशी भाविकांची समजूत असते. जी पालवी, जीं फळें, जीं फुलें सुंदर असतील तीं गणपतीस मंडपीला अथवा पूजेला उपयोगांत आणावयाचीं. जी भाजी स्वतःच्या मेहनतीनें तयार केली असेल, ती गणपतीला नैवेद्यासाटीं राखून ठेवावयाची हीच कोंकणच्या खेडुतांची इच्छा असते.

त्या लोंबणाऱ्या पडवळांत दोनचार देंठके होते. तिथले पडवळ अर्थात्च तोडले गेले होते. त्या देंठक्यावर साहजिकपणें येशाप्पाची नजर गेली, आणि तत्क्षणींच त्याच्या भुंवया वक्र झाल्या. इतक्यांत फटाका उडवण्यासाटीं योग्य जागा शोधणारा किशा ओरडला—

"काका—काका—काका बामण—"

"चुप्प !" येशाप्पानें दटावलें.

किशा येशाप्पाकडे येणार होता, पण येशाप्पा उठून मंडपाकडे जाऊं लागल्यामुळें तो घरांतच गेला.

येशाप्पा उठून मंडपाकडे गेला. कित्येक पडवळांच्या देंटांकडे त्यानें केंस गुंडाळून ठेवलेच होते. आणखी कांहीं चमत्कारिकसें हाताला लागेल तें तो उरलेल्या पडवळांना गुंडाळूं लागला.

पाऊस झिमझिम पडूं लागला होता. छत्री उघडून घेतलेली एक व्यक्ति आपल्या घराकडे येत असलेली त्याला दिसली. किशानें सांगितलेल्या गोष्टीचा दाखला पटला.

येशाप्पा मनांतल्या मनांत कांहीं तरी पुटपुटत होता, इतक्यांत सुमारें चाळिशीच्या घरास पोंचलेल्या त्या व्यक्तीनें येशाप्पाच्या पडवींत पाऊल टाकलें आणि पायांतली वहाण काढून छत्री तशींच उघडी जमिनीवर गळण्यासाटीं

टेविली. तो गृहस्थ बसण्याच्या विचारांत आहे, इतक्यांत येशाप्पा आंत आला व त्याला बसायला म्हपी देणार, इतक्यांत तो गृहस्थ धक्क्यावरच बसला.

तो गृहस्थ धक्क्यावर बसला हें येशाप्पाला एकापरी बरें वाटलें. कारण त्याची पाट पडवळांच्या मंडपाकडे आयतीच झाली होती. बिचारा साधा भोळा येशाप्पा! आपल्या घरीं आल्यानंतर तो गृहस्थ निसर्गांतील सौंदर्य तेवढेंच पारखणाराच नसून मानवी सौंदर्यही पहाण्यास सोकावलेला आहे हें त्याला काय ठाऊक? तो जसा खळ्यांतील निर्जीव भाजीपाल्याकडे नजर टाकतो, तशीच घरांतील सजीव सौंदर्यावर—

पण त्यानें मारलीच हांक--

" हिरा! गो हिरा—"

त्याने चंची सोडली होती. चंची सोडल्यावरोवर जर्द्याचा वास घमकन् पसरला. हिरा चटकन् उठून घरांत गेली. हिरा ज्या ठिकाणीं बसली होती ती जागा भितीआड असली तरी धक्क्यावरून खिडकींतून दिसण्यासारखी होती. तशा युक्तीनेंच तो गृहस्थ बसला होता. त्याची छाया पडतांच व जर्द्याचा वास सुटतांच फुलवातीचें काम आटोपून हिरा घरांत गेली. ती त्या गृहस्थाला दिसली. म्हणूनच त्यानें हांक मारली होती.

" काय काकांनु! वेडो होयो? " येशाप्पानें विचारलें.

" नको—पानं हवीं होतीं. शेगलावरच्या पानवेलीला पानं असणार."

येशाप्पानेंही हिराला चार पानवेलीचीं पानें आणायला सांगितलीं. त्याचा हेतु एवढाच कीं ही आलेली संक्रांत एकदा पडवळीच्या मंडपाकडे नजर टाकल्याशिवाय निघून जावी.

हिरानें पानें आणलीं. पण दाराच्या आड राहून तिनें येशाप्पाला घरांत खुणेनें बोलाविलें. येशाप्पानें घरांत जाऊन पानें आणून दिलीं. पानें ठेवतां ठेवतां त्याची नजर काकांच्या चंचीकडे गेली. चंचींत पानें भरपूर होतीं. त्याला काका बामणाच्या स्वार्थाचा तिटकारा आला.

पण काका बामणांचा स्वार्थ केवळ चंचींत पानें सांठविण्यांतच नसून

दृष्टीनें सौंदर्यपान करण्यांतही होता ना? हिराच्या युक्तीनें तो फसल्या-मुळें काका निराश झाला, पण काका बामण कसला बरताद! तो गण-पतीचें दर्शन घेण्याच्या निमित्तानें घरांत जाऊं लागला.

काका बामणानें पडवींत पाऊल टाकलें तेव्हांच त्याच्या कानांत फुग-डीचा ध्वनि पडला होता. तरण्याताठ्या पोरी जमून सायंकाळच्या सुमारास फुगडीचा रंग लुटीत आहेत हें त्याच्या तेव्हांच लक्षांत आलें होतें. कारण " **फुगडी फुलारा! देस-मल्हारा! कुणी बाई चाडी केली गांव पळाला** " हें फुगडीचे कडवें त्याला स्पष्ट ऐकूं आलें होतें. आपण आंत जाण्याचा बेत बोलून न दाखवितां एकदम आंत गेलों तरच हिरा आपणांला दिसेल असा त्याचा कयास होता. म्हणूनच तो झटकन् उठून माजघरांत गेला. आंत गेल्यावर डाव्या बाजूस गणपती बघावयास जाव-याचें पण काका बामणानें डावीकडे न वळतां प्रथम घरांतच पाहिलें. त्याला कोणीच दिसलें नाहीं. पण कोणीकडून तरी किशाच्या आईचे कर्णकर्कश शब्द त्याच्या कानांत पडले—

" थडे, थडे गणपति हा! हडे काय सोदतास—? " विजेचा धक्का बसल्याप्रमाणें काका बामणाची स्वारी मुकाट्यानें गणपतीकडे वळली. आतां त्याला गणपतीचें दर्शन घेण्याशिवाय सुटकाच नव्हती. नाहीं तर तें किशाच्या आईचे हिडिंबिचें स्वरूप दृष्टीस पडावयाचें! त्यापेक्षां काका बामणाच्या मतें गणपतीचें रूप सिंदुरमंडित व वक्रतुंड असलें तरी सहस्र-पटीनीं बरें. गणपतीच्या समोरील तरुण पोरींचा घोळका, काका बामण आले हें ओळखून, केव्हांच पसार झाला होता.

काका बामण गणपति बघीत आहेत अशी संधि पाहून येशाप्पानें गोठ्याकडे नजर फेंकली. सुदैवानें हल्लींच व्यालेली गाय अद्याप गोठ्यांत आली नव्हती.

काका बामणांचें गणपति बघणें झालें. ते मागें परतले. बाहेर धक्क्या-वर बसायला येतांना त्यांची नजर पडवळांच्या मंडपाकडे वळली. येशाप्पा त्यांना धक्क्यावर बसायला घाई घाईनें सांगूं लागला. येशाप्पाची छाती धडधडत होती.

काका बामण धक्क्याकडे येत असतां त्यांची नजर पडवळांकडेच होती. ती कांहीं तेथून ढळेना. येशाप्पा मनांत अस्वस्थ झाला.

" बसा हंय् काकानुं ! " त्यानें म्हटलें.

"येशाप्पा ," काका बामणाला स्फूर्ति होऊं लागली, " अरे येशाप्पा ! अरे पडवळ बरे लागले आहेत—"

" ओशाड पडलीं तीं पडोळीं ! " येशाप्पा मध्येंच म्हणाला. तो वैतागून गेला होता. जी गोष्ट टाळण्यासाटीं त्यानें इतके परिश्रम घेतले होते तीच नेमकी घडून आल्यामुळें त्याला अतिशय वाईट वाटणें साहजिक होतें. शिवाय त्यानें पहिलें फळ देवाला वाहण्याच्या आधींच आठ दिवसांपूर्वीच आपल्या हातानें काका बामणानें तीन चार पडवळ काढून नेले होते. त्या गोष्टीची आठवण देखील येशाप्पाला यावेळीं झाली. त्या उद्वेगाच्या भरांत त्याच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले. पण त्यांतील "पडोळीं" ह्या शेवटच्या शब्दांतील 'प' अक्षर अस्पष्ट व हलकें उच्चारलें गेल्यामुळें काकास " ओशाड पडले ते डोळे " असें ऐकूं आलें.

काकानें चंची आवरून केव्हांच खिशांत घातली होती. पावसाच्या सरीला जोर चढला होता. येशाप्पानें आपल्याला अपशब्द उच्चारले असें काका बामणाच्या मनानें घेतलें.

" काय काय म्हणतोस येशा ?" काकानें दरडावून विचारलें.

" अहो कसलीं पडोळीं ? बरीं नाय जांवक. गनेसाक नियेद घालुंक होयो आदीं. असां हुना होतंय भियां " येशाप्पानें राग गिळून म्हटलें.

" तुझ्या घरांत गणपति आहे—आणि माझ्या घरांत नाहीं वाटतें ? आं ? अडीचशें रुपयांचा कर्जखत कागद मुदत संपत आली असतां अझून कोर्टांत दावा लावला नाहीं म्हणून इतका चढून गेलास वाटतं ? कीं मुलगा मुंबईला नोकरी करतो आहे म्हणून मस्तावलास ? " काका बामणाचा पारा वाढत चालला.

" अगा पण इतके चिडतास कित्याक ? " येशाप्पानें म्हटलें. कर्जाचें वर्म काकानें काढतांच येशाप्पा बराचसा वरमला.

"चिडतास कित्याक? मला शिव्या?" दांत ओंठ खात काकानें उपरणें सांवरलें. खांकरून पिंकी टाकली. पायतण पायांत घालून छत्री उचलून घेतली आणि तो म्हणाला—"याद राख येशा! याचा परिणाम तुला लवकरच दिसून येईल!" "अगा पण—" येशाप्पाचें वाक्य पुरें व्हायच्या आधींच काका बामण रागानें पाय आपटीत निघून गेला.

पण काका बामण येशाप्पाच्या घरापासून दहा वीस पावलें देखील दूर गेला नाहीं तोंच पडवळांचा मंडप घसकन् कोसळून पडला! काका बामणानें छत्री आडून काय पडलें तें पाहिलें आणि त्यानें आपल्या चालीचा वेग चौपट केला!

पण पडवळांचा मंडप कोसळून पडलेला पाहतांच येशाप्पा कपाळावर हात घेऊन मटकन् खालीं बसला!

---

## २ : काका बामणाचा कोप!

खळयांत कांहींतरी पडल्याचा आवाज ऐकून येशाप्पाची सून बाहेर आली. तिच्या दृष्टीस तो प्रकार पडतांच, तिनें कुणाचें नांव न घेतां शिव्या हांसडण्यास सुरवात केली. येशाप्पा तिला तोंड आवरण्यास सांगूं लागला. हिरा घरामागच्या बाजूस गुलबशीचीं फुलें काढीत होती. अवाटांतलीं माणसें आज येशाप्पाच्या घरीं भजनास जमणार होतीं. मुलास मुंबईत नोकरी लागली होती; म्हणून येशाप्पानें गणपति पांच दिवस ठेवला होता. उद्यांचा दिवस पांचवा. तेव्हां वाड्यांतले भजनी लोक येशाप्पाच्या घरीं जमणार होते.

आरतीच्या ताम्हनास लावायला तेरड्याचीं फुलें आणि गणपतीच्या गळयांत हार घालावयास गुलबशीचीं फुलें हिरा मागच्या दारीं जमवीत

होती आणि पुढच्या दारी किशाची आई चंडिकेचा अवतार धारण करून मंडपास दृष्ट लावणाऱ्याला शिव्यांचीं फुलें सढळ हातानें वाहत होती !

दिवेलावणीची कातरवेळा झाली. दोडक्यांचे वेलांचीं सोनेरी फुलें यावेळीं फुलून सुशोभित दिसतात. मंडपावर डौलानें मिरवणारीं, वाऱ्यांच्या लहरींबरोबर डुलणारीं तीं सुवर्णपुष्पें यावेळीं मार्गांत मिसळलीं होतीं. ती दुर्दशा पाहून येशाप्पाच्या सुनेला दुःख झालें यांत नवल तें कसलें ? येशाप्पाला देखील संताप आला होता. पण तो फार विवेकी होता. इतक्यांत बाळा गावडे येशाप्पाच्या घरीं आला. किशाची आई हळूहळू घरांत गेली. पण घरांत देखील तिचें गालिप्रदान सुरूच होतें. घरांत जातांना ‘ अलाबला ’ करून बोटें मोडून गणपतीपुढें तिनें मंडपाला दृष्ट लावणारास जो शाप दिला तो कोणीही ऐकलाच नाहीं. तो शाप दिल्यावरच तिच्या रागाचा आवेश थोडासा ओसरला.

“ हें असं कसं झालं ?” आश्चर्यानें बाळाने येशाप्पाला पडवींत येतांच विचारलें.

“ अरे बाबा ! नशीब आपलं ! ” येशाप्पा खिन्नतेनें म्हणाला आणि कशासाठीं आलास, असें त्यानें मानेनेंच विचारलें. त्याला बोलण्याचा देखील कंटाळा आला होता.

इतक्यांत गुरें आलीं. त्यांना गोठ्यांत हिरा बांधूं लागली. किशा गुपचूप येशाप्पाजवळच बसला होता.

“ आज भजनी मंडळी जरा लौकरच येणार आहे. जेवणें झाल्याबरोबर लोक येतील ” बाळा गावडे म्हणाला.

“ इतकी घाईशी ?” येशाप्पानें विचारलें.

“ घाई म्हणजे असं–” बाळा गावडे घाईचें कारण सांगूं लागला. “ भजन आटोपल्याबरोबर इथंच भाईसाहेब जमलेल्या लोकांना चार शब्द सांगणार आहेत व लिहिण्यावाचण्याची परीक्षा घेणार आहेत. कारण दसरा झाल्यानतर सुगीची कामगत सुरू होईल. त्याच्या पूर्वींच त्यांना प्रौढांची चांचपणी घेऊन पहावयाची आहे. ”

भाईसाहेब हें नांव हिराच्या कानांत पडतांच, ती बशा बैलाला दावणीला बांधून दोन पावलें पुढें सरकली. ती बैलाचे कान खाजवण्याच्या

निमित्तानें तेथेंच राहिली, पण तिचे स्वतःचे कान भाईसाहेबांचें नांव उच्चारणाऱ्या बाळा गावड्याच्या बोलण्याकडे होतें, हें मुद्दाम लक्षपूर्वक तिच्याकडे पहाणाऱ्याच्या देखील लक्षांत आलें नसतें.

चुलीला लाकडें नेण्यासाठीं किशाची आई बाहेर आली होती. तिच्या कानांत हा मजकूर पडतांच ती आणखी उसळली. भजन आटोपल्यावर पुढें आणखी प्रौढ शिक्षणाचा वर्ग चालू होणार आणि तो आज देखील आपल्याच घरीं, हें पाहून तिला त्वेष आला होता. दिवसभर काम करून थकवा येतो. गणपतीच्या उत्सवाचे दिवस म्हणून मध्यरात्रपर्यंत भजन चालू! आणि मग स्वस्थ अंथरुणावर पडायला मिळेल तर प्रौढशिक्षण चालायचें! हें ऐकून तीं संतापल्याशिवाय कशी राहील? प्रौढशिक्षणाचें कार्य भाईसाहेबांनींच सुरू केलें होतें. त्यामुळें तिला भाईसाहेबांचा फार राग येई. ह्याताऱ्या कोताऱ्या माणसांस देखील आतां यानंतर शिकवायचे हे चाळे कसले खुळ्यासारखे चालले आहेत याचें तिला कोडें उमगत नसे. एवढा थोरला पंचावन्न वर्षांचा आपला सासरादेखील आतां धुळाक्षरें शिकायला लागला हें पाहून तिला साश्चर्य संताप येई. पण भाईसाहेबांना ती कधींच अपशब्द बोलत नसे. त्यांच्याविषयीं तिला आदर होता. त्यानें असले वेडेचार करूं नयेत इतकेंच तिचें म्हणणें असे.

आज भाईसाहेब येणार हें ऐकून येशप्पाला जरा बरें वाटलें. आपल्यावरील काका बामणानें आणलेलें संकट त्यांस कळवून कांहीं उपाय सुचतो तर विचारावयास मिळेल अशी त्यास आशा उत्पन्न झाली.

आणखीही कुणालासें बरें वाटलें, भाईसाहेब रात्रौ येणार या बातमीमुळें. गुलबशीचा हार तिनें तयार केला होता, तो परडींत ठेवायच्या निमित्तानें ती देवघरांत गेली. तिच्या हातांत लपवून घेतलेली फणी होती. गणपतीकडे दोन बाजूस दोन समया तेवत होत्या. त्या दिव्यांच्या प्रकाशांत सिंदुरमंडित गणरायाचें विशाल दोंद तकाकत होतें. वातींचे चुचळे मोडून तिनें त्या काडीनें पुढें सारल्या. दिव्यांचा प्रकाश झगझगीत पडूं लागला. डाव्या हाताच्या मुठींत तिनें कुंकवाची डबी घेतली होती. तिनें ती मूठ उघडली. पण कशाकरितां?

कुंकूं लावण्याकरितां ? छे ! त्या कुंकवावर तिचा हक्क नव्हता. आपल्या कुंकवाचा धनी जो असावा अशी तिची मनीषा होती तो आपल्याला या जन्मीं मिळणें शक्य नाहीं अशी तिच्या मनाची पक्की खात्री होती. तिच्या इच्छेविरुद्ध कुंकवाचा मालक जो वडील माणसांनीं ठरवून दिला तो इहलोक सोडून गेला होता. मग ती कुंकूं कशी लावील ? तरी पण तिनें मूठ उघडली आणि रुपाया एवढ्या आकाराच्या कुंकवाच्या डबीच्या दिडकीएवढ्या आरशींत आपलें प्रतिबिंब पाहून तिनें कपाळावरचें केस फणीनें झटकन् नीट करून घेतलें.

हिरानें आरशीसारखें—कुंकवाच्या डबीसारखें–कांहीं तरी नेलें, इतकी अंदेशा किशाच्या आईला आली. तिनें हलक्या पावलांनीं येऊन दाराआडून पाहिलें, तर हिरा केंस निटावीत आहे. तिच्या मनांत कसलीशी शंका आली.

“ तरच लोकां तोंडावर थुकतत तीं ! ” तिनें टोमणा दिला. हिराला मरणप्राय दुःख झालें. तिनें दीनवाणेपणानें गजाननाच्या मूर्तीकडे पाहिलें. गजाननानें तिची मूकप्रार्थना ऐकिली असेल काय ?

गजाननाच्या मागच्या बाजूच्या भिंतीवर फार मोठ्या आकाराचें कमळ रंगविलें होतें. त्या कमळाच्या दोहों बाजूंस तांबड्याच रंगांत सुरूचे खांब रंगविले होते. ते उंचच उंच सुरूचे खांब चहाच्या पेल्याएवढ्या आकाराच्या कुंड्यांत उभे केले होते ! कुंड्यांच्या शेजारीं मोठे मोठे कोंबडे रंगविले होते. कोंबड्यांच्या मस्तकावर गांवदेवाच्या देवळांतले तरंग रंगविले होते. बहुतेक रंगकाम तांबड्या रंगांतलें होतें. हा तांबडा रंग धावाचा केलेला असतो. खडूनें सफेत केलेल्या भिंतीवर धावाचा तांबडा रंग घवघवीत दिसतो. पिवळ्या रंगाचें काम हळकुंड उगाळून आणि हिरवा रंग कार्लीच्या वेलांचीं पानें चुरडून तयार केलेला असतो. काळ्या रंगाला कोळसा उपयोगी पडतो.

त्या विशाल कमळाच्या खालच्या बाजूस एक गणपतीचें चित्र लावलेलें होतें. त्यांतील गजाननाच्या मूर्तीच्या दोन्ही बाजूंस दोन सुंदर स्त्रिया ऋद्धिसिद्धी उभ्या होत्या. त्याच चित्राकडे हिरा लक्षपूर्वक पाहत

होती. पण तिचें लक्ष बाहेरील बोलण्याकडे वेधलें. कारण भजनाचा बेत नक्की ठरून बाळा गावडे जाऊं लागला होता.

बाळा गावडे आणि येशाप्पा यांनीं बरीचशी चर्चा करून ठरविलें कीं, आधीं प्रौढशिक्षणाचा वर्ग घ्यावा आणि मग भजन सुरू करावें. म्हणजे भजनाला कितीही रात्र झाली तरी हरकत नाहीं. येशाप्पाची ही सूचना बाळा गावडे यास रुचली व तो तसें भाईसाहेबास सांगावयास निघाला.

प्रौढ शिक्षणाच्या कार्याबद्दल बहुतेक लोक साशंक व निराशावादी असले तरी येशाप्पाला त्या प्रयत्नाचें कौतुक वाटत होतें, व त्याला कारणेंही अनेक होतीं. त्याला आतांपर्यंत जगांत साक्षरतेचा दुरुपयोग करणाऱ्यांच्या कारवाईपासून जे टक्के टोणपे खावे लागले होते, त्यांवरून त्याला स्वतः आत्मरक्षणासाठीं तरी साक्षर व्हावें असें वाटूं लागलें होतें. तो स्वतः भाविक असल्यामुळें तुकोबाचे अभंग त्याला वाचण्याची फार इच्छा होई. पण पाठांतर पुष्कळ असूनही त्याला वाचतां येत नसे; याबद्दल त्याला पश्चात्ताप होई. आतां तरी वाचतां आल्यास पहावें, म्हणून तो आनंदानें भाईसाहेबांच्या वर्गांत दाखल झाला.

पण या प्रौढशिक्षणवर्गाचा त्याला जो जिव्हाळा वाटे त्याचें आणखी एक निराळेंच कारण होतें. तो वर्ग चालविणाऱ्या तीन व्यक्ती होत्या. भाईसाहेब हे मूळ उत्पादक व चालक; आणि बाळा व हिरा हीं दोघें त्या वर्गाचीं सहाय्यक होतीं. या तिघांच्या खटपटीनें तो वर्ग सुव्यवस्थितपणें चालला होता. त्या वर्गांतील स्त्रीपुरुषांस बरेंचसें लिहितां वाचतां येऊं लागलें होते व आज त्यांच्या अभ्यासाची चांचपणी व्हावयाची होती. त्यांच्या कार्यावर येशाप्पाचा विश्वास बसण्याचें कारण असें कीं त्याला स्वतःला थोडेंसें लिहायला व बरेंचसें वाचायला येऊं लागलें होतें. त्याला वर्गांत दाखल होऊन जरी दीड वर्ष झालें होतें, तरी प्रत्यक्ष अभ्यासाची मुदत नऊ दहा महिनेच भरली असती. इतक्या अवधींत मोठ्या टाइपांतला मजकूर येशाप्पाला हळूहळू वाचतां येत असे.

बाळा गावडे हा आंबेखोल गांवच्या शाळेंतच शिकला होता. पांच इयत्ता पुऱ्या झाल्यावर त्याला घरीं शेतीकरितां रहावें लागलें होतें. पण

वाचनाची त्याला गोडी असल्यामुळें त्यानें आपलें शिक्षण ताजें राखलें होतें. नंतर नोकरीच्या खटपटीसाठीं तो मुंबईस कांहीं दिवस राहिला होता. पण गांवांत राहून शेतसुधारणा करून पोट भरण्यांतच आपलें खरें कर्तव्य आहे असें भाईसाहेबांच्या उपदेशावरून खात्री झाल्यामुळें तो आंबेखोलास शेती करून राहिला होता, म्हणून त्याला भाईसाहेबांचा सहाय्यक होण्याचा मान मिळाला.

पण हिराची गोष्ट अगदींच निराळी होती. तिसऱ्या इयत्तेंतूनच तिला शाळा सोडावी लागली होती. तिला स्वतःचें शिक्षण थोडें तरी-निदान लिहिणें वाचणें-पुढें चालू झाल्यास पहावयाचें होतें. प्रौढशिक्षणाची चळवळ तिच्या पथ्यावर पडली. कारण निरक्षर स्त्रियांना शिकवण्याचें तिनें पत्करलें. त्यासाटीं तिला दोन तीन स्त्रिया मारून मुटकून शिकण्यासाटीं तयार कराव्या लागल्या. त्यांतच तिनें आपलें वाचन भाईसाहेबांच्या देखरेखीखालीं व बाळाच्या मदतीनें पुढें चालविलें.

हिराची आई असतांना हिराचे लाड करी. आपली हिरा जशी रूपानें सुंदर, रंगानें गोरी तशीच नशिबानें भाग्यवान होईल असें तिला वाटे. म्हणून तिनें मोठ्या प्रयासांनीं हिराला शाळेंत पाटविण्याची संमति मिळविली होती. तिचा भाऊ शाळेला जात असे, तो तिला बरोबर नेत असे; हिरा शिकायला चांगल्यापैकीं होती. तिचा अभ्यास पाहून शिक्षकांस आश्चर्य वाटे. भावाच्यापेक्षां अभ्यासांतील बुद्धि तिचीच अधिक तल्लख असल्याचें शिक्षकांना दिसून आलें होतें. ती भराभर शिकलीही असती, पण तितक्यांत तिचें लग्न जुळलें आणि शिक्षण आटोपलें.

भाईसाहेब देखील त्यावेळीं शाळेंत जात असत. ते त्या शाळेंतील तेव्हां शेवटच्या वर्गांत होते. नंतर त्यांनीं हायस्कूलमध्यें नांव घातलें. हिराची कुशाग्र बुद्धि त्यांना ठाऊक होती. साक्षरतेचा प्रसार निरक्षरांत करावयास तीन चार इयत्ताच कशाला? एक दोन इयत्ता शिकलेलें पण हुषार असें माणूस देखील चालतें. हिरानें पुढाकार घेतल्यास कदाचित् कांहीं स्त्रिया शिकावयास जमतील असें भाईसाहेबांस वाटलें होतें व ती त्यांची अटकळ खरी ठरली. तेवढ्या एका वर्षाच्या अवधींत हिरानें

घरकाम व शेतीकाम करून देखील आपलें लेखन वाचन बरेंचसें वाढविलें.

बाळा गावडे गेल्यावर येशाप्पा उठला. त्यानें जड पावलांनींच व जड अंतःकरणानें आपलें काम करावयास सुरवात केली. त्यानें पहिल्यानें गवाणींत ओलें गवत टाकलें. बैलांची पाठ थोपटली आणि पुढच्या कामास लागला.

पण बैलाची—त्या बशा बैलाची पाठ थोपटीत असतांनाच काका बामणानें दिलेल्या धमकीची येशाप्पाला आठवण झाली. अडीचशें रुपये म्हणाला ना ? शंभर रुपये तर आपण सारे घेतले. त्यांचें वर्षाचें व्याज रुपये पंधरा व इतर खर्च दहा रुपये मिळून सवाशें रुपयांचा कागद केला. त्याचे दोन वर्षांत अडीचशें रुपये कसे होतील ? कागद सवाशें रुपयांचा केला तरी रोख शंभर रुपयेच दिले. पण त्याला आपण संमति तरी दिली होती. तरीही पण हे अडीचशें रुपये कसे झाले ?

बैलाच्या पाठीवरून हात काढून त्यानें घराच्या छपराकडे नजर फिरविली. कारण तितक्यांत पाल चुकचुकली ! येशाप्पाचें काळीज चरकले. मोडावयास आलेलें घर दुरुस्त करावयास आणि एक बैल ऐनवेळीं मेल्यामुळें बसलेलें जोत उभें करावयास त्याला हे शभंर रुपये दाजीसाहेबांकडून कर्जाऊ घ्यावे लागले होते. अडीचशें रुपये ! बैलाच्या पाठीकडे आणि घराच्या छपराकडे त्या रुपयांचा संबंध अशा तऱ्हेनें पोंचत होता.

उलट्या काळजाचा काका बामण ! काय कारस्थान करील त्याचा नेम नाहीं. आंबेखोल गांवच्या साऱ्या कुणबाऊ लोकांस त्याची दहशत होती. दाजीसाहेब पतकरले, पण हा त्यांचा कारभारी बाळकोबा ऊर्फ काका बामण नको, असें सर्वांस वाटे. येशाप्पाला उदास वाटूं लागलें. त्याचें कशाकडे लक्ष लागेना. पण चिंता करून काय होणार आहे ? गणराज हाच विघ्ननाशक नव्हे का ? त्या गणरायाचें ध्यान करण्यानेंच मनाला कांहीं शांति मिळाली तर. येशाप्पा देवघरांत जाऊन गणरायासमोर हात जोडून बसला.

हिरा देवघरांतून मधांच निघून घर कामांत भावजयीस मदत करीत होती. तिचा भाचा निजावयास आला होता. तो आपल्या आत्याला

मांडीवर घालावयास सांगत होता. हिरानें किशाला मांडीवर घातला आणि ती आपल्या गोड गळ्यांत अंगाई गाणीं म्हणूं लागली कीं, त्याला गोड झोंप लागे. हिराच्या मधुर गळ्यांत कल्पनातीत जादू होती.

पण किशाच्या आईला त्यामुळें फार हेवा वाटे. आपला सोन्यासारखा मुलगा, पण आपल्याकडे फारसा न येतां, हिराच्या पाठीमागून लोंबतो हें तिला सहन होत नसे. तिनें मघाशीं हिराला टोमणा मारला आणि त्याच टोमण्याची मध्यवर्ती कल्पना धरून, तिच्याभोंवतीं अनेक लोकवदंतांचीं पुटें चढवून तें लोकनिंदेचें भडक चित्र हिराभोंवतीं ती उभी करीत होती. तिची सारखी धुसफूस चालली होती.

दोन तासांपूर्वी तें शेतकरी कुटुंब किती सुखी होतें? त्या घरांत सारें आनंदाचें वातावरण खेळत होतें. आणि आतां? काका बामणाचा पाय लागला आणि सारा देखावा पार पालटून गेला!

त्या उदास स्थितींत देखील आतां भाईसाहेब येणार व अवाठकरी लोक भजनासाठीं जमणार या विचारानें येशाप्पा घरांत वावरत होता.

आणि भाईसाहेब याच वेळीं आपल्याकडे येणाऱ्या पाहुण्याची सोय कशी करावी या विचारांत होते. दोन तीन तासांपूर्वी ते तालुक्याच्या गांवाहून आले होते. आल्यावर त्यांनीं आपलें टपाल पाहिलें. त्यांत त्यांना आपला कॉलेज मित्र वसंतराव गोरे येणार असल्याचें पत्र मिळालें. त्याची नीट व्यवस्था कशी ठेवावयाची या विचारांत भाईसाहेबांच्या माडीवरून खालीं व खालून माडीवर अशा येरझारा पडत होत्या. जेवणें नुकतींच आटोपलीं होतीं. दाजीसाहेब स्तोत्राचा पाठ म्हणत सदरेवर शतपावली घालीत होते. सदरेवरील कडीपाटाला मध्यभागीं दिवा टांगला होता. पण त्यांत दिवा लावला नव्हता. सदरेवरील पूर्वेच्या बाजूला असलेल्या खोलींत जावयास जें दार होतें, त्याच्या जवळच भिंतीला खिळा ठोकून चिमणी लावली होती. त्यांतील दिव्याचा प्रकाश सदरेवर पडला होता. पण शतपावली करीत असतांना दाजीसाहेबांनीं तो प्रकाश मुद्दाम कमी केला होता. पश्चिम बाजूच्या खोलीकडूनच माडीवर जाण्याचा जिना होता.

दाजीसाहेबांचा स्तोत्रपाठ आणि खलबत्त्यांत कुटून दिलेला विडा चघळणें हीं दोन्ही कामें एकदमच चाललीं होतीं. पण दांतांत सुपारीचा कण रिघला कीं त्यांचा स्तोत्रपाठ तितक्यापुरता थांबे व ते कटड्याच्या जाळीपाशीं थुंकायला येत. सदरेच्या कांठाला अर्धी भिंत असून वर लोखंडी जाळी लावली होती व त्या जाळीला तांबडें रोगण लावलें होतें. त्या जाळींतून बाहेर थुंकत असतां तांबड्या पिंकीचे डाग जाळीवर पडले तरी ते दिसण्यांत न येण्यासारखी सोय झाली होती! ते थुंकायला जाळीपाशीं आले कीं त्यावेळीं चिमणीच्या प्रकाशाच्या आड आल्यामुळें त्यांची जी सावळी खळ्यांत पडे, त्या सावलींत भाईसाहेबांनीं आंगणांत ठेवलेल्या अनेक फुलझाडांच्या कुंड्या गडप होऊन जात! दाजीसाहेबांच्या मनाला तें दृश्य पाहून धन्यता वाटे. आपल्या एका माणसाच्या सावलीनें अनेक कुंड्या अंधारांत टाकल्या जातात! काय मौज!

ते दिव्यापासून थोड्या अंतरावर असणाऱ्या जाळीपाशीं गेले व थुंकूं लागले. सर्वत्र खळें त्यांच्या काळ्या आकृतीच्या सावलीनें झांकलें गेलें. ते मागें परतून स्तोत्र म्हणूं लागले.

ध्वजाग्रीं उचली बाहो आवेशें लोटिला पुढें
काळाग्नी काळरुद्राग्नी देखतां कांपती भयें.

स्तोत्र—पाठांतल्या या ओळी म्हणत असतांना आपलें स्वतःचें रूप पाहतांच कुळें कशीं कांपतात याचें चित्र त्यांच्या नजरेसमोर येऊं लागलें. पण नंतर ते पुन्हां खांकरले. सावलीचा चमत्कार पाहण्याचें काम बरबर चाललें होतें. त्यांचें मन अस्वस्थ नसतें तर या गमतीनें त्यांना खरोखरच मौज वाटली असती. पण यावेळीं त्यांचें मन प्रसन्न नव्हतें हें त्यांच्या वारंवार खांकरण्यानें सिद्ध होत होतें. राग आला असतां हुंकारपूर्वक खांकरण्याची त्यांची संवय होती. तोच प्रकार आज सारखा सुरू होता. त्यावरून आज ते कोणावर तरी मनांतल्या मनांत रागावले आहेत असें त्यांची माहिती असलेल्या माणसास वाटलें असतें. भाईसाहेबांनीं वडिलांचें हें लक्षण केव्हांच ओळखलें होतें. भाईसाहेब माडीवरील आपल्या खोलींत कांहीं वेळ बसले व नंतर ते गच्चीवर येऊन उभे

राहिले. त्यांनीं गच्चीवरून खालीं नजर फेंकली. स्तोत्रपाठ म्हणत-फिरत असतां मधून मधून निघणारा हुंकार त्यांच्या कानीं आला. आंगणांतील कुंड्यांवर पडणारी त्यांची सावलीही भाईसाहेबांना दिसली. थोड्याच वेळांत त्यांना येशाप्पाच्या घरीं वर्ग चालवावयास जावयाचें होतें. त्यांनीं आज जमलेल्या कृषीवल वर्गास काय काय सांगायचें तें आपल्या मनाशीं ठरविलें. विद्यादाता गणराज हें दैवत कोणत्या प्रकारचें आहे व विद्या संपादन म्हणजेच साक्षरता हेंच गणपति–पूजन खरें कसें ? याविषयीं गांवकऱ्यांस समजूत कशी द्यावयाची याची त्यांनीं तयारी केली त्यानंतर ते माडीच्या गच्चीवर आले.

माडीच्या गच्चीवरून गांवाचा बराचसा विस्तार दिसत असे. आज भाद्रपद शुक्ल सप्तमीच्या रात्रीं बाकी कांहीं दिसलें नाहीं तरी गांवकरी लोक येशाप्पाच्या घरीं जमताहेत किंवा नाहींत हें काळोखांतून दिसणाऱ्या कंदिलांवरून समजून येण्यासारखें होतें. त्यासाठींच ते गच्चींत आले होते. येशाप्पाचें घर त्यांच्या बंगल्याच्या डावीकडे–पश्चिमेच्या बाजूस सरासरी पाव मैलावर होतें. कंदील व चुडी येशाप्पाच्या घरीं जात असलेल्या त्यांना दिसल्या. मधूनच एकाद्या टाळाचा आवाज, किंवा गझलाच्या चालीवर म्हटलेल्या अभंगाची एकादी लकेर त्यांच्या कानावर आली. त्यांचा चेहरा प्रसन्न झाला. पण तितक्यांत खालून दाजीसाहेबांचें तें खांकरणें आणि तो हुंकारही त्यांच्या कानीं आला.

" कांहीं तरी बिघडलंय खास! ... .. " असें अर्धवट स्वतःशींच ते बोलले. सदरा, कोट व टोपी चढवून ते खालीं उतरले. खिशांत इलेक्ट्रिक् टॉर्च त्यांनीं आहे कीं नाहीं तें चांचपून पाहिलें. चार पांच पुस्तकें हातांत घेतलीं. आंगावर घ्यावयाचें घोंगडें व छत्री घेतली.

इतक्यांत त्यांना वसंतराव गोऱ्यांच्या पत्रांतला मजकूर पुन्हा पहावासा वाटला. वसंतराव गोरे नक्की कधीं येणार ती तारीख त्यांना फिरून नीट पहावीशी वाटली. त्यानीं खिशांत हात घातला. पत्र खिशांतच होतें. आपल्या टेबलावरचें पत्र आपण खिशांत कां बरें घातलें! बरोबर! वसंतराव आल्यावर प्रौढशिक्षण वर्गाचा विशेष समारंभ

करावयाचा होता. त्यासंबंधीं कार्यक्रम ठरविण्याकरितां आपण हें पत्र खिशांत ठेवलें हें त्याना आठवलें. त्यांच्या कानांत स्तोत्रपाठाच्या पुढील ओळी पडल्या.

**नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा भृकुटि त्राटिल्या बळें.**

आणि भाईसाहेबांवर नजर जातांच दाजीसाहेबांच्याही भुंवया वक्र झाल्या होत्या. मात्र भाईसाहेबांचें तिकडे लक्ष नव्हतें इतकेंच.

पत्र वाचण्याकरितां म्हणून भाईसाहेब चिमणीपाशीं गेले. प्रकाश अंधुक होता. तो त्यांनीं जरा मोठा केला.

" हूंः !—कशाला दिवा मोठा केला ? " दाजीसाहेबांनीं त्रासिक स्वरानें विचारलें. आपण विसर्गाक्षराचा उच्चार करतांना तोंड मिटलेलें ठेवून श्वासनलिकेंतील वायूला बाहेर घालवितांना झटकन् अवरोधाचा हिसडा दिला असतां जसा ध्वनि बाहेर येईल, तसा तो दाजीसाहेबांचा " हुंः " कार होता. तो हुंकार त्यांच्या तीव्र नापसंतीचा द्योतक असे.

भाईसाहेबांनीं कांहीं उत्तर न देतां पत्र दिव्याच्या उजेडांत पाहून तें खिशांत घातलें. " माडीवर दिव्याचा धमाटा पेटत असेलच एखादा ! —हुंः ! " दाजीसाहेबांनीं दुसरा आघात केला. पण तो त्यांनीं मुलाला चिडविण्याकरितां मुद्दामच केलेला होता. खरें म्हटलें असतां जाळीकडे जाऊन जेव्हां ते विड्याची पिकी थुंकून टाकीत होते तेव्हां त्यांची नजर आंगणाकडे जी जाई, ती माडीवर पेटलेल्या दिव्याचा प्रकाश आंगणाच्या बाहेरील फुलझाडांवर पडला आहे कीं नाहीं हें हेरण्यासाठींच. त्यांना तसा प्रकाश दिसला नसतांही त्यांनीं तो आरोप भाईसाहेबांवर केलेला होता.

" माझा एक स्नेही यायचा आहे, त्याचं पत्र पाहिलं. " भाई-साहेब शांतपणें म्हणाले. असें म्हणत असतां त्यांनीं दिव्याचा प्रकाश पूर्वीप्रमाणें अंधुक करून ठेवला.

" कशाला येतोय स्नेही ? हुंः ! काय येणार आहे घेऊन ? उगाच चारी वाटांनीं उधळपट्टी ! रिकामटेकडे उपद्याप सगळे ! नोकरी नाहीं धंदा ! सांठवलेली पुंजी किती दिवस टिकणार ? " हें वाक्य उच्चारतांना

दाजीसाहेबांनीं फ्लॅनेलच्या वास्कुटाचा कंबरेवरील दोन्ही बाजूंकडचा भाग दोन्ही हातांनीं खालीं ताणला, आणि त्यांनीं शतपावली चालू केली. स्तोत्रपाठही सुरू झाला. पण स्तोत्रांतील शब्द देखील क्रोधमिश्र स्वरांत निघूं लागले. उच्चारावयाचे शब्द रसानुकूल स्वरांत साभिनय व्यक्त करूं पाहणाऱ्या नटाचेंच ते जणूं अनुकरण करीत होते. मारुतीचें भीमरूपी स्तोत्र इतकें साभिनय आजवर कुणीही म्हटलें नसेल—

सुवर्ण कटि कासोटी घंटा किंकिणि—

पण स्तोत्राची ती ओळही पुरी न करतां ते पुन्हा म्हणाले—" कोण आहे हा स्नेही? आणि कशाला येतोय? "

" तो माझा कॉलेजांत असतांना पासूनचा मित्र आहे. एका वर्तमानपत्राचा सहकारी संपादक आहे. मुंबईच्या सिनेमा कंपनींत तो भागीदारही आहे.— "

" काय शिकलाय तो? " भाईसाहेबांना मध्येंच थांबवून त्यांनीं विचारलें, " तुझ्याच इतकं वाटतं? "

" नाहीं, तो एम. ए. झाला नाहीं. बी. ए. झाल्यावर तो वर्तमान पत्राच्या कचेरींतच राहिला. त्याला लेखनाचा होताच नाद थोडासा— " भाईसाहेब चटकन् बोलून गेले. पण आपल्या शब्दांचा परिणाम काय होणार आहे इतका पोंच त्यांना राहिला नव्हता.

" हुं! बी. ए. होऊन तो नोकरीला राहिला, आणि तूं? तूं एम्. ए. व्हायला गेलास. फार तर मॅट्रिक म्हणजेच पुरें होतं. मी नको नको म्हणत असतां हट्टानं पुढं शिकायाला गेलास? आणि परिणाम काय? तर एम्. ए. होऊन घरीं बसलास! अं? तरी असेल नाहीं त्याला पगार चांगला शेंपाचशें रुपये?

सुवर्ण–कटि कासोटी घंटा किंकिणि नागरा. "

भाईसाहेबांना आपली चूक उशीरां कळून आली. पण खोटें बोलून वेळ मारून नेण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता.

" सहसंपादकत्वाचा पगार कांहीं फारसा मिळत नसावा. शें–शंभर रुपये असेल. पण सिनेमा फिल्म कंपनीकडून कांहीं प्राप्ति होत असावी. "

" आणि तूं इतकी शाई खर्च करतोस इतके कागद नासवतोस, टपालाला नेहमीं इतके पैसे खर्च करतोस!-तुला त्या मानानें पोट भरण्याइतके तरी पैसे मिळतात काय ? तुला लाज नाहीं वाटत ? रिमेंच्या रिमें लिहून जर तुला वर्तमानपत्रांकडून मोबदला मिळत नाहीं, तर इंग्रजी पांच सहा इयत्ता शिकून कोर्टकचेऱ्यांत नकला काढणारे उमेदवार रे काय वाईट ? इतके दिवस मी तुला सांगत आलों, कांहीं नोकरी बघ म्हणून. तुला मास्तरगिरी करायची हौस असेल, तर एकाद्या हायस्कुलात कां नोकरी करीत नाहींस ? हलकट लंगोटे–शेतकरी धनगर जमवून त्यांना र–ट–फ शिकविण्यांत आयुष्याचा अपव्यय करतोस हा काय शहाणपणा झाला ? तुझ्या अभ्यासासाठीं खर्च केलेल्या रकमेवर व्याज तरी सुटायला पाहिजे होतें ! पैशाची माती केलीस ! असलेला पैसा संपवून टाकलास. नवीन स्वतःच्या करामतीनें मिळविण्याची अक्कल नाहीं--अं ? आणि आमच्या पूर्वार्जित धंद्यांत लक्ष घालशील म्हटलं तर आमचं शेतच खणून टाकायला उठलास — अं ? "

" शेतच खणून टाकायला ? म्हणजे ? " भाईसाहेबांनीं, दाजीसाहेबांच्या गहन उपमेचा अर्थ न समजल्यामुळें विचारलें. भाईसाहेब चिमणीजवळच भिंतीला टेंकून उभे राहिले होते.

" हुं: ! अरे, ज्या शेतांतून पीक निघायचं, तें शेतच खड्डे खणून जसं खराब करून टाकावं, तसंच तूं अपकृत्य नाहीं का चालवलं आहेस ? अरे, कुणब्यांना शिकवून आणि त्यांना शहाणे करून का कुणाला धनीपणा गाजवायला आणि सावकारी चालवायला मिळेल ? अरे तुमच्या शिकलेल्या लोकांच्या अकला तरी गेल्या कुठं ? अरे, कुणबी–शेतकरी शिकले, तर गडी माणसं कुठलीं मिळायचीं ? त्यांना हिशेब ठिशेब येऊं लागले, तर व्याजबट्ट्याचा धंदा कसा चालायचा ? अरे, डोळे उघडा, कांहीं विचार करा. आपल्या हातांनीं आपल्या उरावर दगड घालून घेऊं नका. आतां रात्रीं कशाला चालला आहेस त्या कुळंबटांत ? तुझ्या फुसलावणींनं ते सारे रयत लोक शेफारून गेले आहेत. आमच्या वसूल-

दारांना देखील जुमानीनातसे झाले आहेत; आणि याला कारण तुझी फूस!"

दाजीसाहेबांचे ओंठ बोलतां बोलतां थरथरूं लागले. त्यांच्या झोंपावयाच्या खोलींतून अंथरूण घातल्याचा आवाज येऊं लागला. खोबऱ्याच्या फेणीच्या तेलाची वाटी बाहेर ठेवली गेली. स्तोत्रपाठ संपविण्याची वेळ झाली अशी सूचना दाजीसाहेबांना मिळाली. त्यांच्या मनांत मुलाची आणखीही कानउघाडणी करावयाची होती. पण आज त्यांनीं इतक्यावरच संपविलें—

## रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती

दाजीसाहेब खोलींत गेले. गडी सदरेवर रात्रीं निजत असे, तो निजावयास आला. चिमणींतील दिवा दाजीसाहेबांनीं आंत जातांना मालवला.

भाईसाहेब प्रौढ शिक्षणाचा वर्ग चालविण्यासाठीं येशाप्पाच्या घरीं जाण्यासाठीं घराबाहेर पडले. रात्रौ घरीं आल्यावर गडी त्यांना दार उघडणारच होता.

भाईसाहेब बाहेर पाऊल टाकीत असतानांच डोकीवर तेल चोळीत असतांनाचा चकचक आवाज कानीं आला. झोंपावयाला जावयाच्यापूर्वी डोकीला तेल मारून घेण्याची दाजीसाहेबांची संवय होती.

तेल चोपडण्याचें काम केव्हां म्हादू गडी तर केव्हां मावशी करीत असे. जिनें तेलाची वाटी बाहेर ठेवली होती, आणि जी सैंपाकीण या नांवाखालीं दाजीसाहेबांच्या बंगल्यावर मालकीणीसारखी कारभार चालवी, तीच ही मावशी म्हणायची.

ती जेव्हां तेलाची वाटी बाहेर ठेवून बिछाना घालण्यास गेली, तेव्हां जर तिचा चेहरा पाहिला असता, तर मुलाची खरडपट्टी काढतांना दाजीसाहेबांस पाहून मनांतल्या मनांत झालेल्या आनंदाच्या गुदगुल्या कृत्रिमतेनें धारण केलेल्या निर्विकार मुद्रेनें झांकण्याचा प्रयत्न ती करीत असल्याचें दिसलें असतें.

# ३ : दस्तऐवजांचा कारखाना!

वडिलांच्या मनावर आज कांहींतरी प्रयोग झाला आहे हें भाईसाहेबांनीं ओळखलें होतें. त्यांनीं बोललेलें मुकाट्यानें ऐकून घ्यावयाचें, पण आपल्या मनोदेवतेला जें योग्य वाटेल तेंच व्यवहारांत आचरावयाचें असें त्यांचें वर्तन असे. त्यांच्याबरोबर युक्तिवाद करून भाईसाहेबांनीं हात टेंकले होते. म्हणूनच ते आपल्या प्रौढशिक्षणाच्या कार्याचा ठराविक बेत पार पाडण्यासाठीं येशाप्पाच्या घरीं निघून गेले.

येशाप्पाच्या घरीं मंडळी जमत होती. जमलेल्या लोकांच्या गप्पा चालल्या होत्या. प्रौढशिक्षणाचा व भजनाचा हा आजचा कार्यक्रम नसता, तर डोकीवरून पांघरूण घेऊन येशाप्पा चिंताग्नींत होरपळत अंथरुणावर पडला असता. काका बामणानें दिलेली धमकी त्याला थरारून सोडीत होती. पण काका बामण गेल्यापासून आज त्याला चिंता करीत बसायला फारशी सवडच मिळाली नव्हती.

पाऊसपाणी आणि पीक यासंबंधींच्या ठराविक गप्पा झाल्यावर कोसळून पडलेल्या पडवळांच्या मंडपाचा विषय निघाला. प्रत्येकानें आपापणास ठाऊक असलेला काका बामणाच्या नजरेच्या प्रभावाचा अनुभव सांगावयास सुरवात केली.

पहिल्यानें शिदू गवळ्यानें आपला अनुभव सांगितला. त्याची म्हैस व्याली होती. चांगली दुधाळ होती ती. तिला तो घेऊन चालला असतां त्या गृहस्थानें पाहिली. " तुझ्या म्हशीची ओटी बरीच मोठी आहे रे! किती दूध देते ही? " असा प्रश्न त्यानें केला. म्हैस घरीं जातांच आजारी झाली. तिची ओटी सुजून ती दगडासारखी घट्ट झाली. तिला म्हैस स्पर्श देखील करून घेईना. वासराच्या तोंडाचा देखील स्पर्श करून घेईना. अद्याप त्या म्हशीची ओटी तशीच लोखंडासारखी घट्ट होऊन राहिली आहे.

लखू परटाची कपडे वडविण्याची एक छानदार गुळगुळीत पाथर होती. काका बामणाच्या ती नजरेस पडली. “ किती छान पाथर आहे ही, लखू!” असें शब्द त्या महात्म्याच्या तोंडून निघाले मात्र. शिळा दुभंग झाली!

नागूजी ढापळ्याचा आंबा चांगला लागला होता. त्यांतल्या त्यांत एका फांदीला आंबे खूप लागले होते व त्याजवर रंगदेखील छान आला होता. “ गोड आहे काय रे हें झाड? आंबे बरे लागले आहेत. मिळतील तुझ्या पोरांबाळांना खायला!” असें त्या सद्‌गृहस्थानें म्हटलें म्हणे. कंपाउंडांतून तो बाहेर पडला तोंच फांदी काड्‌कन मोडून पडली! नागूजी ढापळ्यानें ही हकीकत सांगतांना ती आठवण होऊन त्यानें काका बामणाला एक इरसाल शिवी दिली. सगळे जण हांसले. काका बामणाच्या दृष्टिप्रभावाचें हें पुराण बराच वेळ चाललें होतें. त्यांत शेंकडों अनुभव लोकांनीं सांगितलें. मग त्या गोष्टींवर चर्चा सुरू झाली. काका बामणाला लोक खूपच शिव्या देऊं लागले तेव्हां हा एकाद्या माणसाचा जन्मवेळेचा गुण आहे, त्याचा त्या बापड्या दृष्टोळ्या माणसाचा काय इलाज? असा पोक्त शेरा येशाप्पानें मारला.

काय इलाज? डोळे फोडून टाकावेत. हा उपाय एकानें सुचवला.

असला दृष्टोळ्या माणूस तोंडांतून ब्र देखील न काढतां चालता होईल, तर त्याच्या नुसत्या बघण्याचा कांहीं एक वाईट परिणाम होत नाहीं, असें दुसरा एकजण म्हणाला.

पण नजरेंत भरेल त्या वस्तूला कोणी न विचारतां न पुसतां तो बरी म्हटल्याशिवाय रहायचाच नाहीं, तिसऱ्यानें म्हटलें.

दृष्टोळ्या माणसाच्या नजरेचा जर इतका प्रभाव असतो, तर त्याचाही पुष्कळ चांगला उपयोग करून घेतां येईल. जर्मनीला हटवायला इंग्रजांला सैन्याची मदत हवी होती. आपल्या हिंदुस्थानांतून पुष्कळ लोक लढाईवर नेले. पण असें करण्याऐवजीं एकाद्या काका बामणालाच नेला असतां तरी चाललें असतें. त्यानें जर्मन सैन्यासमोर उभें राहून नुसतें, “ अरे वा! फौज बरी आहे.” इतकें म्हटलें पुरे कीं, एकाही बॉंब

गोळयाचा खर्च न होतां सारी फौज ठार! असें झालें असतें. असें एकानें कोणीसें म्हटलें आणि चोहींकडे हंशा पिकला.

तसेंही झालें असतें. पण काका बामणानें तें स्वतःच्या इच्छेनें तल्लीन होऊन म्हटलें पाहिजे. तें कांहीं कोणाच्या हातचें नाहीं, असाही कुणीसा आक्षेप घेतला.

हंशावर हंशा उसळत होता. शेवटीं गोष्ट जेव्हां का मूळपदावर—पडवळांच्या मंडपावर आली, तेव्हां सर्वांना भाईसाहेबांची आठवण झाली. कारण, त्या पडवळांच्या मंडपाला तशी दृष्ट लागण्यासारखी विलक्षण शोभा यायला भाईसाहेबच कारण होते. त्यांनीं बागबगीचा नामक पुस्तक वाचून त्यांत भाजीपाला चांगला लागण्यास काय काय करावें लागतें तें पाहून त्याप्रमाणें खत घालण्याचे वगैरे प्रयोग त्या वेलांवर केले होते. अशी हकीकत येशाप्पानें सांगितली. त्यावरून तो पडवळांचा मंडप कोसळलेला पाहून त्यांना कसें वाटेल त्याच्यावर एकेकाचें मत झडूं लागलें आणि तितक्यांतच भाईसाहेब त्या ठिकाणीं येऊन टेपले.

देवघरासमोरील मधल्या जागेंत ही सगळी मंडळी बसली होती. त्यांत दोन तीन बायकाही होत्या. मधोमध ठेवलेल्या समईचा थंड प्रकाश चोहींकडे पडत होता. लोकांनीं आणलेल्या चुडी व कंदील त्यांनीं विझवून टाकिले होते. पण प्रकाश भरपूर असावा म्हणून दोन तीन कंदील तसेच ठेवले होते. त्यामुळें तेथें चकचकीत उजेड झाला होता. त्या दोन तीन बायकांकडे सहज पाहिलें तरी त्यांतील एक तरुणी इतकी सुंदर दिसत होती कीं, मघांच्या दिवेलावणीपूर्वीच्या संधिप्रकाशांत आपणाला अस्पष्ट दिसलेली हिरा ती हीच असें कोणाला सांगूनही खरें वाटलें नसतें. समईतल्या वाती नीट करून त्यांत भरपूर तेल ओतण्यास जेव्हां ती वांकली तेव्हां प्रकाशांत आलेली तिची एकच उजवी बाजू पडवीच्या दारांत उभे राहून पहाणारास अत्यंत रमणीय दिसली असती. मुंबईहून तिच्या भावानें आणलेलें पोपटी रंगाचें पातळ ती चापूनचोपून नेसली होती, आणि अंगांत तिनें अस्मानी रंगाची चोळी घातली होती. तेल ओतणें व दिव्यांतील वात सारण्याचें काम म्हणजे वस्त्र आंगाबरोबर घट्ट

असलेलें बरें असें वाटून किंवा अन्य कोणत्या हेतूनें असो, तिनें समईकडे वांकण्यापूर्वी पातळाचा पदर कंबरेभोवतीं घट्ट लपेटून घेतला, व त्याचें टोक निऱ्यांवरून घेऊन आंत खोंचलें, तेव्हां तर तिच्या प्रत्येक अवयवांत ओथंबून राहिलेल्या तारुण्याला विशेषच स्पष्टाकृति आली. पदर मोकळा ठेवून कामासाठीं वांकलें असतां तो सरकेल या भीतीनें तिनें तो कसून घेतला. पण त्यामुळें ती वांकून राहिली असतां तिच्या वक्षःस्थळाला अधिकच उठाव मिळाला. सुंदर स्त्रिया आपलें सौंदर्य दृष्टीआड करण्याचा जितका अधिक प्रयत्न करतात, तितकें तें सौंदर्य उलटें अधिकच डोळ्यांत भरतें हेंच खरें. ती क्षणभरच तशी राहिली, पण त्यावेळची तिची ती रेखीव आकृति कायमची चित्रित करून ठेवण्यासारखी होती असें कोणाही सौंदर्योपासकाला वाटलें असतें. त्यावेळीं जरी दुसरा कुठलाही चित्रकार तेथें उपस्थित नव्हता; तरी त्या मोहक चित्राची आकृति अगदीं त्याच क्षणीं दारांत येऊन ठेपलेल्या एका व्यक्तीच्या नेत्रावाटें प्रवेश करून तिच्या हृत्पटलाच्या कांचेवर प्रतिबिंबित होत होती.

क्षणभरच भाईसाहेब स्तिमित होऊन तेथें उभे राहिले. त्यांच्याकडे अझून कोणाचें लक्ष गेलें नव्हतें; पण आतां तें गेलें. भाईसाहेब आल्याचें ऐकतांच हिराच्या मुखावर विलक्षण प्रसन्नता दिसली. ती लबगबीनें कडू तेलाची तपेली देवघरांत ठेवावयास गेली, आणि मग आपल्या जागेवर जाऊन बसली. भाईसाहेबांस सर्वांनीं उत्थापन दिलें.

सणासुदीला किंवा देवळारावळाकडे जावयाचे कपडे ही अशी आर्धीमधींच कां करते हें किशाच्या आईला उमगत नव्हतें. शेजारीपाजारी कुत्सित माणसें जे काय बोलतात त्यांत खरेपणा असेल काय असें किशाच्या आईला हिरानें लुगडें बदलल्या वेळेपासून वाटत होतें. त्यासाठीं ती हळूहळू धुमसत होती. पण फार माणसें जमल्यामुळें तिला आपली जीभ सैल सोडतां येत नव्हती. तिचा अगदी नाइलाज झाला होता.

सप्तमीचा चंद्र आतां हळूहळू खालीं खालीं जात होता. येशाप्पाच्या घराकडून खालीं उत्तरेस गेलें असतां अजमासें तीन फर्लोंगावर मोठा

गाडीरस्ता लागतो. तो पूर्वेकडून येऊन पश्चिमेकडे चौदा पंधरा मैलांवर असलेल्या समुद्रकांठच्या बंदरापर्यंत जातो. रस्त्याच्या पलीकडेच गांवच्या देवाचें देऊळ असून सभोंवतीं देवाच्या सेवकसेविकांचीं घरें आहेत. सरकारमार्फत दर दहा वर्षांनीं होणारी शिरगणती आगाऊ प्रसिद्ध करून ठराविक दिवशीं विवक्षित वेळीं करण्याची पद्धत असते. परंतु गमतीसाठीं म्हणून त्या गांवची अवाठवारीनें दिवसा केलेली शिरगणती पुन्हा रात्रीं केल्यास खात्रीनें चुकली असती. बऱ्याचशा अवाठांतून विशेषत: गांवकरी मानकरी यांच्या अवाठांतील कमी झालेल्या पुरुषांच्या संख्येचे आंकडे देवसेविकांच्या अवाठांत जास्त वाढलेले आढळून आले असते. आपणाला प्रत्यक्षच प्रत्यंतर घ्यावयाचें असल्यास आतांच घ्यावयास हरकत नाहीं. यावेळीं काका बामण तुम्हांला त्यांच्या स्वत:च्या घरीं आढळणार नाहींत. ते आपल्या रात्रौच्या मुक्कामालाही अद्याप गेलेले नाहींत. रस्त्याच्या कडेला लागून असलेलें एक छोटेखानी घर त्यांच्या स्वत:च्या मालकीचें खरें, पण त्यांना स्वत:ला एकट्यालाच जरूर तेव्हां उठण्याबसण्यासाठीं मुद्दाम बांधलेलें आहे. गांवचीं सूत्रें हालवणाऱ्या त्यांच्यासारख्या कारस्थानी पुरुषास अशा प्रकारचें एकांतस्थान आवश्यकच असतें. ते गांवचे फौजदार नाहींत, कीं कुलकर्णी नाहींत, पण गांवचे फौजदार कुलकर्णी त्यांच्या मुठींत. ते गांवचे मानकरी नाहींत, पण मानकऱ्यांच्याहीवर मान त्यांचा. आज तर ते या आपल्या खलबतखान्यांत असणारच. कारण येशाप्पावर क्रोधाविष्ट होऊन निघालेले काका आपल्या सहकाऱ्यांस खलबतखान्यांत येण्याविषयींची ताकीद देऊन नंतरच अन्नग्रहणास घरीं गेले होते. जेवण झाल्यावर आपलें कागदांचें पुडकें घेऊन ते या खलबतखान्यांत आले होते. सहकाऱ्यांस इशारत दिल्यानंतर ते दाजीसाहेबांकडे जाऊन प्रथम मावशीस व नंतर दाजीसाहेबांस भेटले. येशाप्पा व भाईसाहेब यांच्याविरुद्ध आजवर सांगितलेल्या गोष्टींत त्यांनीं आज आणखी थोडीशी भर घातली आणि त्यानंतर ते आपल्या घराकडे जावयास वळले. जातांना त्यांनीं आज रात्रौ येशाप्पाच्या घरीं कोणत्या प्रका-

रचा कार्यक्रम आहे याची बित्तंबातमी काढून आपले हस्तक भजनी-मंडळींत सोडून दिलेच होते त्यांनीं.

चंद्र साफ मावळला. जिकडे तिकडे काळोख. काकांच्या खलबत-खान्याच्या एका खोलींत दिवा जळत होता व दोन गृहस्थ कागदपत्र चाळीत व लिहीत बसले होते. त्यांपैकीं एक आपल्या परिचयाचे काकाच आहेत. मात्र ते यावेळीं आपल्या गोणपटाच्या तक्क्यास टेंकून बसले आहेत व उघडे आहेत. सदरा, कोट आणि रुमाल खुंटीवर काढून ठेवलेले दिसतात. पण त्यांची आवडती चंची त्यांच्या पुढ्यांतच आहे. काका काळसांवळे व खप्पड गालफडांचे तर त्यांच्या शेजारीं बसलेले गृहस्थ किंचित् गौरवर्ण आणि गोल चेहऱ्याचे असून काकांहूनही जरासे तरुण दिसतात. काका कांहींसे कृश शरीराचे तर, त्यांचे साथीदार कृशही नाहीं आणि स्थूलही नाहीं अशा मध्यम बांध्याचे व वयानें बत्तीस पस्तीस वर्षांचे असावेत. काकांना चाळीशीची झुळुक लागत असावी.

बैठकीला बांबूची डाळी आंथरलेली होती. शाळेंतील मुलांच्या बैठ-कींना जसे शाईचे डाग असतात, तसे त्या डाळीला शाईचे असंख्य डाग होते. काकांच्या पुढें बैठें डेस्क असून त्यावर एक कागदांचें पुडकें होतें. पण त्याशिवाय सुटे कागद किती तरी चोहींकडे पसरलेले होते.

तेथें आठदहा दौती, वीसपंचवीस लेखण्या व पेनें, पुष्कळसे कोरे कागद असें सामान पसरलेलें होतें. जवळच स्टोव्हवर एक पातेलें ठेवलें असून त्यांत पाणी कढत होतें. कोणालाही वाटलें असतें त्यांना सैंपाक करावयाचा आहे, किंवा निदान चहा तरी टेवायचा असेल. पण आजूबाजूला सैंपाकाचें किंवा चहाचें सामान उपयोग करण्याच्या तयारीनें ठेवलेलें दिसत नव्हतें. स्टोव्हच्या पाठीमागच्या बाजूच्या भिंतीतील फडताळांत मात्र चहासाखरेचे लहान लहान डबे असावेत असें त्या फडताळाच्या अर्धवट उघड्या दारांतून दिसलें असतें.

स्टोव्हच्या आवाजांत त्यांचें बोलणें बाहेरून ऐकणाराला ऐकूं आलें

नसतें. तशांत काका आपल्या साथीदाराशीं सावधगिरीनें व हलक्या आवाजांत बोलत होते.

" जमलं ना राजाभाऊ?" काकांनीं विचारलें.

" हें बघा ना!" राजाभाऊनें लिहिलेला कागद चांगला वाळल्यावर काकांना दाखविला. काकांनीं दुसऱ्या एका कागदाबरोबर तो ताडून पाहिला. त्यांनीं भुवया उडविल्या व स्मित केलें. किंचित् भुवया उडविणें म्हणजे काकांचें समाधान किंवा पसंती व्यक्त करणें असें मानायचें.

काकांनीं लागोपाठ दोन तीन कागद हातांत घेतले व त्यांतील विवक्षित जागेवरील मजकूर राजाभाऊनें लिहिलेल्या कांहीं मजकुराबरोबर ताडून पाहिला. काकांच्या चेहेऱ्यावर निश्चितपणा दिसला. त्यांनीं राजभाऊच्या पाठीवर हात मारला.

" बस्–बस्–राजाभाऊ! बापसे बेटा सवाई. बेटा असावा तर असा. कुळकर्ण्यांचं ब्रीद राखशील. काका बामणाचा साथीदार शोभतोस खरा. चला आतां आटपूंया दप्तर," काका म्हणाले.

" ठीक आहे ना?" राजाभाऊनें आपली स्तुति आणखी थोडीशी करून घेण्याच्या आशेनें विचारलें.

" हें पहा ना तुम्हीच! हा यादीचा मजकूर आपण सोडून देऊं. तो ठराविक पद्धतीचा आहे. लिहीत तुम्हीच आहांत, तेव्हां तो प्रश्नच नाहीं. एक साक्षीदार तुम्हींच आहांत. खालीं हा आंगठा येशाप्पाचा आहेच. दुसरा साक्षीदार आपण निवडला तो मरून गेला आहे. ही यादी लिहिल्यानंतर असंच ठरेल. तो आपला सारा हिशेब अगदीं बरोबर आहे. अंत या मयत गृहस्थाची सही अगदीं अस्सल दिसते कीं नाहीं एवढंच बघायचं—खरं कीं नाहीं?"

" हो. पण तीच तर मुख्य महत्वाची बाब आहे," लटकाच काळजीचा आविर्भाव करीत राजाभाऊ म्हणाले.

" पण ती त्या मयताची सही इतकी अस्सल आहे कीं, तो जिवंत होऊन उद्यां कोर्टांत उभा राहिला तरी छाती नाहीं त्याची, ही सही आपली नव्हे असं म्हणण्याची," काका बोलले.

" तुम्ही खात्री दिलीत कीं, मला तेवढा धीर येतो, " राजाभाऊ हें वाक्य बोलत असतां पातेल्यांतल्या कढत पाण्यांतून एक चतुर्थांश आकाराचे दोन तीन ताव बाहेर काढून हलकेच वाळत ठेवीत होते. तिथच तीन चार वाळलेले तावही पडले होते व ते दहावीस वर्षांपूर्वींच्या कागदांसारखे मळकटसे दिसत होते. त्या पाण्यांत कसलें मिश्रण टाकलें होतें कोणास ठाऊक. ते कागद पाहून काकांनीं विचारलें—

" ते चौकुरे हो कशाला ? "

" एरवींच—विशेष नाहीं कांहीं— " राजाभाऊंनीं उडवाउडवी करीत म्हटलें.

" तरी पण-? " काकांनीं चेंगटपणा चालविला. काका दांतांत धरलेलें सोडणार नाहींत हें राजाभाऊला पुरतें ठाऊक होतें.

" दहा पंधरा वर्षांपूर्वींच्या दोन कबुलायती तयार करावयाच्या आहेत, " राजाभाऊंनीं शेवटीं नाइलाजानें उत्तर दिलें.

" सोडा— " त्या गोष्टीचें आपल्याला महत्व नाहीं असें दर्शवीत काका म्हणाले, " आवरा बघूं आतां सारं सामान. "

राजाभाऊनें स्टोव्ह बंद केला. त्याबरोबर त्यांना बाहेर कांहीं तरी सुरसुरल्यासारखा आवाज ऐकूं आला. ते दोघेही कान देऊन ऐकूं लागले. पण सामसूम ! दारांतील केळींवर बाजूच्या आंब्याच्या वृक्षाच्या फांद्या आल्या होत्या. पावसाचें किंवा दहिंवराचें पाणी आंब्याच्या पानांवरून खालीं केळींच्या पानांवर पडलें कीं ठब् ठब् असा आवाज होई. त्या आवाजाशिवाय दुसरा कसलाच आवाज त्यांना ऐकूं आला नाहीं.

" आतां तुम्हीं घरीं जाणार कीं इकडे—? " राजाभाऊनें देशसेविकांच्या घराकडे बोट दाखवीत विचारलें.

" आतां सगुणेच्या घरींच गेलं पाहिजे मला. बाकी नाहीं कांहीं, पण तिची बहीण यायची या दोन दिवसांत बोटी सुरू झाल्याबरोबर मुंबईहून, आणि तिच्याशीं माझं काम आहे थोडंसं–तसंच महत्वाचं, " बोलतां बोलतां काका विचारांत मग्न झाले होते.

दोघांनीं मिळून सामानाची आवराआवर केलीच होती.

" मग काय उद्यां रात्रीं पुन्हा जमायचं इथंच ?" राजाभाऊनें विचारलें.

" होय तर! ती आपली नेहमींचीच पद्धत नाहीं का? रात्रीं केलेलं काम दिवसाच्या उजेडांत पाहिल्याशिवाय तें पुरं झालं असं कसं म्हणतां येईल? काय राजाभाऊ, अगदीं नवख्यासारखें विचारूं लागलांत! असे शेंकडों कागद केले असतील थोडे म्हटले तरी, अपण दोघांनीं."

" मी तरी तेंच म्हणतों—हातावळा बसून गेला आहे. काम बिनचूक झालंच पाहिजे. येशाप्पानें दिलेली तुमच्या नांवची यादी शाबीत झालीच पाहिजे," राजाभाऊ आत्मविश्वासानें कपडे चढवीत म्हणाले.

बिचाऱ्या येशाप्पानें काकाच्या नांवची यादी कधींच दिली नव्हती.

काका देखील आपल्या केसाळ छातीपोटावर सदरा चढविल्यावर डोकीला रुमाल गुंडाळीत होते. पुन्हां सुरसुरल्याचा आवाज आला. चालतां चालतां माणसाचा पाय घसरावा तसाच आवाज आला. काका साशंक झाले. त्यांनीं हलकेच पण लवकर जाऊन दाराची कडी काढली आणि घराभोंवतीं एक फेरी मारून आले. पण कुठेंच कोण आढळलें नाहीं. दूर अंतरावर मारलेले कुकारे मात्र ऐकूं येत होते. भजनाचे मेळे एका गणपतीकडून दुसऱ्या गणपतीकडे जात असतांना एकमेकांस इशारा देत होते. येशाप्पाच्या गणपतीकडील लोकदेखील इतक्यांत भजन आटोपून उठले असावे. काकांना वाटलें कीं, आतां भजन आटोपल्यावर प्रौढशिक्षणाचा वर्ग सुरू होईल. ती आठवण झाल्याबरोबर ते लवकर लवकर आंत आले आणि त्यांनीं राजाभाऊला विचारलें—

" राजाभाऊ, राजाभाऊ! अहो तें पत्र कुठं आहे ?"

" अरेच्चा! विसरलोंच मी देखील, ती तुमच्या नांवची यादी तयार करण्याच्या नादांत," असें म्हणून त्यांनीं खिशांतून एक लखोटा काढला.

आतां त्यांनीं दार झांकून देखील घेतलें नव्हतें. कारण आतां त्यांना बाहेर पडावयाचें होतें. म्हणून दारासमोर उभे राहूनच ते बोलत होते. काकांनीं तो कागद घेऊन वाचला.

" ठीक!" त्यांनीं उद्गार काढला.

" पण मला एक शंका येते, काका ! " राजाभाऊंनीं सुचवलें.

" कसली ? "

" याच्यामुळं उगाच गुप्तपोलीसाची फेरी इकडे व्हावयाची आपल्या गांवांत– नसती ब्याद ! "

" तसंच तर घडलं· पाहिजे. जुगाराच्या तपासांत हल्लींचे पोलीस सबइन्स्पेक्टर आहेत. असली एखादी सूचना मिळाल्याबरोबर येशाप्पाच्या घराभोंवतीं पोलीसांच्या घिरट्या पडूं लागतील. "

" त्यांत कसलं येशाप्पाचं नुकसान ? तो प्रौढशिक्षणाचा वर्ग आहे असं आढळून आल्यावर त्या बंद पडतील. पण आपणाला मात्र फार सावध रहावं लागेल. आजच्यासारखं रात्रौ या मांगरांत जमून कांहींच काम करायला मिळणार नाहीं."

" उंः ! अशीं काय आपलीं बारमाही कामं चालू असतात ? आणि पोलीस नुसते येशाप्पाच्या घरीं फिरकून गेले तरी तेवढ्या एका गोष्टीवर मला कितीतरी लचांडं उभारतां येतील. द्या तुम्ही इकडे तो त्याचा लखोटा. हें पत्त्यावरचं अक्षर थेट आपल्या शाळा मास्तरच्या सारखं दिसतं आहे ! " डोळे मिचकावीत काका म्हणाले. काकांनीं डोळे मिचकावले कीं, त्यांच्या केसाळ जाड भुवया कांहीं निराळ्याच दिसूं लागत.

" त्यांतच तर मौज आहे. भाईसाहेबाशीं त्या शाळामास्तरचं फारच सख्य आहे. त्यांत ' खो ' पडला पाहिजे. हा निनांवी अर्ज कदाचित् पुढें आलाच व शोधचौकशी सुरू झाली तर हें प्रकरण शाळा-मास्तरवरच आणून कसं घालायचं, याचा बेत मी पुरा आंखून ठेवला आहे, " हातांत छत्री घेत राजाभाऊ म्हणाले.

पण नंतर ते चटकन् घरांत गेले. त्या ठिकाणीं एक कागद तसाच पडला होता. त्या कागदावर अनेक लोकांच्या निरनिराळ्या अक्षरांत सह्या केल्या होत्या. कोणाचेंही अक्षर समोर ठेवून त्याप्रमाणें अक्षर काढण्यांत राजाभाऊचा हातखंडा होता, हें सांगावयास नको. हा गुण त्यांना त्यांच्या वडिलांपासूनच मिळाला होता. त्यांनीं जमिनीवर पडलेला तो कागद दिव्यावर धरून जाळून टाकला.

काकांनीं तो आपला शार्टकोटही आतां चढविला होता. चंची खिशांत टाकली.

" जाऊं या आतां—अं ? " काका डोळे उडवीत म्हणाले.

" तो लखोटा कुठल्या पोस्टांत टाकणार ? " राजाभाऊनें विचारलें.

" तुम्ही टाका ना ? "

" आपण नाहीं बोवा. "

" ठीक, आमचा एक दोस्त जायचा आहे म्हापशाला आज. त्याच्या-कडे देईन झालें," काका म्हणाले.

" बघा हो ! भलत्या सलत्या माणसाच्या हातांत असला कागद जातां नये. "

" अहो असला कागद दुसऱ्याच्या हातांत गेला कीं आपण सुटलों. " काका म्हणाले.

" हो—तेंही खरंच एका अर्थी म्हणा. "

दोघेही बाहेर पडले. राजाभाऊंनीं आपली पिशवी घेतली. त्यांत भरावयाच्या त्या वस्तू भरल्या, पण त्या एका टॉवेलांत गुंडाळून तो टॉवेल पिशवींत भरला. त्यावर गळ्याभोंवतीं गुंडाळावयाचा मफलर रेंटून भरला. त्यांनीं डोकीस टोपी घातली होती.

फडताळ बंद करतांना त्यांतील एका छोट्याशा बाटलींतून काकानें एक कापसाचा बोळा तयार करून तो आपल्या कानावर ठेवला. त्याबरो-बर सुरंगी अत्तराचा वास घमूदिशीं चोंहोंकडे पसरला.

दाराला कुलूप ठोकून दोघेही बाहेर पडले. गडग्यांस उभें केलेलें लांकडी फाटक उघडून दोघेही बाहेर पडले. या फाटकालाही काकांनीं कुलूप ठोकलें. फाटक बंद केल्यावर आंत कोणालाही जातां आलें नसतें. कारण गडगा खूप उंच असून त्यावर कांचा रुतवल्या होत्या; आणि आंतल्या बाजूस घराच्या चारी बाजूंस चिटक्या—मेंड्या लावल्या होत्या. एका बाजूच्या कोनांत लोखंडी जातीच्या केळी होत्या. आणि दुसऱ्या बाजूच्या कोपऱ्यांत तांबड्या देवकेळी फुलांकरितां लावल्या होत्या.

फाटकाच्या बाहेर पडल्यावर दोघे दोन बाजूंस गेले. पण दोघेही

देवसेविकांच्याच वाड्यांत गेले. त्या वाड्यांतील रात्रीं वाढणाऱ्या पुरुष-लोकसंख्येंत आणखी दोघांची भर पडली!

सगुणा भावणीच्या घराच्या दारावर ठराविक पद्धतीची टिचकी वाजली. दार उघडलें गेलें. घरांत एका बाजूस कंदील मिणमिण जळत होता. पण दार उघडतांना त्याची वात वर केली गेली नव्हती. आतून उठणाऱ्या माणसानें दाराकडे येतांच फटींतून जर्दामिश्रित सुरंगी अत्तराचा वास आल्याबरोबर, आंतील माणसाला बाहेरील माणसाची ओळख पटली. म्हणूनच कोण–काय वगैरे प्रश्नोत्तरें न होतां दार उघडलें गेलें. दार उघडणाऱ्या व्यक्तीचे डोळे झोंपेनें भारावलेले असावेत.

काकांनीं आंत पाऊल टाकीत असतांच खिशांतील चंची पलंगाच्या रोखानें फेंकून दिली; आणि उजव्या खिशांतून एक दोन दौती काढून त्या उजवीकडच्या खिडकीवर टेवल्या. त्या घराचा कोनाकोंपरा स्वतःच्या घरापेक्षांही काकांना जास्त सरावाचा असल्याची कोणालाही त्यांच्या या कारभारावरून खात्री पटली असती. त्यांचे हे व्यवहार काळोखांत बिनचूक चालले होते.

सगुणेनें दार आंतून बंद केलें.

" काय करात आजून ? " तिनें गोड रुसव्यानें विचारलें.

" काम धंदा ! "

" कसलो कामधंदो ? माकां काय आणलांत ? "

" त्या दोन दौती ! "

" तुमकांच घ्या त्यो. खंयूचे शाळेंत गेल्लात रातचे ? "

" माझी शाळा रात्रीचीच चालते. मी रात्रीच लिहिणं वाचणं करतों, " भुंवया उडवीत काका म्हणाले; " कांही विशेष बातमी ? "

" आसा तर ? "

" हो का ? कसली कसली सांग बघूं आधीं, " उतावीळपणानें काकांनीं विचारलें.

" घाय कसली इतकी ? " तिनें डोळे मारीत कुऱ्यानं म्हटलें.

पण दार बंद करून घेतल्यामुळें अगदीं हळू बोललेल्या गोष्टी ऐकूं येण्यासारख्या नव्हत्या.

आक्टोबर महिन्याचा पहिला आठवडा सुरू होता. कोंकण प्रांतांत उन्हाळा भासूं लागला होता. थंडीला अद्याप जोरानें सुरवात झाली नव्हती. भातकापणीचें काम जोरानें सुरू झालें होतें. शेतकऱ्यांचें जीवन किती कष्टकारक? कोंकणांत तर शेतीला 'कष्ट' हाच प्रतिशब्द सर्रास रूढ आहे. अमक्या तमक्या कुळवाड्यानें दोन भऱ्याचे कष्ट यंदा केले, असें म्हणण्यांत येतें. शेतीला दिलेला कष्ट हा शब्द किती सार्थ आहे! विशेषतः, कोंकण प्रांतांत तर तोच शब्द खरा अर्थवाहक आहे. देशावरील शेतकऱ्यांना शेतीसाठीं बिलकूल कष्ट करावे लागत नाहींत. पण कोंकणांत शेतीची स्थितिच अशी आहे कीं, दहा महिने राबावें आणि दोन महिने खावें. पुन्हां जवळजवळ दहा महिने उपासमारी! म्हणूनच कोंकणप्रांताचे कुणबी शेती सोडून मुंबई कराचीसारख्या शहरीं चाकरी शोधण्यासाठीं धांवत असतात. ते आगबोटी सुरू झाल्यावर आपापल्या गांवीं गणेशचतुर्थीच्या सणासाठीं येत असतात. गणेशचतुर्थीला म्हणून येतात खरे, पण या दिवसांत जी जोराची हंगामी कामगत असते, ती उरकण्यांत घरच्या माणसांना मदत करण्याकरितां म्हणून बहुधा येत असतात. बोटी सुटायला फार अवकाश असला, किंवा वादळापावसाची धास्ती असली तर ते रेल्वेच्या वाटेनें येतात. म्हणून बेळगांव कोल्हापूरवरून कोंकणांत येणाऱ्या सर्व्हिसच्या मोटारींना या दिवसांत पॅसेंजरांची फार गर्दी असते. आगबोटी सुरू झाल्यानंतर आपला प्रवास कमी खर्चात व लवकर होईल अशी गरीब पॅसेंजरांना उमेद वाटत असते, तर आपलें गिऱ्हाईक आतां पावसाळा सुरू होईपर्यंत आगबोट बळकावणार म्हणून मोटारवाले थोडेसे नाउमेद झालेले असतात.

बेळगांवहून सुटलेली मोटार लॉरी वेंगुर्ला रस्त्यानें चाललेली आपण पाहिली तर तिच्यांत बराच कडाक्याचा वाद चाललेला ऐकू येईल. वाद

प्रथम हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक स्थितीविषयीं म्हणून सुरू झाला. नंतर तो आर्थिक परिस्थितीकडे वळला. पण शेवटीं तो महाराष्ट्राच्या परिस्थितीवर आला असतां, त्याला कसें कुणास ठाऊक, पण निराळेंच तोंड लागलें. आणि कोंकण व देश यांचें साम्य व विरोध या आडवळणांत तो वाद शिरला. आस्ते आस्ते, त्या वादाला विवादाचें स्वरूप आलें. अखेरीस तो वादविवाद नसून तंटाभांडण आहे असें वाटण्याइतका विकोपास चढला होता.

" हें बघा—हें बघा! " एक जण नाचण्याच्या शेताकडे बोट दाखवीत कुत्सितपणानें म्हणाला, " हा कोंकणचा जोंधळा कसा पिकला आहे! "

" कोंकणचा जोंधळा! " हा कोंकणचा जोंधळा! म्हणून देशपक्षाची मंडळी हंसूं लागली.

आंबोली घाट आठ दहा मैलांवर राहिला होता. जोंधळा, मका, गहूं तर केव्हांच दिसेनासा झाला होता. पण भुईमूग, हरभरा देखील आतां मागें पडला होता. नाचणा आणि भात व मधून मधून उंसाचे मळे यांनींच सारी कृषिभूमि झांकून गेलेली दिसत होती.

एका शेतकऱ्याच्या परड्यांत नारळीचें झाड होतें. त्याच्यावर नारळ नव्हते. त्या झाडाकडे बोट दाखवून कोंकणाभिमानी एक गृहस्थ अत्यानंदानें म्हणाला—

" अहो देसोरे! पाहिलांत का तो आमच्या कोंकणच्या सृष्टिसौंदर्याचा ध्वज? हा ध्वज म्हणजे स्वर्गींचा कल्पवृक्षच देवांनीं आपल्या लाडक्या कोंकणभूमीला वरदान दिलेला आहे. हा वृक्ष कोंकणप्रांतांत असेपर्यंत कोंकणप्रांतीयांना कुठल्याही देशासमोर खालीं मान घालण्याची पाळी येणार नाहीं! तुम्ही ताक पीत असाल, पण शाळयाचें पाणी म्हणजे केवळ अमृत! कोंकणांत आल्याशिवाय या अमृताचा थेंब तरी तुमच्या जिभेवर पडणं शक्य आहे काय? सुके नाहीं तर कुजके नारळच तुमच्या नशिबीं! अहो! इतका दिमाख कशाला? मघांपासून आम्हां कोंकण्यांना हंसताहांत, पण देशावर पिकणारा हवा तो जिन्नस आम्हांला या नारळाच्या साधनानं विकत घेतां येतो, समजलांत? "

" समजलांत ? " कोंकणपक्षीय मंडळीनें त्याच शब्दाची जोराची पुनरुक्ति केली.

मोटर सारखी पळतच होती. त्यामुळें रस्त्याच्या दोन्ही बाजूला दूर-वर नजर पावेतों दिसणारी वनस्पतिसृष्टि निरखण्यांत उतारू मंडळी निमग्न झाली होती. जसे कांहीं एखाद्या हायस्कुलांतील विद्यार्थीच भूगोलविद्येपैकीं धान्या–पिकांचा वगैरे अभ्यास करण्याच्या आस्थेनें भूमि-निरीक्षण करीत आहेत.

" ज्यास्ती कशाला पाहिजे बोलायला ? ही खडकाळ, दगडाळ, तांबड्या मातीची भूमि किती सुपीक आहे तें दिसतेंच आहे. नशीब आमचं, हा चैत्र वैशाख महिना नव्हे, नाहींतर इतक्यांत आपण सगळे या वेळीं लाल झालों असतों, " एक देशावरील गृहस्थ म्हणाला.

" अहो घांटी ! सर्व देशावर पुष्पफलमंडित वनस्पतिसृष्टींत झांकलेला एकादा तरी डोंगर दिसतो का तुम्हांला कधीं ? आतां ह्या आंबोलीच्या घाटांतून जेव्हां उतरूं लागाल, तेव्हां ती नितांत रमणीय सृष्टिशोभा पाहून चौकुळच्या धनगरांबरोबरच एकादी झोंपडी बांधून रहावयास तयार व्हाल बरं ! सावध असा ! " एक कोंकणप्रांतीय म्हणाला.

" सावध हो घांटीलोक सावध ! " कोंकणप्रांतीय मंडळीनें विजयारोळी ठोकली.

सह्याद्रि म्हणजे कोंकण आणि देश यांची सीमारेषा. या सीमारेषे-जवळ ती मोटर आली होती. हा मुलूख जरी सह्याद्रीच्या वरचा असला तरी तो कांहीं खरा देश नव्हे, कारण तेथें देशावरील पिकें येत नाहींत. तशीच ती कोंकणभूमीही नव्हे, कारण तेथें कोंकणांतील झाडेंही होत नाहींत.

मोटर सारखी धांवतच होती. अपटुडेट साहेबी पोषाख केलेला एक तरुण त्या मोटरींत फ्रंट सीटवर बसला होता. तो देशकोंकणवाद निमूट-पणें ऐकत होता. त्याच्याचबरोबर मागच्या बाजूस कंपार्टमेंटमध्यें दुसरा एक तरुण बसला होता. हा चाललेला वाद ऐकून हे दोघेही एकमेकां-कडे पाहून मधूनमधून हांसत होते. त्यांना त्या वादविवादाची मौज वाटत होती. त्या देशकोंकण वादांत गणेशशास्त्री फाटक यांनीं आपल्या व्याही-

विहिणी नाटिकेंत आणलेल्या साऱ्या मुद्यांची उजळणी तर होऊन गेलीच होती, पण त्याशिवाय त्यांनीं आजवर न ऐकिलेल्या अशाही किती तरी गोष्टी येऊन गेल्या होत्या. फळें, पिकें, वनस्पति, देवळें, देवदासी, झाडें, समुद्र, मासे, सृष्टिसौंदर्य, मानवीशरीरसौंदर्य, पशुपक्षी, जनावरें वगैरे प्राणी सर्व विषय तुलनेकरितां येऊन गेले. कांहीं म्हणतां कांहीं उरलें नाहीं.

मोटरीची चाल संथ होऊं लागली. आंबोली बाजार आतां दोन तीन मैलांवर आला होता. पाठीवर दगड लादलेलीं पुष्कळशीं गाढवें रस्त्यानें चाललीं होतीं. आंबोलींत एकादी इमारत बांधण्याचें काम चालू असावें. त्या गाढवांत एक घोडेंही म्होरकेपणा घेऊन चाललें होतें. घोड्याकडे नजर जातांच नवीन कल्पना सुचून एका देशावरील गृहस्थाला उकळी आलीच!

" अहो कोंकणे! भात बोकणे! तुमच्या कोंकणांत मरतुकडीं बैलं! तुम्हांला स्वप्नांत तरी कधीं घोडा बघायला मिळतो काय?"

समोरील तें लमाण पाहूनच हा सवाल त्या गृहस्थाला सुचला होता. आणि तो वस्तुस्थितिनिदर्शक असल्यामुळें कोंकणपक्ष एक क्षणभर स्तब्ध राहिला. देशपक्षानें हंशाचीं कारंजीं उडविलीं.

" कशाला विनाकारण वाद घालतां? असल्या वादानं सलोखा नाहींसा होतो मात्र. प्रवासांत एकमेकांच्या सोबतींत प्रेमाचा आनंद उपभोगावयाच्या ऐवजीं हीं भांडणं कशाला काढतां बरं?" कंपार्टमेंट-मधील तो प्रवासी बोलला. त्यानें सैल विजार घातली असून त्याच्या आंगांत साधा सदरा, कोट व डोकीला काश्मीर कॅप होती. तो सरासरी अठ्ठावीस एकुणतीस वर्षांच्या उमरीचा असावा. त्याच्या गौरवर्णाकडे व एकंदर बोलण्याच्या पद्धतीकडे पाहून तो कोंकणपक्षीय असावा असेंच उतारू मंडळींचें मत झालें.

तीन चार अपवाद खेरीजकरून बाकीची सगळी मंडळी या देश-कोंकण वादांत सामील झाली होती. आपल्याला स्वप्नांतही घोडा पहायला मिळत नाहीं असा टोमणा मारलेला ऐकणें सहन न होऊन एक चुणचुणीत पोरगा त्याच, आतां मागें पडलेल्या पण दृष्टीआड न झालेल्या

लमाणाकडे पहात आवेशानें म्हणाला. " अहो घांटे-भाकरीलाटे ! आम्हांला जरूर पडते, तेव्हां घोडींच तेवढीं आम्ही देशावरून मागवतों असेंच केवळ नव्हे, तर आम्हांला जेव्हां सुंदर बंगले बांधायचे असतात, तेव्हां दगड लादण्याकरितां गाढवांचे तांडेदेखील आम्ही देशावरूनच मागवतों. कारण त्यांची देशावर पैदास जास्त ! देशावरून कोकणांत प्रसंगनिमित्त आयात होणाऱ्या मालापैकीं तो एक माल आहे. मात्र त्या गाढवांना कोंकणची हवा मानवत नाहीं म्हणून तीं लगेच आपल्या मूळ घराप्रत गमन करतात ! " तो तरुण मिस्किलपणानें म्हणाला. कोंकणप्रांतीयांत प्रचंड हास्यध्वनि पसरला. देशपक्षीय मंडळी चिडून मारामारीच्या तयारींत दिसली. पण तितक्यांत फ्रंटसीटवरील काळेलासा व चष्मा घातलेला तो साहेबीपोषाखांतला तरुण म्हणाला-" भाईनो ! उगाच तंडू नका. कोंकण आणि देश हे एकाच महाराष्ट्रदेशाचे परस्परपूरक दोन भाग आहेत. एकाच देशाचीं तीं दोन अंगें आहेत. त्याच्यांत लहानमोठेपणाचा भेदाभेद नाहीं. आम्ही वर्तमानपत्रवाले बृहन्महाराष्ट्राचा ऐक्यविस्तार करावयास झटत असतां तुम्ही असे भांडत बसतां हें काय ? "

सर्वांचे डोळे आतां त्या फ्रंटसीटवरच्या तरुणाकडे लागले. तरी पण देशावरचे लोक अस्तन्या सारीत परस्परांस खुणावीत होते. इतक्यांत मोटरीचा हॉर्न वाजला. गाडी आंबोली बाजारांत शिरली. पण मोटर-बाजारांत उभी न करतां ड्रायव्हरनें ती बरोबर पोलीसगेट समोर उभी केली. ड्रायव्हर हुशार होता. त्याला भीति वाटत होती. न जाणों, दंगा धिंगा-मारामारी झाली तर काय घ्या ? प्रकरण थट्टेवर मिटलें तर उत्तमच. नाहींतर काय घडायचें असेल तें पोलीसासमोर घडेल.

वादविवादांत भाग न घेतां तो तिऱ्हाईतपणें ऐकणाऱ्या मंडळींत एक बाई माणूस होतें. तें माणूस कंपार्टमेंटमध्येंच बसलें होतें. कोंकण प्रांतीयांची सरशी झालेली त्या माणसाला आवडल्यासारखी दिसे. फ्रंटसीट-वरचा साहेबी पोषाखांतला गृहस्थ केव्हां समोरून तर केव्हां चष्म्याच्या काचेच्या कोपऱ्यांतून त्या माणसाकडे पाही. आपण एक वर्तमानपत्रवाला

असें म्हणविणारा तो तरुण त्या सुंदर तरुणीकडे पहायला जितका उत्सुक होता, तितका त्याच्या पाठीमागचा कंपार्टमेंटमधला तरुण नव्हता. कित्येकांच्या लक्षांत ही गोष्ट येऊनही गेली होती.

वादविवाद करणाऱ्या लोकांचे मुद्याचे शब्द कानांत पडत असतां मधून मधून कंपार्टमेंटमधल्या तरुणाला आणि वारंवार त्या फ्रंटसीटवरील तरुणाला पाठीमागें बसलेल्या पॅसेंजरांकडे पहायचें एवढें काय नडलें होतें? आणि नडलें असलें तरी ते डावीकडच्या बाजूनें न बघतां उजवीकडून कां मागें बघत होते? प्रेक्षकांना वाटत होतें हें सारें ढोंग आहे मागें वळून बघण्याचें !

आणि तेंहि एका अर्थी खरेंच. कारण फ्रंटसीटवरचा तरुण मागें बघत असतां त्याच्या दृष्टीच्या मार्गाची रेषा जर काढतां आली असती तर ती सरळ रेषा न येतां वर्तुलखंडाकृति आली असती, व त्या वर्तुळखंडाच्या मार्गावर त्या तरुणीचें मुखमंडल खात्रीनें आलें असतें. इतकेंच नव्हे तर त्या तरुणीच्या मुखमंडलावर त्या तरुणाची नजर एक दोनदां किंचित्काल विसांवली सुद्धां होती.

देशकोंकण वादाच्या भरांत जेव्हां मानवी शरीरसौंदर्याचा प्रश्न येऊन देवदासींचा विषय निघाला, तेव्हां त्या सुंदरीच्या भ्रुकुटी वक्र झाल्या. पण कोंकणपक्षीयांनीं कोंकणांतील भाविणींच्या सौंदर्याची देशावरील जोगत्या मुरळ्यांशीं तुलना करून जेव्हां ते यशस्वी ठरले, तेव्हां तर त्या सुंदरीच्या मुखावर मूर्तिमंत अभिमान प्रतिबिंबित झालेला बघणारांना दिसला होता. फ्रंटसीटवरील तरुण त्या सुंदरीकडे पाहून, नंतर तो आपण हिला पूर्वी कुठं बरं पाहिली, असा स्वतःच्या मनाशीं विचार करीत असावासा दिसला.

साऱ्या हिंदुस्थानचें नागरसौंदर्याचें प्रतीक जी मुंबापुरी, ती कोंकणांत मोडते कीं देशांत? या प्रश्नावर जेव्हां वादाची रणधुमाळी माजली होती तेव्हां पुणें– मुंबईवाद फारच उतास आला. त्यावेळीं तर वरेरकर–केळकर देखील वादभूमीवर येऊन गेले. कोंकणच्या खांडेकरांची देशावरील प्रो. फडक्यांशीं तुलना झाली. उभयपक्षांतील लोक आपापल्या

प्रांतांतील वाङ्‌मयवीरांना द्वंद्व करावयास लावून त्यांच्या हड्‌ड्या खिळखिळ्या करून मोकळे देखील झाले! शेवटीं फ्रंटसीटवरील स्वतःला पुढारी मानणाऱ्या तरुणानें वादाचा समारोप केल्यानंतर गाडी थांबली.

बाजारांत कोंकणी लोकांचें संख्याधिक्य दिसत होतें. तरी देखील शेवटचा शेरा देशावरील मंडळीस फारच झोंबला होता, म्हणून ते चुळबुळ करूं लागले होते. चहाच्या दुकानांत बसल्यावर कांहींतरी गडबड होण्याचा अजमास दिसूं लागला होता. पण गाडी उभी राहिली ती पोलीस गेटासमोर ! आणि शिवाय—

शिवाय समोरून एक भगवा बावटा असलेली सुंदर मोटर आली. त्याबरोबर एकूणएक सर्व लोकांनीं लवून प्रेमादरपूर्वक मुजरे केले. ते अत्यंत प्रजाप्रिय सावंतवाडीचे सरकार श्रीमंत बापूसाहेब महाराज होते.

त्यांना पहातांच वाद जिथल्या तेथें थंडावला. जो तो चौकशी करूं लागला तेव्हां कळून आलें कीं, बेळगांवहून आलेल्या पाहुणे मंडळींच्यासाठीं महाराजांनीं शिकारीचा कार्यक्रम आंखला होता. नाहीं तरी आतां दसऱ्याकडील नवरात्रांत महाराज दरसाल शिकारीसाठीं आंबोलीला येतच असतात.

मोटर भर्र्रकन् नारायणगडकडच्या रस्त्याला निघून गेली. उतारू मंडळी चहाच्या दुकानांत शिरली असतां, फ्रंटसीटवरील व कंपार्टमेंटमधील असे ते दोघेही तरुण प्रवासी ट्रॅव्हलर्स बंगल्याकडे वळले.

दोघांच्याही सायकली होत्या. दोघेही पार्वतीपॉइंट, नटपीक, महादेवगड टेंपल पॉइंट, शिरगांवकर सीट वगैरे स्थळें पाहून आले. त्यांनीं सृष्टिसौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेतला. दिवेलावणी झाल्यावर ते बंगल्यावर आले. पार्वतीपॉइंटवरून सृष्टिशोभा सुंदर दिसते.

व्हरांड्यांतील राउंड टेबलाजवळच्या खुर्च्यांवर ते पश्चिमाभिमुख होऊन बसले होते. निरनिराळ्या पॉइंटवरून निरनिराळ्या देखाव्यांचे त्यांनीं फोटो घेतले होते. शरदृतूंतील सृष्टिवैभव त्यांना अप्रतिम वाटलें. मोठीं झाडें झुडपें हिरवीगार व टवटवीत दिसत होतीं. पावसाळ्यांत उत्पन्न झालेली वनस्पतिसृष्टि निरनिराळ्या रंगाच्या व निरनिराळ्या

आकारांच्या फुलांनीं नटली होती. आंखीव रेखीव बगीच्यांत माणसांनीं वाढविलेल्या फुलझाडांपेक्षां निसर्गाच्या नजरेखालीं सृष्टीच्या अमर्याद बगीच्यांत तयार झालेल्या असंख्य फुलझाडांचें वैभव अवर्णनीय होतें. त्यांचीं मनें अत्यंत प्रसन्न झालीं होतीं, त्यामुळें त्यांना प्रवासाचा थकवा देखील वाटेनासा झाला होता. खुर्च्यांवर बसले असतां देखील त्यांच्या नजरेसमोर नुकते पाहिलेले देखावेच घोळत होते.

दोघांनींही गळ्याभोंवतीं मफ्लर गुंडाळलेले होते. सूर्यास्तानंतरच्या सायंकालीन आकाशाकडे त्यांचे डोळे लागले होते. समुद्राला जणूं चिकटून असलेली ती क्षितिजरेषा त्यांना रमणीय दिसत होती. आकाश यावेळीं निरभ्र होतें. उत्तरेकडच्या बाजूला मात्र एक कासवाच्या आकाराचा मोठासा ढग तरंगत चालला होता.

" महाराष्ट्रसृष्टीचं धान्याचं कोठार देशावर असलं तरी वस्त्रालंकारांचा जामदारखाना व बागबगीचा कोंकणप्रांतांतच खरा " साहेबीथाटाचे गृहस्थ अर्धवट स्वतःशींच म्हणाले. जणुं काय मघांशीं मोटरींत चाललेला वादच त्यांना यावेळीं आठवला होता, व त्यावेळीं त्यांत भाग घेण्याच्या आपल्या दाबून ठेवलेल्या इच्छेला ते मोकळीक देत होते.

" आतां तरी पटलं ना ? भाईसाहेबांनीं व मी दिलेल्या इकडच्या वर्णनांत कांहीं अतिशयोक्ति नव्हती ना ? " त्यांच्या सोबत्यानें विचारलें.

" तुम्ही दिलेलीं वर्णनं अगदीं यथार्थ होतीं. मी विचारांत पडलों आहे तो या सृष्टिवैभवाचा आमच्या फिल्म कंपनीला उपयोग कसा करून घेतां येईल याचाच. बाकी दुसऱ्या कुठल्याही कंपनीच्या आधीं या सृष्टि-वैभवाचा उपयोग करून घेण्याचा मान आमच्याच कंपनीला घेतला पाहिजे असं माझं आतां ठाम मत होऊन गेलं आहे. भाईसाहेबांचं सार्वजनिक कार्यक्रमाचं आमंत्रण आलं म्हणून मी मुद्दाम पुढं आलों इकडे. नाहीं तर बेळगांववरूनच परतणार होतों. सुदैव माझं कीं मला आयत्यावेळीं तुमच्या-सारखा मार्गदर्शक मिळाला, यशवंतराव ! "

" तरी आपणाला फिरतांना फार त्रास झाला आज. कारण जमीन अद्याप वाळलेली नाहीं. पण उन्हाळ्यांत जेव्हां इतरत्र कडाक्याचा

उन्हाळा असतो, तेव्हां या २३०० फट उंचीवरील गिरिशिखरावरील शोभा आणि हवा अवर्णनीय असते. त्याचा आस्वाद स्वतःच चाखला पाहिजे ज्यानं त्यानं, " यशवंतराव म्ह ाले.

" आतां आधीं उद्यांचा कार्यक्रम आंखूया, " साहेबीगृहस्थ म्हणाले, " उद्यां आपण आज उतरलों तेव्हां निघायचं ना ? "

" अगदीं त्याचवेळीं. तीन वाजतां सावंतवाडीला जाऊं. साडेतीनला कुडाळ. तिथून मालवणला जाणारी मोटर घेतली कीं, साडेचारपर्यंत आंबेखोल. भाईसाहेब वाट पहात राहणार हें अगदीं टरलेलं. "

" गाजावाजा कसलाही न करतां भाईसाहेबांनीं केवढं तरी कार्य आपल्या शिरावर घेतलं आहे. मला त्याची इतकी कल्पना नव्हती तुम्ही सांगेपर्यंत."

" हें पहा वसंतराव ! तुम्हांला कळायचं म्हणजे वर्तमानपत्रांतून किंवा आमच्या पत्रांतून. पण आम्ही पत्रांत विशेष लिहून तें काय लिहिणार ? आतां इकडचीं आमचीं वर्तमानपत्रं म्हणजे कसलीं ? आमचं मालवणचं " सागर " म्हटलं तर तालुक्याचं वर्तमानपत्र. त्यांत मी लिहून काय लिहिणार ? बरं विशेष लिहीन म्हटलं तर भाईसाहेबच स्वतः नको नको म्हणतात. बाकी आतां मला भाईसाहेबांच्या जीविताची बरीक काळजी वाटूं लागली आहे. "

" जीविताची काळजी म्हणजे ? " वसंतरावांनीं अस्वस्थतेनें विचारलें.

" हरिजनांत आणि भूमिजनांत जरी ते लोकप्रिय झाले असले तरी पांढरपेशांत व जमीनदारवर्गांत ते अप्रिय झाले आहेत. निमूटपणं पण धडाडीनं, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व शेतीच्या सुधारणा ग्रामिक लोकांत करण्याचं त्यांचं अंगीकृत कार्य अगदीं थोड्या अवधींतलं पण फारच परिणामकारक झालं आहे. उद्यां आंबोखोलला गेल्यावर तुम्हांला याचा पडताळा पटेलच. पांढरपेशावर्ग भाईसाहेबांना पाण्यांत पहूं लागला आहे. बरं एकाद्याला गृहसौख्य तरी असतं. त्याला बिचाऱ्याला तें देखील नाहीं. "

" कां बरं ? " वसंतरावांनीं विचारलें, "आम्ही कॉलेजांतले स्नेही

दोघेही. भाईसाहेबांचा स्वभाव नेहमीं आनंदी असावयाचा. खर्चाला त्यांना मनीऑर्डरी घराकडून येत. पण स्वावलंबी वृत्ति मात्र तेव्हांपासून देखील होती त्यांची. निरनिराळ्या नियतकालिकांत लेख लिहिण्याचा त्यांचा प्रघात तेव्हांपासूनचा आहे. थोडा बहुत मोबदला मिळत असे त्यांना तेव्हां देखील. असं मला आठवतं बाकी ते घरचे सधन आहेत ना? बापाकडे बरंच डबोलं आहे म्हणे त्यांच्या."

"हो! दाजीसाहेबाकडे बरीच माया आहे. सध्यां पण त्यांच्या घराला उंदीर घुशी लागल्या आहेत;" हें म्हणतांना यशवंतरावांनीं जरा निराळाच आविर्भाव केला. वसंतराव तें वाक्य ऐकून थोडेसे बुचकळ्यांत पडले; "आणि शिवाय," यशवंतराव पुढें बोलूं लागले, "बापलेकांचं आतां पटेनासं झालं आहे."

"साहजिक आहे. बाप असणार सनातनी आणि हे राजेश्री नवमतवादी!"

"छे! छे! नवमतवादी म्हणूं नका. प्रागतिक म्हणा पाहिजे तर. कारण नवमतवाद्यांची कार्यप्रणालि भाईसाहेब अवलंबीत नाहींत. त्यांना भलते वर्गकलह अथवा जातिभेद नको असले, तरी कुटुंबसंस्था नको असं मुळींच नाहीं. त्यांना संतति–नियमन विशिष्ट प्रसंगीं आवश्यक वाटलं तरी स्वैराचाराचा ते मनापासून तिरस्कार करीत असतात. आपल्यांतील उणीवा काढून नव्या उपयुक्त सुधारणा घडवून आणण्याकडे त्यांचा कल असला तरी त्यांचा देशाभिमान व धर्माभिमान जाज्वल्य आहे. ग्रामसंस्थेबद्दलचे त्यांच विचार अत्यंत मननीय आहेत."

एक पांखरूं डावीकडच्या झाडींमधील झाडावरील घरट्यांत बसून गमतीनें किलबिलत होतें. तो पक्षिशब्द ऐकत ते किंचित्काल दोघेही स्तब्ध राहिले. जणूं काय दोघांच्याही मनश्चक्षूंसमोर त्यावेळीं भाईसाहेबांची ती पाणीदार मूर्ति आली असावी. वसंतराव भाईसाहेबांचे कॉलेजांतील वर्गबंधु असले तरी त्या गोष्टीला आतां बरेच दिवस झाले होते. त्यानंतर त्या दोघांची प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. पण यशवंतराव व भाईसाहेब यांच्या वारंवार गांठी भेटी होत असत.

" पण एवढ्यामुळं भाईसाहेबांच्या जिवाला धोका कसा उत्पन्न होईल तें नाहीं समजत— " बऱ्याचशा वेळानें वसंतरावांनीं विचारलें.

" आंता लवकरच, आंबेखोल गांवचा दसरा होईल ना ? त्यावेळीं सीमोल्लंघनाच्या वेळीं भयंकर दंगा होण्याचा संभव आहे असं लोक कुज-बुजूं लागले आहेत. आणि त्याचवेळीं भाईसाहेबांच्या जिवास दगा-फटका होण्याचा संभव आहे—"

" कारण—? "

" कारण, भाईसाहेब खरोखरीचं सीमोल्लंघन करणार आहेत त्या दिवशीं; आणि तें तसलं खरोखरीचं सीमोल्लंघन इतरांना व्हावयास नको आहे. इतरांना रूढिगत सीमोल्लंघन जगाच्या अंतापर्यंत चालवावयाचं आहे. " यशवंतराव बोलावयाचे थांबले. कारण वसंतराव आंत जाऊन आंगांत स्वेटर घालून आले. त्यांनीं कोट काढून ठेवला होता. यशवंत-रावांच्या आंगांत कोट होता. शिवाय त्यांनीं मालवणहून निघतांना फारसे कपडे बरोबर घेतलेच नव्हते.

" म्हणजे ? " वसंतरावांनीं औत्सुक्यानें विचारलें. भाईसाहेबांची हकीगत यशवंतरावांच्या तोंडून ऐकतांना त्यांची उत्सुकता वाढत चालली होती एकसारखी.

" म्हणजे असं कीं, त्या दिवशीं आंबेखोलच्या जगदीशाच्या देवा-लयांत भाईसाहेब हरिजनांचा देवालयप्रवेश करणार आहेत. तसेंच येत्या दिवाळीस सर्वांचं एकत्र गूळपोहेसंमेलन ते घडवून आणणार आहेत. या बातमीनं सारा आंबेखोल गांवच नव्हे, तर आजूबाजूचे गांव देखील खळबळून गेले आहेत. त्यामुळें त्या दोन्ही प्रसंगीं फार गर्दी होण्याचा संभव आहे. "

" आँ ? " वसंतराव आश्चर्यानें उद्गारले, " इतकी धडाडी मारली आहे का भाईसाहेबांनीं या कोंकणपट्टींत ? तर मग या पुंगीवाल्यानं आपल्या पुंगीच्या नादावर तुम्हां साऱ्या " को—ब्रां " नां अगदीं भारून टाकलं आहे म्हणायचं ! "

" पण कोंकणांत सारेच कांहीं मोठे को—ब्रा—नाहींत. जादूगाराची

पुंगी जिथं खात्रीनं लटपटेल अशीं कांहीं फुरशीं देखील या आमच्या कोंकणप्रांतांत आहेत. आणि त्यांतलं एक जहर विखारी फुरसं भाईसाहेबांना दंश करण्याच्या खटपटींत—"

" म्हणजे सकाळचा मोटारींतला देश–कोंकणवादच पुन्हां निघाला म्हणायचा. म्हणजे तसा वाद नव्हे–पण तो विषय असं मी म्हणतों. तुमच्या कोंकणातले हे विषारी प्राणी सकाळीं कोणी कोंकणपक्षीयांनीं काढले नाहींत. आठवण झाली नाहीं वाटतं कुणाला आयत्या वेळीं त्यांची ? " वसंतरावांनीं यशवंतरावांचें वाक्य पुरें होऊं न देतां मध्येंच विचारलें.

त्यांच्या डोळ्यांसमोर यावेळीं त्या मोटरींतले ते सगळे उतारू आणि कंपार्टमेंटमधील ती नखरेल सुंदर तरुणी फिरूं लागली. काय असेल तें असो, पण यशवंतरावांना देखील अगदीं याचवेळीं तिचीच आठवण झाली.

आंतल्या खणांत दिवा पेटत होता. नोकर आंतल्या बाजूस दिवाबत्तीची सोय लावून गेला होता. हें त्यांच्या ध्यानांतच आलें नव्हतें अझून गोष्टींच्या भरांत. वसंतरावांनीं आपली बॅग उघडली व आपल्या " मेदिनी " साप्ताहिकाचा त्यांनीं नवा अंक काढून हातांत घेतला, आणि आनंदाच्या भरांत त्यांनीं यशवंतरावाला हांक मारून म्हटलें—

" यशवंतराव–यशवंतराव ! अहो ही बघा सकाळची—"

" का हो ? सकाळची कोण ? " बसल्या जागेवरूनच यशवंतरावांनीं विचारलें.

" अहो सकाळची ती गुलजार परी–जिच्याशीं तुम्ही खेटून बसण्याचा प्रयत्न करीत होता ती नखरेल तरुणी–अहो कंपार्टमेंटमध्यें तुमच्या शेजारीं बसलेली ती ! "

" काय म्हणतां ? " असें म्हणून यशवंतरावांनीं टुणदिशीं उडीच मारली व ते आंत वसंतरावाजवळ गेले. आंत गेल्याबरोबर त्यांना कोण दिसलें ?

# ५ : उग्र वेताळाची फेरी !

भाईसाहेब आणि वसंतराव हे कॉलेजमित्र असले तरी त्यांची बरेच दिवसांत दोन तीन वर्षांत गांठ पडली नव्हती. फक्त पत्रव्यवहार चालू असे. पण यशवंतराव व वसंतराव यांची प्रथम भाईसाहेबांच्या मध्यस्थीनें ओळख होऊन, नंतर व्यवसायसाम्यामुळें त्यांचा दोघांचा दाट परिचय झाला होता. यशवंतराव मालवणहून व वसंतराव मुंबईहून आपापल्या कामासाठीं निघाले, पण त्या दोघांची बेळगांवांत भेट झाली. वसंतरावांस भाईसाहेबांची माहिती यशवंतराव व भाईसाहेब या दोघांच्या पत्रांतून कळे तेवढीच. पण यशवंतराव भाईसाहेबांच्या जवळच्या तालुक्याच्या गांवीं रहात असत. त्यामुळें त्यांना भाईसाहेबांच्या बहुतेक हालचाली समजत असत. म्हणूनच वसंतरावांस ठाऊक नसलेल्या भाईसाहेबांच्या कार्याबद्दलच्या बऱ्याचशा गोष्टी त्यांस यशवंतरावांनीं सांगितल्या. भाईसाहेबांस दंश करावयास टपून बसलेले आंबेखोलचें फुरसें कोण हें जेव्हां वसंतरावांस कळलें तेव्हां तर त्यांना त्या फुरशास पाहण्याची तीव्र इच्छा झाली. दुसऱ्या दिवशीं मोटर कोणती घ्यावयाची, जातांना वाटेंत कोणकोणतीं स्थळें पहावयाचीं, आपल्या फिल्म कंपनीचें व आपल्या साप्ताहिकाबद्दलचें आपलें कार्य कसकसें करावयाचें वगैरे बेत त्यांनीं आंखून ठेवले.

वसंतरावांनीं यशवंतरावांवर बोलतां बोलतां थट्टेंत जो आरोप केला होता तो किती असभ्यपणाचा आहे याबद्दल यशवंतराव त्यांची कानउघाडणी करीत होते. अशा प्रकारचें थट्टेंतलें देखील असभ्य बोलणें भाईसाहेबांस कसें सहन होत नाहीं हेंही त्यांनीं त्यांस सांगितलें.

" सकाळची गुलजार परी " असें वसंतरावांनीं म्हटल्याबरोबर यशवंतराव आंत गेले. वसंतरावांनीं आपल्या 'मेदिनी' साप्ताहिकांतून शेवटचें पान काढून उघडून ठेविलें होतें व आपला गोल्ड फ्रेमचा चष्मा सरसावून त्यावरील जाहिरात ते पहात होते. ती जाहिरात एका हौशी

व धाडशी नाट्यमंडळाची असून त्यांत मंडळाच्या मुख्य नायिकेचा नाटकांतील भूमिकेचा फोटो छापलेला होता. हें मंडळ नाट्यकलेच्या उन्नतीकरितां जिवापाड झटणारें होतें. मुंबईत व पुण्यांत त्या मंडळाचे यशस्वी प्रयोग फार लोकप्रिय झाले होते व म्हणून तें मंडळ बेळगांवला आलें होतें. त्या मंडळाचा शेवटचा प्रयोग कालच झाला होता. या मंडळाचा एक प्रयोग मुंबई मुक्कामीं वसंतरावांनीं पाहिलेला होता, व त्या प्रयोगावरचें अभिप्रायाचें स्फुट मेदिनींत त्यांनींच लिहिलें होतें. पण प्रयोगास मात्र ते पंधरा मिनिटांहून अधिक वेळ बसले नव्हते. मुख्य भूमिका घेणाऱ्या स्त्री नटीचें काम येईपर्यंत ते बसले होते. ती त्यांना आठवण होऊन त्यांनीं मेदिनीचा अंक उघडला. तेव्हां त्यांची पक्की खात्री झाली कीं, "युगप्रवर्तक नाट्य मंडळा"ची नायिका ती ही सकाळची "गुलजार परी."

त्यानंतर त्या फोटोवरून त्या दोघांची त्या नायिकेच्या सौंदर्याविषयीं बरींच बोलणीं झालीं व त्यांनीं तिच्या सौंदर्याची इतर प्रसिद्ध नटींच्या सौंदर्याशीं अनेक प्रकारें तुलना देखील केली. त्या दोघांचें एका बाबतींत मात्र पूर्ण मतैक्य झालें कीं त्या सकाळच्या नटींत जें काय सौंदर्य असेल त्यांत आंगच्या शरीरसौष्ठवापेक्षां कृत्रिमतेच्या प्रसाधनानें आणलेला व नखरेलपणानें जोपासलेला असा भागच अधिक होता. असल्या व्यक्तींच्या दिखाऊ सौंदर्याची छाप कांही अंतरावरून किंवा अस्पष्टपणें पहाणारांच्या मनावर एकदम बसते. पण जवळून त्या सौंदर्याचें स्पष्टपणें पाहून पृथक्करण करूं गेल्यास हातास कांहींच लागत नाहीं. एकसमयावच्छेदाच्या गोळाबेरजेंत भरलेलें गुणांचें माप, एकेक अवयव निरनिराळा पारखूं गेल्यास हिस्सेरशीच्या प्रमाणांत गुण दिसून न आल्यामुळें रितें कां पडावें, हें चमत्कारिक कोडें तज्ज्ञ सौंदर्यसमीक्षच सोडवूं शकतील.

दोघांचींही जेवणें झाल्यावर झोंपावयाच्या पूर्वीं बंगल्याच्या पुढील मोकळ्या जागेंत साधारणसा उंचवटा बघून ते दोघेही त्याच्यावर चढले व समोरील दृश्याकडे पाहूं लागले. हजारों फूट खोल असलेला तो भूभाग चांदण्यांत अस्पष्ट दिसत होता. कोठें कोठें विरल धुकें उठल्यामुळें त्या अस्पष्टतेंत अधिकच भर पडली होती. परंतु असल्या प्रचंड देखा-

ज्याचा विस्तार पहात असतां सूक्ष्मतेकडे लक्ष जातच नाहीं. ते जेथें उभे राहिले होते तेथून पश्चिमेकडे पाहिलें असता, आंबोलींतील तो सह्याद्रि पर्वताचा भाग घोड्याच्या नालाच्या आकृतीचा दिसतो. एक भाग डावीकडील मलईच्या जंगलांतून डोंगरकण्याच्या आधारानें पुढें गेलेला, व दुसरा भाग महादेव गडाच्या बाजूनें डावीकडून पुढें सरकलेला. अशा प्रकारें बनलेल्या त्या अर्धवर्तुलाकृति नालाच्या मधल्या भागावर आपण उभे आहोंत असें त्यांस वाटलें. हजारों मैल क्षेत्रफळाचा तो विस्तीर्ण प्रदेश एकाच दृष्टिपातांत दाखविणारी ती विशिष्ट निसर्गरचना त्यांनीं त्याच जागेवरून सूर्यास्तापूर्वी पाहिली होती. म्हणूनच निशेच्या श्यामल काचेंतून ते दृश्य पुनः कसें निराळें दिसतें तें त्यांना पहावयाचें होतें.

वाऱ्याच्या झुळुकीबरोबर त्यांना थंडी भासली तरी त्या थंडींतून त्यांना तरतरी वाटत होती. वसंतरावांच्या प्रश्नांना यशवंतराव स्थानिक माहितीनें भरलेलीं उत्तरें देत होते; व मधून मधून अंबोलीच्या हवेंतील आरोग्यवर्धनाचा नैसर्गिक गुण सिद्ध करण्याकरितां अनेक उदाहरणें आपल्या ' सागर ' साप्ताहिका च्या स्फुटांचे आधार देऊन सांगत राहिले होते.

महात्मा गांधीजी उजवीकडच्या रेसिडेन्सी बंगल्यांत राहिले असतां त्यांची दिनचर्या कशी होती, आपण त्यांना भेटावयास आलों त्यावेळीं त्यांच्यांशीं भाईसाहेब कसे बोलत बसले होते, तात्यासाहेब केळकर आले तेव्हां ते कोणत्या ठिकाणीं फिरावयास गेले, व चौकुळकडे जाणाऱ्या रस्त्यावरील शिरगांवकर सीटवर बसले असतां राजकारणांतील कोण-कोणत्या विषयांवर वादविवाद झाला, त्यानीं राउंड टेबल कॉन्फरन्सला विलायतेस गेल्यावेळच्या कोणत्या गोष्टी सांगितल्या; मालवणास ललितकला नाटक मंडळी आली असतां कै बापूसाहेब पेंढारकर आपल्या एका परिचित गृहस्थास भेटावयास तेथें येऊन टेंपल्पॉइंटवर आपले पुढील बेत बोलत बसले असतां उदार कलाप्रेमी श्रीमंत लोक मदत करतील तर आपण सर्व ललितकलांचें शिक्षण देणारें एक अभिनव कलामंदिर मुंबा-पुरींत उभारण्याचें ध्येय हृदयाशीं बाळगून टेवलें असल्याचें किती कळ-कळीनें सांगितलें, तसेंच बेळगांवास गंधर्व नाटक मंडळी आली असतां

सावंतवाडीच्या श्रीमंत महाराज सरकारच्या वाड्यावर त्यांनीं गुरुवार रात्रीं मास्तर कृष्णराव व वालावलकर इत्यादिकांसमवेत कसें रसभरित भजन केलें, अशा अनेक गोष्टींचें रसाळ वर्णन ‘ सागर ’चे संपादक करित होते. इतक्यांत डावीकडच्या बाजूस भेकऱ्याचें ओरडणें सुमारें अर्धा मैल अंतरावरून ऐकूं आलें.

भेकरा हा प्राणी कसा आहे, वगैरे जंगली प्राण्यांचें वर्णन यशवंतराव देऊं लागले होते. सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरावरून तेवीसशें फूट खोलींतील जगाकडे वसंतराव करड्या अंमलदाराच्या आढ्यतेनें पहात होते. जणूं काय तो सारा टापू आपल्या अमलाखालींच आहे असें त्यांस त्या क्षणीं वाटत असावें. यशवंतरावांच्या बोलण्यांत ईश्वराच्या नांवाचा उल्लेख एकदां नव्हे, दोनदां नव्हे, तिसऱ्यांदा आलेला ऐकिल्याबरोबर त्यांनीं तोऱ्यांत म्हटलें—

“ यशवंतराव ! तुमच्या माहितींतील नाविन्य ऐकण्याच्या उत्सुकतेनें मी मघांपासून बोललों नाहीं. पण हें पहा— ”

यशवंतरावांचा वाक्प्रवाह एकाएकीं थांबला. ते चकित होऊन वसतरावांकडे पाहूं लागले—

“ हें पहा ! ईश्वरबीश्वर सब् झूट ! ईश्वराचं अस्तित्व मी मानीत नाहीं. निसर्ग म्हणजेच ईश्वर. ईश्वर म्हणून जगांत निराळं कांहीं नाहीं. धर्मभोळया व ढोंगी लोकांनीं ईश्वराचं बुजगावणं उभारलेलं आहे. त्या बुजगावण्याला आतां चोहींकडून थपडा बसूं लागल्या आहेत. तुमच्या डोळ्यांदेखतच तो डोलारा खिळखिळा झालेला तुम्हांला दिसेल. ”

“ वसंतराव, हें मत तुमचं आजकालचं नवीन नाहीं. या मताचे पुरस्कर्ते पूर्वींही होते व ते शेवटीं पश्चात्तप्त होऊन आपलंच थोबाड फोडून घेत जगांतून नाहींसे झाले, आणि तुम्ही— ”

लागोपाठ बंदुकीचे दोन आवाज महादेवगडच्या बाजूस झाले. वसंतराव दचकले.

“ ईश्वराचा शब्द ऐकायला कान नसणाऱ्या गृहस्था ! बंदुकीच्या आवाजाला असा दचकूं नको. श्रीमंत महाराज सरकारनीं वाघाला

गोळी घातलीशी वाटतें. एका तासाभऱ्यांत आपणाला राजवाड्यापाशीं वाघ पहायला मिळेल. " यशवंतराव म्हणाले.

" तर मग आपण तोंपर्यंत निजायचं नाहीं. असाच वेळ काढूं तोंवर, नाहींतर रेसिडेन्सी बंगल्याकडे जाऊन राहूं या " असें वसंतरावांनीं म्हणून बंगल्याच्या नोकराला हांक मारली. विशेष माहिती काढण्याचा त्यांचा विचार असावा. आतां सरासरी अकरा वाजायला आलेच होते.

नोकर येईपर्यंत ते दोघेही त्याच ठिकाणीं उभे राहिले होते. पण दोघेही स्तब्धच होते. सभोंवतालचा देखावा पाहून दोघांच्याही मनांत निरनिराळ्या तऱ्हेचे विचारतरंग उद्भवत होते. त्यांच्या जवळील डावीकडच्या जंगलाच्या बरोबर वर आकाशांत धुक्याचा थर पसरला होता. तो थर बराच दाट म्हणजे बहुतेक ढगासारखाच होता. तो मधून मधून प्रकाशमयतेनें सतेज दिसे व पुन्हां पूर्ववत् होई. त्या दोघांना हा चमत्कार उलगडेना. यशवंतरावाला तो प्रकार कसा घडला हें लवकरच कळून आलें. मात्र वसंतराव खालीं, वर, इकडे तिकडे चोहोंकडे पहात राहिले होते.

वेंगुर्ल्याजवळील निवतीच्या खडकावरील दीपगृहाच्या प्रकाशाचा झोत त्या बाजूस आला कीं, तो धुक्याचें माध्यम आधारादाखल सांपडल्यामुळें दृश्यमान् होत असे. जोंवर धुकें नव्हतें व वातावरण स्वच्छ होतें, तोंपर्यंत तो दृश्यमान् झाला नव्हता. पण आतां तो त्यांना धुक्याच्या साधनानें दिसूं लागला होता.

इतक्या खोलींतला व इतक्या दूर अंतरावरचा दिवा कसा दिसतो व लंबरेषेंत बरोबर घाटाखालीं असलेल्या मनुष्यांच्या मोठ्यानें बोलल्याचा आवाज, इतका वर किंचित् मंद होऊन कसा ऐकूं येतो ह्याचा अनुभव घेतल्यावर यशवंतरावांना वाटूं लागलें, कीं आपल्यापेक्षां अनेक पटींनीं सामर्थ्यवान् असलेल्या परमेश्वराला, विश्वांत तो कोणत्याही स्थळीं असला तरी माणसांच्या हालचाली दिसणें अशक्य कां असावें ?

यशवंतराव तसेच त्या दीपगृहांतील विद्युद्दीपाकडे पाहत राहिले होते. त्यांना त्या दीपगृहाजवळील आपलें मालवण, तेथील आपलें निवास-

स्थान, तेथील तो आपला छापखाना व ती ' सागर ' कचेरी हें सर्व आठवलें.

वसंतराव देखील त्या दीपगृहाकडे पहात राहिले होते. इतक्यांत खोल भूभागावरून, इतक्या गर्द जंगलांतून, इतक्या उत्तुंग पर्वतशिखरावर चढण्याचा पायरस्ता प्रथम ज्या कोणी शोधून काढला असेल, त्याच्या श्रमांची, साहसाची व बुद्धीची कर्तबगारी आश्चर्यकारक वाटून, आधुनिक शास्त्रज्ञानानें सुसज्ज झालेला मानवप्राणी कदाकाळीं आकाशांत लुकलुकणाऱ्या ग्रहगोलांवर चढून जाण्याचा मार्ग काढावयास समर्थ झाला तर त्यांत नवल तें कसलें मानावयाचें? असा विचार मनांत घोळवण्यांत वसंतराव दंग झाले. त्यांना त्या दीपगृहावरून जलमार्गाची, आगबोटींची, मुंबईची, धोबी तलावावरील त्या मेदिनी ऑफीसची, मेदिनीचे आश्रयदाते व तारका फिल्म कंपनीचे चालक श्रीमंत गिरधरलाल यांची व इतर अनेक व्यक्तींची व गोष्टींची आठवण येऊन ते त्यांतच कांहीं वेळ गुंगत राहिले.

" यशवंतराव! आंबेखोल गांव कोणत्या बाजूस आहे तो? तिकडे का?" मध्येंच वसंतरावांनीं विचारलें.

" काय म्हटलंत? काय बरं तुमच्या मनांत आलं इतक्यांत?" झोपेंतून जागें झाल्यासारखें करून यशवंतराव म्हणाले. त्यांनीं विशिष्ट जागेकडे हात करून म्हटलें—

" ती बाजू आंबेखोल गांवाकडची. दिवसा नीट कल्पना येते. रात्रौ काय कळणार?"

थोड्या वेळानें ते दोघेही बंगल्यांत गेले.

आंबेखोल गांवची त्यांना आठवण झाली. कारण दुसऱ्या दिवशीं त्यांना तिकडे जावयाचें होतें. खुद्द आंबेखोल गांवांत या मध्यरात्रीच्या सुमारास सर्व माणसें झोंपीं गेलीं असलीं तरी कित्येक व्यक्ती जाग्या होत्या व कित्येकांना जागृत राहणें भाग पडलें होतें.

येशाप्पाच्या घरांत सर्वत्र सामसूम झालें असलें तरी, एका खोलींत पणती मिणमिणत होती. त्या पणतीच्या उजेडांत नुकतीच आंथ-

रुणावरून उठलेली हिरा कानोसा घेऊं लागली होती. किशाची आई आपल्या खोलींत झोंपली होती. दिवसभर काबाडकष्ट केल्यानंतर थकून भागून गेलेल्या कामकऱ्यांना निद्रेची कधींच आराधना करावी लागत नाहीं. जमिनीला अंग टाकण्याची फक्त फुरसत, कीं गाढ झोंप !

येशाप्पा मधल्या सोप्यांत आपल्या जागेवर निजला होता. तोही नुकताच घोरूं लागला होता. त्याच्याजवळ निजलेला धाकटा किशा अंथरुणावरून लोळत सरकत बाजूस गेला होता. मध्यरात्र कलंडून गेल्यावर एक दोन वाजण्याच्या सुमारास तो जागा होई व मग त्याची आई त्याला घेऊन जाई. तो वेळ यायच्याआधींच हिराला आपली कामगिरी आटपायची होती.

हिरानें दिवा खोलींतच ठेवला. ती काळोखांतूनच बाहेर आली. प्रथम देवघरांत जाऊन तिनें देवाला नमस्कार केला. नंतर ती आपल्या बापाच्या अंथरुणाजवळ गेली. त्याच्या पायाखालच्या बाजूस ती बराच वेळपर्यंत उभी होती.

नंतर ती पुन्हां आपल्या खोलींत आली. तिला माणसाचीं पावलें वाजल्यासारखीं वाटलीं. म्हणून ती दिवा घेऊन घरांत फिरूं लागली. पण किशाची आईदेखील गाढ झोंपेंतच होती. पणती घेऊन ती पुन्हां आपल्या खोलींत आली. तिनें आपल्या उशाखालीं लिहून ठेवलेलीं दोन पत्रें हातांत घेतलीं. त्यांतील एक पत्र तिनें घेतलें आणि फिरून येशाप्पाच्या अंथरुणाजवळ गेली. पुन्हां मागें फिरली. दिवा बाहेर आणून उंबरठ्यांतूनच तिनें येशाप्पाची व किशाची जागा लक्षांत धरली. काळोखांतच तिनें किशाचा एक हलकेच मुका घेतला. नंतर येशाप्पाच्या उशीलगत तें पत्र तिनें ठेवलें. ती मागें फिरली तोंच किशा जागा झाला !

ती घाबरली. तिनें पणती मालवून टाकली. काळोखांतच आपलें गांठोडें तिनें काखोटीस घेतलें. मागील दाराच्या वाटेनें ती बाहेर पडली. बाहेरून तिनें कडी लावून घेतली. दारांचा किंवा पावलांचा बिलकुल आवाज होऊं दिला नाहीं. किशा इतक्यांत आपोआपच थांबला होता. तो कुशीवर फिरतांच कुरकुरला असावा.

जड पावलांनीं ती मागील दाराच्या वाटेनें बाहेर पडली आणि वाटेला लागली. थोड्याच अंतरावर गेल्यावर झाडाखालीं तिला दुसरी एक व्यक्ति भेटली. ती व्यक्ति बहुधा हिराची वाट पहातच बाहेर तिष्ठत उभी राहिली असावी.

हिराला घराबाहेर पडायला फार उशीर लागला म्हणून ती बहुधा चरफडत असावी हिरावर. हिरा निमूटपणें खालीं मान घालून चालली होती. त्या दोघांनीं देवदासीच्या आवाठाचा मार्ग धरिला होता.

त्यांना सगुणेच्या घराकडे पोंचावयास फारसा वेळ लागला नाहीं. पिकून गेलेलें भात वाटेवर येऊन पडल्यामुळें व तेंही दहींवरानें ओलें झाल्यामुळें पायाखालीं आलें असतां त्यांना चालतांना किंचित् त्रास होई. पण ती त्यांच्या सरावांतली गोष्ट होती.

उसाच्या मळ्याकडून जातांना तिला फार भीति वाटत होती. मळ्यांतील खोपेंत राखण करण्यासाठीं निजलेला एखादा शेजारी उठून बाहेर आला आणि त्यानें आपणास पाहिलें तर ?

सुदैवानें तसें कांहीं घडलें नाहीं. सगुणेच्या घरांत दिवा होता हें फटींतून बाहेरून दिसत होतें. सगुणेच्या घरांत ती यापूर्वी कधींच आली नव्हती. म्हणून तिच्या घरांत प्रवेश करायला तिचें मन कचरत होतें. पण एकदा घराबाहेर पाऊल पडल्यानंतर आतां कचरून काय उपयोग ? मन घट्ट करणेंच भाग होतें.

घरांत दोन तीन माणसांचा कुजबुजाट चालला होता. हिराच्या बरोबर असलेल्या व्यक्तीनें इषारा देण्याकरितांच बहुधा खोकला ओढून ताणून आणला असावा. कारण तें खोंकणें ऐकतांच सगुणेच्या घरांतील कुजबूज बंद झाली.

सगुणेच्या घराजवळ आंब्या फणसांची झाडी होती. एक वाघूळ मोठ्यानें फडफडत उडून गेलें. हिराच्या आंगावर शहारे आले. सगुणेच्या दारांत तीं दोघे येतांच घरांतील एका खोलीचीं दारें झांकलीं गेलीं आणि घराचें मुख्य दार उघडलें गेलें.

हिरा दारांतच उभी राहिली. सगुणेनें तिला हाताला धरून घरांत

नेली व हलक्या आवाजांत तिला कांहीं सांगितलें. थोडक्याच वेळांत सगुणेच्या घरांतून एक सुंदर दिसणारी स्त्री तेथें आली. सगुणेनें तिची व हिराची ओळख करून दिली. तिला पाहतांच हिराला तशाही स्थितींत आनंद झाला. हिरा चुकलेल्या हरिणीप्रमाणें त्या घरांत सभय व सांशक होऊन चोहोंकडे पाहत होती. कारण तिला तो पूर्व परिचयाचा जर्द्याचा वास येत होता. पण कोणी पुरुष तिला कोठें दिसला नाहीं.

पंधरा मिनिटांत त्यांचें कांहीं बोलणें झालें. ती सुंदर स्त्री प्रवासाच्या तयारीनेंच उभी होती. तिनें आपल्या हातांतील घड्याळाकडे पाहिलें. टरलेला वेळ होऊन गेला होता. पण तिला फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. रस्त्यावर मोटरींचें हॉर्न वाजलें. सगुणाची बहीण व हिरा जाऊन मोटरींत बसलीं. त्यांच्याबरोबर एक गडीमाणूस सामान-सुमान घेऊन मोटरींत बसला. ती टूरिंगकार होती. आंत बसल्याबरोबर त्या नटव्या स्त्रीनें हलक्या आवाजांत उशीर कां लागला म्हणून विचारलें. ड्रायव्हरनें कांहींएक उत्तर दिलें नाहीं.

ड्रायव्हरनें पूर्वी मोटर आणून जिथें उभी केली होती, त्याच्यालगतच वेताळाचें देऊळ होतें. त्यानें मोटर आणून उभी केली व तो दर्शनासाठीं वेताळाच्या देवळासमोर उभा राहिला. गाभाऱ्यांतील दिव्याच्या प्रकाशांत वेताळाची अगडबंब नग्न मूर्ति त्या मध्यरात्रीच्या समयीं अध्यांकच्या मनाला वचक बसविण्याइतकी गंभीर दिसत होती. या वेताळाच्या देवळांत बसकेकरितां राऊळ यांच्या घराण्यापैकीं कोणत्या इसमानें बसावयाचें याविषयीं मोठा तंटा पडला होता. दोन रावळांच्या बाजूला गांवांतले निरनिराळे लोक होते, म्हणून गांवांत जे अनेक पक्षोपपक्ष होते, त्यांत आणखी जास्त भर पडली होती. त्या तंट्यामुळें गेलीं दोन वर्षे वेताळासमोरचें देवपण बंद पडलें होतें. गांवामार्फत व्हावयाचें देवपण बंद पडलें असलें, तरी खाजगी व्यक्ति कोंबडा अर्पण करण्याचा आपला नवस फेडूं शकत असत. कित्येक वेताळ देवाला कोंबड्याचा बळी अर्पण करून देवाचा आशीर्वाद मिळवीत असत; तर ज्या कित्येकांना तसें करण्याचें परवडत नसे ते देवाच्या नांवानें जिवंत कोंबडा सोडून देत असत.

तसाच प्रकार रात्रीं सगुणेनें केला होता. आपल्या बहिणीची इच्छा पूर्ण झाली कीं तिला बोलावून घेऊन कोंबडा-नारळ अर्पण करीन असा सगुणेनें वेताळास नवस केला होता. सगुणेची बहिण कस्तुरी हिला मुंबईस गेल्यावर प्रथम प्रथम फार वाईट दिवस गेले. पण नंतर सर्व कांहीं मनासारखें जुळून आलें व तिला धनप्राप्ति तर उत्तम होऊं लागलीच, पण कीर्तीचाही लाभ होऊं लागला. आंबोलीच्या ट्रॅव्हलर्स बंगल्यांत ' मेदिनी ' साप्ताहिकांतील जाहिरातींत जिचें छायाचित्र इतकें लक्षपूर्वक वसंतराव व यशवंतराव पहात बसले होते तें ह्याच कस्तुरचें. हिराचें काम करण्याकरितां सगुणेनें कस्तुरला कितीतरी कळवळ्यानें सांगि-तलें होतें. लहानपणींच वारलेल्या आपल्या आईचा कळवळा या सगुणच्या हृदयांत कसा निर्माण झाला याचें सगुणेला आश्चर्य वाटूं लागलें होतें. हिराचा आणि कस्तुरचा स्वभाव सारखाच अगदीं उघडा भाबडा आहे हें धूर्त सगुणेला ठाऊक होतें. कुठून तरी, आंबेखोल गांवांतून हिरा निघून जावी हीच तिची मुख्य इच्छा होती. इतर ज्या तिच्या इच्छा हिराच्या भवि-तव्यास वळण लावण्याच्या होत्या, त्या स्वयंप्रेरित नसून परप्रेरित होत्या.

ड्रायव्हर मोटर चालविण्याकरितां बसला, पण त्याच्या आंगाला दरदरून घाम सुटला होता. कारण त्याला जो प्रकार दिसला तो तसाच रोमांचकारक होता.

आंबेखोलचे वेताळाचें दैवत तसेंच अत्युग्र असल्याबद्दल आसपासच्या दहापांच गांवांत कीर्ति होती. हल्लीं देवस्की नीट न झाल्यामुळें तें दैवत खवळलें होतें. गांवांत रोगराई, चोरीमारी असे प्रकार त्यामुळें सुरू झाले होते, असा भाविक लोकांचा समज झाला होता. पण अमा-वास्येच्या रात्रीशिवाय सहसा कधीं न दिसणारा वेताळदेव कित्येकदां इतर आडरात्रीं देखील बाहेर फेरीला निघत असल्याच्या गोष्टी पसरल्या होत्या. ड्रायव्हरला त्या ऐकून ठाऊक होत्या.

ड्रायव्हरनें मोटर उभी केली आणि तो सगुणेच्या पडवींत धक्क्यावर बसला होता. दोन दिवस फार जाग्रण झाल्यामुळें त्याचा डोळा लागूं लागला होता. पण कसलासा आवाज झाला म्हणून त्यानें किलकिले डोळे उघडले. तेव्हां देवळांतून बाहेर पडलेल्या मोठ्याशा बोकोबांचें त्याला

दर्शन झालें. पुन्हां थोड्याच वेळांत सुकीं पानें सरसरल्यामुळें त्यानें अर्धवट डोळे उघडले आणि पाहिलें तर एक अतिशय उंच कृष्णाकृति हातांत उंच सोटा घेऊन झाडीच्या काळोखांत फिरत आहे असें त्याला दिसलें. ती आकृति मोटरीकडे आली व दिसेनाशी झाली. मोटरीच्या मागच्या बाजूस लककन् उजेड पडलासें झालें. मोटरीची पुढची बाजू इकडून दिसण्यासारखी होती, मागची बाजू दृष्टिआड होती. ड्रायव्हरला उठून जाऊन बघावेसें वाटलें पण त्याला वेताळाच्या फेरीबद्दलच्या दंतकथांची आठवण झाली. शिवाय रात्रीं सगुणेनें देवस्की केल्याच्या गोष्टी त्याला तिथें आल्यानंतर कळल्या होत्या. खात्रीनेंच वेताळाची स्वारी! सभोवतीं झाडी तर इतकी किर्रर्रर्र होती कीं चंद्र अगदीं मस्तकावर आला तरी क्वचितच थोडेसे कवडसे खालीं आले असते. मोटरभोंवतीं फेरी घालून ती कृष्णाकृति काळोखांतून जाऊं लागली आणि दूर गेल्यानंतर ती आकृति कोल्ह्यासारखी ओरडूं लागली. कळपांतून फुटलेला एकादा कोल्हा जसा ओरडतो, तशीच ती कृष्णाकृति ओरडली; त्याबरोबर दूरच्या मळ्यांतून कोल्हेकुई सुरू झाली. ड्रायव्हरचें अंग थरारलें. तो घरांत जाऊन हा सर्व प्रकार सांगण्याच्या बेतांत होता. इतक्यांत घरांत तीन माणसें जीं बोलत बसलीं होतीं, त्यांतून एकानें दार उघडलें व ड्रायव्हरास मोटरींत जाऊन बसण्यास सांगितलें. दक्षिणेकडून दोन माणसें येत असल्याचें त्यालाही उमगलें व तो मोटरींत जाऊन बसण्यास तयार झाला. त्याला आतां थोडासा धीर येऊं लागला होता. एक क्षणभरच पण त्याला असेंही वाटलें कीं आपल्याला हा स्वप्नांतच सारा भास झाला असावा.

पण गाडी स्टार्ट करतांना त्याला त्या प्रकाराची पुन्हां आठवण झाली, हातरुमालानें त्यानें आपला घाम पुसून टाकला व मोटर चालू केली. सकाळीं उजाडल्याबरोबर जो कोणी प्रथम भेटेल त्याला हा वेताळाच्या फेरीचा प्रकार सांगण्याविषयींची त्याची हुटहुटी मोटरवेगापेक्षांही अधिक जलदीनें वाढत होती, आणि आतां ड्रायव्हरची भीति देखील पळाली होती. ड्रायव्हर कितीही भोळसट, घाबरट असला तरी मोटरींत बसल्यावर व हातांत व्हील आल्यावर त्याच्या आंगांत धैर्य संचरतें. मोटर चालू झाली.

# ६ : पोस्टांतून गडप झालेलें पत्र !

मोटर चालू झाल्याचें पाहून सगुणा घरांत गेली. तिनें दार लावून घेतलें. घरांत पुन्हां बोलणें सुरू झालें. घरांत दिवा असल्याचें बाहेरून ओळखतां आलें असतें.

ड्रायव्हर मोटर घेऊन गेला. तो जर तेथें बाहेर असतां तर त्याला पुन्हां तीच कृष्णाकृति सगुणेच्या घराच्या वळचणीकडे येत असलेली दिसली असती. आंबेखोलचा वेताळ कोपला तर कसें नुकसान होतें, या अनुभवांची केवढी तरी मोठी यादी तयार झाली होती.

अमका तमका माणूस रस्त्यानें चालला असतां त्याला रात्रौ " कांबळेकार " दिसला. दुसऱ्या दिवशीं तो माणूस तापानें आजारी पडला आणि चार दिवसांत आटोपला. कुणाचें मूल, कुणाची बायको, असे अनेक वेताळाच्या कोपास बळी पडल्याच्या आख्यायिका होत्या. म्हणूनच आजूबाजूच्या पांच सात गांवांत आंबेखोलच्या वेताळास " उग्र वेताळ " असें लोक म्हणत असत.

घराच्या ज्या खोलींतून बोलण्याचा आवाज येत होता त्याच खोलीच्या भिंतीकडे ती कृष्णाकृति हळूहळू जाऊं लागली. एकच शब्द मोठ्यानें उच्चारलेला बाहेर ऐकूं आला होता. तो शब्द " बहुरूपी " हा होय. तो शब्द ऐकतांच ती कृष्णाकृति अधिकच घराजवळ जाऊन कानोसा घेण्याचा प्रयत्न करूं लागली.

आतां तर बोलणें अधिकच हलक्या सुरांत येऊं लागलें. एकदम दोन माणसांच्या हंसण्याचा ध्वनि कानावर आला. त्या हंशांतच बोलणें चालू होतें. कृष्णाकृति कपाळाला आंठ्या घालूं लागली. इतक्यांत आवाज हळूहळू मोठा येऊं लागला.

" म्हणूनच तर इतकी घटना घडवून आणावी लागली. मी इथं राहणारच नाहीं. मी उद्यांच आंबेखोल सोडणार. उद्यां प्रौढशिक्षणवर्गाचा कसला तरी समारंभ असल्यामुळं ती मंडळी त्या कामांत गुंत-

लेली असणार. याच आठवड्यांत दसरा येतो आहे. दसऱ्याला मंदिरप्रवेशाच्या चळवळींत दंगा झाल्याशिवाय खास रहात नाहीं. कदाचित् रक्तपातही होण्याचा रंग दिसतो. भाईसाहेबांची गत कठीण दिसते. — ...”

पुढील बोलणें ऐकूं येईना. कांहीं वेळानें कुजबुज देखील बंद झाली. कृष्णाकृति वळचणीकडून दूर जाऊं लागली. पण पुन्हां तुटक तुटक शब्द कानावर येऊं लागले.

“ ... .. मी लिहिलेल्या कागदाचा परिणाम झालाच पाहिजे ... लिहिलेलं ... वायां जाणार नाहीं ... ... ”

ती कृष्णाकृति अत्यंत चपलतेनें झाडीच्या काळोखांत गडप होऊन गेली. सगुणेनें हातांत दिवा घेऊन दार उघडलें होतें. झाडीकडच्या बाजूस कोल्हा ओरडल्याचा आवाज ऐकूं आला. या खेपेस मात्र कोल्हेकुई ऐकूं आली नाहीं. एकांडाच कोल्हा ओरडायचा बंद झाला, आणि लगेच बकरा ओरडण्याचा स्पष्ट आवाज ऐकूं आला. सगुणेच्या आंगांत चोळी नव्हती. दोन्ही हात तिनें पदरानें झांकतां येतील तितके झांकले होते. तिच्या हातांत कंदील होता. कंदीलासहच तिनें दोन्ही हात वेताळाच्या देवळाकडे तोंड करून जोडले आणि ती घरांत मागच्या पावलींच, पाठ फिरवल्याशिवाय गेली. तिनें हात वर केले व मस्तक खालीं करून देवाचें स्मरण केलें. कंदीलाच्या प्रकाशांत तिच्या केस विसकटलेल्या चेहऱ्यावर भीतीची छाप बसलेली अगदीं स्पष्ट दिसण्यासारखी होती.

दुसऱ्या दिवशीं वेताळाच्या फेरीच्या अनेक बातम्या गांवभर पसरल्या. आंबोलीहून निघून आंबेखोलास जेव्हां वसंतराव आले तेव्हां त्यांना देखील वेताळाच्या फेरीच्या निरनिराळ्या हकीगती समजण्यास फारसा वेळ लागला नाहीं.

रात्रीच्या मुक्कामाची वसंतरावांची व्यवस्था भाईसाहेबांनीं सुरबाजी सुभेदाराच्या घरीं केलेली होती. त्यांना स्वतःला एकंदर कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठीं एकसारखें चोहोंकडे फिरावयाचें असल्यामुळें त्यांना एकेक काम एकेकाच्या हवालीं करून सर्व कामाची सुरळीत सोय लावावयाची

होती. सुरबाजी ऐंशी वर्षांचा वृद्ध पेन्शनर होता. त्याला सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शन मिळत असे. शिवाय त्याचे दोन मुलगे कराचीला चांगल्या हुद्यावर नोकरीला होते. त्यांतला एक मुलगा गणेशचतुर्थीसाठीं घरीं आलेला दसऱ्यापर्यंत राहिला होता. तो मॅट्रिकपर्यंत शिकलेला होता; व शहरांत वागलेला होता. त्याची ओळख भाईसाहेबांनीं वसंतरावांशीं करून दिल्यावर तो पाहुण्यांशीं गप्पासप्पा करूं लागला. पण सुरबाजी फारच बोलका असल्याचें वसंतरावांस आढळून आलें.

अशा तऱ्हेचे प्रसंग म्हणजे आपलें कार्य चालविण्याचे लहान लहान टप्पेच होत असें भाईसाहेबांस वाटे. कारण अशावेळीं बाहेरील प्रसिद्ध लोक गांवांत आल्यामुळें गांवकऱ्यांत एक प्रकारचा उत्साह उत्पन्न होतो. सामाजिक सम्मेलनें त्या निमित्तानें अगदीं नकळत सहजासहजीं घडवून आणतां येतात. एकादें कार्य करावयाचें म्हणून पुकारा करून तें हातीं घेतल्यावर विरोधी पक्षाकडून अडचणी आड येऊन संघर्ष उत्पन्न होतो. पण प्रसिद्धीच्या भानगडींत न पडतां निमूटपणें केलेलें कार्य संथपणें आस्ते आस्ते चालतें; व विरोध सहन करण्याची ताकद येईपर्यंत त्यास आघात सहन करावे लागत नाहींत. तसाच कांहींसा प्रकार भाईसाहेबांच्या या ग्रामोद्धार कार्याचा झाला होता. प्रथम प्रथम भाईसाहेबांच्या आचरणाचा अर्थ विरोधीपक्षानें असा केला होता कीं तो एक बाटगा सुधारक आहे. त्यानंतर लोकसमज असाही होऊं लागला कीं हा बडा बापका बेटा बापानें सांठविलेली दौलत उधळून वाटेस लावण्याच्या विचारांत आहे. पण भाईसाहेबांनीं आजूबाजूच्या गांवांत देखील साधारण शिकलेले लोक व शिक्षक लोक यांस हाताशीं धरून जेव्हां साक्षरताप्रसार व लोकजागृति घडवून आणण्याचें कार्य आरंभिलें व त्याला थोडेंसें सुसंघटित रूप दिलें, तेव्हां मात्र इतरे जनांस शंका येऊं लागली. ते भाईसाहेबांच्या प्रयत्नांकडे साशंकित मुद्रेनें डोळे चोळीत तर प्रसंगीं डोळे वटारीतही पाहूं लागले.

भाईसाहेब ज्या कुणबाऊ लोकांत जागृति करण्याचा प्रयत्न करीत त्या लोकांकडून देखील त्यांस आरंभीं अडथळे उत्पन्न झालेच नाहींत असें

मात्र नाहीं. ते अडथळे इतके उत्पन्न झाले कीं, लेचापेचा दुसरा एकादा माणूस असतां, तर हातचें कार्य सोडून देऊन तो स्वस्थ बसला असता. पण त्या अडचणी म्हणजे दाजीसाहेबांच्या पुण्याईचा प्रताप होता. त्यांनीं इस्टेट संपादन करतांना ज्या भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब केला होता, किंवा त्यांनीं कुळांशीं ज्या प्रकारचें कठोर वर्तन ठेवलें होतें, त्या त्यांच्या वागणुकीचें कटुफळ भाईसाहेबांस भोगावें लागलें होतें व ज्या मूक भूमिजनांच्या हिताकरितां भाईसाहेब झटत होते त्यांतील कांहीं भूमिजन अद्याप देखील भाईसाहेबांच्या लोकोपकारांत स्वार्थसाधुपणा शोधून काढण्याची खटपट करीत असत. विरोधीपक्षाला भूमिजनांतील मिळतील ते लोक आपल्या बाजूला ओढावयाला पाहिजेच होते. भूमिजनांतूनच एक कंपू कांहीं विशिष्ट समजुतीनें फुटून तो भाईसाहेबांच्या विरोधी पक्षांस सामील होऊं लागला होता.

बरेचसे भूमिजन भाईसाहेबांस अनुकूल होऊं लागले होते. कारण सामाजिक समता—वरच्या वर्गांशीं मिळून मिसळून वागणें—हें त्यांस हवेंच होतें. पण एकदां बोलतां बोलतां भाईसाहेबांनीं आपलें मत असें उघड केलें होतें कीं भूमिजनांनीं हरिजनांना आपुलकीनें जवळ केलें पाहिजे. भाईसाहेबांच्या या विधानाची गांवांत ठिकठिकाणीं आणि घरोघर चर्चा झाली. ज्या भूमिजनांना बामणाभटांशीं मात्र बरोबरीच्या नात्यानें वागावयास पाहिजे असून हरीजनांस मात्र जवळ घ्यावयाचें नव्हतें, अशा लोकांचा एक गट बनूं लागला. हा गट विरोधीपक्षास हळूहळू मिळूं लागला. विरोधीपक्ष अशा लोकांच्या मनांत भाईसाहेबांविरुद्ध अनेक भलत्या गोष्टी भरून देऊं लागला. गावचे कांहीं दुकानदार व व्यवसायी लोक देखील या पक्षांत सामील होऊं लागले. कारण परदेशी माल न घेण्याचा खेडुतास केलेला उपदेश त्यांच्या हिताच्या आड येऊं लागला. आंबेखोल गांवचे तेल्यांचे घाणे आज कितीतरी वर्षे बंद पडले होते ते हल्लीं पुन्हां चालू झाले होते. कडू तेलाचे दिवे जितके जास्त वाढले तितक्या घासलेटाच्या बाटल्या कमी खपूं लागल्या. तीच गोष्ट इतर जिनसांच्या बाबतींत. भाईसाहेबांचा उपदेश केवळ परदेशी माल वापरण्याच्या

विरुद्ध होता असें नव्हे. खेडेगांवांत जो माल उत्पन्न होत असे तो प्रथम खेडुतांच्या कुटुंबांतच वापरला गेला पाहिजे असें त्यांचें मत होतें. खेड्यांचें आर्थिक जीवन स्वावलंबी करण्याचें त्यांचें धोरण होतें. त्या कच्च्या मालाचा उपयोग जेथल्या तेथें होऊन मग उरेल त्याचें स्थलांतर होण्यास हरकत नाहीं. ते सुधारणेच्या विरुद्ध नव्हते. पुन्हां निसर्गाकडे जाऊन रानटी युगांत प्रवेश करावयास लावण्याची त्यांची आरोळी नव्हती.

आज रात्रौ आंबेखोलच्या व सभोंवतालच्या दोन तीन गांवच्या खेडुतांचें एक लहानसें संमेलन सुरबाजी सुभेदाराच्या घरीं भरावयाचें होतें. फक्त प्रौढशिक्षण घेणाऱ्या लोकांचेंच हें संमेलन असल्यामुळें सरासरी दोनशेंहून जास्त लोक जमण्याचा संभव नव्हता. पाहुण्यांबरोबर झुणकाभाकर देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. अशा प्रसंगीं सैंपाकपाण्याचें काम पत्करणारी व पुढाकार घेऊन वावरणारी हंसतमुख अशी एक व्यक्ति कुठेंच दिसत नव्हती. त्यामुळें जिकडे तिकडे तो एक चर्चेचा विषय होऊन गेला होता.

येशाप्पाची हिरा अशा प्रसंगीं भोजनाचे जिन्नस तयार करण्यांत आपल्या पथकासह पुढाकार घेत असे. ती रात्रीं कुठें अकस्मात् नाहींशी झाल्यामुळें गांवांत चोंहीकडे चमत्कार वाटत होता. त्या बाबतींत हजार लोक हजार तोंडांनीं बोलत होते.

सकाळीं उठल्याबरोबर येशाप्पाच्या हाताला पत्र मिळालेंच नाहीं. हिराचा पत्ता नाहीं म्हणून प्रथम तो रडतच बसला. नंतर कोणी तरी सुचविल्यावरून फौजदाराकडे वर्दी द्यावयाला तो निघाला. फौजदार त्याच्या घरींच विशेष चौकशी करण्याकरितां आला. तो पोलीसांत वर्दी देणार होता इतक्यांत तें पत्र सांपडलें व त्यावरून मग सगळा खुलासा झाला. मात्र तें पत्र व त्यांतील मजकूर जो गुप्त रहावा अशी हिराची इच्छा होती, तो मात्र जगजाहीर होऊन गेला.

इतर अनेक कुळांप्रमाणें येशाप्पा हा दाजीसाहेबांचें कूळच होता. त्याच्यावर दाजीसाहेबांच्या येण्याची बाकी निघत होती. त्या कर्जाचा त्याच्यावर दावा गुदरण्यांत आला होता व त्याचबरोबर आणखी एका

कर्जखतावरून येशाप्पावर कोर्टांत दुसरा एक दावा गुदरला गेला होता. पहिल्या दाव्यांतील कर्ज घेतल्याची कबुली येशाप्पानें देऊन टाकली होती. प्रश्न फक्त हिशेबाचा होता.

पण दुसऱ्या दाव्याचें गहनगूढ येशाप्पाला मुळींच उलगडत नव्हतें. काका बामणाचे रुपये कर्जाऊ घेतल्याचें त्याला स्मरतच नव्हतें. जो व्यवहार मुळीं कधीं घडलाच नाहीं, त्याचें त्याला स्मरण कसचें होणार! आकास्मिक आलेल्या संकटानें तो आधींच हताश झालेला होता. तशांत हिरा नाहींशी झालेली पाहून त्याचें हृदय शतधा विदीर्ण झालें.

त्यानें आपल्या मुलाकडून पैशांची मागणी केली होती. पण त्याच्याकडून पैसे मिळणें शक्य झालें नाहीं. पड्वळाच्या मंडपावरून काका बामणानें आपल्यावर दंश धरिलेला आहे हें येशाप्पा जाणत नव्हता असें नाहीं. पण त्यावर त्याचा इलाज कसलाच चालण्यासारखा नव्हता. अशी बापाची दैनावस्था पाहून हिरा नोकरी—चाकरीस कुणाकडे तरी राहून आपल्या बापास पैशांची मदत करतां आली तर पहावी, म्हणून मुंबईस जावयास निघाली होती व तिनें तसें पत्रही लिहून ठेविलें होतें.

पत्रांत मात्र तिनें आपला हेतु स्पष्ट लिहिला असला तरी पत्ता कळविला नव्हता. बापाच्या संकटांत कांहीं मदत करतां आल्यास पहावी म्हणून आपण स्वखुषीनें नोकरी पहावयास जात आहें, आपला कोणी शोध वगैरे करूं नये. लवकरच आपण दुसरें पत्र पाठवीन. पत्ता कळविल्यास आपल्या मार्गांत अडथळे उत्पन्न होतील, यासाटीं मुक्कामास पोंचून कोठेंतरी सोय लागेपर्यंत आपण पत्र पाठविणार नाहीं. अशा तऱ्हेच्या मजकुराचें तें पत्र होतें. तें पत्र मिळाल्यावर येशाप्पाला किंचित् समाधान वाटलें. तरी पण त्याचें चित्त उडालेंच होतें.

त्याला धीर देणारा असा गांवांत एकच पुरुष पण तो आज सार्वजनिक कार्यांत गुंतला होता. तरी पण आपल्या मित्राला सुखाजी सुभेदाराच्या घरीं पोंचविल्यावर भाईसाहेब येशाप्पाच्या घरीं येऊन येशाप्पाचें समाधान करून गेले. इतकेंच नव्हे, तर कसल्याही संकटास न भिण्याबद्दल ते येशाप्पास आश्वासनही देऊन गेले.

हिरानें आपल्या बापाला लिहिलेलें तें पत्र भाईसाहेबांनीं वाचून पाहिलें होतें. तें पत्र वाचल्यावर हिराच्या मनाच्या थोरपणाबद्दलची खरी कल्पना भाईसाहेबांना आली. मात्र अशा प्रकारच्या संकटांत उडी घालावयाच्या आधीं हिरानें ही गोष्ट आपणास कळवावयास पाहिजे होती असें त्यांना वाटलें.

हिरानें—स्वाभिमानी हिरानें मदतीची याचना पाहिजे तर आपणाजवळ न केली तरी चाललें असतें, पण येशाप्पाशिवाय आपली काळजी करणारें दुसरें कोणीच या जगांत नाहीं असें हिरास कां वाटावें बरें ? असा एक प्रश्न भाईसाहेबांच्या मनांत चट्कन् डोकावून गेला. पण त्या प्रश्नास त्यांनीं लगेंच मनांतून धुडकावून लावलें. तसल्या नाजूक प्रश्नाची त्यांना फार भीति वाटत होती. स्वार्थ बुद्धीनें मनांत प्रवेश केला तर आपण आपल्या उच्च भूमिकेवरून खालीं घसरले जाऊं अशी त्यांस अंदेशा आला. शिवाय आज ते आपल्या कामांत इतके गढले होते कीं, त्यांना असल्या विचारांस मनांत थारा द्यावयास अवकाशच नव्हता.

खरें म्हटलें असतां, भाईसाहेबांना हिरानें पत्र लिहिलें होतें व तें तिनें रात्रौ सगुणाच्या घरीं जातांना रस्त्याच्या बाजूच्या पोस्टाच्या पेटींत टाकलेंही होतें.

डांकेच्या वेळेला काका हे बहुतेक पोस्टांत असावयाचेच. आज ते पोस्टमास्तरच्या—आणि या खेडेगांवांत शाळामास्तरच पोस्टमास्तर होते—घरीं डाकेच्या वेळेस हजरच होते. आज डाकेंत भाईसाहेबांच्या नांवचें बायकी अक्षरांत बालबोधींत लिहिलेल्या पत्त्याचें पत्र असलेलें काकांनीं टेहळलें. पोस्टमास्तरनीं शिक्के मारून पोस्टमनकडे पत्रें दिलीं. पोस्टमननें पाहिलें तर गांवांतल्या त्या वाड्याला भाईसाहेबांच्या एका पत्राशिवाय दुसरें कोणाचेंच पत्र नव्हतें. भाईसाहेबांच्या घराशेजारीं राहणाऱ्या एका मुलाजवळ तें पत्र पोस्टमननें दिलें व आपली एका पत्रासाठीं इतक्या लांबीवर घालावयाची खेप वांचविली.

त्या विद्यार्थ्यानें घरीं गेल्यावर पत्र भाईसाहेबांस द्यावयाचें कबूल

करून आपल्या पिशवींत घातलें. डांकेचा वेळ होईतों काकांच्या व पोस्टमास्तरांच्या गप्पा उग्र वेताळाच्या फेरीबद्दल चालल्या होत्या. पत्रांची डिलिव्हरी झालेली पहातांच काका लवकर लवकर पुढें जाऊन आपल्या मांगराजवळ जाऊन उभे राहिले. त्या मांगरावरूनच त्या विद्यार्थ्यांची घरीं जाण्याची वाट गेली होती.

त्या मांगराच्या आवारांत केळी होत्या हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच तेथें एक जगमीचें झाड होतें, व त्यावर खूप जगमें पाडास आलीं होतीं. त्या विद्यार्थ्याला जगमें आवडतात व तो जातां येतां तीं जगमें पाडण्याचा प्रयत्न करतो हें काकास ठाऊक होतें. त्यांनीं त्या मुलास हांका मारून जगमें पाडून देण्यास सांगितलें. पाडलेल्या जगमांपैकीं निमे त्या विद्यार्थ्याला द्यावयाचा करार काकांनीं हो–ना हो–ना म्हणतां म्हणतां अखेर कबूल केला. विद्यार्थी मुलगा मोठ्या आनंदानें झाडावर चढून जगमें तोडूं लागला. तोडलेल्या जगमांत आपला अर्धा वांटा आहे, ही फायदेशीर अट लक्षांत धरून मुलगा मिळतील तितकीं अधिक फळें तोडूं लागला. त्यानें दप्तरपाटी व कोट टोपी खालींच ठेवली होती.

बऱ्याच वेळानें तो उतरला. काढलेल्या फळांतलीं निमीं फळें त्याला मिळालीं. तो खूप होऊन घरीं गेला. घरीं गेल्यावर त्याला भाईसाहेबांना पत्र द्यावयाची आठवणच झाली नाहीं.

पुन्हां शाळेंत गेल्यावर त्यानें अभ्यासासाठीं दप्तर सोडलें. तेव्हां त्याला त्या पत्राची आठवण झाली. पण पत्र त्याला दप्तरांत सातदां शोधलें तरी सांपडेना ! मग बोलतो कशाला ? तो गुपचूपच राहिला. होईल चौकशी तेव्हां पहातों आहे पुढें. उगीच आपणहून आरडाओरड कशाला करा ? असा पोक्त विचार करून तो स्वस्थ बसला.

पत्र काकांनीं हस्तगत केलें होतें हें सांगावयास नकोच. बायकी अक्षराच्या पत्रावर कॉलेजांतल्या तरुणाची नजर कशी खिळून राहते ! काका कांहीं तसे कॉलेजांतले तरुण नव्हते. पण त्यांना तें पत्र हस्तगत करावयाचा अतिशय मोह झाला होता.

मोठेपणीं विशेष लिहिणें वाचणें शिकलेल्या एका तरुणीचें तें पत्र होतें. तें पत्र हिराचें असावें अशी काकांस शंका होती, पण पक्की खात्री नव्हती. भाईसाहेबांस हें बायकी अक्षराचें पत्र कोणाचें आलें? आणि तें हिराचेंच असलें, तर त्यांत तिनें काय लिहिलें असेल? अशा अनेक कल्पना काकांच्या मनांत उठूं लागल्या.

गांवांतील एकूणएक पुरुषांच्या हस्ताक्षरांची काकांस ओळख होती. तो त्यांचा आवडता व्यासंग होता, इतकेंच नव्हे तर उपजीविकेचा दुय्यम धंदा होता. मुख्य धंदा म्हणजे दाजीसाहेबांकडे दप्तरगिरी. बायकी अक्षराचा त्यांना फारसा परिचय नव्हता.

तो विद्यार्थी निघून गेल्यावर काकांनीं आपल्या त्या आडबाजूच्या घराचें कुलूप काढून दार उघडलें. ते आंत खुर्चीवर बसले.

हें काकांचें छोटेखानी घर कौलारू असलें तरी बाहेरून तें अव्यवस्थित दिसावें अशी मुद्दामच तजवीज केली होती. बाहेर पुष्कळसा केरकचरा, पडवींत कसलीं तरी जुनाट लांकडें ठेवून दिलेलीं. मागच्या बाजूस शेळ-कुंडें व बिमत ठेवलीं होतीं. एका बाजूस त्यांतच गाई बैल बांधून मग ती जागा स्वच्छ न केल्याचें स्पष्ट दिसून येत होतें. चारी बाजूंनीं भोपळी, कोहळी, वाल वगैरे वेल घराच्या छपरावर चढवून दिलेले होते. त्यामुळें, त्या घरांत पाऊल ठेवावें असें कोणालाही वाटलें नसतें. त्या घरांत गुरें बांधणें, सामानसुमान टाकणें, भाजी वगैरे लावणें हीं कामें सगुणा मालकपणें करीत असल्याचें दिसे. गांवातले बरेचसे लोक तो सगुण्या भावणीचा मांगर असें देखील म्हणत असत.

पण तोच मांगर आंतून बराच स्वच्छ राखलेला होता. बाहेरच्या खणापेक्षां आंतील खण अधिक चांगले होते. काका खुर्चीवरून उठून आंतील खणांत जाऊन बसले. त्यांनीं पत्र उघडलें. हिरानें भाईसाहेबांस लिहिलेलें पत्र काकांनीं उत्सुकतेनें उघडलें व ते त्यावरून नजर फिरवूं लागले.

प्रथम प्रथम त्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलत होतें. त्यांच्या भुंवया उडूं लागल्या होत्या देखील. पण हळूहळू तें हास्य मावळलें. चेह-

त्यावर आंठ्या पडल्या. भ्रुकुटि वक्र झाल्या. ओंठ थरथर कांपूं लागले. डोळे विस्फारित होऊं लागले. त्यांच्या हाताच्या मुठी वळूं लागल्या. त्यांनीं असे कांहीं हस्तविक्षेप केले कीं, आतां हे तें पत्र फाडून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करून टाकतात किंवा ते तें जाळून त्याची राख तरी करून टाकतात खास, असें पाहणारास वाटावें.

त्यांनीं त्या पत्राचा चोळामोळाच केला असता—हो, तसें करावयास त्यांचे हात वळले. त्यांनीं तें थोडेंसें चुरगळलें देखील रागाच्या भरांत. पण तें पुन्हा त्यांनीं नीट होतें तसें केलें. समोर हिरा आहे असें वाटूनच जणूं काय त्यांनीं डोळे वटारले. ते ओठ चावूं लागले. शेवटीं एक अगदीं गलिच्छ अशी शिवी त्यांनीं हिराचें नांव घेऊन हांसडली !

लगेच त्यांनीं कपडे चढवले. जरीचा तांबडा रुमाल त्यांचा नेहमींचा ठरलेला; तो खुंटीवरून उचलून घेऊन जशाचा तसाच त्यांनीं डोकीवर ठेवला व शेवटचें टोंक तेवढें सोडून पुन्हा गुंडाळलें व रुमालाच्या बांधणीचा एकदर आकार ठाकठीक जुळवल्यासारखा केला; आणि ते तेथल्यातेथेंच येरझारा घालूं लागले. त्यांचें मन भडकून गेल्यासारखें दिसलें. त्यांना अतिशय संताप आलेला होता. येरझारा घालतांना त्यांचीं पावलें जोरानें दाणदाण वाजूं लागलीं. कोणाला वाटलें असतें कीं ते क्रोधानें पायच आपटीत आहेत !

हिरानें भाईसाहेबांस लिहिलेल्या पत्राचा काकांवर असा परिणाम कां व्हावा ? भाईसाहेबांनीं तें पत्र वाचलें असतें, तर त्यांच्यावर त्या पत्राचा असाच परिणाम झाला असता काय ? आपल्या पत्राचा परिणाम भाईसाहेबांवर काय बरें झाला असेल, यासंबंधीं गोड कल्पना रचण्यांत तिकडे हिरा दंग झाली होती. हिराची कांहींच सूचना आपणाला कां नसावी अशी शंका भाईसाहेबांस येत होती. आणि हिराच्या त्याच गोड पत्रानें काकांच्या आंगाचा अंगार बनवला होता !

———

## ७ : डॉ. आंबेडकर हे ब्राह्मणच !

काका आपल्या घरांतून बाहेर पडावयाच्या आधीं पत्र हातांत घेऊन विचार करीत असतांना भाईसाहेब त्यांच्या घरावरून गेले. ते फार जलदीनें चालत होते. पण जातां जातां त्यांनीं त्या घराकडे सहज नजर टाकली तों काका विचारांत मग्न असलेले त्यांना दिसले. त्यांनीं काकांना हांक देखील मारली असती, पण त्यांना मालवणला निघणारी मोटर गांठावयाची होती.

भाईसाहेबांनीं पाहुण्यांस सुरबाजी सुभेदाराकडे पोंचविल्यावर ते स्वतः इतर कामांत गुंतले होते. सुरबाचा मुलगा व यशवंतराव हे दोघे गृहस्थ वसंतरावांबरोबर असल्यामुळें त्यांना इतर गोष्टींकडे लक्ष पुरवावयास आपणाला हरकत नाहीं असें वाटलें होतें. पण तितक्यांत त्यांना समजलें कीं पाहुण्यांचा निरोप घेऊन व आपणाला दिलगिरीचा निरोप ठेवून यशवंतराव मालवणास जाण्यासाठीं मागून दुसरी येणारी मोटर गांठण्यासाठीं गेले.

त्यांनीं आयत्यावेळीं आपला बेत बदलण्याचें कारण असें कीं, वसंतरावांच्या आगमनाचा विशेष फायदा करून घ्यावा. त्यांनीं वसंतरावांना आपल्या घरीं येण्यास आमंत्रण दिलेंच होतें. पण नंतर त्यांना वाटलें कीं त्यांचें एक जाहीर व्याख्यानच करावें. तशी व्यवस्था करावयाची तर पूर्वतयारीसाठीं त्यांना स्वतःच पुढें जाणें भाग होतें. म्हणूनच ते गेले होते. पण भाईसाहेबांस हे कळतांच, त्यांनीं त्यांचा स्वतःच पाठलाग केला, आणि त्यांना गांठलेंही.

यशवंतरावांचा स्वतःच पाठलाग करण्यांत भाईसाहेबांचा आणखीही एक हेतु होता. कांहीं पाहुणे मंडळी त्यांच्याकडे यावयाची होती. वास्तविक ती मंडळी वसंतराव आले त्याचवेळीं यावी. पण दोनतीन गाड्या लागोपाठ येत असल्यामुळें कदाचित् मागाहून आले तर येतील असें भाईसाहेबांस वाटलें. यशवंतरावांना मागें फिरावयास तयार करीत अस-

तांच ती गाडी आली; आणि त्या गाडींतून दोन माणसें उतरलीं. एक साठीच्या घरास पोंचलेले गौरवर्ण व सौजन्याची केवळ मूर्तीच असे दिसणारे गृहस्थ, व दुसरें माणूस म्हणजे सरासरी वीस बावीस वर्षांची अगदीं आजतागायत आधुनिक पद्धतीची सुशिक्षित मुलगी.

" या या ! नानासाहेब ! वाः ! छान झालं. आतां मात्र मला राहिलंच पाहिजे. काय करणार बोवा ? असली पर्वणी सोडून जायचं कसं ? आणि वासंती आल्या ना ? वाः ! आजचं संमेलन अपूर्व होणार खास !...... "

यशवंतरावांनीं आपलें तोंड सुरू केलें. भाईसाहेबास बोलण्यास सवडच मिळाली नाहीं. त्यामुळें वासंतीला खोंचकपणें उत्तर देण्यास वाव मिळाला.

" म्हणजे, आपणच संमेलनाचे चालक वाटतं ? "

" मी चालक नसलों तरी स्वागताध्यक्ष आहें, म्हणून भाईसाहेबांच्यातर्फे मी आपलें स्वागत करण्यासाठीं आधींच येऊन राहिलों आहें. "

" दोनच मिनिटांचा अवकाश, नाहींतर हे स्वागताध्यक्ष मालवणला जाणाऱ्या मोटारींतच दिसले असते, " भाईसाहेबांनीं हांसतच म्हटलें.

" पण यावरून भाईसाहेब मला थांबविण्याकरितांच इथं आले असा मात्र कृपा करून आपला गैरसमज करून घेऊं नका. ते तुम्हांला उतरून घेण्याकरितां, तुमचं स्वागत खासा स्वारीनिशीं करण्याकरितांच आले आहेत ! असं समजा. नानासाहेबांचं, त्यांतही वास्— " यशवंतरावांनीं भाईसाहेबांना तर पेंचात टाकलेंच व शेवटीं स्वतःही अडखळले.

त्यांच्या स्वागतासाठीं मुख्यत्वें न येतां आपण यशवंतरावांना थोपवून धरण्यास आलों असा आभास यशवंतरावांनीं उपस्थित केला व त्यामुळें मानी वासंतीचें मन दुखावणार हें त्यांनीं तेव्हांच ओळखलें. पण ते प्रथम तर न बोलावयाचें तें बोलून गेले होते. आणि छक्केपंजे करण्याचा त्यांचा बिलकूल स्वभाव नव्हता. व्यवहारांत वागतांना साध्या सुध्या बाबतींत देखील केव्हां केव्हां विलक्षण मारपेंच पडतात आणि त्याचे परिणाम फार दूरवर पोंचतात.

स्टँडवरील एका मजुरास खूण करतांच त्यानें वासंतीची बॅग उचलली होतीच. स्टँडवरील बांकावर बसण्याचा वासंतीचा हेतु दिसला नाहीं. सर्व मंडळी सुरबाजीच्या घरीं लवकर पोंचेल तितकी बरी असें भाईसाहेबांनाही मनांतून वाटत होतें. सर्व मंडळी तिकडे जावयास निघाली.

भाईसाहेब आपल्याला घेण्याकरितांच केवळ कांहीं खास आले नाहींत हा ग्रह वासंतीचा झालाच. पण आपला अपमान बाहेर दिसण्यांत येऊं नये म्हणून व भाईसाहेबांच्याकडून घडलेल्या ह्या आतांच्या कृत्यावर विशेष प्रकाश पडणार म्हणून तिनें उसनें हंसें मुखावर आणून विचारलें—

" 'सागरा'च्या लाटा मध्येंच अडखळत नसतात. त्यांची गर्जना सारखी चालू राहिली पाहिजे. वाक्य अपुरंच कां सोडलंत यशवंतराव ?" वासंतीनें पातळाचा पदर झटकीत असतां विचारलें.

आपल्या बहुभाषीपणावरील हा हल्ला यशवंतरावांच्या तेव्हांच ध्यानांत आला. त्याची सव्याज फेड करण्याच्या इराद्यानें त्यांनीं उत्तर दिलें—

" तुमचं स्वागत करण्यास भाईसाहेब आले असं मला सांगायचं होतं. पण तुमचं नांव कसं घ्यावं याचा मला थोडासा विचार पडला. 'वासंतीबाई' म्हणावं, तर नांवाच्या पुढें 'बाई' लावणं हें सुशिक्षित स्त्रिया रानटीपणाचं समजतात. बहुवचनानं तर संबोधलं पाहिजे. नुसतं 'वासंती' म्हणून बहुवचनी भाषाप्रयोग करणं जुळत नाहीं. 'वासंतींनं' असा शब्दप्रयोग तर अगदींच बेंगरूळ दिसतो. त्यामुळं तुमच्यासंबंधीं कसं बोलावं हें मला न सुचल्यामुळं वाक्य अर्ध्यावरच सोडावं लागलं."

" ओ हो हो ! अस्सं का ?" हें म्हणतांना वासंतीनें अशी कांहीं मान वेळावली कीं ती पाहून भाईसाहेबांस देखील क्षणभर गंमत वाटली; " एका कामासाठीं यायचं आणि आपोआप साधलेल्या दुसऱ्या कामाचं श्रेय पदरात घ्यायचं, हा पुरुषी कावा मोठा वाखाणण्यासारखा आहे खरा—" हे शब्द ऐकून भाईसाहेबांनीं हळूच वासंतीकडे पाहिलें. तोंच यशवंतरावाकडे वरवर पाहणारी पण निराळाच कोण करून आपल्याला दूषण देणारी वासंतीची चोरटी नजर भाईसाहेबांच्या नजरेला भिडली. भाईसाहेबांना तो टोमणा बराच लागला. ती पुढें म्हणाली—

"कारण 'मेदिनी' कारांबरोबर आलेले यशवंतराव मध्येंच उठून गांवीं जाऊं पाहतात, आणि त्यांतच आमचं स्वागत केल्याचं श्रेय संपादतात. खरोखर तुम्ही पुरुष म्हणजे असेच. मनांत एक, वचनांत दुसरंच आणि जनांत तिसरंच!"

"छे छे! हीं लक्षणं पुरुषांचीं नव्हत. शूद्रक कवीनं हीं लक्षणं स्त्रियांचीं म्हणून मृच्छकटिक नाटकांत सांगितलीं आहेत." भडभड्या स्वभावाचे आणि बडबड्या जिभेचे यशवंतराव एकदम बोलून गेले झालं.

वासंतीचं किंचित् नाराज झालेलं मन अधिकच दुखावलं, हें तिच्या लालट मुद्रेवरून तिनं केलेल्या ओष्ठखंडनावरून तेव्हाच ताडलें. वादास कलाटणी देण्याच्या मिषानं त्यांनीं म्हटलें--

"'एकावरी मन ठेवुनी नेत्रें' या साकीनं, देवलांनीं भाषांतरित केलेल्या शूद्रकाच्या विधानाबद्दलच तुम्ही म्हणतांना यशवंतराव? मला वाटतं तें विधानच अर्थशून्य आहे. कारण मन ठेवणं, प्रेमवृद्धि करणं, आणि संगमसुख या अगदीं परस्परांशीं विसंगत गोष्टी आहेत असं त्यांत गृहीत धरलेलं दिसतं. पण ही गोष्ट मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे." भाईसाहेब बोलले. हीं तीन तरुण माणसें बरोबर चाललीं होतीं. गडी बराच पुढें गेला होता आणि नानासाहेब आस्ते कदम चालत असल्यामुळें सर्वांच्यामागें राहिले होते. त्यांना त्या तिघांचा चाललेला संवाद कांहींच ऐकूं येत नव्हता. तो ऐकूं येणार नाहीं इतक्या अंतरावर ते मागें पडले असें पाहूनच आतां भाईसाहेबांनीं थोडासा त्यांत भाग घेतला होता.

"पण भाईसाहेब त्यांत विसंगत असं काय आहे मोठंसं? प्रेमवृद्धि आणि संगमसुख यांचं साहचर्य असलंच पाहिजे असं कां मानावं? तसंच मन ठेवणं आणि प्रेम करणं या गोष्टीही भिन्न असूं शकतील, मात्र आपण नवनीतिवाल्यांच्या चष्म्यानं या गोष्टींकडे पाहिलें पाहिजे. खरं म्हटलं तर नवनीतिवादाचं मूळबीज शूद्रकाच्या या विधानांतच आहे."

"अहो, पण राजेश्री! हें विधान एका सामान्य दर्जाच्या पात्राच्या तोंडीं घातलं असून तें कमी दर्जाच्या स्त्रीला उद्देशून आहे. त्यावरून

तुम्हांला हवा असलेला सिद्धांत स्थापित होत नाहीं," भाईसाहेब म्हणाले.

"हो–पण कालांतरानं सामाजिक स्थित्यंतर होत असतं, एका काळीं ठरलेल्या हीन वृत्ति दुसऱ्या कालांत श्रेष्ठ ठरतात. स्त्रियांच्या आचार-स्वातंत्र्याच्या बाबतींत या दृष्टीनें फरक साऱ्या जगांत आज घडून आला आहे. हिंदुस्थानांतही या मताला अनुकूल वारे वाहूं लागले आहेत. विभावरी शिरूरकरांनीं या मताची नौका प्रथम सागरांत लोटली आणि आतां 'मेदिनी' पत्रांतून 'मिस् व्ही. एस्' या विभावरी शिरूरकरांचें कार्य नेटानं रेटीत आहेत. याच अनुकूल वाऱ्याच्या जोरावर त्यांनींही आपलं शीड पसरलं आहे."

"मिस् व्ही. एस् ह्यांनीं तर कांहीं बाबतींत विभावरींच्याही पुढं आघाडी मारली आहे," भाईसाहेब म्हणाले.

"विभावरींचीं मतं कित्येक पुरुषांना पसंत पडत नाहींत. कित्येकांनीं तर त्यांच्यावर कुत्सितपणानं हल्लेही चढविले. तुम्हां दोघांनाही विभा-वरींचीं मतं पसंत असतीलच," वासंतीनें खडा टाकला.

"तें आपण सावकाश पाहूं. आतां वेळ आहेच आपल्याला. मग रस्त्यावर हे वादविवाद कशाला?" यशवंतराव म्हणाले; "मला जें आश्चर्य वाटतं तें या कूर्मवृत्तीच्या भाईसाहेबांचं. तुम्हाला त्यांनीं बोलावलं असलं तर तें माझ्यापासून कां चोरून ठेवलं कळत नाहीं."

"त्या येतील अशी मला खात्री नव्हती म्हणून. दुसरं कांहीं नाहीं त्याला कारण. कोणतीही गोष्ट पुरी घडून येईपर्यंत मी उतावीळपणानं त्याची वाच्यता करीत नसतों," भाईसाहेबांनीं खुलासा केला.

"पण आतां त्या आल्याबद्दल तुम्ही आनंदप्रदर्शनादाखल काय देणार बुवा आम्हांला?"

"आतां आहेच ना रात्रौ सहभोजन!"

"आज सहभोजन कां आहे?" मध्येंच वासंतीनें त्रासिकपणानें प्रश्न टाकला.

"तें सहभोजन म्हणजे का तुमचं लग्नप्रयोजन आहे? तें सहभोजन म्हणजे झुणकाभाकरी!"

इतकें म्हणून यशवंतरावांनीं वासंतीकडे पाहिलं, तों तिच्या चेहऱ्यावर नापसंती दिसतांच त्यांनीं म्हटलें,—

" सहभोजनांत पुढाकार घेण्यास तुमची तयारी असेलच. "

" हो माझी तयारी असतेच. पण–पण काय हो? मिस् व्ही. एस् चीं मतं तुम्हांला कशीं काय वाटतात ? "

" अगदींच बेफाट ! " यशवंतराव म्हणाले.

" आणि आपणाला ? " भाईसाहेबांना उद्देशून वासंतीनें विचारलें.

" मला त्यांच्यांत कांहींच विशेष वाटत नाहीं. नुसतीं मतं प्रतिपादन करणं आजच्या मतस्वातंत्र्याच्या काळांत अगदीं सर्वांत सोपी गोष्ट आहे, आणि आतां तर तो एक अभिनव अशा प्रकारचा छंदच झाला आहे. मतांच्या लोकप्रियतेचं मापन अनुयायांच्या संख्येवरून व रास्तपणाचं मापन ज्ञानवंत विचारी लोकांच्या संमतीवरून ठरावावयाचं असतं, ' भाईसाहेब म्हणाले.

" पण मतांची इष्टानिष्टता तुम्ही कशावरून ठरवाल ? वासंतीनें पुनः प्रश्न केला.

" समाजाच्या तात्कालिक स्थितीवरून. " यशवंतराव म्हणाले.

त्या तिघांचेंही बाजूस लक्ष गेलें. वाटेच्या दोन्ही बाजूंच्या शेतांतून भात कापणारीं माणसें त्या तिघांकडे टंवकारून बघत होतीं. एखादा पांढरपेशा जवळून चालला असतां खेड्यांतलें जनावर जसा बुजगटपणा दाखवितें, तसलें बुजकें आश्चर्य त्या खेडूती बायांच्या चेहऱ्यांवर उमटलेलें दिसत होतें. कारण दोन तरुण पुरुषांच्या मध्यें एक तरुण स्त्री वाद-विवाद मोठमोठ्यानें करीत चाललेली हें दृश्य त्यांना क्वचितच दिसणाऱ्या देखाव्यापैकीं एक होतें. त्यांच्या त्या आश्चर्यप्रदर्शक मुद्रांनीं त्या तिघां-नाही मौज वाटली.

" अगो ! तां काय खेड्यांतला चेड्डूं ? तां आसतालां कालिजांत शिकलालां बायल माणूस ! "

असें एक वाक्य उच्चारलेलें त्यांच्या कानीं आल्यावर तर तिघांना हंसें आवरेना !

त्या सर्वात यशवंतरावांचें हास्य त्या दोघांच्याहीवर ताण करणारें होतें.

भात कापणाऱ्या त्या खेडवळ बायकांत संवादच सुरू असावा असा त्या तिघांना संशय आला. म्हणून तीं जवळच्या करवंदीच्या जाळींत आपण कांहीं तरी पहात आहोंत असें निमित्त करून जराशीं उभीं राहिलीं. त्यांना पुढील संवाद ऐकूं आला.

" अगो या शिकलेल्या बायल माणसांक लगीन जांवच्या आदींच दादलेमाणसांत जाऊन मिरवाक होयोसा वाटता. "

" लगीन जायसर तीं काय आकवार रवतत? काय होयां होयां तां करतात ! " दुसरी बाई म्हणाली.

" पण भाइसायब् बापडे तेतुलें न्हंय हां. बरो माणूस. पण लगिन नाय घितल्यान् करून आजून. कित्या बाये जाणा कोण ?" पहिली म्हणाली.

" तूं होयां तां म्हण. पण ह्या शिकल्याल्या मानसांचा माका काय-याक सांगां नुको ! जशीं बायल माणसां तसेच दादले माणूस ! त्यांका तसलां काय नाय ? भाईसायब तशे बरे गो ! मियां काय त्येंकां तसां हुनांचंय नाय ! पन त्या हिरग्याबरोबर, कायगो तां त्येंचां ?...... "

पुढील शब्द हळू उच्चारल्यामुळें त्यानां ऐकूं आले नाहींत. इत-क्यांत नानासाहेब जवळ येऊं लागले म्हणून असो, कीं गडी सामान घेऊन फार दूर गेला म्हणून असो, अथवा हा असला संवाद यापुढें ऐकणें त्या तिघांसही निरनिराळ्या कारणासाठीं असह्य झालें म्हणून असो, पण तीं तिघेंही एकदम पुढें झरझर चालूं लागलीं.

तितक्यांत त्यांना मोठ्यानें उच्चारलेलीं पुढील वाक्यें ऐकूं आलींच.

" ओगी रवूगो ! काय तरी सांगा नुको आमकां. अगो त्या नाना-साबांचा चेडूं पुन्याक का खंयसां आसतां. कालिजांत काय खेतुर तां हुनता लय विगरजी शिकलां हा. लय हुशार हा तां ! अगो त्याकां आमच्या भाइसायबांकच दितले हुनता ! " एक म्हणाली.

" अगे ऽऽ माजे बाये ! आनि लगिन् जांवच्या आंदिच लागलां

घोवाबरोबर फिरांक ! ओशाडगे पडो ! काय बाये तरी याक याक बगुंचां—आयकांचा तितक्यां थोडांच ह्या कलियुगांत ! ”

भात कापणाऱ्या सगळया बाया मोठमोठ्यानें हांसल्या. तीं तिघें तरुण माणसें निरनिराळ्या मनस्थितींत असून देखील हंसूं लागलीं. यशवंतराव हास्याचे मजल्यावर मजले चढवीत होते.

“ बाकी इतकं खरं, ” यशवंतराव म्हणाले, “ बरं का भाईसाहेब, वासंती ! पुढील आयुष्यांत जोडीनं काम करणारीं तुम्ही दोघं, पतिपत्नी नात्यानं बद्ध व्हावयाच्याआधीं समाजकार्य आज जोडीनं करणार आहांत हा योगायोग अपूर्व व शुभसूचक आहे खरा. वासंती झुणका तयार करण्यांत भाग घेतीलच. ”

आपण मोटाच विनोद केला अशी यशवंतरावांची अपेक्षा होती. पण त्या दोघांपैकीं कोणीच कसलाच मनोभाव व्यक्त केला नाहीं. यशवंतरावांची निराशा झाली व आश्चर्य दुणावलें. त्या दोघांचींही डोकीं कुठं गुंगलीं होतीं कुणास ठाऊक.

एका बाजूस सकाळीं कापून पसरून ठेवलेलें भात एकत्र करून त्याच्या कवळया करून त्या कवळ्यांचीं मोटी पेंडकीं बांधण्याचें काम सुरू होतें. त्या ठिकाणीं देखील दोघी बायकांत चाललेला एक लहानसा संवाद त्यांच्या कानांत पडला.

“ अगो ! तां बग कसां बायल माणूस जाताहा पदर फलकायत् ! वळखलंय त्याकां ? अगो तां नानासायबाचां चेडूं ! होकाल ती होकाल ! ” एक म्हणाली.

“ नाय हुतल्यार आतां दोन पोरांची आवूस् दिसता ! होकाळ काय ढकाल ? ” दुसरी म्हणाली.

“ ओगि गो ओगी ! मोट्यान काय बोलतस ? तो येताहा पाटसून न्हंय—तो तेचो बापुस. भाईसायब हुनता करतलेहत त्याकां ? ”

“ अगो ! तां हिरा खंय् गो हुनता नायसां जालां रातचांच ? ”

“ अगो इचारतस काय ? केल्ल्यान् तां निस्तारुंक गेलां ? ”

“ थु—थुमाकलां ! ओगि रंव हां ! असलां काय हुनां नुको त्यांकां !

भाइसायब तसल्यांतले न्हय! आणि हिरग्यां देखील गंगाजळासारख्या त्यांकां तसां हुंताल्याऱ्या तोंडांक किडे पडवीत. हुजवाडाच्या आर्दी–होय!" दुसरी बाई आवेशानें निर्भर्त्सना करीत म्हणाली.

" असां काय तां करता? माकां कित्या? गांव हुनता तां मियां हुनतंय! हिरग्याची भावजयच सांगता!" पहिलीनें आपलें आंग काढून घेतलें.

तीं तिघेंही खालीं मान घालून मुकाट्यानें चाललीं होतीं. सुरबाजी सुभेदाराचें घर केव्हां आलें तें त्यांना कळलेंच नाहीं.

" भली झाली! 'सागर'कारांची स्वारी आली ना शेवटीं परतून? खाशी झाली!" या स्वागताच्या सरबत्तीनें त्या तिघांची तंद्रींतून सुटका केली. हें घरवाल्याचें स्वागत पाहुण्यांकडून—वसंतरावांकडून झालें होतें.

सुरबाजी सुभेदार आपल्या पाहुण्याला १८४० सालच्या वेळीं झालेल्या काबूलच्या लढाईच्या गोष्टी सांगत होते. जमलेला समाज संध्याकाळच्या कार्यक्रमाच्या तयारीस लागला होता. जिकडे तिकडे हिरा कां नाहीं आज, ती कुठें गेली, याबद्दल गुणगुण चालली होती. अशावेळीं मुख्य कार्यभार ती आपल्या स्त्रीपथकासह घेत असे. तिच्याबद्दल सर्वांस चुकल्या चुकल्या सारखें वाटत होतें. इतक्यांत नवीन पाहुण्यांकडे सगळ्यांचें लक्ष वेधलें. विशेषतः वासंतीकडे तर सर्वांचेच डोळे वळले.

वृद्ध नानासाहेब आलेले पाहून सर्वांना अतिशय आनंद झालेला दिसला. त्यांनीं आपला सफेत रुमाल डोकीचा काढून खुंटीवर ठेवला. आंगावरील रुइफुलकांटीं जुन्या पद्धतीचें उपरणेंही त्याच खुंटीवर ठेवलें व पाय धुतले.

एका राउंड टेबलाभोंवतीं पांचसहा खुर्च्या होत्या. त्यांतील एकीवर वसंतराव व दुसरीवर सुरबाजी सुभेदार बसले होते. मधील राउंड टेबलावर एक बंदूक, दोन तरवारी पण त्या फार जुनाट अशा, पडलेल्या होत्या. आपल्या लढाईच्या मर्दुमकीच्या गोष्टींत खंड पडला म्हणून हिरमुसलेले सुरबाजी आपलें शिपायगिरीचें आख्यान पुढें चालू करण्यास उत्सुक झालेले होते. तर त्यांच्या तडाख्यांतून या निमित्तानें तरी पांच मिनिटें सुटल्याबद्दल वसंतरावांस हायसें वाटलें होतें.

वसंतराव वासंतीकडेच टकमक पाहत होते. वासंतीची व त्यांची नजरानजर झाली. वसंतराव हे कोण हें वासंतीस ठाऊक होतें. पण वासंती कोण हें वसंतरावांस माहीत नव्हतें.

भाईसाहेब चटकन् पुढें आले आणि त्यांनीं पाहुण्यांच्या एकमेकांस ओळखी करून दिल्या. ते म्हणाले—

" ह्या मिस् वासंती सुखात्मे आणि हे त्यांचे वडील नानासाहेब सुखात्मे ! इमानपूरचे इनामदार."

" अस्सं–अस्सं ! " वसंतराव चकीत होऊन म्हणाले, " ह्याच का वासंती सुखात्मे ! मिस् व्ही. एस्."

वसंतराव उठले. दोघांचें हस्तांदोलन झालें. वसंतराव व नानासाहेबांनीं एकमेकांस नमस्कार केले.

" काय ? मिस् व्ही. एस्. ? " यशवंतराव आश्चर्यातिशयानें उद्गारले !

" अर्र्रर्र ! " वसंतरावांनीं जीभ चावली. त्यांनीं संपादकीय गौप्य उत्साहाच्या भरांत उघड करून टाकण्याचा मूर्खपणा केला होता.

वासंतीनें आपला सेंट शिंपडलेला हातरुमाल तोंडावर घेतला, ती बरीचशी ओशाळली होती.

" आँ ! " असा विस्मयानें भाईसाहेबांनीं काढलेला उद्गार कोणाच्याच लक्षांत आला नव्हता.

वसंतराव आपल्या चुकीनें रुजील होऊन बसले.

वसंतराव आणि वासंती ह्यांचा अपांगक्षेपांचा विनिमय नानासाहेबांस अत्यंत अनिष्ट वाटला.

सुरबाजी सुभेदारांचें व्याख्यान काबूलच्या लढाईवरून ब्रम्ही लढाईवर आलें होतें. मधून मधून मेसापोटेमियांतील लढायांचा उल्लेख तुलनेकरितां प्रसंगानुसार होतच होता.

मंडपांत जीं स्त्रीपुरुषें वावरत होतीं, त्यांच्याकडे पाहून वासंती पांचच मिनिटांत कंटाळून गेलीसें दिसलें. तिनें आपल्या तोंडावर धरलेला हातरुमाल तसाच ठेवलेला होता तो आपला चेहरा लपवावा म्हणून, कीं त्या

गरीबगुरिबांपैकीं एकाद्याच्या कपड्याची येत असलेली घामट घाण नाकांत शिरूं नये म्हणून, हें सांगणें कठीण होतें.

भाईसाहेब उठले व जरासे बाजूस गेले. त्याचवेळीं काळसांवळेलासा सतरा अठरा वर्षांचा पोरगा पुढें आला. त्याचें आणि भाईसाहेबांचें कायसें बोलणें झालें.

आजच्या रात्रीचा लिहून काढलेला कार्यक्रम पाहुण्यांसमोर ठेवण्यांत आला. त्यांत सहभोजन ( झुणकाभाकर ), सामुदायिक ईशस्तवन, भाई-साहेबांच्या अध्यक्षतेखालीं वसंतरावांचें व्याख्यान, भाईसाहेबांचें सदीप व्याख्यान, साक्षरतेचा प्रयोग, शक्तीचे व लाठीचे प्रयोग वगैरे गोष्टी होत्या.

वसंतरावांच्या व्याख्यानाला वासंतीनें अध्यक्षत्व स्वीकारावें अशी फिरवाफिरव भाईसाहेबांनीं सुचविली.

यशवंतरावांनीं त्या सूचनेला दुजोरा दिला.

वासंतीनें ती गोष्ट नाकारली.

तिनें कार्यक्रमांत कसलाच भाग घेण्यास तयारी नसल्याचें सांगितलें. पण वसंतरावांनीं फारच आग्रह केला, तेव्हां तिनें उपवक्तृत्व करण्याचें कबूल केलें. अध्यक्ष यशवंतरावांनीं व्हावें असें ठरलें. झुणकाभाकरीचा वास चांगलासा सुटला होता.

भूमिजनांमधूनच कांहीं तरुणांना भाईसाहेबांनीं स्वयंसेवक बनविले होतें. त्यांना स्वयंसेवकी थाटाचे कपडे भाईसाहेबांनीं स्वत: दिले होते. तें स्वयंसेवकांचें पथक सर्व काम करीत होतें.

जमलेल्या लोकांत कुठेंकुठें आंबेखोलच्या उग्र वेताळाच्या फेरीबद्दलच्या गोष्टी देखील चालल्या होत्या. त्या कानांत पडल्याबरोबर भाईसाहेब व वसंतराव यांनीं मानीव दैवतें व तत्संबंधीं खोटे समज याबद्दल विवेचन करण्यास सुरवात केली. भूमिजन त्यांच्या म्हणण्यास मान तुकवीत होते, पण त्यांतील कांहींजणांचें खरेंखुरें समाधान होत नव्हतें, हें सूक्ष्मपणें पाह-णारांस चटकन् समजून येण्यासारखें होतें. पण तशी खात्री पटविणें

म्हणजे शास्त्रीय विवेचनांत शिरणें. जेथें शिक्षणाचा अभाव, तेथें शास्त्रीय विवेचन कसलें करावयाचें ?

वसंतराव म्हणाले, " ह्या सर्व गोष्टी तुम्हांला आम्ही थोडक्यांत सांगितल्या. पण त्यांत हें कसें आणि तें कसें असें जो कोणी मधून मधून विचारीत आहे, त्याला तें सांगून समजण्यासारखें नाहीं. आम्हीं तो अभ्यास करून त्याचा पुष्कळ विचार केला आहे. तुमच्या भाईसाहेबांनीं तुमच्याकरितां ह्या विषयाचा पुष्कळ विचार केला आहे. म्हणून ते सांगतील त्यावर तुम्हीं विश्वास ठेवा."

यापुढें वसंतराव आणखी बोलणार होते. पण त्यापुढील प्रवचन वासंती करूं लागल्या.

" तुमच्यापैकीं हे सुभेदारांचे चिरंजीव ह्या गोष्टी तुम्हांला सांगू शकतील. तुम्हांला सर्वांनाच ह्या गोष्टी इतक्या बारीकपणें समजून घेणें शक्य होणार नाहीं. कारण त्यासाठीं तुम्हांला हातचा धंदा टाकून पुस्तकी शिक्षणांतच उमरीचीं बरींचशीं वर्षें घालवावीं लागतील. तुम्हांला शेतीचीं कामें सांभाळावयाचीं असतात."

वासंती आंवढा गिळूं लागल्या. तितक्यांत यशवंतरावांनीं तें भाषण चालू केलें—

" तुम्हांला शेतीचीं कामें सांभाळावयाचीं असतात. पण तीं सांभाळूनही कामापुरतें लिहिणें वाचणें व हिशेब ठिशेब करणें इतकें ज्ञान मिळविणें तुम्हांला अशक्य नाहीं. हें शिक्षण घेऊन तुम्ही स्वतः पुस्तकें वाचूं लागलांत तर तुम्हांला स्वतःलाच पुष्कळसें ज्ञान मिळेल, तुम्हांला शेतींत सुधारणा कसकशा करावयाच्या तें समजेल व बागायतींत देखील उत्पन्न अधिक काढतां येईल."

इतक्यांत नानासाहेब बोलण्याच्या तयारींत दिसले—

" अगदीं बरोबर आहे. शेतकरीवर्ग आपलें काम सांभाळीत असतां त्यांना त्या कामांत लक्ष घालावयास भरपूर वेळ देऊन त्यांना ज्ञान-संपन्न करण्यासाठीं स्वतः ज्ञानसंपादनांत आयुष्य घालविणारा जो वर्ग तोच ब्राह्मणवर्ग. तो ब्राह्मणवर्ग जगाच्या आरंभापासून जगाच्या अंतापर्यंत

कायम राहणार. तो नष्ट होणार नाहीं. तो पूर्वी आंगावर उपरणें घेत असला, तर आतां बूटसूट घालील. पूर्वी हातांत दर्भ आणि चरु घेत असला तर आतां वर्तमानपत्र आणि सिग्रेट घेईल. पण तो कायम राहणार. कारण ही श्रमविभागाची वर्णव्यवस्था आहे." नानासाहेब म्हणाले.

गाडी भलत्या रुळाकडे वळलेली पाहून भाईसाहेबांना आतां मध्यें पडणें आवश्यकच झालें.

" पण त्यांत आनुवंशिकतेचा संबंध काय ? तो ब्राह्मण वैश्यांतून, क्षत्रियांतून व शूद्रांतून देखील उत्पन्न होऊं शकेल. "

टाळ्यांचा कडकडाट पडला.

" तर आंबेडकर आमचे बिरामनच हुनांक होयेत " दूरच्या कोपऱ्यांतून आवाज आला.

" हो–हो ! आंबेडकर हे ब्राह्मणच त्या अर्थानें ठरतात. " वसंतरावांनीं ठांसून सांगितलें.

इतक्यांत पानें वाढलीं व झुणकाभाकर संमेलनाच्या सहभोजनास सुरवात झाली. मंडळी उठली. पण वासंती खुर्चीवरून उठली नाहीं. ती आतां कशी वागते इकडे भाईसाहेबांचें लक्ष लागलेलें होतें.

---

# ८ : झुणकाभाकर संमेलन.

सुरबाजी सुभेदारांकडे येऊन शहाळ्यांचें पाणी प्याल्यानंतर वसंतरावांनीं आपला साहेबी पोषाख बदलून नुसता सदराच घातला होता. त्यांचा साहेबी पोषाख देखील देशी कापडाचा होता. त्यांची उंची बरीच कमी होती तरी ते अगदीं ठेंगण्यांत गणले जाण्याजोगे नव्हते.

तथापि सुरबाजीबरोबर बोलत उभे असतांना त्यांना सुरबाजींच्या सहाफूट उंचीसमोर स्वतःच्या पांच फूट दोन इंच उंचीची लाज वाटली. दोघांच्याही देहयष्टींमधील तुलना लोकांच्या नजरेंत येऊं नये म्हणून त्यांनीं जी एकदा राऊंड टेबलाच्या जवळील खुर्चीवर बैठक मारली ती पुन्हा दिवेलावणी झाली तरी उचलली नव्हती.

सुरबाजीनें पलटणींत शिरल्यापासून तों पेन्शन घेईपर्यंतचें बहुतेक सगळेंच आत्मचरित्र वसंतरावांस सांगून टाकलें होतें. मधून मधून त्यांनीं आपल्या पूर्वजांचाही त्रोटक इतिहास कथन केला होता व पुढील आपले बेतही सांगून टाकावयास त्यांनीं कमी केलें नव्हतें. त्या आत्म-निवेदनांत त्यांनीं किती तरी साहेबांच्या गमतीच्या हकीगती सांगितल्या होत्या. त्यांचा निष्कर्ष वसंतरावांनीं काढला तो इतकाच कीं, साहेबां-शिवाय चांगले राज्यकर्ते कोणी कधीं झाले नाहींत व होणारही नाहींत. आणि साहेब म्हणजे अर्थात्च इंग्रज लोक.

कांहीं झालें तरी सुरबाजीचें आरोग्य आधुनिक तरुणांस लज्जेनें खालीं मान घालावयास लावणारें होतें. आधुनिक सुधारणेचा कोणीही हट्टी पुरस्कर्ता आला तरी आरोग्याच्या बाबतींत त्याला मागील पिढीच्या पुढें टेंभा मिरविण्यास जागाच राहत नाहीं. सुरबाजीनें चहावर जेव्हां तोंडसुख घ्यावयास सुरवात केली, तेव्हां त्यानें मांडलेले मुद्दे चांगल्या शिकलेल्यां-नींही विचारांत घेण्यासारखे होते. सुरबाजींचें व्याख्यान सप्रयोग प्रात्य-क्षिक होतें. कारण अद्याप चहा न प्याल्यामुळें आपले दांत किती घट्ट आहेत हें त्यांनीं जेव्हां दाखविलें तेव्हां वसंतरावांस मोठें आश्चर्यच वाटलें. पांच दिवसांच्या गणपतीच्या मावंद्याचे वडे तीन दिवसांनीं शिळे व घट्ट होऊन गेलेले आपण कसे कडाकड चावून खाल्ले याची साक्ष म्हणून आधीं त्यांनीं तोंड उघडून आपले दांत–दाढा दाखविल्या व नंतर घरां-तल्या बायकामाणसांस साक्ष द्यावयास हाक मारून बाहेर बोलावून घेतलें. तोंड उघडून दाढा दाखवितांना त्यांनीं वसंतरावांस आपल्या दाढा हालवून पहावयास देखील सांगितलें होतें! वसंतरावांनीं शिताफीनें चुकवाचुकव केली.

सुरबाजीला चांगलेंसें दिसत नव्हतें, पण त्यांनीं डोळ्यांला चष्मा लावलेला नव्हता. हल्लींच्या तरुणांना आपलें आरोग्य राखतां येत नाहीं, या मुद्यावर बोलतांना स्वतःबरोबर तुलना करण्याकरितां आपणाला बोलावणार या भीतीनें त्यांचा चाकरमानी मुलगा कामांत गुंतल्याचा बहाणा करून तो सुरबाजींच्या दृष्टीआड झाला होता. पण या त्याच्या युक्तीचा परिणाम बिचाऱ्या वसंतरावांस भोगावा लागत होता. कारण या शिपाईगड्याच्या मगरमिठींतून आपली सुटका कशी होते याची त्यांना फार चिंता लागून राहिली होती. वसंतराव चष्मेवाले असल्यामुळें त्यांच्या पोटांत धाकधूक होऊं लागलें. आपल्यासारख्या पाहुण्याला या गोलंदाजाच्या भडिमाराच्या लक्ष्यस्थानीं देऊन स्वतः भाईसाहेब दूर राहिले, या गोष्टीनें वसंतराव मनांतल्या मनांत चरफडत देखील होते. वसंतराव सडेतोड स्वभावाचे असले तरी त्यांच्यानें असल्या उघड्या दिलाच्या व प्रेमळ स्वभावाच्या सुरबाजीच्या भाषणाचा उघडपणें निषेध करवला नाहीं. एक दोनदां त्यांनीं पुस्तक उघडून वाचण्याचा आविर्भाव करून पाहिला. सुरबाजींनीं तें त्यांच्या हातांतलें पुस्तक बोलण्याच्या नादांत काढून घेऊन मिटून ठेवलें व आपलें पुराण ऐकावयास भाग पाडलें !

वसंतरावांनीं जांभया देऊन, चुटक्या वाजवून पाहिल्या, पण सरदार साहेबांचा पट्टा सुरूच होता. शेवटीं ते उठलेसुद्धां; पण त्यांच्याबरोबर हवालदारसाहेबही उठले !

त्याचवेळीं वसंतरावांच्या मनांत आलें कीं, भाईसाहेबांनीं आपणाला स्वतःच्या घरांत न नेतां या परक्या मराठा गृहस्थाच्या घरांत कां बरें आणलें ? भाईसाहेब आल्याबरोबर त्यांना हा प्रश्न रोखठोक विचारावयाचा वसंतरावांनीं विचारही केला. पण त्याचवेळीं सुरबाजींची चर्पटपंजरी चालू होती—

" भाईसाहेब सोबावाचे चांगले. तेस्नी मानूस नाय तोडावतो. पन त्यांचा बाप जो हाय की नाय, तो लय चिकू मारवाडी. चमडी देयंगा, पर दमडी नाय देयगा. बापलेकाच पटत न्हाय ! तुमच्यासारखा

पावना ल्येकानं घरांत आनला तर—तर बाप अन्नाच्या घासाला शिवेल बी न्हाय. त्येला पैसा पायजे—दुसरा काय बी नाय पायजे."

सुरबाजी सुभेदारांचा हा मराठी भाषेचा नमुना वसंतरावांस किती तरी गमतीचा वाटला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मुखपत्राला हा नमुना पाठवावा असें देखील त्यांस एकवार वाटलें. पण त्यांचें मन मात्र सुरबाजींच्या भाषणांकडे यावेळीं जडूं लागलें. कारण त्यांस भाईसाहेबांच्या गृहस्थितीची हवी असलेली माहिती अनायासें सुरबाजींच्या बडबडींतून मिळूं लागली होती. वसंतराव आपल्या भाषणाकडे लक्ष देत आहेत असें दिसून येतांच सुरबाजींनीं आपल्या पांढऱ्या सफेत गालमिशांवरून एकदां हात फिरवून आपलें कथानक पुढें चालू केलें.

"दाजीसायबांची इष्टेट वडलार्जित लय न्हाय. सगळी नव्वद रुपये दस्ताची जमीन. पण दाजी सायबान आतां ती चारपांचशें दस्ताची केल्यान हाय्. शिवाय रोकड पैसा पंचवीस तीस हजारांचा ऐवज असल. घाणाचे दागिने असतील ते निराळेच. दाणागोटा निराळाच. गुरांढोरां वायलींच. पण सगळी इष्टेट सवाय दिडीच्या व्याजानं आणि खोट्या दस्तऐवजांनीं मिळविलेली हां. झिलास तें सादत न्हाय. दाजीसायबानं लोकांस खूप नाडले. लोक बिथरलेबी होते. दाजीसायबांस मोडूनच घालनार होते. पण मुलगा लय चांगला निपाजला. भाईसायबाला गरीबाची माया हाय. भाईसायबापासून दाजीसायब वांचले. पण भाईसायबाकूनी घरचां सुक न्हाय." .

"तें कसं?" वसंतरावांनीं विचारलें.

आतांपर्यंतच्या बडबडींत वसंतरावांनीं संभाषणांत मन घालून प्रश्न टाकला असा हाच पहिला. मग काय विचारतां? सुभेदार साहेबांस परमावधीचा उत्साह चढला.

"अहो तें असां बगा, बाळपणीच त्याची आय वारली. आईबापाचा एकटाच मुलगा. कालेजांत लय शिकला. पण त्याचा सोबाव मुळचाच उदार आणि बाप तर असा चिकशेट! दोघांचं पटत न्हाय. शिवाय घरांत सैंपाकाला म्हणून दाजीसायबांनीं एक बाई ठेवली, पण लोक हुन-

त्यात तीच घरची कारबारीण बनली! घरांत बापलेकाची एक पंगत होत न्हाय कधीं बी! बाप अगोदर जेऊन उठतो. लेक मागून जेवतो. लेक कुळांच्या बाजूचा. कुळांला दुकवायाचा न्हाय. दाजीसायबाचा तो कारकून हाय काकाबामण नांवाचा. हातूतेच्या! लय दुष्ट. दाजीसायब तरी कितीतरी बरे. पण त्या बामनांचा तोंडबी बगूं नये. त्या काकान् सगळ्यांच्या घरांवर नांगर फिरावला! तो काका आतां त्या येशाप्पाच्या मागं लागलाय्."

"पण भाईसाहेबांना घरचं सुख नाहीं कसं तें नाहीं तुम्हीं सांगितलंत अद्याप?" वसंतरावांनीं अधीरपणानें म्हटलें.

"अहो बाप ह्यो असा. भाईसायबाला आई मूळचीच न्हाय. आणि आजून लगीन न्हाय कार्य. कसलं बिचाऱ्याला सुक? आतां गोरगरिबां-साठीं ह्या खटपटी तो करतो हाय. पन् त्याला खर्च काय थोडा येतो? बाप पै बी देत न्हाय!"

"मग?"

"मग काय? कदीं फोटू काढला, कदीं लेख बिरकटला, कदीं आणखी काय तरी कोणाचं काम केलं, काय मिळाले चार पैसे तर ते घातले ह्या असल्या कामांत. आजच्या झुणकाभाकरीला काय थोडा खर्च येईल, पण भाईसाहेब कोणाकडे मागायचा न्हाय. त्याला लोकांचा नाय पायजे—अगदीं कवडी देखील नाय पायजे. त्या इमानपूरचा इनामदार नानासायब नांवाचा एक लय चांगला सावकार हाय तो आपली लेक भाईसाहेबाला देनार हाय आसं ऐकलं होतं. पण काय झालं कळना. आतां बगा दाजीसायब आणि नानासायब दोघंही जमीनदार. पण कसे अगदीं निराळ्या सोबावाचे. नानासायब उदार मनाचे. पण त्या कार-णानं त्याचा वसूल होत न्हाय. त्यांस्नी कुळं लुबाडते. दाजीसायब कुळांच्या पोटावर बसते, तर कुळं त्यानला वसूल घालते. काय जगाची रीत बगा. आमीबी जमिनी कुळांस्नी दिल्या हायत. पण कांहीं कुळं भारी लबाड, बडगा न्हाय दाखवला, तर खंड घालनारच न्हायत."

अशा तऱ्हेचें संभाषण चाललें असतां भाईसाहेब, यशवंतराव, नाना साहेब, वासंती वगैरे मंडळी आली होती.

कार्यक्रमाला सुरवात झाल्यावर नानासाहेबांनीं आपलें उपोषण असल्याचें सांगितलें. वासंतीनें प्रकृति नीट नाहीं, म्हणून कांहीं खाण्याचें नाकारलें. पण सर्वांनींच आग्रह करून तो अयशस्वी ठरल्यावर वसंतरावांनीं जेव्हां आपल्याबरोबर बसल्याशिवाय आपण सुरवात करणार नाहीं असें सांगितलें तेव्हां ती खालीं बसली. तिनें एक तुकडा मोडला, तो जिभेकडे नेल्या-सारखें केलें व तोंडावर सेंटचा हातरुमाल धरला. कदाचित् तो भाकरीचा तुकडा तोंडांत घेतला असल्यास थुंकूनहि टाकला असेल. पण इतकें करा-वयास तिनें किती तरी आढेवेढे आणि किती तरी वेळ घेतला. स्वयंसेवक मंडळी स्वच्छ पोषाख करून वाढीत होते. पानांच्या पत्रावळी आणि पानांचे द्रोण होते. श्लोक वगैरे म्हणण्याचा सपाटा चालू होता.

जेवणें आटोपल्यावर म्हणजे झुणकाभाकर सहभोजन आटोपल्यावर इतर कार्यक्रमास सुरवात झाली. भाईसाहेब सहभोजनास स्वतः तर बस-लेच होते. ते उठल्यावर स्वतः इतरांस वाढीतही होते.

सामुदायिक ईशप्रार्थनेंत वसंतरावांनीं भाग घेतला नाहीं. हिंदी राज-कारणाच्या बाबतींत ते आपणास कॉंग्रेसचे अनुयायी म्हणवीत असत. पण त्यांचीं इतर मतें काय होतीं हें नक्की सांगतां येणें कोणासही शक्य नव्हतें. तथापि त्यांचा कल साम्यवादाकडेच अधिक झुकत होता. समाजसत्तावाददेखील त्यांस मान्य होता. कम्यूनिझमच्या मतांचा पुर-स्कार ते वादविवादांत करीत असत. पण ते स्वतःला भाई म्हणवून घेत नसत. ते नवमतवादाचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांना ईश्वराचें अस्तित्व मान्य नव्हतें, तसेंच खाजगी मालमत्ता कोणाचीही असणें त्यांना इष्ट वाटत नसे. पण या तत्त्वांच्या प्रस्थापनेकरतां रक्तपाताचा अवलंब करणें त्यांना रुचत नसावें. म्हणूनच त्यांना खरे कम्यूनिस्ट म्हणतां येण्यासारखें नव्हतें. पण त्याशिवाय जर दुसरा इलाजच नसेल तर हिंदुस्थाननें कम्यूनिस्ट बनलें पाहिजे असें ते आपल्या ' मेदिनी ' पत्रांतून, व्याख्यानांतून व खाजगी संभाषणांतून प्रतिपादीत असत.

'मिस् व्ही. एस्.' या वासंती हें गूढ जेव्हां बाहेर पडलें, तेव्हां तिघांसही निरनिराळ्या कारणांसाठीं चमत्कारिक वाटलें. वासंतीचीं नवमतवादाचीं आत्यंतिक मतें भाईसाहेबांस खरोखरच पसंत नव्हतीं. वसंतरावांस ती पूर्णपणें पसंत होतीं. म्हणूनच तीं 'मेदिनी' पत्रांतून सगौरव प्रसिद्ध केलीं जात असत. भाईसाहेबांचें वाङ्मयविषयक लेखन तेवढेंच 'मेदिनीं'तून प्रसिद्ध होई, पण राजकीय अथवा आर्थिक मतें स्वीकारलीं जात नसत. तें लेखन त्यांना दुसऱ्या नियतकालिकांकडे पाठवावें लागे.

खुद्द वासंतीकडेच वासंतीच्या मतांची आपण हेटाळणी तर केली नाहीं ना? असें वाटून यशवंतराव खट्टू होऊन बसले होते. नानासाहेब उठून जाण्याची चुळबूळ करूं लागले होते. त्यांना तो संमेलनाचा कार्यक्रम नकोसा नव्हता; पण वासंतीसह त्यांना त्या ठिकाणीं राहणें इष्ट वाटत नव्हतें. एवढ्याचकरितां त्यांनीं दाजीसाहेबाकडे जाण्याची गोष्ट काढून पाहिली. पण पाहुणे त्यांना सोडीनात.

आज सुरबाजी सुभेदार आपले निशाणबाजीचे व शक्तीचे कांहीं प्रयोग स्वतः करून दाखविणार होते, त्यामुळें आजच्या कार्यक्रमास विशेष महत्त्व आलें होतें.

भाईसाहेबांचा सदीप व्याख्यानाचा कार्यक्रम चालू असतां, एका बाजूच्या कोंपऱ्यातून कसली तरी बाचाबाची सुरू झाली. भाईसाहेबांनीं त्यांना गप राहण्याविषयीं विनवून सांगितलें. कांहीं वेळ गडबड बंद झाली. पण पुन्हां बाचाबाचीला सुरवात झाली. त्यांत पूर्वी न आलेलीं पण आतांच काळोखांत कुठून तरीं अकस्मात् आलेलीं माणसें असावींत असा संशय भाईसाहेबांस आला. त्यांनीं विद्युद्दीप तात्पुरता बंद करून व्याख्यान बंद केलें व उजेड करून स्थिर-स्थावर करीतों भांडण वाढत चाललेलें आढळून आलें. सदीप व्याख्यान हें अगदीं शेवटीं ठेवण्यांत आलें होतें. बहुतेक सगळा कार्यक्रम यथा-सांग पार पडला होता. आणि आतां अखेरीअखेरीस हें नवीन विघ्न उपस्थित झालें होतें.

त्यांत एका तरुण मुलास सर्वजण मिळून ओढीत होते. तो तरुण दीनासारखा होऊन गेला होता. भांडखोर मंडळी थोडी असली तरी ती चढाईची भाषा बोलत होती व मारामारी करण्याची किंवा सभा उधळून लावण्याची तरी त्यांची इच्छा असावीसें दिसलें.

ती झुंज आस्ते आस्ते भाईसाहेबांकडे येऊं लागली. भाईसाहेबांनीं मध्यें पडून सर्वांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचें कोणी ऐकेना. बहुजनसमाज या भांडणांत अद्याप सामील झाला नव्हता. तो समाज भाईसाहेबांच्या पक्षाचा व शांत स्वभावाचा होता.

भांडण उकरून काढणाऱ्या पक्षाचें म्हणणें असें आढळून आलें कीं, वाढणारांत एक महार पोरगा होता व त्यास भाईसाहेबांनीं मुद्दामच आणला होता. तो महार पोरगा आंबेखोलचा नसून बाहेरगांवचा होता. त्यामुळें त्याला प्रथम कोणी ओळखला नाहीं. ओळखला असता तरी असा दंगा झाला नसता. पण त्यांना मागून कोणी तरी चिथावणारा होता.

भाईसाहेबांनीं मराठ्यांना बाटवण्याचा हा धंदा सुरू केला आहे. त्यांच्या बापानें जशा मराठ्यांच्या जमिनी बळकावल्या तशा त्यांचा मुलगा मराठ्यांची व इतरांची जात बाटविणार आहे, असा आरोप दंगेखोर लोक भाईसाहेबांवर करूं लागले. इतकेंच नव्हे तर ह्या साक्षरता प्रसाराच्या ढोंगाखालीं व शेतकऱ्यांची सुधारणा करण्याच्या निमित्तानें मराठ्यांच्या तरुण पोरी पळविण्याचा भाईसाहेबांचा इरादा आहे, असेंहि दंगेखोर लोक मोठमोठ्यानें सांगूं लागले. त्यामुळें शांत राहिलेल्या मंडळींतील आणखी थोडेसे लोक बिथरले. प्रकरण जास्तच बिघडणार असा रंग दिसूं लागला.

आज या संमेलन समारंभास हिरा नाहीं म्हणून भाईसाहेबांस वाईट वाटत होतें. किशानें आपल्या आत्याकरितां कसा हट्ट घेतला होता व तो कसा सारखा रडत राहिला होता हें भाईसाहेबांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें. तशांत त्या पवित्र मुलीच्या विषयीं गैरसमज उत्पन्न करून तिला व आपणाला कलंक लावण्याचा हा नीच प्रयत्न वर्मी घाव घालणारा होता, हें

जाणूनही भाईसाहेबांनीं आपलें मस्तक भडकूं दिलें नाहीं. हा नीच प्रयत्न आपल्या प्रतिपक्षीयांकडून झालेला आहे हें आतां भाईसाहेबांनीं ओळखलें. कारण त्यांच्या पाठीमागें राजाभाऊसारखा कोणीतरी असलेला त्यांस दिसला. भाईसाहेबांनीं आपल्या अनुयायांना नुसत्या डोळ्यांचा इशारा दिला असता, तरी सर्वांनीं मिळून त्या दंगेखोरांचा खुर्दा उडविला असता. पण मग आजपर्यंत ज्या तत्वांचा उपदेश केला त्याचा उपयोग काय झाला असता ?

वासंती अगदीं घाबरून जाऊन रडकुंडीला आली होती. वसंतरावांची त्रेधा उडून गेली होती. यशवंतराव कांहीं टिपणें घेत होते. सुरबाजी आपली बंदूक हातांत घेऊन अस्तन्या सारीत होते. नानासाहेब इथें येण्यांत आज आपण मोठीच चूक केली असा पश्चात्ताप करीत होते.

दंगेखोरांना धाक दाखविण्याचा उपाय म्हणून सुरबाजींनीं खरोखरच एक वायबार काढला. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, सुरबाजींच्या खळ्यांतील काळोखांतून दुसरा एक बंदुकीच्या बाराचा आवाज ऐकूं आला !

ताबडतोब दंगा थंडावला ! जिकडे तिकडे सामसूम ! लागोपाठ बंदुकीचे दोन बार ऐकूं आले, पण लोकांना बंदूक मात्र एकच दिसत होती व ती फक्त सुरबाजींच्या हातांत. सुरबाजी काडतुसांची फैर झाडूं लागले कीं काय ?

वासंती मूर्च्छित पडली. वसंतराव लटपटूं लागले. नानासाहेब व यशवंतराव यांचें धाबें दणाणलें. कारण सुरबाजी आधींच म्हातारा. त्याचें डोकें बिघडलें आणि त्यानें गोळीबारास सुरवात केली असली तर? तीन चार तास सारख्या त्यानें लढाईच्या गोष्टी सुरू केल्या असल्यामुळें डोक्यांत तेंच भरलें असलें तर !

भाईसाहेब मात्र शांत होते. पण बाहेरून बंदुकीचा आवाज कसा आला म्हणून ते तिकडे पाहत होते. लोकही त्या बाजूकडेच हळूहळू जाऊं लागले होते. सुरबाजी खरोखरच बिथरून गेला होता. त्याला

वाटलें कांहीं तरी दगाफटका आहे खास. म्हणून त्यानें बंदुकींत खरोखरच गोळी भरली !

आजूबाजूंच्या लोकांची बोबडी वळली !

वसंतरावांच्यासमोर बोल्शेविझम उभा राहिला !

खाड् खाड् बुटांचा आवाज ऐकूं येऊं लागला. थोड्याच वेळांत लोकांची गर्दी फांकूं लागली. टॉर्च लाइटचा उजेड राजाभाऊंच्या तोंडावर पडलेला सर्वांनीं पाहिला. एका हातांत टॉर्च लाइट व दुसऱ्या हातांत बंदूक घेतलेला एक गोरासाहेब बेधडक पुढें आला व तो मुख्य चालकांच्या जवळ येऊन उभा राहिला !

सुरबाजी सुभेदारांनीं त्याला मिलिटरी सलामी दिली !

साहेब खूष झाला व हिंदुस्थानींत त्यानें सुभेदाराला शाबासकी दिली. नंतर तो गोरासाहेब वसंतरावांकडे वळला. भाईसाहेब वासंतीला सावध करण्याच्या प्रयत्नांत गुंतले होते. ती सावध होऊं लागल्यावर भाईसाहेबांनीं साहेबाकडे पाहिलें.

---

# ९ : बंदुकवाला गोरा साहेब !

साहेबानें वसंतरावांशीं हस्तांदोलन केलें. सूक्ष्मपणें पाहिल्यावर वसंतरावांना शंका आली. ते कांहींतरी बोलणार होते पण तितक्यात भाईसाहेबांनीं त्यांस खूण केली असावी. जिकडे तिकडे शांतता झाली होती. राजभाऊंचा कोठेंच पत्ता नव्हता !

साहेबांच्या हातांतली बंदूक ही हवाई बंदूक होती. साहेब प्रथम इंग्रजींतच बोलत होते. नंतर ते हिंदुस्तानींत बोलले. शेवटीं त्यांनीं जमलेल्या लोकांस समजावें म्हणून मराठींतही—पण साहेबी मराठींतच भाषण केलें.

साहेबांचा कोणी नातेवाईक अगर परिचित कोणत्या लढाईवर होते

म्हणून सुरबाजींनीं चौकशीस सुरवात केली. आपला निकट संबंध साहेबाशीं जोडतां येतो कीं काय हें ते पहात होते.

वसंतराव साहेबांच्या कातडीकडे बारीक नजरेनें पहात होते. दिव्याच्या प्रकाशांत ते थेट गोऱ्यासाहेबासारखे दिसत होते. पण इंग्रजींतील साहेबांचे उच्चार एतद्देशीयाचे होते. ते उच्चार देखील थेट युरोपियनप्रमाणें करण्याची त्यांनीं शिकस्त केली होती. पण वसंतरावांचा साहेबांशीं चांगला सराव असल्यामुळें त्यांना ह्या साहेबाच्या ठिकाणीं गांवठीपणाचा संशय येऊं लागला. आणि तितक्यांत भाईसाहेबांनीं नेत्रसंकेत केल्यामुळें तर वसंतराव मुग्धच राहिले होते. तशांत वसंतरावांनीं एक महत्वाची संधि नुकतीच गमाविली होती. वासंतीस उचलून घेऊन तिला सावध करण्याचें काम त्यांच्याआधीं भाईसाहेबांनीं केलें होतें. वसंतराव आपल्या बॅगेंतून कांहीं औषध काढण्याच्या विचारांत होते. त्यांनीं आपली बॅग उघडली देखील. पण भाईसाहेबांनीं कांहीं नेहमींच्या आकस्मिक विकारांवर तात्कालिक उपचार आपल्या स्वयंसेवकांस शिकविले होते. गांवठी वनौषधींचा उपयोग ते करीत असत. शिवाय कांहीं ठराविक पेटंट औषधेंही त्यांच्या संग्रहीं होतीं. आज या ठिकाणीं बराच जमाव जमणार हें जाणून त्यांनीं कांहीं औषधांची पेटी सुरबाजींच्या घरीं आणून अगोदरच ठेविली होती. ती यावेळीं उपयोगीं पडली.

थोडासा सावधपणा आल्यावर वासंतीला आपल्या दुबळेपणाबद्दल लाज वाटली. स्त्रियांचा नाजूकपणा आपल्याला पसंत नाहीं, असें ती प्रतिपादीत असे. वसंतरावाच्या समक्ष आपला नाजुकपणा अथवा दुबळेपणा असा प्रदर्शित झालेला तिला आवडणें शक्य नव्हतें. म्हणून ती उठली. वसंतरावांनीं पुढें केलेल्या हाताचा तिनें आश्रय घेतला. भाईसाहेब दुसऱ्या कामास निघून गेले. वसंतरावांनीं कसलीशी बाटली उघडून वासंतीच्या नाकाशीं धरली.

नानासाहेब या विधिघटनेकडे आश्चर्यचकित होऊन पहात होते. जमलेल्या लोकांतील कांहींजण साहेबास वचकून दूर जाऊन निमूट बसले होते. भाईसाहेबांचा साथीदार बाळा गावडे प्रसंगावधान बाळगून

भाईसाहेबांस हरतऱ्हेचें सहाय्य करण्यास चक्रासारखा फिरत राहिला होता. जमावांतील कित्येकजण आतां हळूहळू आपसांत त्या साहेबाबद्दल कांहींसें बोलत होते. नंतर भाईसाहेबदेखील वसंतरावांशीं इंग्रजींतच बोलले. त्याचवेळीं साहेब सुरबाजीसाहेबांशीं हिंदींत बोलले. त्याबरोबर सगळेजण मोठमोठ्यानें हांसले. वसंतरावांनीं आपल्या खिशांत हात घालून कांहीं वस्तु बाहेर काढली व ती साहेबाच्या हातावर ठेवली. साहेबानें टोपी काढून अदबीनें वसंतरावांस सलाम केला व तो आला तसाच निघून गेला.

जमावांतले एकदोन असामी म्हणूं लागले कीं, वसंतरावांनीं साहेबांस दिलेली वस्तु म्हणजे एक रुपयाचें नाणें होय. त्याच्यावरच पुन्हां पुष्कळशी भवति न भवति होऊं लागली.

मी समक्ष पाहिला. तो रुपयाच होता असें एकानें म्हटलें. आतांशा गांवांत निरानिराळीं सोंगें घेऊन फिरणारा बहुरूपी तो तोच असें दुसऱ्या एकाचें मत पडलें.

तो साहेब मात्र जात असतां एकदम थबकला व कांहीं वेळ उभा राहिला. नंतर तो अगदीं सावकाश चालूं लागला. त्याच्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. आपल्याबद्दल कसली भवति न भवति चालली आहे याविषयींचें गांवच्या लोकांचें मत ऐकून घ्यावें अशी त्याची कदाचित् इच्छा असावी.

कोणीसें एकानें म्हटलें कीं त्या बहुरूप्यानें मारवाड्याचें सोंग कांहीं दिवसांपूर्वी आणलें होतें. त्या दिवशीं सगुणा भावीण काकाबामणाच्या मांगरांत चिटक्या काढावयास गेली होती. चिटक्या काढून झाल्यावर तिनें घर उघडलें व ती केर लोटूं लागली. तेव्हां हा मारवाडी सोंग दाखवायला म्हणून त्या घराच्या दारांत गेला. सगुणा त्याला जायला सांगत होती. तेव्हां ह्या मारवाड्यानें घरांत पडलेले पुष्कळसे कागदांचे कपटे उचलले व तेच खिशांत टाकून तो रुपयांच्या नोटी मिळाल्यानें जसें एकाद्या भिकाऱ्यानें आनंदित व्हावें, तसा आनंदित होऊन उड्या मारीतच निघून गेला. त्यांत एक टिपकागदाचा देखील जाडा तुकडा

होता. सगुणा त्या गोष्टीचें नवल करीत व त्या बहुरूप्याकडे पाहत किती तरी वेळ उभी होती.

हें सर्व ऐकल्यानंतर त्या साहेबाचा झालेला चेहरा खरोखरच प्रेक्षणीय होता. पण काळोखांत तो कोणास कसा दिसणार ?

बहुरूपी दिवसाचीं सोंगें घेऊन फिरतात. पण रात्रौ कांहीं कधीं फिरत नाहींत. या बहुरूप्याची ही एक नवीनच तऱ्हा! असें कांहीं जण म्हणत होते.

पण सोंगें काढण्याच्या बहुरूप्याच्या कौशल्याबद्दल मात्र सर्वांची एकवाक्यता होती.

वसंतराव, यशवंतराव, सुरबाजी वगैरे माणसें देखील या बहुरूप्याच्या सोंगाबद्दलचीच वाखाणणी करीत होतीं. शहरांत फिरणारे बहुरूपी यंदां आंबेखोल गांवांत कां उतरले याबद्दल मात्र गांवकऱ्यांस आश्चर्य वाटत होतें. तो साहेब आणि त्याच्याबरोबरचा तो त्याचा ऑर्डर्ली—एः ! सर्व कांहीं हुबेहुब !

भाईसाहेब पुन्हां आपल्या कामास लागले होते. वसंतरावांची झोंपण्याची व्यवस्था त्यांनीं सुरबाजीच्याच माडीवर केली होती. नानासाहेबांच्या मनांत प्रथम दाजीसाहेबांकडे जावयाचें होतें. नंतर त्यांना वाटलें कीं आतां रात्रीच्यावेळीं दाजीसाहेबांकडे जाणें योग्य नाहीं. पण प्रत्येक तासाला जे जे नवे नवे प्रसंग घडून येत होते, त्यांवरून आपण ज्या संकल्पानें आज आंबेखोलास आलों तो संकल्प दुरावत आहे असें त्यांना आढळून आलें होतें. यासाठीं ही रात्र सुरबाजी सुभेदारांच्या घरीं घालविणें त्यांना फार अनिष्ट वाटूं लागलें होतें. सकाळ होईपर्यंत आणखी कोणकोणत्या घटना घडून येतील न जाणो, अशी धास्ती त्यांना वाटत होती. पण वासंती आपल्याबरोबर यावयास कबूल होईल कीं नाहीं याबद्दलही त्यांचें मन साशंक होऊं लागलें. तिचें हृद्गत ओळखण्याकरितां ते स्वतःच डोकीला रुमाल चढवूं लागले.

वासंतीच्या मनांतील खळबळ भाईसाहेबांनीं ओळखली होती. त्यांनीं सर्व गोष्टींचा खुलासा लगेच करून टाकिला. वसंतरावांस त्यांनीं आपल्या

स्वतःच्या घरीं राहण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं बोलाविलें. नानासाहेब वासंतीसह दुसऱ्या दिवशीं दाजीसाहेबांकडे राहणारच होते. तेव्हां दुसऱ्या दिवशीं सर्वजणें भाईसाहेबांकडे जमणार इतकें नक्की ठरलें. सहभोजन व इतर एकंदर प्रकार पाहून वरवर जरी वासंती पसंती दर्शवीत होती, तरी तिला एक प्रकारचा तिटकाराच आला होता. तेव्हां त्यासाठीं ती नानासाहेबांबरोबर दाजीसाहेबांकडे इतक्या रात्रीं देखील जावयास तयार झाली. निदान रात्रीं झोंप तरी चांगली मिळेल अशी तिला आशा वाटत होती.

भाईसाहेब दाजीसाहेबांचे चिरंजीव आणि नानासाहेब हे एक परिचित गृहस्थ. दोघेही सांपत्तिक दृष्ट्या एकाच तोलाचे, पण दोघांचें व्यावहारिक धोरण अगदींच भिन्न. तरी पण त्यांचा तसा स्नेह होता. रात्रीच्या वेळीं आपल्या घरीं जावयास भाईसाहेब तयार नव्हते, पण नानासाहेब केवळ नाइलाज म्हणून दाजीसाहेबांकडे जावयास तयार झाले. त्यांना रात्रौ सोबतीस म्हणून भाईसाहेबांनीं एका स्वयंसेवकास दिलें.

तीं तिघें जावयास निघालीं. वसंतरावांस झोंप येत होती तरी त्यांचें मन अस्वस्थ झाले होतें. ते आपल्या जागेवर जाऊन बिछान्यावर पडले. झोंपण्यापूर्वी 'मेदिनी'करितां पाठवावयाचा मजकूर त्यांनीं लिहून काढला. त्यांत आंबेखोलच्या भाईसाहेबांच्या ग्रामोद्धारकार्याचा गौरव योग्य शब्दांत केलेला होता. त्यांना कांहीं फोटोग्राफ्स मिळाल्यावर दुसरा एक आणखी लेख लिहावयाचा होता. तो बेत त्यांनीं दुसऱ्या दिवसावर ढकलला.

यशवंतराव व वसंतराव एकाच खोलींत होते. यशवंतरावांनींहि आपल्या 'सागरा'करितां मजकूर तयार केला. झालेल्या एकंदर प्रकाराबद्दलचे विचार यशवंतरावांच्या डोक्यांत घोळत होतेच. पण उद्यां मालवणास गेल्यावर व्याख्यानाचा कार्यक्रम कसा काय आंखावयाचा याविषयींच्या कल्पनांचा भाग त्यांत अधिक होता. पण 'मिस् व्ही. एस्.' ऊर्फ वासंती हिच्या एकंदर वर्तनाचें कोडें त्यांना अगम्य वाटत होतें. दुसऱ्या दिवशीं ते स्वतः मालवणास जाणारच होते. पण वसंतराव

नक्की कधीं येतात हें त्यांना विचारावेंसें वाटलें. वसंतरावांचें नक्की उत्तर येईना.

" हें पहा यशवंतराव, माझा हा दौरा अनेक कारणांसाठीं आहे. पत्राचा खप वाढविण्यासाठीं ठिकठिकाणीं एजंट शोधून काढावयाचे, वर्गणीदार वाढावावयाचे, निरनिराळ्या ठिकाणचे फोटोग्राफ्स घ्यावयाचे, तुमच्यासारखे भाईसाहेबांसारखे नवीन लेखक मिळाले तर पहावयाचे—"

" आणखी ' मिस् व्ही. एम्. ' सारखे नाहींत वाटतं ? "

" हो —तसे देखील " अगदीं निर्विकारपणें, सहजासहजीं बोलल्याचा आव आणीत वसंतराव म्हणाले. " तसेंच आमच्या मित्रांच्या फिल्म कंपनीकरितां मुलुखाची पाहणी करावयाची. सह्याद्रीची पाहणी आपण आंबोलीला केलीच आहे. पण एकंदरींत ही कोंकणभूमि फारच सौंदर्यसंपन्न दिसते यांत शंका नाहीं.—— "

" ओ हो ! टाळी द्या टाळी ! " बिछान्यावर निजलेले यशवंतराव उठून बसून मध्येंच म्हणाले.

वसंतराव अगदीं स्फूर्तीच्या विमानांत बसून गगनविहार करणाऱ्या कवीप्रमाणें बोलत सुटले होते. त्यांच्या विमानाला एकदम धक्का बसला.

" पण कशाबद्दल ती ? " त्यांनीं विस्मयानें विचारलें. बाकी तोंपर्यंत दोघांच्या हातांची टाळी वाजलीच हळुचशी.

" कोंकणचं महत्व तुम्हीं स्वतः आपल्या तोंडानंच वर्णन कराल अशी प्रतिज्ञा मी नव्हती का केली काल आंबोलींत ? "

" सोडा ! "

" अहो सोडा आतां म्हणतांहात. पण आमच्या गोव्यास जाल तर लेमन म्हणाल. तुम्हां रुक्ष प्रांतांत राहणाऱ्या देशावरच्या लोकांस कोकणांतलं गोमांतक नंदनवनासारखं वाटतं. आहे का जायचं गोव्याला ? "

" तें पाहूं मग. आमच्या मुख्य संपादकमहाशयांस मी आज पत्र लिहित आहें. त्यांच्या उत्तरानुसार माझा दौरा पुरा करणं किंवा न करणं हें आतां अवलंबून आहे. "

" नाहीं तरी तुमचा दौरा लांबेल असा आपला माझा तर्क वाहूं लागला आहे. "

" तो कशावरून बोवा ? "

" कारण कांहीं मला तसं नक्की सांगतां येणार नाहीं, " इतकें बोलून उत्तर देण्याचें टाळण्याकरितां त्यांनीं दुसरा प्रश्न विचारला—

" वसंतराव तुम्ही फिल्म कंपनीसाठीं जशीं सृष्टिसौंदर्याचीं स्थळं शोधीत आहांत तशींच पडद्यावर काम करण्यासाठीं मानवी सौंदर्याचीं स्थळंही शोधीत असाल नाहीं ? "

" हो,–पण सहजासहजीं दृष्टिपथांत आल्यास— "

" पण एक प्रश्न विचारतों, मात्र राग येऊं देऊं नका हं— तुम्ही भाषणांत प्रतिपादन करतां कीं कोणीही खासगी मालमत्ता वाजवीहून जास्ती वाढवूं नये आणि तुम्ही स्वत: तर सपाटून धनसंचय करण्याचा व्यवसाय आरंभिला आहे, याची संगती कशी बरं लावायाची ? "

" अहो तीं माझीं मतं आहेत. पण त्याप्रमाणं आचरण करावयास सगळीच समाजस्थिति पालटली पाहिजे. ती पालटली नाहीं तर आपण एकटेच मात्र व्यवहारांत फसून जाऊं. शिवाय मला तरी तसा पैसा कुठं मिळतो आहे ? आणि रशियासारखी परिस्थिति हिंदुस्थानांत कुठं निर्माण झाली आहे ? हिंदुस्थानाला अनुकरण करावयास उदाहरणादाखल म्हणून रशिया आपल्यापुढें ठेवावयास हरकत नाहीं असं मी समजतों. " वसंतराव एकदम पडतें घेऊन म्हणाले.

" तर मग मला वाटतं तुमच्यासारख्या व्याख्यानी कम्यूनिस्टांपेक्षां यथाशक्ति संपत्तिविभागाचं कार्य धीमें धीमें करणारे आपले भाईसाहेबच श्रेष्ठ ठरतील. "

" भाईसाहेबांना परिस्थिति अनुकूल आहे तशी आम्हांला नाहीं. शिवाय भाईसाहेबांना आपल्या पित्याच्या पापाचं क्षालन करायचं आहे. ही गोष्ट तुम्ही लक्षांत घ्याल तर भाईसाहेबांच्या स्वार्थत्यागानं इतकें दिपून जाणार नाहीं, " वसंतराव जरासे आवेशानें म्हणाले. त्यांचीही झोंप आतां पार मोडून गेली होती. " तुम्ही मला आंबोलींत ज्या

हकीगती भाईसाहेबांबद्दल सांगितल्या त्याहूनही जास्त लोकहिताच्या त्यांच्या गोष्टी जशा मला इथं आल्यावर ऐकायला व प्रत्यक्ष पहायला मिळाल्या, तशाच त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीच्याही कांहीं हकीगती समजल्या आहेत. त्यांच्या उज्ज्वल वर्तनावर आक्षेप घ्यावयाचा माझा हेतु नाहीं, समजलं कां; पण एखाद्या खेडुताला असं वाटलं तर तुम्हांला तें गैर वाटेल का ?—" वसंतरावांनीं आपला प्रश्न कसा मांडावा याचा विचार करीत तो मागेंच ठेवला.

" कसं वाटलं तर ?" यशवंतरावांनीं हटकलें.

" कीं, बापावर चिडून गेलेल्या कुळांना गोंजारण्याची ही एक खुबी आहे. बापानं नखांनीं ओरबाडून द्रव्यसंपादन केलं. मुलगा मऊ तळहातांनीं थोपटून थोपटून तें राखण्याचा उद्योग करीत आहे. एखाद्या कुळाला किंवा एखाद्या तिऱ्हाइताला जर असं वाटलं तर शंकानिरसन कसं करतां येईल ?"

" नाइलाजास्तव मी उद्यां मालवणला जातच आहें. म्हणून त्या वेळेला मला हजर राहतां येत नाहीं. पण उद्यां या तुमच्या शंकेचं उत्तर दाजीसाहेबांच्या घरीं तुम्हांला आपोआपच मिळणार आहे. उद्यांच्या चर्चेत हा विषय आपोआपच येणार आहे असें भाईसाहेबांच्या बोलण्या-वरून वाटतं आहे मला."

त्या दोघांचें असें बोलणें चाललें असतां जिन्यांत पावलें वाजलीं. सुरबाजी केव्हांच झोंपून गेले होते. भाईसाहेब खालीं सर्व काम संपविल्यानंतर बाळा गावड्याबरोबर एकातांत दूर एका बाजूस जाऊन बोलत राहिले होते.

प्रथम हलक्या आवाजांत त्यांचें बराच वेळ बोलणें झालें. आस्ते आस्ते बाळाचा आवाज मोठा येऊं लागला.

" पण तुम्हाला इथं एकटा ठेवून मी कसा जाऊं मुंबईला ?"

" हळू बोल," भाईसाहेब हलके म्हणाले, " माझ्या सोबतीला इथं कशाला राहिलं पाहिजे ?"

" वा: ! म्हणजे मला काय इतकंही समजत नाहीं ! आजचा दंगा ही एक ठिणगी आहे. दसऱ्या दिवशीं मंदिर प्रवेशाच्या वेळीं होणाऱ्या

लढाईचें हें शिंग आहे. त्यावेळीं आपण एकटे, अभिमन्यूसारखे एकटे शत्रूंच्या चक्रव्यूहांत सांपडणार आहांत. तुम्हाला सोडून मी कसा जाऊं ?"

"बाळा ! तुला टाऊक नाहीं. तुला कल्पनाही नसेल हिरा कसल्या संकटांत असेल याची. तिला दगा करण्याचा विचार आहे, त्या लोकांचा. तूं जर गेला नाहींस तर तिची धडगत नाहीं. बापाला संकटमुक्त करण्याकरितां स्वतःचा जीव धोक्यांत घालावयास तयार झालेली वीरकन्या—तिचं कौतुक करावं तितकं थोडं. मला स्वतःला तिकडे जातां येत नाहीं. माझं अंगीकृत कार्य मला इथून पाय हलवूं देत नाहीं. मी मोकळा असतों तरी जनदृष्टीला तें बरं दिसलं नसतं. आणि इतका भिऊन वागत असतांना सुद्धां, निंदक लोक माझी कशी निंदा करीत आहेत, ती आली असेलच कानीं तुझ्या ? तूं माझी कसलीच काळजी करूं नको. खर्चाची तुझी मी व्यवस्था करतों. तूं उद्यांच इथून निघालं पाहिजे."

"पण काका अद्याप इथंच आहे तो ?"

"तो मुद्दामच राहिला आहे आमच्या पाळतीवर. तो आजच निघाला असता. पण हिराला पळवून नेण्याचा परिणाम आमच्यावर व गांवावर काय होतो, याचा अजमास काढण्याकरितां तो राहिला आहे. येथील रागरंग पाहून तो पुढं पाऊल टाकणार असेल असं वाटतं."

"तसं असेल तर मला वाटतं, तो इथून हलेपर्यंत हिराला धोका नाहीं. तो इथं राहून काय काय कारस्थान करतो हें आपणाला डोळ्यांत तेल घालून पाहिलं पाहिजे. पाहुण्यांच्या बरोबर तुम्ही असल्यामुळं तुम्हांला इकडे लक्ष घालावयास फुरसत होणार नाहीं. मी काकाच्या आसपास राहतों. काका निघाला कीं त्याच दिवशीं किंवा दुसऱ्या दिवशीं मी निघतों."

"बरं आहे. तुझं म्हणणं देखील मला योग्य वाटतं. मी जातों आत तर—हं !"

असें म्हणून भाईसाहेब पाहुण्यांकडे वर आले होते. त्यांना वाटलें पाहुणे इतक्यांत झोंपलेही असतील पण बघतात तों पाहुणे अझूनही आंथरूणांत पडून बोलत आहेत व तें देखील आपल्याबद्दलच !

"उद्यांच्या चर्चेंत हा विषय आपोआपच येणार आहे असं भाईसा-

हेबांच्या बोलण्यावरून वाटतं आहे मला, ” हें शेवटचें यशवंतरावांचें वाक्य कानांत पडलें भाईसाहेबांच्या.

“ शाबास ! तुम्ही दोघे अजून जागेच ? आणि कसला विषय माझ्याबद्दल काढला ? ” भाईसाहेबांनीं येतां येतां विचारलें.

“ कसला नाहीं. रात्र फार झाली. आतां सर्वांनीं निजावं हें बरं ! ” जांभई देत यशवंतराव म्हणाले.

“ पण कांहींतरी माझाबद्दलच चाललं होतं ना ? ”

“ तुमच्याबद्दलच कांहीं शंका मला विचारीत होते वसंतराव. ”

“ मग तर ते मलाच कां नाहीं विचारीत ? ” भाईसाहेबांनीं म्हटलें. यशवतरावांनीं वसंतरावांचा आक्षेप सांगितला.

“ बरोबर आहे त्यांचा आक्षेप. असा आक्षेप माझ्याबद्दल उपस्थित होणार हें मी देखील पुरतें जाणून आहें. तथापि सार्वत्रिक हिताबद्दल जें जें म्हणून माझ्या अल्पबुद्धीला सुचेल तें मी करीत राहणार आहें. माझ्याबद्दल आक्षेप काय उपस्थित होतील हा प्रश्न निराळा. पण माझं कार्य तुम्हां दोघांना पसंत आहे ना ? ”

“ हें काय विचारायला पाहिजे ? ” यशवंतराव म्हणाले.

“ तुमचं कार्य मोठमोठ्यांलाही तोडांत बोटं घालायला लावील. मी जे आक्षेप सांगितले ते माझे नव्हत. लोकांच्या कुत्सित दृष्टीला काय दिसेल तेंच मी सांगितलं. ” वसंतराव बोलले.

“ कांहीं हरकत नाहीं. पण तुम्ही माझ्याबद्दल बरीचशी माहिती आतां तरी मिळविली असेलच. ”

“ तशी कांहीं फारशी नाहीं, ” वसंतराव टाळाटाळ करीत म्हणाले.

“ पण स्वतःच्या मनाची खात्री करण्यापुरती तरी मिळविली असेल. तुम्ही माझे स्नेही आहांत. आपण कॉलेजांत असतांनापासूनचे मित्र. तुम्ही व्यवसायांत पडलां. मी ग्रामोद्धार हातीं घेतला. माझे चाललेले हे प्रयत्न पाहिल्यानंतर व माझ्या घरची अवस्था डोळ्याखालीं घातल्यानंतर मी कसा अडचणींत असतों हें तुमच्या निदर्शनास आलंच असेल.

मला आतां या साक्षर झालेल्या लोकांकरितां वाचनालय काढायचं आहे. त्यासाठीं आपण मला काय मदत करूं शकाल ?"

"केलं पाहिजे कांहीं तरी–" अळंटळं करीत वसंतराव म्हणाले.

"माझ्या लेखनाबद्दल मी जेव्हां जेव्हां मोबदला मागितला तेव्हां तेव्हां, तुम्ही मला असं विचारलं आहे कीं, श्रीमंत माणसांनीं साहित्यसेवा करतांना मोबदल्याची अपेक्षा धरूं नये. आपल्या महाराष्ट्रांत हौसेनें साहित्यसेवा करणारे असे श्रीमंत लोक श्री. सौ. कमलाबाईसाहेब किबे यांच्यासारखे कितीकसे सांपडतील ? सांपडतील कां ? श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदारासारखे किती कलावंत सांपडतील ?"

"छे ! हो !" यशवंतराव म्हणाले.

"मी सुखवस्तु आहें खरा. पण मी हातीं घेतलेलं हें प्रचंड कार्य पार पाडायला मला किती गरज आहे पैशांची, हें सहज समजून येण्यासारखं आहे. आम्हांला उदारपणानं साहित्यसेवा करावयाचा उपदेश करणारे संपादक स्वतः उदारपणाची साहित्य सेवा करीत असतात का ?" भाईसाहेबांच्या प्रश्नाला उत्तर मिळालें नाहीं, तेव्हां ते स्वतःच पुढें बोलूं लागलं.

"परोपदेशे पांडित्य करणारे हे संपादक साहित्यिक जर मालक किंवा प्रोप्रायटर असतील, तर त्यांना मला असं विचारायचं आहे कीं, नियतकालिक चालवायला त्यांना जे अनेक खर्च आकारावे लागतात, त्यांत लेखकांच्या मोबदल्याचा अंतर्भाव कां केला जाऊं नये ? त्यालाच काय पोट नाहीं ? त्यालाच काय श्रम नाहींत. लेखनाच्या धंद्याला काय मुळांत खर्च करावा लागत नाहीं ? नियतकालिक चालवायला कागदखर्च आहे, जाहिरात खर्च आहे, छापखाना खर्च आहे, बायंडर आहे, एजंट आहे. सर्व कांहीं आहे. ठराविक पुठ्ठयांतले एकदोन झब्बू, अथवा नांवाच्या प्रसिद्धीकरितां हपापलेले एकदोन उमेदवार हाताशीं धरून त्यांच्या जिवावर इतरांचे लेखन फुकटांत पाडण्याचा प्रयत्न करणं ही कोणत्या प्रकारची साहित्यसेवा ? मी मोबदला कां मागत होतों हें आतां तरी आपल्याला जाणवलं असेल ना ?"

" नाहीं—नाहीं. मला आतां हा तुमचा प्रश्न आमच्या चालक कमिटी-समोर मांडून तुमच्या लेखनाचा मोबदला तुम्हांला द्यावयाची व्यवस्था केलीच पाहिजे. इतकंच नव्हे, तर तुम्हांला इतरही बाबतींत हस्तें परहस्तें होईल ती मदत मी आनंदानं करीन."

" तुम्ही माझे पाहुणे आहांत. आज हा प्रश्न मी तुमच्यासमोर काढूं देखील नये. पण महाराष्ट्रांत असे कांहीं प्रकाशक आहेत कीं ते चांगल्या तपस्वी वाङ्मयसेवकांकडून हजारों पृष्ठें लिहून घेऊन त्याचा बाजार मांडतात. त्या दुकानदारीवर पैसा मिळवितात. पण अत्यंत वृद्धावस्थेंत परस्वाधीन होऊन पडलेल्या लेखकाची मात्र विचारपूस देखील करीत नाहींत. हेच प्रकाशक देशभक्त म्हणून मिरवीत असतात. हे प्रकाशक तुमच्याच गोटांतले आहेत हें लक्षांत घ्या. याचीं मी उदाहरणें दाखवून देईन, वसंतराव. अशा वाङ्मयतपस्वी लोकांकरितां मी हे बोलत आहे. माझ्या स्वतःकरितां बोलत नाहीं. वृत्तपत्रव्यवसाय ज्या पाश्चात्य लोकांकडून तुम्ही शिकलांत, त्यांची नीति या बाबतींत तुम्ही सर्वांनीं अनुकरण्यासारखी आहे. साहित्यसेवकांत अर्ध्या हळकुंडानं पिवळे होणारे कांहीं अर्धवट आहेत. त्याचं लेखन प्रसिद्ध करणं हे त्यांच्यावर उपकार असं तुम्ही मानलं, तर एकवार चालेल. मी तर म्हणेन कीं, असलं अर्धं कच्चं वाङ्मय आपल्या वर्गणीदारांस त्यांच्या वर्गणीच्या मोबदल्यांत वाचावयास देणं म्हणजे वर्गणीदारांची निव्वळ फसवणूक होय. हा अर्ध्या कच्च्या लेखकांना उपकार होत असला, तरी वर्गणीदारांना अपकार होत असतो," भाईसाहेब अगदीं कळ-कळीनें बोलत होते.

" भाईसाहेब," वसंतराव न चिडता शांतपणानें म्हणाले, "भाईसाहेब तुम्ही आपली विद्यार्थीदशा व त्या दिवसांतील साहित्यसेवेची उमेदवारी लक्षांत घ्या. मी देखील आतां जें बोलत आहे, तें 'मेदिनी' पत्राकरितां बोलत नसून, सर्व संपादक वर्गाकरितां बोलत आहें. कॉलेजांत असतांना तुम्ही जें लेखन लिहित होतां, तें पहिल्याप्रथमच पहिल्या वर्गाच्या नियत-कालिकांनीं स्वीकारलं होतं काय ? एका प्रसिद्ध मासिकाकडून परत आलेला

तुमचा लेख पाहून तुम्ही किती निराश झालां होतां, हें सोयीकरितां तुम्हांला विसरावसं वाटत असलं, तरी मला तें चांगलं आठवत आहे. त्यावेळीं तुमच्या लेखनांतले चांगले गुण तुम्हांला दाखवून मीच तुम्हांला उत्तेजन दिलं होतं. त्यावेळीं तुमचे लेख प्रथम दुय्यम दर्जाचीं मासिकंच छापून प्रसिद्ध करीत होतीं. त्यानंतर लवकरच तुम्ही प्रसिद्ध लेखक बनलांत व ग्रंथकारही होऊं लागलांत पण हीं दुय्यम दर्जाचीं मराठीं नियतकालिकं हीं पुढं प्रसिद्धीस येणाऱ्या लेखकांच्या शाळाच होत." बोलतां बोलतां वसंतराव उठून बसले होते. यशवंतराव घोरूं लागले होते.

" आतां आमच्या पुढयांतील प्रकाशकांबद्दल तुम्ही म्हणतां, पण एकाद्या प्रकाशकाचं वर्तन सर्वांच्या माथीं मारणं हें न्यायाचं कसं होतं?" वसंतराव पुढें म्हणाले.

" तुम्ही म्हणतां तें खरं आहे, " थोडेसें नवाळून भाईसाहेब म्हणाले, " जोंपर्यंत वृत्तपत्रव्यवसायाचं शिक्षण देण्याची सोय आमच्या महाराष्ट्रात झालेली नाहीं, तोंपर्यंत दुय्यम दर्जाचीं नियतकालिकं हींच तें कार्य करितात असं मानणं भाग आहे. पण मी मांडिलेला एक मुद्दा तुम्हांला नाकारतां आला नाहीं व येणारही नाहीं. कांहीं अपवादादाखल उदाहरणं वजा करून बाकीचे सर्व प्रकाशक आपल्या धंद्याचा हिशेब करतांना, खर्चाकडची बाजू मांडतानां, लेखकांच्या मोबदल्याकडे अजीबात डोळेझांक करीत असतात हें गैर आहे. "

" हें पहा भाईसाहेब, तो प्रश्नच जरासा तेढा आहे. लेखक तेवढे सगळे स्वच्छ आहेत, असंहि कुणाला छातीठोकपणं म्हणतां येणार नाहीं. निव्वळ प्रमाणच पहायचं असेल, तर प्रकाशकांत लेखकांना मोबदल्याची टाळटाळ करणारे लोक जास्त आढळतील कदाचित्—"

" अहो तुम्हांला तें नाकारतां येणारच नाहीं. तुम्ही निव्वळ धंदेवाले संपादक नव्हे, तर लेखक होऊन संपादक झालां आहांत तेव्हां तुम्हांला या गोष्टीचा अनुभव आलेलाच आहे." भाईसाहेब विजयोत्साहानें म्हणाले.

" तसं नव्हे तें, त्यांना नाइलाजानं तसं करावं लागतं. त्या धंद्यांत पडावं तेव्हांच त्यांतील सुखदुःखं समजतील. नियतकालिक प्रथम नाव-

नेच्या आणि हौसेच्या भरांत सुरू केल्यानंतर आश्रयदात्यांची वाण पडली असतां, जेव्हां खर्चाचीं चोहोंकडून येणारीं बिलं भंडावून सोडतात, आणि परतून आलेल्या व्ही.पीं.चा ढिगारा पर्वतासारखा पडतो, कित्येक महिने नियतकालिक सुरू ठेवून जेव्हां वर्गणी देतांना वाचक बेमुर्वतपणं व्ही. पी. परत करतो, तेव्हां प्रकाशकानं तरी काय करावं ? वाचकांच्या नादानपणाचे हे परिणाम आहेत. तसेंच जाहिरातवाले वर्षांचीं वर्षं जाहिरात छापवून घेऊन आणि पैसे देण्याचीं नुसतीं आश्वासनं देऊन जेव्हां पैसे शेवटीं देण्याचं नाकारतात, तेव्हां प्रकाशकाचे डोळे कसे पांढरे होतात तें उघड्या डोळ्यांनीं कुणीतरी पाहिलं पाहिजे. त्याशिवाय तुमची खात्री नाहीं व्हायची. तेव्हां आतां तुम्हीच विचार करा, कुणाची फसवणूक कोण करतो ? वाचक कीं प्रकाशक ? ”

“ कबूल ! पण मी असं विचारतों, कुठले वाचक शिष्टमंडळ घेऊन त्या प्रकाशकाकडे नियतकालिक सुरू करावयास गेलेले असतात हो ? आपल्या हौसेकरितां धंदा सुरू केला असेल, तर त्या हौसेसाठीं इतरांचे कां बळी घेतां ? बुद्धीचं भांडवल नाहीं, विद्वत्ता नाहीं, विपुल पैसा नाहीं, तर संपादक—पदवीच्या लोभानं हपापलेले हे लोक नियतकालिक सुरू करण्याच्या फंदांत पडतात तरी कशाला झक् मारायला ? अहो मला हा अनुभव आला नसता. पण माझ्या कौटुंबिक परिस्थितीमुळं मला लोक-हिताच्या कामाला घरचा पैसा खर्च करावयास मिळत नाहीं, म्हणून मला लेखनव्यवसायाचा अवलंब करावा लागला, आणि म्हणूनच मला प्रकाशकांचीं हीं कर्मं समजलीं. सुदैवानं इंग्रजी नियतकालिकांचा मला पाठिंबा आहे. म्हणून माझ्या ह्या चळवळी मी इथवर चालवूं शकलों. नाहीं तर, मला हें ग्रामोद्धाराचं कार्य चालविणं शक्यच झालं नसतं, आणि आतां तरी तीच पंचाईत आहे. येशाप्पाच्या घरावर हकनाक जप्ती येणार आहे. त्याचं घरदार सोडविण्याकरितां मला आतां या घट-केला पांचशें रुपयांची जरूर आहे. तुमच्याशीं मी आतां बोलत आहें, पण इथून उठल्यावर झोंपण्यापूर्वी मला पांच तरी ताव लिहिलेच पाहि-जेत. मी श्रीमंत दिसतों एवढ्याचकरितां तुम्ही मला सध्यां मोबदला

मागूं नका म्हणून पत्र लिहिलं होतं ना ? माझी श्रीमंती आणि माझे व्यवसाय आतां कळले ना तुम्हांला ? "

" याच पाहुणचाराला आम्हांला बोलावलं होतं वाटतं एवढं आग्रहाचं आमंत्रण देऊन ? "

" माफ करा. परकीपणा असता तर मी मनाचे उमाळे हे तुमच्यासमोर मांडले नसते. मी हें बोललों म्हणून माझे लेख मी तुमच्याकडे पूर्वीप्रमाणंच सवडीनुसार पाठवीत राहीन. तुम्ही मला वादांत कमी जास्त बोललांत, तरी त्याचं मला कांहींच वाटणार नाहीं. कारण आपणा दोघांत तसा परकीपणा आहे का ? पण तुम्ही प्रकाशकाचा धंदा पतकरला असतां, लेखकाचें हृदय तुम्हांला कळणं अवश्य आहे असं मला वाटलं, आणि सगळ्या संपादकवर्गावरील राग मी तुमच्यावर काढला, एवढंच. जातों आतां. झोपा. मला अझूनही थोडं काम करायचं आहे. "

असें म्हणून भाईसाहेब गेले. त्यांनीं आपल्या बिछान्याकडे जाऊन दिवा जरा मोठा केला. कांहीं लेखन केलें. नंतर खिशांतून एक फोटो काढून त्याला नमस्कार केला. त्यानंतर दुसरा एक फोटो काढून त्याच्याकडे पहात ते बराच वेळ राहिले. त्यांचा चेहरा चिंताक्रांत दिसत होता.

नंतर तोंडानें कांहींतरी ईशचिंतनात्मक श्लोक म्हणून ते झोंपीं गेले.

कांहीं वेळापूर्वीं नानासाहेब व वासंती दाजीसाहेबांकडे जावयास निघालीं होतीं. घर जवळ आल्यानंतर त्यांनीं स्वयंसेवकास परत जावयास सांगितलें. त्याची गरज तिकडे असणार हें त्यांना ठाऊक होतें व स्वयंसेवकदेखील मागें परतून जाण्यास फार उत्सुक होता.

खळ्यांत गेल्यावर पायऱ्यांवर चढून दारावर ठुकठुक करून नानासाहेबांनीं पाहिलं. गडी तिथें निजला असला तर तो उठून आपणाला कडी काढील अशी त्यांची अटकळ होती पण कडी काढली गेली नाहीं. म्हणून तिथें त्यांना वाट पहात उभें रहावें लागलें.

" मी मुळींच ऐकायची नाहीं ! ऊं हूं ! " स्त्रीचा आवाज ऐकूं आला.

" असं काय बरं ? " मनधरणीचा पुरुषाचा स्वर.

" मी सांगतें तसं झालंच पाहिजे आधीं. "

" अग पण त्याचा विचार केला पाहिजे ना ? "

" विचार बिचार काय मला ठाऊक नाहीं. मी म्हणतें तसं झालंच पाहिजे. "

" बरं उद्यां पाठवितों वीस रुपये मनीऑर्डरीनं मुंबईला. "

" वीसच ? पन्नास ! "

" बरं पन्नास. "

" पण तो कागद कधीं करणार ? "

" हे बघ तूं आतां फारच अटी घालूं लागलीस हं ! "

" तें कांहीं नाहीं ! "

" इतकी निष्ठुर कशी तूं ? माझ्या मुलाबरोबर मी व्यवहार देखील सोडला. तुझ्या सांगण्याप्रमाणं वागूं लागलों. तरी देखील तूं मला अशी छळतेस ! "

" ठाऊक आहे. कुळांना लावणचिठ्या करून देऊन मुलगा इष्टेट उधळायला लागला, म्हणून त्याच्याशीं व्यवहार सोडला. तो कांहीं माझ्याकरतां नव्हे. माझ्याकरितां कांहीं नाहीं केलं. हें इंग्रजसरकार सगळे कायदे करतं. पण आमच्यासारख्या बायकांच्या रक्षणाचं कांहींच करीत नाहीं कसं कुणास ठाऊक ! मी म्हणतें तसं झालंच पाहिजे. होय म्हणा आधीं. मी छळतें नाहीं का ? पाय रगडतें, डोकीला तेल चोळतं. घरकाम, सगळी सेवाचाकरी करतें तो मार्ग छळच झाला वाटतं ! वाईगऽऽबाई !...... "

" बरं आतां तंटा नको उद्यां जातों वकिलाकडे...... "

नानासाहेब उभे असलेल्या जागीच स्तंभित झाले. वासंतीला परमाश्चर्य वाटलें.

त्यांनीं दार ठोठावलें व हांक मारली. तेव्हां गडी बगांनूनच कुट्टनसा दुरून आला. तो यावयाच्या पूर्वीं दोनतीनदां दारांच्या कड्या वाजल्या. त्याला खोलींत तर घातला नव्हता ना ! त्यानें मग कडी काढून पाहुण्यांस आंत घेतलें.

# १०: वासंतीच्या मनाचीं आंदोलनें.

आतापर्यंत जो जो प्रकार घडला तो पाहून व ऐकून नानासाहेबांचा घरून निघतांनाचा संकल्प पार बदलला. पण त्यामुळें त्यांच्या मनाला समाधान झालें नाहीं. उलट त्यांना जास्तच काळजी वाटूं लागली. वासंती व भाईसाहेब यांचें लग्न व्हावें अशी नानासाहेबांची इच्छा होती. वासंतीच्या मनांत तसें एकदां आलेंही होतें व म्हणून तिनें नानासाहेबांकडे आपली नापसंती व्यक्त केली नव्हती. भाईसाहेबांचें लेखन व कीर्ति तिच्याही कानीं गेलीं होती. भाईसाहेबांचें तिला सहभोजन संमेलनास येण्याविषयीं पत्र गेलें तेव्हां ती नानासाहेबांसह यावयास निघाली. तिची विलासलोलुपता सर्वांस ठाऊक होती. पण त्याहूनहि तिच्या स्वभावांतली चंचलता विशेष प्रसिद्ध होती. भाईसाहेब गरीबगुरीबांत कसे मिसळून वागतात व किती साधेपणानें राहतात, हें पाहिल्यावर तिला त्यांच्याबद्दल एक प्रकारचा तिटकाराच उत्पन्न झाला. तिचीं उदार मतें कितीही असलीं तरी स्वतःच्या चैनीला आळा घालण्याची तिची तयारी नव्हती. आंबेखोलास उतरण्याच्या वेळेलाच जो तिचा थोडासा मानभंग झाला, त्याच क्षणापासून तिचें भाईसाहेबांविषयीं प्रतिकूल मत बनत चाललें. पुढें वसंतरावांची भेट होतांच त्यांच्याबद्दल तिच्या मनांत विलक्षण आकर्षण उत्पन्न झालें. भाईसाहेबांपेक्षां वसंतरावांची कर्तबगारी व सामाजिक दर्जा तिला शतपटीनें अधिक योग्यतेचा वाटला.

रात्रौ दाजीसाहेबांच्या घरीं आल्यावेळीं घडलेल्या प्रकारामुळें उभयपक्षांना एकमेकाविषयीं संकोच वाटूं लागला होता. पण जणूं काय आपण कांहीं ऐकलेंच नाहीं, अशा आविर्भावानें नानासाहेबांनीं बोलण्याचालण्यास सुरवात केली. दाजीसाहेबांनांही कांहीं झालें तरी तसेंच वागणें

भाग होतें. दोघेही आपल्या व्यावसायिक गप्पागोष्टींत गढून गेले. पण वासंतीला वेळ घालविण्याला कांहींच साधन नव्हतें.

आधीं तिला निजून उठायलाच उशीर लागला. रात्रौ बरेंच जाग्रण झालें होतें. निजल्यावर देखील निरनिराळ्या विचारांनीं तिच्या हृदयांत नुसता कल्लोळ उडवून दिला होता. त्यामुळें तिला डोळा लागावयास बराच वेळ वाट पहावी लागली. आणखी कांहींतरी बोलणें ऐकूं येईल असें तिला बिछान्यावर पडतांना वाटलें होतें. पण तसें तिला कांहींच ऐकूं आलें नाहीं.

सकाळचे सात वाजले. शेजारच्या खोलींतून नानासाहेब उठून प्रातर्विधीकरितां खालीं गेले. तिला कसलीच दाद नव्हती. भाईसाहेब आपल्या मित्रां-पाहुण्यांकरितां जी खोली देत असत त्याच खोलींत एका कॉटवर बिछाना घालून गड्यानें वासंतीस दिला होता. गांवांतील गुण-गुण गड्यालाही ठाऊक होती. दाजीसाहेबांस हा संबंध इष्ट वाटत होता. वासंती आपली धनीण होणार या आपुलकीनें त्यानें बिछाना घालून देणें वगैरे सरबराई चालविली होती. मालकिणीकडे वागावें तशी त्या गड्याची वागण्याची पद्धत वासंतीच्याहि लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं.

ती कॉट ज्या खोलींत होती तिला उजवीकडच्या बाजूस एक खिडकी होती. ती खिडकी पूर्व दिशेला होती. आठ वाजण्याच्या सुमारास सूर्याचे किरण खिडकीवाटे आंत आले. खिडकीला पडदा असल्यामुळें वासंतीनें ती रात्रीं उघडीच टाकिली होती.

सूर्य क्षितिजावर आला तेव्हां किरण डावीकडच्या भिंतीवर वरच्या बाजूस पडले होते. पण तो वरवर जाऊं लागला तसतसे ते खालीं खालीं उतरूं लागले व शेवटीं तेथें लावलेल्या फोटोच्या कांचेवर पडून परावर्तित झाले.

पक्ष्यांची किलबिल, गुरांना गोठ्यांतून बाहेर काढून राखण्याच्या हवालीं करण्याच्या वेळचा "हैक्, हैक्" असा आवाज, बाहेर चरावयास जाण्याची उत्सुकता दर्शविणारा गाईचा "हम्मा" ध्वनि, अथवा झोंप पुरी झालेली असल्यामुळें झालेली उठण्याची वेळ, किंवा ते

अस्पष्टपणें परावर्तित झालेले प्रकाशकिरण, हीं सर्व एकत्र मिळाल्यामुळें किंवा यांपैकीं कोणत्याही एका प्रमुख कारणामुळें असो, पण वासंतीला जाग येऊं लागली.

तिनें डोळे किलकिले उघडले. तिची नजर समोर होती. तिनें पुन्हा डोळे झांकले. कालचे देखावे पुन्हा नजरेवरून फिरूं लागले. भाईसाहेबांनीं आपल्याला उचलून धरलें व शुद्धीवर आणलें. वसंतरावांनीं डोकीस बाम चोळला. वसंतरावांची ती विलासी व छानछोकी वृत्ति. भाईसाहेबांची बेमुर्वतीची व सरळ वृत्ति. वसंतरावांची पोषाखांतील टापटीप आणि नीटनेटकेपणा, भाईसाहेबांचा त्या बाबतींतला निष्काळजीपणा. वसंतरावांचा संपादकीय लौकिक व अर्थोत्पादनाची कर्तबगारी, भाईसाहेबांची अर्थोत्पादनांतील संन्यस्त वृत्ति. दोन चित्रांची तुलना करीत असतां वसंतरावांचा उठावदारपणा तिच्या नजरेंत भरूं लागला. आणि इतक्याच वेळीं नेमकी तिची दृष्टि डावीकडच्या भिंतीवरील फोटोकडे गेली. त्या फोटोवरूनच परावर्तित झालेला प्रकाश तिच्या डोळ्यावर आला होता.

भाईसाहेबांचा तो फोटो कॉलेजमध्यें असतांनाचा होता. कॉलेज, स्टूडंटच्या पोषाखांत त्यांचा त्यावेळचा फोटो वसंतरावांच्या चित्राहूनही उठावदार दिसूं लागला. भाईसाहेबांचें विशाल मस्तक व पाणीदार डोळे, मजबूत देहयष्टि, बुद्धिमत्तानिदर्शक चेहरा, बसण्याची ऐटदार ढब, सर्व कांहीं मनांत भरण्यासारखें होतें.

दोघांचे पोषाख जर सारखेच असले तर भाईसाहेबच जास्त रुबाबदार दिसतात. तर मग काल ते वसंतरावांसमोर कमी मोहक कां दिसले! पोषाख खादीचा अगदीं साधासुधा म्हणून, कीं टापटिपीचा निष्काळजीपणा म्हणून ! कदाचित् दोहोंच्याहीमुळें असेल.

इतकी संपत्ति असतांना, इतकी विद्वता पदरीं असतांना नोकरीच्या पाठीमागें न लागतां हा तरुण ग्रामोद्धारासाठीं झटतो हें केवढें उदात्त ध्येय!

वासंतीच्या मनाचा काटा भाईसाहेबांकडे झुकूं लागला. खरोखर आपण अविचार तर करीत नाहीं ना ! आपण आपल्या हालचालींनीं अथवा

अंगविक्षेपांनीं काल वसंतरावांला कितपत उत्तेजित व भाईसाहेबांना कितपत निराश केलें असेल बर! आपला विचार बदलणें शक्यतेच्या कोटीच्या बाहेर तर गेलें नाहीं ना?

आपल्याला तोलून धरलें असतांना भाईसाहेबांचा चेहरा किती घाबरलेला व कोमल दिसला! वसंतरावांच्या नजरेंत कशी कामुकतेची मादकता होती! तिचा कांहींच निश्चय होईना. तिनें आपल्या दोन्ही हातांचीं बोटें आपल्या दोन्ही डोळ्यांवरून फिरवलीं व आंथरुणांतच ती उठून बसली. तिनें सभोंवार पाहिलें. तो बंगला, त्याच्या बाहेरील ती बाग. तें परडें, तीं शेतें, त्या नारळी पोफळीच्या बागाईत जमिनी, ती कलमांची बाग, ती बैलराहाटाची विहीर, मनांत आणलें तर आपण या एवढ्या मालमत्तेच्या मालकीण होऊं. वसंतराव कुटलें तर इंदूरकडच्या बाजूचे. मुंबईत त्यांचें काय असेल कोणास ठाऊक! आपल्या बापाची इस्टेट ती आपलीच आहे आणि त्यांत आणखीही भर. आपल्याला हवी तेवढी चैन करावयास मिळेल. आपल्याला कसलीच उणीव पडणार नाहीं.

पायाखालच्या बाजूच्या भिंतीला असलेल्या खुंटीला भाईसाहेबांचा एक सदरा लोंबत होता. त्यावर तिची दृष्टि जातांच तिच्या विचारांची दिशा पालटली.

भाईसाहेब म्हणजे आंबेखोलचा छोटासा गांधीच. त्याच्याबरोबर आयुष्य कंठण्यांत कसलें सुख मिळणार आहे? त्यानें आपलें आयुष्य खेडुतांच्या उद्धाराकरितां वाहिलेलें. बापाची मालमत्ता तो संपुष्टांत हां हां म्हणतां आणील.

तेंही सोडा. पण गांवांत जें भाईसाहेबांच्या नांवाबरोबर हिराचें नांव घेतात, त्याचें काय? खरेंच हें एक आहेच आणखी गौडबंगाल! ही हिरा कोण! आणि भाईसाहेबांशीं तिचा संबंध काय!

कांहीं का असेना. कॉलेजहून आपण सुटी व्हायच्या आधीं येणार हें लक्षांत ठेवून आपणाला आदरानें भाईसाहेबांनीं मुद्दाम पत्र पाठवून बोलावलें नाहीं काय! त्यांच्या हृदयांत आपणाला जागा असल्यावांचून का त्यांनीं तसें केलें असेल! आणि खरोखरच ते आपल्यावर प्रेम करीत असले तर!

पण रात्रीं कानांत पडलेल्या प्रकाराचा उलगडा कसा करावयाचा ? दाजीसाहेब भाईसाहेबांशीं जन्मभर उलटच वागणार असले आणि आपल्या इस्टेटीची हवी तशी विल्हेवाट लावून टाकणार असले तर ? म्हणजे मग इकडील संपत्ति नाहींशी झाल्यासारखीच; आणि सासरची कांहीं मिळेल ती देखील ग्रामोद्धारांत फुंकून टाकतील ! शेवटीं कांहींच नाहीं ! संन्यासी !

वासंतीच्या मनाचा कोणताच निश्चय होईना. पण शेवटीं तिला त्या क्षणीं तरी वसंतरावच बरे वाटले.

इतक्यांत गड्यानें तिची टुथपेस्टची ट्यूब, साबण, गरमपाणी वगैरे सर्व वस्तु तिच्या समोरील टेबलावर आणून ठेवल्या. आधीं त्यानें वाकून पाहिलेंच होतें. तिला आपण त्या घराची स्वामिनी आहों, असें पुन्हां वाटूं लागलें. तिचें चित्त प्रसन्न झालें होतें. आपल्या केंसाचा शेपटा तिनें उजव्या हातांत घेतला होता. आंथरुणांतून निजून उठणाऱ्या तरुणीचें चित्र रेखाटूं इच्छिणाऱ्या चित्रकारास तें एक सुंदर मॉडेल होतें. तिच्या मुखावर पडलेल्या परावर्तित विरल प्रकाशामुळें तिच्या चेहऱ्यावरील मोहकतेंत विलक्षण जादू भरली होती. एरवीं तिचें सौंदर्य कसेंही असो, पण यावेळीं तिच्या सौंदर्यांत कोणाही पुरुषाचें देहभान हरण करण्याचें सामर्थ्य होतें.

गड्याला हांक मारून तिनें आपली बॅगच आणून द्यावयास सांगितलें. तिचें जुजबी प्रसाधन–साहित्य बरोबर घेतलेलें त्या बॅगेंतच होतें. आरशांत पाहून तिनें एकदा केंसांवरून हात फिरविला. नंतर मुखमार्जन करून केंस आवरले. यावेळीं तिला चहाची आवश्यकता भासत होती मनांतून. पण परकें ठिकाण. मोरी दाखवायला गडी आला होता तो अद्याप तिथेंच कांहीं काम करीत राहिला होता. त्याच्याकडे तिनें एकवार पाहिलें. तो गडी फारच चाणाक्ष होता. त्याची भक्ति दाजीसाहेबांच्याहीपेक्षां भाईसाहेबांवरच अधिक होती.

दाजीसाहेबांनीं पहांटेसच एक ब्राह्मण घरांत आणविण्याची व्यवस्था केली होती. पाहुण्यांच्या करितां ही खास व्यवस्था होती. सर्व साधा-

रणपणें पाहूं गेल्यास पाहुण्यांच्या नशिबाला इतकी बरदास्त कधींच याव-याची नाहीं दाजीसाहेबांच्या घरीं. पण आजचा बेत कांहीं निराळाच होता. मावशीला तिकडे खूष ठेवायची ती ठेवून, मुलाला इकडे शहरांत ठेवायचा तो ठेवून, आपल्या फायद्याचीं व्यावहारिक तंत्रें सांभाळण्याची कुशलता दाजीसाहेबांच्या आंगीं होती आणि आपली भावी धनीण कोणत्या प्रकारची असावी, याचा पुरता अंदाज गड्यानें केलेला होता. कारण तो जेव्हां ब्राम्हणाकडून चहा घेऊन माडीवर गेला, तेव्हां वासंती चकितच झाली. दाजीसाहेबांच्या घरांत सकाळींच चहाचा बेत कधीं होत असो कीं नसो, पण वासंतीला मात्र मिळाला खरा आज.

चहा झाल्यावर वासंती माडीवरील इतर खोल्या पाहूं लागली. पण गड्यानें आधींच म्हटलें—

" ती भाईसाहेबांची खोली ! "

" असं का ? पण कुलूप आहे वाटतं तिला ? "

" पण ह्या आयल्या खोलयेच्या खिडकेंतून गावता बगुंक " त्यानें म्हटलें.

" हो का ? " असें म्हणून ती त्या खिडकींतून आंत पाहूं लागली. समोरच तिला एक पुस्तकांचें शेल्फ दिसलें. त्यावरील पुस्तकें अर्थशास्त्र, चरित्रें, शेतकी व बागाईत, शिक्षणशास्त्र, राजकारण वगैरे विषयांचीं असून शिवाय नाट्य, कादंबरी, लघुकथा, निबंध वगैरे वाङ्मयीन विष-यांवरीलही पुस्तकें त्यांत होती. त्यांचें लिहिण्याचें टेबल बरेंचसें अव्यवस्थित असून त्यावर लिहून टाकलेले पुष्कळसे कागद होते. कोणतें तरी पुस्तक लिहावयास त्यांनीं घेतलें असावें. एका कोनांत मुद्गलांची जोडी होती व खुंटीला स्प्रिंग डंबेल्सही होते. टेबलाच्यावर भिंतीवर शेषशायी विष्णूचा फोटो लावलेला होता.

दुसऱ्या बाजूस त्यांचा स्वतःचा उघड्या आंगाचा फोटो होता. तो रोजची मेहनत करण्याच्या वेळचा लंगोट कसलेला व मुद्गलांची जोडी फिरवीत असतानांचा होता. हा फोटो अलीकडचा होता. त्यांच्या अंगकांतीचें तेज अगदीं खुलून दिसत होते. ती मर्दानी भव्य मूर्ति

मोहिनी घालणारीच होती. त्यांची ती भरदार छाती, तें विशाल मस्तक, ते पिळदार दंड ! खरा वीर पुरुष दिसत होता तो. त्याच्यापुढें वसंतराव म्हणजे कःपदार्थ ! वासंतीचें मन पुनः डळमळूं लागलें.

खिडकीवरच आंतील बाजूला एक नोटबुक पडलें होतें. ती त्यांची जुनी डायरी होती. आंत हात घालून ती बोटांनीं बाहेर काढतां आली असती. तिनें आजूबाजूस पाहिलें. गडी खालीं गेला होता. डायरी वाचणें गैर आहे. तिनें आपलें मन आवरलें.

पण हात गेलाच आंत. रोजनिशी बाहेर आली. तिनें ती उघडली. एक विशिष्ट पान उघडून उघडून फार पेंचकटलें असावें. ती सहज जरी हातांत धरली तरी वारंवार तेंच पान उघडूं लागे. तेंच पान मालकानें हल्लीं पुष्कळदां उघडलें असावें.

डायरी गुदस्त सालची ! काय बरें असेल त्या पानांत ?

" वासंतीचें पत्र वाचलें. तिचें प्रेम खरोखरच आहे का माझ्यावर ? तर मग कॉलेजांत बोलतात तें काय ? ती रोज फिरावयास ××× बरोबर कां जाते ? त्याच्यावर प्रेम असलें तर मला हें असें पत्र कां ! वासंतीचें प्रेम माझ्यावर आज आहे असें मानलें, तरी तें अचल असेल काय ? प्रत्यक्ष परिचय आमच्या गांवीं, शक्य तर आमच्या घरीं आणून करून घेईपर्यंत व माझ्या कार्याला तिची सहानुभूति आहे कीं काय हें समजून घेईपर्यंत मनाला अलिप्त ठेवलें पाहिजे........."

तिनें ती डायरी जिथल्या तिथें ठेवली. ती लगेच ज्या खोलींत झोंपली होती, त्या खोलींत जाऊन आंथरुणावर पडली.

कांहीं वेळानें दोघांतिघांचीं जिन्यांत पावलें वाजलीं. तेव्हां ती जी अस्ताव्यस्त पडली होती ती उठली. व्यवस्थितपणें उठून बसली. पण त्यापूर्वी दूर अंतरावरील लहान मुलाची किंकाळी ऐकून ती खिडकींतून बसल्या जागेवरूनच पाहूं लागली.

## ११ : मावशीनें आग फुंकरली!

वासंती खोलींत जाऊन विचार करीत असतां एका लहान मुलाची किंकाळी तिला ऐकूं आली. पण ती एकेरी किंकाळी नव्हती. कोणी तरी आठ नऊ वर्षांच्या मुलाला मारीत होतें व मूल सारखें ओरडत होतें. बऱ्याच दूर अंतरावर हा प्रकार घडत होता. तिला तो देखावा डोळ्यांनीं दिसत होता, पण बोलणें मात्र स्पष्टपणें ऐकूं येत नव्हतें.

कांहीं वेळानें एक चाळीस पन्नास वर्षांचा शेतकरी आपल्या आठ नऊ वर्षांच्या मुलांच्या बचकुटांस धरून त्याला रस्त्यावर फरफटीत ओढीत नेत होता. तो मुलगा अस्ताव्यस्तपणें लोळण घेत जात असतां त्याचें आंग खरचटत होतें. केंस विसकटले होते, टोपी नव्हतीच मुळीं! फाटलेल्या कोटाच्या आणखी अधिकच चिंधड्या उडत होत्या. काटे-वाहीची पाटी मधांशीच पडली होती. पण त्याला ओढणाऱ्यास त्याची दया येत नव्हती.

तो मुलगा सकाळीं शाळेस जाण्याच्यावेळीं निजून राहिला. त्याची आई शेतांत भात कापावयास गेली होती. बाप आतां कामास जाणार होता. थोरल्या मुलाला गुरांबरोबर पाठविला होता. तो राखणाच झाला होता. आईबापांस शेतीकामांत मदत करणें त्याला भाग होतें. त्याच्यावर ती नैसर्गिक जन्मजात जबाबदारी होती. धाकट्या मुलाला देखील कामाला घरींच ठेवावयाचें त्याच्या बापाच्या मनांत वारंवार येई. पण भाई-साहेबांनीं व त्यांच्या सल्ल्यावरून शाळाशिक्षकांनीं जो त्याला उपदेश व आग्रह केला होता, त्याला मान देण्यासाठीं त्यानें ह्या धाकट्या मुलास शाळेंत पाठविण्याचें कबूल केलें होतें.

आज किती दिवस तरी त्यानें आपल्या आईबापांजवळ हट्ट धरला होता. आईबापांनीं वेळ घालविण्याकरितां होय होय म्हणून त्याला शाळेस घालवावा. असें कित्येक दिवस चाललें. पण वडील माणसें खोटें बोलतात असें त्याच्या बालमनानें घेतलें.

आज बाप त्याला उठवावयास गेला, तेव्हां त्या मुलानें सहज म्हटलें, " बाबा तुमि खोटां बोलतास. माकां आदीं जरीची टोपी होई. नायतर मियां साळेक जावंचय नाय ! "

एवढ्यानेंच बापाला राग आला होता.

" उठ आधीं, तोंड धू, मारख्या राखोंडी लावून तोंड धू, आनि बरे गजालिन् साळेक जा. नायतर कुळे फोडून उडयन ! " बापानें दम भरला.

सुभेदारांच्या गजाननासारखी जरीची टोपी हा मुलगा कितीतरी दिवस मागत होता. पण जरीची टोपी मुलाला देणें बापाला शक्यतेच्या कोटींतील नव्हतें. शेवटीं बापानें सांगितलें कीं सुभेदारांसारखी आपली श्रीमती नाहीं आणि आपणाला टोपी देतां येणार नाहीं.

मुलानें हट्ट घेतला.

" खोटा किंत्या बोल्लात तर ? माकां मातर टोपी दितंय म्हूण सांगलात, खोटां बोल्लात ! " म्हणून मुलानें रडण्यास सुरवात केली बापास चीड आली.

सुभेदाराला पेन्शन मिळतें. त्याचे मुलगे नोकरीला आहेत. जरीच्या टोपीवाल्या मुलाचा बाप कराचीच्या गिरणींत चाकरमानी–टाइमकीपर– आहे. सुरबाजी सुभेदाराचा जमीनजुमला शेतीभाती खूप उत्पन्न आहे. त्याला उंची कपडे वापरतां येतात, तसे आपल्यासारख्या गरीबांला मिळायचे नाहींत, वगैरे खूप गोष्टी त्या शेतकऱ्यानें राग आला असतांही सांगून पाहिल्या. मुलाचें समाधान झालें नाहीं. बापानें मुलाला झोडायला सुरवात केली !

बाप मुलाला फरफरटीत नेत असतां, त्या वाटेनें भाईसाहेब व वसंतराव येत होते. ते तिथें उभे राहिले. ते त्या शेतकऱ्याशीं कांहीं तरी

बोलत होते. वासंतीला खिडकींतून हें दिसत होतें, पण बोलणें काय झालें तें ऐकूं येत नव्हतें.

त्या मुलाच्या हातांत कांहींतरी वस्तु देऊन भाईसाहेबांनीं प्रथम मुलाची समजूत केली. नंतर त्यांनीं बापाचें समाधान केलें. बापलेकांची जोडी शाळेच्या वाटेनें निघून गेली. वसंतराव–भाईसाहेबांची जोडी घराकडे येऊं लागली. भाईसाहेब श्रीमंत खरे, पण त्यांना पैशाची निकड कां भासते, याची कल्पना वसंतरावांना अधिकाधिक येऊं लागली.

त्या दोघांची ती जोडी जवळ जवळ येऊं लागली. ते कसल्या तरी वादविवादांत रंगून गेले होते. त्यांचें लक्ष दुसरीकडे नव्हतें. पण वासंती त्या दोघांकडे खिडकींतून बघीत होती. ती त्यांची तुलना करीत होती.

ते जसजसे जवळ येऊं लागले. तसतसे त्यांचें बोलणें अधिक स्पष्टपणें वासंतीला ऐकूं येऊं लागलें. तिनें आधीं सरकलेला खिडकीचा पडदा साफ ओढून घेतला. आतां त्यांनीं खिडकीकडे पाहिले असतें तरी त्या पड-द्याच्या आंतील वासंतीचा मुखचंद्र त्यांना दिसला नसता.

"पाहिलंत ना? वेळीं अवेळीं ऐषआरामाचं प्रदर्शन केल्यानं गरीब जनतेच्या मनावर कसे परिणाम होतात ते?" भाईसाहेब बोलत होते.

"आणि आम्ही तरी काय तेंच म्हणतों. संपत्तीची विभागणी सारखी झाली पाहिजे ती याचकरितां," वसंतराव उत्तरले.

"तुमचं सगळंच निराळं. तुम्ही सुखवस्तु वर्गाला अजिबात उखडून टाकूं पाहतां. रशियांतला बोल्शेविझम तुम्ही हिंदुस्थानांत आणूं पाहतां. खुद्द रशियांतच या क्रांतीचा काय परिणाम झाला आहे तो तुम्ही पाहत नाहीं."

"रशियांतील क्रांति यशस्वी होत आहे. सारं जग आस्ते आस्ते रशियाचा कित्ता गिरवूं पहात आहे. आजूबाजूच्या राष्ट्रांत साम्य-वादाच्या तत्त्वांचा शिरकाव झालाच आहे. जगांतील क्रांतीच्या भरतीच्या लाटा हिंदुस्थानावर येऊन आदळल्याशिवाय राहणार नाहींत. हिमाल-याचा बंधारा त्याला आडवूं शकणार नाहीं."

"ओहो! जरा थांबा! रशियांतील क्रांतीचा विजय जगाला दिसून येऊं द्या. जगाला पारखून पाहूं द्या. मग त्याचं अनुकरण करा. पण

तोंपर्यंत सभोंवतालच्या प्रतिकूल परिस्थितींतून जें काय आपणाला करत येणं शक्य असेल, तेवढं तरी कराल का ? ”

“ काय करणार तुम्हीं ? त्या शेतकऱ्याच्या मुलाला एक जरीची टोपी घेऊन द्याल उद्यां. पण जेव्हां आंबेखोलचे दोनशें मुलगे जरीच्या टोप्या मागतील तेव्हां काय कराल ? ”

“ पण नाहीं. जरीची टोपी हें भूषण असं मानलं जाऊं नये इतकी मनाची तयारी झाली पाहिजे. संपत्तीचा उपयोग आपल्यापेक्षां कमी श्रीमंतीच्या माणसांत डामडौल मिरविण्याकरितां नव्हे असं धनिक लोकांना कळलं—उमगलं पाहिजे. धनिकांनीं व त्यांच्या मुलांनीं आपल्या तोलाच्या लोकांत वावरतांना ऐषआरामीचे पोषाख आणि दागदागिन्यांचं प्रदर्शन करावं. सार्वजनिक ठिकाणीं सार्वजनिक संस्थांत वारतांना त्यांनीं इतर लोकांसारखंच राहिलं पाहिजे. भुकेलेल्या गरीबाच्या पुढ्यांत मिष्टान्न भक्षण करीत असतां त्या भुकेलेल्या गरीबाला आपल्या तोंडाकडे पहावयास लावण्यांत पुरुषार्थ नाहीं--हिंसा भरलेली आहे. त्याला उपाय—”

“ धनिकाच्या पुढ्यांतील ताट ओढून तें भिकाऱ्याच्या पुढ्यांत ठेवणं—”

“ खात्रीनं नव्हे, ” वसंतरावांना अडवून भाईसाहेब म्हणाले.

“ तशानं भिकारी ऐदी बनेल. ऐदी भिकारी समाजाचा सत्यानाश करून टाकतील. आपल्या अन्नांत गरिबाच्या वाटणीचा घांस आहे व तो त्यास भोगवला पाहिजे—”

“ हं ! हं ! हं ! ” वसंतराव वेडावून रागानें म्हणाले, “ तुम्ही गरिबांवर दानधर्म करणार, त्याना तोंड वेंगाडावयास लावणार, त्यांना कायम गरीबींत खितपत ठेवून त्यांच्या तोंडावर भाकरीचा तुकडा टाकण्यांत कर्णाचं ऐश्वर्य मिळविणार ! नीचपणाच आहे हा ! ”

“ मला पुरतं कां बरं बोलूं दिलं नाहींत ? आपण जे श्रीमंत झालों आहोंत, ते कामकऱ्यांच्या मेहनतीच्या योगानं झालों आहोंत, म्हणून आपल्या अन्नांत गरिबांची हक्काची भागीदारी आहे असं श्रीमंतांस पटवून देण्यांत व आपण फुकाच्या दानधर्मावर न जगतां निढळाच्या

श्रमानं पोटास मिळवलं पाहिजे व श्रमाचा मोबदला धनिकांपासून हक्कानं हिसकून घेतला पाहिजे, असं श्रमजीविलोकांस पटवून देण्यांत आज हिंदुस्थानचा तरणोपाय आहे. आर्थिक प्रश्न सोडविणं आज दुष्कर असलं, तरी अशा प्रकारचा कांहीं तरी उपाय काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. रशिया स्वतंत्र आहे. त्याच्यावर परकी सत्ता नाहीं. आपल्या आर्थिक मोक्षाचे उपाय रशियन लोक मालकपणें करूं शकतात. त्यांच्या पंचवार्षिक आणि दशवार्षिक प्रचंड योजना सोडूनच द्या. पण सार्वजनिक संस्थांत वावरतांना धनिकांनीं अमुक एका विशिष्ट तऱ्हेचाच पोषाख करावा, असा तरी आपण कायदा पास करूं शकाल का ? सध्याच्या राजकीय परिस्थितींत तुम्ही कोणते कायदे पास करून घेऊं शकाल ? आणि बहुजनसमाज जोपर्यंत पुरता साक्षरही झाला नाहीं, तोपर्यंत तुमचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणंच शक्य नाहीं. ”

“ भाईसाहेब तुम्ही कोणत्या पक्षाचे आहांत हेंच मला समजत नाहीं. फार तर मवाळ असाल. तुम्हांला पाहिजे असलेल्या सुधारणांचा पहिला हप्ता तुम्हीं मिळवीपर्यंत आणखी एक हजार वर्षं तरी लोटतील. तोपर्यंत अर्जांचीं भेंडोळीं वळीत बसा. ”

“ मी कोणत्याच पक्षाचा नाहीं. मी पक्षातीत आहें. माझ्या हातून ज कांहीं कार्य घडेल, त्यावरून मी कोणत्या पक्षाचा हें लोकांनीं माझ्या पश्चात् ठरवावें. एखाद्या पक्षाचा अनुयायी म्हणवून घेऊन त्याप्रमाणें तंतोतंत आचरण न करण्यापेक्षां यथाशक्ति आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या सत्तत्त्वांचं आचरण करणंच मी अधिक महत्वाचं ठरवितों. सुधारणा राबवाव्या एक पक्ष म्हणतो, सरकारची अडवणूक करावी दुसरा पक्ष म्हणतो. कोणाचं ऐकावं, कोणाचं खरं मानावं, हें कांहीं अज्ञ जनतेस कळत नाहीं. तुम्हीं काय बोलतां त्या शब्दांचा अर्थ तरी सामान्य जनतेस कळावा ही माझी मनीषा आहे. मी कोणत्याच पक्षाचा नाहीं. सर्व समाज साक्षर झाल्याशिवाय कांहींही उपयोग व्हावयाचा नाहीं अशी माझी खात्री आहे.

तुम्हाला या गोष्टीचं महत्व पटत नाहीं काय ? ”

भाईसाहेबांनीं आर्जवानें विचारलें.

" साक्षरतेबद्दल ना ? आमचं असं आहे. आमच्या पक्षानं जो विवक्षित कार्यक्रम आंखलेला असतो, तोच सर्व शक्ति वेंचून अमलांत आणण्यास आम्ही बांधलेलें असतों. त्याच्या बाहेरच्या सुधारणा करणं इष्ट असलं तरी तरी तें पक्षघटनेच्या शिस्तीला धरून नाहीं, हे तुम्हांला समजत नाहीं असं थोडंच आहे ? "

" पण मी म्हणतों, सर्व पक्ष आपापल्या कार्यक्रमांत साक्षरताप्रसाराचा अंतर्भाव कां करीत नाहींत ? सर्व पक्षांना राष्ट्रप्रगति हें जसं साधारण ध्येय आहे तसंच साक्षरताप्रसार हें सर्वसाधारण साधन मानलं जावं त्या ध्येयसिद्धीकरिता. अहो, तुमची व्याख्यानं अधिक लोकसंख्येला ऐकूं येतील, कीं वर्तमानपत्रं अधिक लोकसंख्येला वाचतां येतील ? "

" वर्तमानपत्रं " ही कबुली द्यावयाला वसंतरावाना अभिमान वाटला.

" आणि तीं वाचणार कोण ? साक्षरताप्रसाराशिवाय सर्व व्यर्थ आहे. साक्षरताप्रसाराला आर्थिक उन्नतीचीही जोड मिळाली पाहिजे. रात्रींचा देखावा तुम्ही पाहिलाच आहे."

" महारानं वाढलं म्हणून हूल उठवून तुमच्या शत्रूंनीं गिल्ला केला तोच ना ? "

" पण त्यांत सत्य होतं. चुणचुणीत व स्वच्छ दिसणारा तो काळसांवळेला पोरगा खरोखरच महार आहे. "

" अस्सं ? "

" आश्चर्य काय वाटलं त्यांत एवढं ? "

" तो दिसत नाहीं महारसा ! "

" कुठलाही ब्राम्हण महारसा दिसेल, आणि कुठलाही महार ब्राह्मणसा दिसेल. मी फक्त ' दिसेल ' असं म्हणतों हें ध्यानांत घ्या. " भाईसाहेब ठांसून म्हणाले.

वसंतराव त्यांच्याकडे कुतुहलानें पहात त्यांचें भाषण ऐकत राहिले.

" स्वच्छतेचं महत्व पटून ती स्वच्छता राखण्यापुरती व नीटनेटके

कपडे वापरण्यापुरती आर्थिक अडचण जर भागवतां आली तर हा अस्पृश्य गणला गेलेला वर्ग आपणा सर्वांबरोबर मिसळून वागूं लागेल. त्यांच्या गरजा आपणास भागवतां यावयाच्या नाहींत, उलट आमच्या ऐश्वर्याचा दिमाख मात्र आम्हांला गरीबांत जाऊन दाखविण्याची हौस मोठी असते. ”

ते चालत असतां बोलत होते व बोलत असतां मधून मधून थांबून उभे राहत होते. उभे राहिल्यावर पांच दहा मिनिटें थबकून बोलत आणि पुन्हां चालूं लागत. आतां तर ते दोघेही घराच्या अगदीं जवळ आले होते.

“ तुमच्या बोलण्याचा रोंख माझ्या व वासंतीच्या पेहरावावर तर नाहीं ना ? ”

“ वासंतीचं कृत्य तसं घडलं खरं. तें जाणूनबुजून घडलं नसेल, पण त्याचा परिणाम व्हावयाचा तो होतोच. तिचं तें घड्याळ, ती गळ्यांतील मोत्यांची माळ, ती सोन्याची पिन्, तें तलम पातळ, हा सर्व थाट कॉलेजांत किंवा श्रीमंत समाजांत जातांना योग्यच ठरेल, पण सहभोजन संमेलनास जातांना असला श्रीमंतीचा डौल मिरवणं म्हणजे गरीबांच्या दुःखावर डागण्या देण्यासारखं आहे असं मी समजतों. जाणून व नेणून आगीवर पाय पडला तरी पायाला फोड येतोच. भपकेदार पोषाखाचं प्रदर्शन गरीब समाजासमोर घडल्यास त्याचा अनिष्ट परिणाम घडल्याशिवाय राहत नाहीं. रात्रीं काहींजणं कपडे बदलल्याशिवायच आलीं असल्यामुळें त्यांच्या आंगाकपड्यांला घामट घाण येत होती. त्यांना स्वच्छतेची माहिती मला तोंडानं देतां येते, पण हातानं कपडे पुरवितां येत नाहींत. माझ्या लेखांना योग्य मोबदला द्यायला मात्र सुखवस्तु व श्रीमंत प्रकाशकांना देखील जिववार येतं. त्यांची घामट घाण येतांच तुमच्या नाकाकडे तुमचा सेंटचा हातरुमाल गेला. पण ती घाण कां येत होती याचा विचार मनांत नसेल आला. ”

भाईसाहेब स्फूर्तीनें बोलत होते. पण माडीवरील वासंतीच्या कानांत तो वाक्प्रवाह तप्त झालेल्या तेलासारखा दाह करीत शिरत होता. तिच्या हृद-

याला असंख्य जखमा झाल्या. ती अतिशय विव्हळ झाली. दुखवलेला अभिमान, संताप आणि पश्चात्ताप यांनीं तिला घेरून टाकलें.

घराच्या दिवाणखान्यांत दाजीसाहेब आणि नानासाहेब बोलत बसले होते. दाजीसाहेब आपल्या घरसंसाराच्या गोष्टी बोलत असतां आपल्या-वर जो लोकांचा आक्षेप असल्याचें त्यांच्या कानीं आलें होतें, त्याचें निरा-करण नानासाहेबांकडे करण्याला त्यांना मिळालेल्या संधीचा ते भरपूर फायदा घेऊन आपली बाजू मांडित होते.

"तेव्हां मी हयात असतांना, माझ्या मर्जीविरुद्ध एका कुळाला भाईनं साठ वर्षांची लावणचिठ्ठी दिली, हें तुम्हांला रास्त वाटतं काय ?"

"छे! असं करूं नये त्यांनीं—" नानासाहेब दाजीसाहेबांच्या समा-धानासाठीं बोलत होते.

"काय करूं नये म्हणतां ?" भाईसाहेबांनीं पायऱ्या चढून दिवाणखा-न्यांत शिरत असतांच विचारलें. अन्याय भाईसाहेबांच्या प्रकृतीला मुळींच मानवत नसे. काकाचा तर त्यांना अतिशय संताप येत असे. वसंतरावां-बरोबर सामाजिक अन्यायांची चर्चा करीत असतां ते आधींच थोडेसें गरम झाले होते. तितक्यांत ह्या दोघां जमीनदारांची चर्चा त्यांच्या कानीं पडली-

वसंतराव व भाईसाहेब येऊन बसले. वसंतरावांनीं एक मोकळे-पणाचा श्वास सोडला. आपल्यावरील मोर्चा आतां त्या दोघां म्हाताऱ्यांवर वळणार हें त्यांना मोठेंच समाधान वाटलं. पण आल्याबरोबर वासंती नजरेस न पडल्यामुळं मात्र त्यांच्या हृदयाची चलबिचल झाली. नजर इकडे तिकडे चौफेर फिरूं लागली. यापुढं होणाऱ्या वादांत आतां आपण पक्षकार नसून तिऱ्हाईताची भूमिका घ्यायची असं त्यांनीं स्वतःच्या मनाशीं ठरवलें देखील.

"काय करूं नये म्हणतां, नानासाहेब ?" भाईसाहेबांनीं पुन्हां एकवार विचारलें.

"कुळाला साठ वर्षांची लावणचिठी तुम्ही दाजीसाहेबांच्या इच्छे-विरुद्ध करून दिली काय ?"

"होय, दिली. मग काय झालं ?" भाईसाहेबांनीं विचारलं. दाजीसाहेब

तिथून हळूच उठून घरांत गेले. नानासाहेब एकटेच राहिले तोफच्या तोंडाला. मितभाषी भाईसाहेबांना असे बोलके झालेले कधीं कोणी पाहिलें नसेल.

" संपादिलेली इस्टेट गमावून बसण्यांत पुरुषार्थ कसला ? "

" कुणी संपादली ? कशी संपादली ? टिकवणं म्हणजे काय ? टिकवण्याचे खरे उपाय कोणते ? जमिनीची स्थिति काय आहे ? कुळांची अवस्था काय झाली आहे ? कांहीं विचार ? "

" तुम्हीं गांवात येऊन कुळांची ओळख करून घेतली ती कधींपासून ! तुमचं पुस्तकी ज्ञान पुष्कळ असेल. पण आम्ही या लोकांशीं व्यवहार करण्यांत सारं आयुष्य घालविलं आहे. दाजीसाहेब व त्यांचे दिवाणजी काका आपला वसूल कसोशीनं करतात. बाकी फार थकूं देत नाहींत. थकली तर कोर्टांत दावे करून जप्त्या आणतात. म्हणून कुळं त्यांचा जनांत दुर्लौकिक व मनांत द्वेष करितात. पण निदान त्यांची बाकी तरी थकत नाहीं. आतां माझा स्वभाव तुम्ही ओळखतांना ? कुळाशीं मी कधींच करडेपणानं वागत नाहीं. सावकारीचीं कांहीं कुळं जीं त्यांचीं तींच माझीं आहेत, तसेच कांहीं भागेलीही तेच आहेत. पण त्यांच्या परिस्थितीकडे पाहून मी त्यांना सवलत देतों, तरी ते माझी बाकी थकवितात; आणि याद्या मुदतींतून घालवूं पहातात. त्यांना मी बाबाबुवा करतों. तर तेच माझ्या तोंडाला पानं पुसतात. पण तुमचे दिवाणजी काका जेव्हां वसूलदार भातेकरी पाठवितात, तेव्हां झक मारीत पैसे भरून वर भातेकऱ्याचेंही कमिशन देखील भरतात ! सांगा आतां ज्या कुळांचा तुम्ही एवढा कैवार घेतां, त्या कुळांचा हा प्रामाणिकपणा मी तुम्हांला वसंतरावांसमक्ष सिद्ध करून द्यायाला—लेखी, कागदोपत्रीं पुराव्यानिशीं सिद्ध करून द्यायला तयार आहे. अहो, काय घेऊन बसलां आहांत ग्रामोद्धार ? या कुणब्यांना गोड शब्दाची किंमत नाहीं पोटावर पाय देईल त्याचे हे पाय चाटतील. सामोपचाराचे—मायाममतेचे शब्द बोलेल, त्याला फसवतील, नाहीं तर त्याच्या आंगावर धांवतील. त्यांना चौदावं रत्नच दाखवलं पाहिजे. इमानीपणाची दुनिया राहिली नाहीं. आमचं गांव इमानपूर पण सगळे कुणबी बेइमान ! "

भाईसाहेबांना तोडीस तोड देणारें नानासाहेबांचें दणदणीत भाषण ऐकून वसंतरावांना मौज वाटली. ह्या वृद्ध–तरुण भीष्मार्जुनांचा झगडा आतां प्रेक्षणीय होणार असें त्यांना वाटूं लागलें.

" तुम्ही सांगता ती स्थिति खरी असेल, सिद्ध करून देण्याची जरूरी नाहीं. मी त्यावर भरंवसा ठेवायला तयार आहें. पण कुणबी लोक असे कां वागतात याचा आणि मनुष्यस्वभावाचा तुम्ही विचार करीत नाहीं. सत्कृत्य आणि परोपकार वायां जात नाहीं कधीं. शिक्षेच्या व कायद्याच्या भीतीनं ते जाच करणाराचं देणं फेडून टाकीत असतील मुदतींत, पण त्याचवेळीं शिव्याशापही देत असतील. तुमचं देणं वेळेवर त्यांच्याहातून फिटत नसेल, पण त्यांचीं मनं तुमचं हित चिंतीत असतात, तुमचं देणं देण्याचा त्यांचा हेतु असतो, तुम्हांला ते अंतःकरणापासून दुवा देत असतात. तुमच्या उपकारांनीं ते ओशाळे झालेले असतात. माझ्यापेक्षां तुम्हांला अनुभव जास्त आहे हें मला मान्य आहे. आणि म्हणूनच तुम्हांला विचारतों कीं, कर्जखत मुदतींतून गेलं असतांनाहि तुमचं ऋण देणारं एखादं कुळ तुम्हांला भेटलं नाहीं का आजपर्यंत ! नीट आठवण करा. "

नानासाहेबांनीं कांहीं उत्तर दिलं नाहीं. येशाप्पानेंच कित्येक वर्षांपूर्वी नानासाहेबांच्या मुदतीबाहेर गेलेल्या यादीची रक्कम व्याजासह पैन् पै दिलेली होती हें भाईसाहेबांस कळलें होतें. नानासाहेबांस गप्प बसावें लागलें.

" मी सांगतों तो नियम निरपवाद नाहीं. कांहीं लुचीं कुळं आहेतच. पण या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे नानासाहेब. कुळांकडून खंड मिळत नाहीं असं तुम्ही म्हणतां, पण पीकच जर येत नाहीं..."

" हो हो ! पीक कां येत नाहीं ? पाऊस कां आतांच खुळवला ! जमीन काय आतांच नापीक झाली ? याच कुळवाड्यांचे पूर्वज याच जमिनी पिकवीत होते ना ? "

" मग कां पीक येत नाहीं असं तुम्ही समजतां ? तुमची चिकित्सा तरी ऐकूं या ? "

" अहो हे लोक आळसावले आहेत. यांना जमिनींत मेहनत करायला नको. मेरधार धरायला नको. उत्पन्न वाढवायला नको. चोरीमारी करून काय मिळेल ते वाण्याला विकलें, मोल मजूरी करून पोट भरलं, आणि धन्याची जमीन खराब करून टाकली. पोट नाहीं भरलं, तर गेला मुंबई-कराचीला गिरणींत. जळेनात तिकडे जमिनी ! याचं काय बिघडलं ? दिल्या सोडून ! "

" बरं ! तेंही खरं मानूं या. पण अशी तरी त्यांच्या मनाची स्थिति कां व्हावी सांगा बरं ? जमिनींत पीक त्यांना वाढवायला कां नको ! जमीन जर तीच आहे, निकृष्ट झालेली नाहीं, पाऊसपाणी जर तेंच आहे, कांहीं फरक पडलेला नाहीं असं तुम्ही म्हणतां, आणि तुमचा खंड भरल्यावर उरलेलं पीक जर त्यांच्याकडेच नफा म्हणून राहणार असेल, तर त्यांना जमिनींत मेहनत करावीशी कां वाटणार नाहीं ? याचं कारण तुम्हींच आपल्या मनाशीं शोधा. "

नानासाहेब पुन्हां निरुत्तर झाले. त्यांना भाईसाहेबांनीं अगदीं चांगलाच पेंच घातला होता.

नानासाहेब बराच वेळ स्तब्ध राहिलेले पाहून भाईसाहेब स्वतःच बोलूं लागले.

" कुळांना तरी जमिनीची शाश्वती पाहिजे. तुम्ही एकसाली कबुलायती घेतां. मर्जीला येईल तेव्हां त्यांच्याकडचं भागेलपण काढून घेण्यास तुम्ही समर्थ आहांत. मग त्यानीं अधिक उत्पन्न जमिनींतून कां काढावं ? "

" पण नांवाच्या एकसाली कबुलायती असल्या तरी त्यांच्याचकडे आमच्या जमिनी चालू असतात ना ? "

" हो पण, हव्या तेव्हां तुम्ही काढून घेऊं शकतां हें कांहीं खोटं नाहीं. तसंच त्यानं लागोपाठ चारपांच वर्षं जास्त पीक काढलं, अथवा दुसरं उत्पन्न कांहीं तरी केलं, तर जादा खंड बसवूं शकतां ! जमिनींत मेहनतीनं खपण्यास त्यांना हुरूप कां यावा ? अशापासून जमिनी निकृष्ट होत चालल्या आहेत. उद्यां परकी सरकार पडद्याआड राहिलं आणि

तुमचा कारभार तुमच्या हातीं सरकारनं दिला असं आपण घटकाभर समजूं, बरं का वसंतराव, तर या देशभर निकृष्टावस्थेस पोंचलेल्या जमिनींतून तुम्ही का जादूनं उत्पन्न काढणार आहांत?" निमूट बसलेल्या वसंतरावांना वादांत भाग घेण्यास लावण्याकरितां भाईसाहेब बोलले. बराच वेळ वासंतीची जाग मात्र नाहींशी पाहून माडीवर जाण्याच्या विचारांत वसंतराव आहेत अशी शंका त्यांस आली होती कीं काय हें कांहीं खात्रीनं सांगतां येणार नाहीं. आतां वसंतरावांना मात्र मनांतून तसें वाटलें असेल कदाचित्. कारण त्यांचें मन साशंकच बनत चाललें होतें.

"कां वसंतराव? देशभक्तांनीं या गोष्टीचा विचार केला आहे काय? हिंदुस्थानच्या राजकारणांत उड्या टोकणाऱ्या कोणत्या पक्षानं या महत्वाच्या प्रश्नाचा विचार केला आहे? कळूंद्या तर खरं!"

"महात्माजींनीं या गोष्टीचा विचार केला आहे. अधिक कशाला? तुमच्या मनांत आज ज्या ह्या कल्पना घोळताहेत त्याला तरी कारण महात्माजींनी केलेली जागृतीच आहे."

"पण माहात्माजीला अनुयायी लाभले आहेत ना तुमच्यासारखे? महात्माजींच्या कांहीं गोष्टी चुकतही असतील, असं आपण क्षणभर मानूं. पण महात्माजींनीं ग्रामोद्धाराचा आणि हरिजनोद्धाराचा जो प्रश्न जनतेसमोर टाकला आहे, तो किती जणांनीं आचरणांत आणला आहे? महात्माजींचे सर्वच उपाय अव्यवहार्य आहेत काय? जे व्यवहार्य असतील ते तरी सर्वांनीं एकमतानं कां अमलांत आणूं नयेत? महात्माजींच्या चुकांचे पर्वत करून दाखवायचें आणि आपण निष्क्रिय रहायचं?"

" तर मग काय आतां तुम्ही साऱ्या कुणबाऊ लोकांस जमिनी देऊन टाकणार वंशपरंपरेनं?"

" असे एकेरीवर कां येतां? मला शेतीचे कांहीं प्रयोग करून पहायचे आहेत. मी येशाप्पाच्या घरीं पडवळांचा मंडप केला. कारण भाजीपाल्याचा मला एक प्रयोग करावयाचा होता. भाविकाला पहिलं फळ देवाला वहावंसं वाटतं. देवाला दिल्यानंतर येशाप्पानं दुसरं फळ खात्रीनं

इथं आणून दिलं असतं आणि काकालाही दिलं असतं. पण काकांनीं अधिकारानं त्याच्या दारांतलं पहिलं फळ तोडून आपल्या घरीं नेलं. गणपतीला वाहण्याची त्याची मनीषा त्यांनीं पुरी करूं दिली नाहीं. नानासाहेब विचार करा या गोष्टीचा. तुमच्याकडून भागेलपणानं केलेल्या जमिनींत पुन्हां वेल लावावा असं वाटेल का आतां त्या भागेल्याला? भागेल्याच्या जागीं तुम्हीं स्वतःला घालून पहा."

"तें खरं," नानासाहेब कबुली देत म्हणाले, "पण तुम्हांला शेतीचे प्रयोग करावयाचे असल्यास जमिनी भागेलपणांतून काढून आपल्या वहिवाटीस घ्याव्यात."

पण तसं करायला आम्हां पांढरपेशांला धमक कुठं आहे? आम्हांला जमिनींत राबायला नकोच आहे. फक्त धनीपणा पाहिजे. मी जमीन वहिवाटीला घ्यावयाची म्हणजे मजूर हाताखालीं घेऊनच वहिवाट करावयाची ना? मग भागेल्यालाच भागीला घेऊन त्याचं भागेली उर्फ भागीदार हें अभिधान सार्थ कां करूं नये? देशावर भागेल्याला रयत हा शब्द आहे तो हीनपणाचा निदर्शक आहे. कूळ हा शब्द देखील तसाच हीनत्वदर्शक आहे. पण भागेली हा शब्द समत्वदर्शक आहे. आम्ही कोंकणस्थांनीं आमच्या कुळांना भागेली हें नांव दिलं आहे. अर्थात् मूळ कल्पना समतेची होती. ती समता त्यांना पुन्हां प्राप्त करून द्यावयाचा हा माझा प्रयत्न आहे. मी आणखी एका कुळाला अशीच कांहीं थोड्या वर्षांच्या करारानं आणखी एक जमीन देणार आहे लवकरच!"

संतापव्यंजक तें दाजीसाहेबांचें खाकरणें आणि तो ठराविक पद्धतीचा हुंकार भाईसाहेबांसह सर्वांना स्पष्टपणें ऐकूं आला. आतां कांहीं तरी भयंकर स्फोट होणार असें त्यांना वाटूं लागलें.

दाजीसाहेब आंत गेल्यावर ते मावशीच्या तडाक्यांत सांपडले होते. त्यांच्यावर मावशीनें चांगलाच मंत्रप्रयोग केलेला होता.

घरांत पाहुणे मंडळी आली. त्यांच्या दिमतीकरितां घरांत स्वयंपाकी आला. घरची नोकर मंडळी वासंतीकडेच जाऊन तिला मालकिणीप्रमाणें मानूं लागलीं. लग्नाच्या गोष्टी निघाल्याच आणि तें जुळलें तर

आपणाला लवकरच चंबुगवाळें बांधावें लागणार हें जाणून अर्थात् अशा वेळीं तिला विशेष सावध राहणें भाग होतें. दाजीसाहेबांनीं मुलाशीं वाद चुकविण्याकरितां म्हणूनच आपलें अंग हळूच काढून घेतलें होतें. आपली बाजू नानासाहेब योग्य तऱ्हेनें मांडतील हें त्यांना ठाऊक होतें.

मावशीबाईंचें लक्ष घरांतल्या व्ययस्थेकडे नसून तें बाहेरील संभाषणाकडे होतें. दाजीसाहेब घरांत आल्याबरोबर त्यांनीं त्यांना गांठलें. भाईसाहेब व हिरा यांचा संबंध, बापाविरुद्ध कुळांस उठविण्याचे उपद्याप व इतर अनेक गोष्टी भडकपणें रंगवून त्यांनीं दाजीसाहेबांस उठविलें. संपत्ति उधळून टाकण्याचा भाईसाहेबांचा प्रयत्न दाजीसाहेबांस कांहीं अपरिचित नव्हता. पण आपला मुलगा आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांसमोर उघड उघड आपली निंदा करतो आहे असा समज दाजीसाहेबांचा जेव्हां झाला, तेव्हां ते जमदग्नीप्रमाणें चवताळून बाहेर आले. त्यांचा हुंकार त्यांच्या मनांतील संताप व्यक्त करीत होता.

रात्रीं आपलें खासगी बोलणें नानासाहेबांनीं ऐकलें असावें असा संशय दाजीसाहेबांस होताच. एवींतेवीं आपलीं गृहच्छिद्रें जर त्यांना कळलींच आहेत तर आतां त्यांवर झांकण घालून तरी काय उपयोग ! असें त्यांच्या मनानें घेतलें.

" ऐकलंत ना हें नानासाहेब ! तुम्ही भाग्यवान् ! " नानासाहेब नुसते दाजीसाहेबांकडे पाहतच राहिले. त्यांची मुद्रा प्रश्नचिन्हांकित झाली होती. कसे ? असा प्रश्न जणूं ते विचारीत होते.

" कारण तुमच्या वासंतीच्या मुखांतून असे शब्द तुम्हांला ऐकून घ्यायची पाळी येणार नाहीं. "

" हेंच कशाला पाहिजे ? वडिलांवर तोंडसुख घेण्याचे का थोडे थोडके विषय आहेत ? आजकालचं जग हें सुधारणेचं आहे. प्रत्येक बाबतींत सुधारणा ! जशी ग्रामसुधारणा, तशीच गृहसुधारणा, तशीच धर्मसुधारणा—सर्व सुधारणा, सुधारणा, सुधारणा ! "

" पण एक शेत कायम भागेलपणास लावणचिठीनं दिलं असतां

बाकीच्या जमिनी तरी राहतील अशी माझी समजूत होती, पण तीही खोटी ठरणार असं दिसतं एकूण हंः ! ”

एकंदर परिस्थिति भाईसाहेबांच्या तेव्हांच ध्यानांत आली. आलेल्या पाहुण्यांसमक्ष गृहकलह चेतविणें त्यांना टाळावयाचें होतें. शिवाय वडिलांस अपमानास्पद शब्दांनीं ताडणें त्यांना शक्य तों टाळावयाचें होतें. यासाठीं ते उगी राहिले.

“ मी म्हणतों हल्लींच्या पढिक तरुणांच्या आंगांत धमक असेल तर त्यांनीं एक तरी जमिनीचा तुकडा संपादन करून दाखवावा ! खरं कीं नाहीं, नानासाहेब ! इस्टेट उधळणं काय, चुटकीसरशी उधळतां येईल. वाड-वडिलांनीं आयुष्यभर खपून मिळविलेली व पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली मिळकत फुंकून टाकायला वेळ नाहीं लागणार हें आम्ही जाणतों. ते प्रयोग आम्हांला करून दाखवायला नकोत. हे यांचे शेतकीचे प्रयोग म्हणजे कुळांना फाजील करून इस्टेटी उधळून टाकण्याचे प्रयोग म्हणायचे ! हंः ! ”

एकंदरींत आंबेखोलच्या मुक्कामांत तंटे, कलहांचे प्रसंगच आपल्याला पहावे लागणार कीं काय अशी रुखरुख वसंतरावांच्या मनास लागून राहिली होती. ते माडीवर जाण्याच्या विचारांत होते. इतक्यांत पोष्टमन आला व त्यानें वसंतरावांना एक आणि भाईसाहेबांना एक अशीं दोन पत्रें दिलीं.

दोघांनीं आपापलीं पत्रें तेथल्या तेथें वांचून पाहिलीं. दोघांचेही चेहरे थोडेसे प्रफुल्लित झाले. विषण्णतेचे ढग वितळूं लागले. भाईसाहेब कलहास प्रवृत्त न झाल्यामुळें “ अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति ” या तत्त्वाप्रमाणें त्यांचा चढाईचा आवेश साध्या कुरकुरींतच विलीन झाला; आणि नानासाहेब ज्या प्रसंगाला भीत होते तो आपोआपच टळला. तो टळला म्हणून नानासाहेबांचा जीव खालीं पडला. पण तोच मावशीचा जीव चरफडूं लागला. तिच्या आंगांची लाही लाही झाली. दाजीसाहेबांस खाऊं का गिळूं असें त्यांस होऊन गेलें. भाईसाहेब घरांत ब्राह्मणाशीं पाहुण्याच्या आदरातिथ्याचा विचार करावयास गेले. नंतर त्यांना वासंतीला भेटावयाचें होतें.

वासंती शौच–स्नान वगैरे प्रातर्विधीच्या तजविजीस लागली असल्याचें त्यांना गड्याकडून समजलें. त्यांचा गडी फार खुषींत दिसत होता. भाईसाहेबांनीं मनांत म्हटलें,

" भोळा बिचारा ! "

भाईसाहेब माडीवर आपल्या खोलींत गेले व पत्र पुन: वाचूं लागले. तोच वसंतराव येऊन ते आपल्या पत्रांतील अडचणींच्या गोष्टींची खबर भाईसाहेबांस हांसत हांसत सांगूं लागले !

---

# १२ : विधवा कुमारी.

" काय बोवा ह्या अडचणी–अशा येतात ! " वसंतराव भाईसाहेबांना उद्देशून पण त्यांना हांक न मारतांच बोलत होते. त्यांच्या हातांत आतां आलेलें पत्र होतें. ते दोघेही माडीवरील आपल्या खोलींत बसले होते. " कसल्या अडचणी ? " असा प्रश्न भाईसाहेबांनीं विचारावा आणि मग आपल्याला आलेल्या पत्रांतील हकीगत आपण सांगावी असा त्यांचा इरादा होता.

अडचणीच्या मजकुरानें वसंतरावांचा चेहरा खुलतो कां म्हणून ?–अशी एक अंधुक शंका भाईसाहेबांच्या मनांत येऊन गेलीच होती. पण त्यांना आपल्या पत्रांतील आनंदकारक बातमी वाचून थोडासा हुरूप आला होता. पुढील बेत कसा जमवावा, याची जुळणी त्यांनीं आपल्या मनांत चालविलेली होती.

" ह्या फिल्म कंपनीचे लोक असे कसे हो ? " भाईसाहेबांना उत्सुकता वाढविण्याकरितां वसंतराव पुन्हां बोलले.

भाईसाहेब मनांतल्या मनांत हांसत होते. पण त्यांना वसंतरावांचा फार वेळ अंत पहाणें बरें वाटलें नाहीं.

" कुणाचं आलं पत्र—कसलं ? " त्यांनीं विचारलें.

" आमच्या फिल्म कंपनीचं. ते म्हणतात कीं लवकर मागं परतून न येतां तिकडेच एखादी सुस्वरूपशी पोरगी मिळाल्यास पहा—नव्हे, येतांना घेऊनच या. कारण कंपनींतील एक नटी कंपनी सोडून दुसऱ्या कंपनींत जाण्याच्या विचारांत आहे. ती गेल्याबरोबर दुसरी एखादी चागली नटी आम्ही इकडे पाहत आहोंत, आणि तोंपर्यंत तुम्ही आणाल तिला चागली तयार करतां येईल. तरी इतर कामांत हेंही काम लक्षांत ठेवावें. या बाबतींत त्यांनीं आमच्या मुख्य संपादकांना भेटून त्यांचीही संमति घेतली आहे." इतकें म्हणून त्यांनीं पत्रावरील नजर काढून भाईसाहेबांकडे वळविली.

" पाहिलंत ना, भाईसाहेब! अशा अडचणी असतात, ह्या फिल्म कंपन्यांना. " किंचित् त्रासिकपणा त्यांनीं बळेंच चेहऱ्यावर आणला.

आपल्याला पत्रांतील वार्तेनें वाईट वाटत नसून, वाईट वाटत आहे असें वरकरणी दाखविण्याचें सोंग वसंतरावांनीं कां आणावें हें भाईसाहेबांस समजेना. कदाचित् त्यांच्या मनांत गोव्याकडच्या बाजूस जावयाचें असेल असेंच त्यांस वाटलें.

" मग आतां तुम्हांला गोव्यांत जायचं असेल तर ? " भाईसाहेबांनीं विचारलें. काल यशवंतरावांनीं त्यांच्या दौऱ्याच्या अनिश्चितपणाबद्दल केलेलें अनुमान खरें ठरणार असें आतां भाईसाहेबांनाही वाटूं लागलें. यशवंतरावांनीं तें अनुमान कोणत्या प्रसंगावरून काढलें, याची ते आठवण करूं लागले. त्यांच्या डोक्यांत एक कल्पना आली. पण त्यांनीं ती आपल्या मनांतून धुडकावून लावली.

" तसंच कांहीं नाहीं. कदाचित् जावं लागेलहि. पण माझा दौरा थोडासा लांबवावा लागेल एवढं खरं. आजच मी मुंबईला पत्र पाठवतों. "

आपला नानासाहेबांशीं वादविवाद चालला असतां वसंतराव माडीवर

जाऊन आले होते हें भाईसाहेबांच्या लक्षांत आलें. पण ते स्वस्थच राहिले. वसंतरावांचा नक्की विचार काय आहे याचा नीट अजमास त्यांना करतां येईना.

त्यांना माडीवरच सोडून भाईसाहेब खालीं आले. वासंती न्हाणें धुणें आटोपून मागील जिन्यानें माडीवर गेली होती. मोटरींतून उतरल्यावर गांवांत येतांना आंबेखोलच्या शेतकरी बाया काय काय बोलत होत्या हें तिनें ऐकलें होतें. ती आठवण तिला झाली. तिनें आपल्या मनाशीं कसला तरी ठाम निश्चय केला.

भाईसाहेब खालीं आलेले पाहून नानासाहेब माडीवर गेले. खोलींतून वसंतराव घाईनें बाहेर आले. नानासाहेबांनीं तोंड घालून आंत पाहिलें तों, वासंती कपडे बदलून कसलेंसें पुस्तक चाळीत बसली होती.

दुपारचीं जेवणें वगैरे झाल्यावर नानासाहेब जावयास उठले. नानासाहेब वासंतीबरोबरच वसंतरावही निघाले, भाईसाहेब त्यांना पोंचवावयास स्टँड-पर्यंत जात होते. आपल्याबरोबर वसंतराव येत आहेत हें पाहून नाना-साहेबांना थोडेसें चमत्कारिक वाटलें, पण त्यांनीं तसें दिसूं दिलें नाहीं.

" आमच्या पाहुण्यांना तुम्ही घेऊन चालला वाटतं ? " भाईसाहेबांनीं शेवटीं नानासाहेबांस गमतीनें विचारलें. वसंतरावाच्या मनाचा थांग लावण्याचा त्यांचा तो प्रश्न करण्यांत एक हेतु होता.

" छे छे ! तुमच्या मनाला वाईट वाटायला लावून तुमच्या पाहुण्याला आम्हीं कशाला नेऊं ? " नानासाहेबांनीं घाईनें म्हटलें.

" आमच्या मनाला मुळींच वाईट वाटत नाहीं, " भाईसाहेबांनीं म्हटलें.

" नानासाहेबांनीं नाहीं बोलावलं तरी मला इमानपूरला एक दिवस मुक्काम करूनच मग पुढं मालवणला जायचं आहे. मी तसा यशवंतरावांना निरोप पाठविला आहे. आम्हांला प्रवाशांना काय कुठंही उतरतां येईल. "

याउपर मात्र सभ्य गृहस्थाचा बाणा राखण्याकरितां म्हणून ओळखीच्या झालेल्या पाहुण्यास स्पष्ट नकार दर्शविणं अशक्य होतं. ते म्हणाले—

" तें काय म्हणून ! भाऊसाहेबांचे स्नेही काय आमचे पाहुणे होऊं

शकत नाहींत ? आमचा परिचय नवा आहे तो तितका दृढ होईल. गांवांत कशाला ? आमच्या घरींच राहतील ते."

" नाहीं तरी वासंतीचा व त्यांचा पत्ररूपानं परिचय आहेच. वासंती 'मेदिनी'च्या लेखिका आहेत. त्यांनीं संपादकांना आमंत्रण करणं अगदीं योग्य असंच होईल.—कदाचित् केलंही असेल म्हणा—" मोटर सुटतांना सर्वांना नमस्कार करीत भाईसाहेब म्हणाले.

वासंतीला ते शब्द बरेच लागले. बॅग वगैरे सामान घेऊन बरोबर आलेल्या गड्याचें तोंड उतरलें होतें. कारण वासंतीबरोबर भाईसाहेबांच्या ऐवजीं वसंतरावांना बोलतांना त्यानें माडीवर आडून हेरलें होतें. त्याला तें कोडें उलगडत नव्हतें.

मोटर चालू झाली. भाईसाहेब परतले. त्यांना आतां हरिजनांना जमा करून मंदिरप्रवेशाच्या चढाईची तयारी करावयाची होती. त्यासाटीं हरिजनांना स्वच्छतेचे पाठ द्यावयाचे होते. त्यांना कांहीं कपडे वांटले पाहिजे होते. ह्या आठड्यांत त्यांना दोन चार मनीऑर्डरी आल्या होत्या ते सगळे मिळून पन्नास साट रुपये झाले असते. सहभोजनाचा खर्चच आधीं किती तरी झाला होता.

आज आलेलें पत्र त्यांच्या मनाला धीर देत होतें. एका फिल्म कंपनीला त्यांनीं पाठविलेलें ऐतिहासिक कथानक पसंत पडलें असून त्याबद्दल त्यांना कांहीं शेकड्यांचा मोबदला मिळावयाचा होता. पण त्यांनीं स्वतः कंपनींत कांहीं दिवस राहिलें पाहिजे अशी अट त्यांत होती. हातांतलें काम ठेवून त्यांना कोल्हापुरास सध्यां जाऊन राहणें शक्य नव्हतें. कारण दसऱ्याचा मंदिरप्रवेश व दिवाळीचा सार्वजनिक फराळ या गोष्टी त्यांना घडवून आणावयाच्या होत्या. तसेंच दसऱ्याच्या दिवशीं देवळाभोंवतालच्या बाजारांत साक्षरतावर्गांतील खेडुतांनीं केलेल्या हस्तकौशल्याच्या वस्तुप्रदर्शनांत व विक्रीकरितां मांडून आंबेखोल गांवांत घरगुती धंदे करतां येण्याजोगीं कोणतीं कच्चीं द्रव्यें आहेत हें भाईसाहेब गांवकऱ्यांना सार्वजनिक व्याख्यानाच्या रूपानें सांगणार होते. ही सर्व तयारी करावयाची

तर त्यांना गांवांतून हालतां येत नव्हतें. शिवाय त्यांचा मदतनीस बाळा गावडे तर उद्यांच मुंबईस जाणार होता.

त्यांच्या वाटेला डावीकडच्या बाजूला डोंगर होता. त्या डोंगरावर काजूचीं पुष्कळ झाडें होतीं. तो डोंगर येशाप्पाकडे भागेलपणास होता. या महिन्यांत काजूच्या एखाद्या झाडाला एकादाच मोहराचा तुरा डोकावत होता. माघ महिन्यांत या काजूंना बहार येणार होता. त्या काजूंच्या झाडांकडे पाहिलें कीं भाईसाहेबांना गतायुष्यांतील एका प्रसंगाची आठवण झाल्यावांचून कधींच राहत नसे.

भाईसाहेब मालवणच्या हायस्कुलांत त्यावेळीं शिकत होते. सुटींत घरीं आल्यावर ते आपल्या मावशीकडे अथवा आजोळीं जात असत. त्यांची घरीं येण्याची वाट त्या डोंगरावरून उतरत होती. एकदा ते आजोळहून घरीं येत असतां त्यांचे पातेऱ्यांत पाय वाजले. त्याबरोबर त्यांना ऐकूं आलें—

"कोन रे तो काजींत ?"

काहीं उत्तर तिला मिळालें नाहीं. तिला वाटलें एखादें गुरूं फिरत असेल. भाईसाहेबांना ती पुढील सारी गोष्ट आठवत असे. आपण लपून कसें राहिलों, त्या राखणदार मुलीचीं गाणीं कशीं ऐकलीं ! आणि तिला चकित करण्याकरितां आपण जेव्हां एकदम पुढें गेलों तेव्हां ती सहा सात वर्षांची मुलगी कशी लाज लाज लाजली !

गाणीं गात असतां नवीन ऐकलेली नांव घेण्याचीं कवितें ती मोठ्यानें घोळवीत होती. ते हळदीकुंकू करण्याचे दिवस होते. बायकांनीं लाजत मुरडत आपापल्या नवऱ्यांचीं नांवें घेतलेलीं तिनें ऐकलीं होतीं. तीं पाठ करण्याची तिची उजळणी चालली होती.

खालच्या बाजूस असलेल्या शेतांत जमीन भिजवणीकरितां येशाप्पा लाटीचें पाणी काढीत होता. पोरें किंवा महारणी काजू चोरतील म्हणून रखवालीकरितां हिराला ठेवली होती. हिरा रखवाली करीत असता आपल्या भावी आयुष्यांत नवऱ्याचें नांव कसें घ्यावयाचें त्याची तालीम घेत होती.

बरोबर तिनें ते चादिवड्याच्या द्रोणांतून आपणाला कसे अर्पण केले? नवीन परकर आणि चोळी नेसलेली ती साधी भोळी मुलगी पाहून आपणाला वर्ड्स्वर्थच्या कवितांची कशी आठवण झाली? तिनें दिलेले गर आपण घेतले तेव्हां ती कशी हांसली आणि मुरडली? इतक्या लहान वयांत मुलींना हें कर्म करतां येनें, हा प्रश्न आपल्या मनांत कसा उद्भवला! 'असं करायला तूं कुठं शिकलीस?' असें विचारलें असतां तिनें "आमची आये अशीच करता बाबांक बगून" असें तिनें जिवाची मुरकुंडी करीत कसें उत्तर दिलें? व शेवटीं तें नांव घ्यावयास आपण आग्रह केला असतां तिनें आढेवेढे घेऊन तें नांव कसें घेतलें? आणि त्यावेळीं ती किती मनोहर दिसली! तिची ती बालिशता कोणत्याही कविमनाला मोहून टाकणारी कशी होती? हें त्यांना स्मरूं लागलें. मात्र तें नांव त्यांना आतां इतक्या वर्षांनीं आठवत नव्हतें.

त्यांनीं एक मनाचा विरंगुळा म्हणून तें नांव आठविण्याचा प्रयत्न केला. कांहीं ओळी मधून मधून त्यांना आठवूं लागल्या.

खणखण कुदळी । मण मण माती
उभारल्या भिती । चितारले खांब
सासूबायच्या पोटीं । भावोजींच्या पाटीं । जलमले राम
राम नाहीं म्हटलं । नांव नाहीं घेतलं । सदरेवरून —

पण यापुढचें त्याना आठवेना. पण शेवटची ओळ त्यांच्या स्मरणांतून जाणेंच शक्य नव्हतें.

× × × । जाउं दे पालखी । × × × रायांची । 'जाउं दे पालखी' यापुढें आपलें नांव न घेतांच तिनें तें कवित पुरें केलें असतां आपण नांव घालण्याचा आग्रह कसा केला. आणि कितीतरी आढेवेढे घेऊन तें नांव—आपलें नांव तिनें कसें घेतलें? हें चित्र हुबेहुब त्यांच्या समोर उभें राहिलें. आपण त्यावर कसें हांसलों? त्या भोळ्या भावाच्या खुळेपणाबद्दल आपण तिची कशी कशी कींव केली, आणि तिथून कसें झटकलों? पण आपल्या मुद्रेकडे ती गरीब बिचारी मुलगी कशी पहात राहिली होती? वर्णभेद आणि वर्गभेद तिला कुठें कळत होते!

नंतर तिचें लग्न ठरल्यावर ती प्रथम फारच रडली होती. शेवटीं लग्नसमारंभाच्या गडबडींत गडबडून गेली होती. आणि मग—तिच्यावर वैधव्याचा प्रसंग आल्यावर—

सगळा चलच्चित्रपट डोळ्यासमोरून सरकत गेला. ही मानवी आयुष्यांतल्या ध्येयांची गत !

अजूनही तिच्या अंतःकरणांतली ती भावना पुसून गेली नाहीं, याबद्दल त्यांना खात्री होती. पण......

पण ती साधी भोळी, प्रेमळ हिरा आज कुठें आहे ? आणि तिची अवस्था काय झाली असेल ? भाईसाहेब मंद पावलांनीं आपल्या घरीं चालले होते.

आपलें ग्रामोद्धाराचें काम करीत असता हिराबद्दल त्यांना चिंता जडली होती. पण त्यांच्या जनसेवेच्या कार्यांत कसलाच खंड पडला नव्हता. गांवांत पांढरपेशा वर्गांत त्यांच्याविरुद्ध लोकमत फैलावत होतें, तसतसा त्यांचा निश्चय दृढावत होता. दसऱ्याला आता दोनच दिवस उरले होते. भाईसाहेबांचा प्रचार जोरानें सुरू होता. महारवाडा स्वच्छ करण्याचें काम सुरू होतें.

मुंबईत हिरा कोणत्या स्थितींत होती ?

रात्रीचे अकरा वाजून गेले होते. मुंबईत फणसवाडीच्या एका काळोख्या बोळांतून गेलें असतां एक तिमजली टुमदार हवेली लागते. त्या हवेलीच्या तिसऱ्या मजल्यावर कांहीं तरी कारस्थान चाललें आहे, निदान नेहमींच्याहून कांहींतरी निराळा बेत चालला आहे असें आजूबाजूच्या लोकांस, जर कोणी यावेळीं जागें राहून पाहिलें असतें तर, वाटलें असतें. कारण त्या मजल्यावर रात्रौ ११ नंतर एका शृंगारलेल्या खोलींत शेडची निळसर बत्ती सर्व रात्रभर पेटत असते हें सर्वांस ठाऊक आहे. त्या हवेलीच्या बखळ जागेंत सरासरी अकरांच्या सुमारास एक मोटर येऊन उभी राहते. त्यानंतर त्या खोलींत कांहीं वेळ हास्यविनोद चालतो. कधीं गाणें वाजविणें चालतें. त्यानंतर एकाच खोलींत ती निळसर बत्ती पेटते आणि मजल्यावर चोहोंकडे काळोख होतो. पहाटेला पाहिलें तरी

ती बत्ती आंत असतेच. उजाडतांच ती मोटर निघून जाते. त्या खोलीच्या खिडक्यांना बाहेरून गुलाबी रंगाचे पडदे लावलेले दिसतात.

आज त्या खोलींत रोजच्यासारखे दिवे नाहींत. फक्त एक दोनच बत्त्या आहेत. खालीं मोटर कांहीं आलेली नाहीं. पण निळसर बत्ती मात्र लागलेली आहे !

त्या निळसर बत्तीच्या सुंदर शृंगारलेल्या खोलींत दोघी तरुणी बसून बोलत होत्या. दोघींतील वयानें लहान असलेली साधेंच पातळ नेसली होती, पण त्या साध्या पोषाखांत देखील ती त्या नखरेल तरुणीपेक्षां अधिक सुंदर दिसत होती.

" छान दिसतं तुला हें पातळ नाहीं ? " ती नखरेल तरुणी विडा चघळीत म्हणाली, " आरशांत नाहीं बघितलंस ? "

" काय बघायचं त्यांत एवढं ? तुम्ही सांगितलंत म्हणून मी नेसलें झालं. माझ्याकडं तरी दुसरं वस्त्र नेसायला कुठं होतं ? "

" मग काय झालं त्यांत ? मी नवं पातळ दिलंय तें, कांहीं वापरलेलं नाहीं दिलं असं संकोच बाळगायला. तूं मला माझ्या बहिणीसारखी दिसतेस. "

तें आपुलकीचें जोडलेलें नातें त्या बालेला आवडलें नसावें. पण तसें दिसूं न देतां ती एवढेंच म्हणाली—

" कितीतरी उपकार आहेत तुमचे माझ्यावर, " नंतर आपल्याला शेजारच्या खुर्चीवर बसायला केलेली खूण ओळखून ती म्हणाली, " नको कांहीं बसायला. मी उभी आहें तीच बरी आहें. जातें आतां निजायला. माझ्या—"

" एकच उणीव दिसतेय ग तुझ्या रूपांत, " तिचें वाक्य पुरें होऊं न देतां नखरेल स्त्री म्हणाली. नेहमींचीच कुरकुर आपल्याला आतां ऐकावी लागणार ती टाळावी असें तिच्या मनांत होतें. " सांगतेंच हं कोणती ती ! पण त्यापूर्वी मी तुला एक प्रश्न विचारतें. खरं सांगशील ? "

" मी खरं तेंच बोलतें. " ती बाला उत्तरली.

ती नखरेल तरुणी कोचावरून उठली. तिनें त्या सुंदर बालेच्या खांद्यावर आपला हात टाकला. नंतर तिचा हात आपल्या खांद्यावर घेतला; आणि ती एका मोठ्या तीन चार हात उंचीच्या आरशासमोर उभी राहिली.

" बघितलंस का आरशांत ? हं, आतां सांग हं ! अधिक सुंदर कोण दिसतं ? तूं का मी ? "

इतका प्रेमळ स्पर्श त्या बालेला लहानपणीं मातृसुखाला आंचवल्यानंतर उभ्या जन्मांत आजच पहिल्यानें लाभत होता. ती बाला मोठ्या पेंचांत सांपडली. काय उत्तर द्यावें हें तिला समजेना. त्या खोलींतून पाय काढायला ती फार उतावीळ झाली होती. कारण निळसर बत्ती लागल्यावर त्या खोलींत कोणता प्रकार घडतो हें त्या बालेला थोड्याच दिवसांच्या सहवासानें पूर्णपणें कळून चुकलें होतें. पण उत्तर तरी काय द्यायचें ? खरें बोलावें, तर आपलें दुर्दैवी सौंदर्यच मुंबईत आल्यापासून अधिक खुललेलें बाह्य दृष्टीला दिसण्यासारखें होतें. एरवीं खरें पाहतां ती अंतःकरणांत सारखी तळमळत होती. काळजीनें ती पोळून गेली होती. ती तिची काळजी या नव्या वेषांत सकृद्दर्शनीं दिसून येण्यासारखी नव्हती. तिला काळजी लागली असली तरी आशेचा अंकुर तिच्या हृदयांत वाढूं लागला होता. त्यामुळें काळजीचें वेष्टन खालीं राहून आशेच्या तजेल्याचें पुट तिच्या यौवनास विशेष खुलवीत होतें. रविवर्म्याच्या कमलोद्भवा लक्ष्मीच्या मस्तकावरील मुगुट व इतर रत्नभूषणें काढून त्या जागीं त्या बालेचा साधा परिवेष कल्पनेच्या साह्यानें चढविला असतां तें चित्र जसें दिसलें असतें तशीच ती बाला दिसली असती. आपल्या चेहऱ्यांत कोणती उणीव आहे, हें तिला देखील आतां ठळकपणें दिसून आलें. तिला आपल्या सौंदर्याची स्तुति ऐकावयास नकोच होती. तशांतही त्या उणीवेचा निर्देश तरी कोणी करूं नये असें तिला वाटे. ती उणीव दूर होण्याची आशा आतां या जन्मीं कुठें राहिली आहे ? निदान उच्च वर्गात तरी जन्म झाला पाहिजे होता. श्रीमंती आणि शिक्षण नाहीं तर जन्मानें तरी आपण—

तिच्या मनांत नाहीं नाहीं ते विचार येऊं लागले आणि तिचा चेहरा

काळवंडला. बाजूच्या तरुणीचें टवटवीत सौंदर्य त्यामुळें उठावदार दिसून तिचें अभिजात सौंदर्य त्यापुढें फिकें पडलें. तीच संधि तिनें साधली.

" तुम्हीं अधिक सुंदर दिसतां. हें का सांगायला पाहिजे. "

" तूं जादूगारीण आहेस. चेटकीण आहेस. तुला असे मुद्राभिनय करतां येतात हें माझ्या लक्षांत अझून आलं नव्हतं. खरंच सांगतें, मला जो थोडासा रंगभूमीचा अनुभव आहे, त्यावरून मी खात्रीनं सांगतें कीं तूं उत्तम नटी होशील. "

" माझं काम लवकर होईल, तर मी नटी देखील होईन. आत्तां तयार आहे. " यावेळीं मात्र उल्हासाच्या उमाळ्यानें ती फारच सुंदर दिसली.

" वा ग वा ! भली सांपडलीस. यावेळीं आता सांग कोण सुंदर दिसतं. किती उपजत अभिनयशक्ति तुझ्या आंगांत आहे ही ? इतकी मुद्रापालट इतक्या थोडक्या अवधींत तुला करतां येते ! या एवढ्या भांडवलावर गजांतलक्ष्मी पायाखालीं लोळवावी. अग, तुला आपल्या सामर्थ्याची कल्पना देखील नाहीं. तुझं काम कोणीही चुटकीसरसं करील. मात्र ती उणीव भरून काढली पाहिजे. त्या चांदीच्या करंड्यातलं कुंकूं लावना तेवढं. "

त्या नखरेल तरुणीच्या तोंडून निघालेल्या " कुंकूं लाव ना " या शब्दांचा फारच चमत्कारिक परिणाम त्या बालेच्या मनावर झालेला तिला दिसला. तिला तसल्या त्या वृत्तीचें आश्चर्यहि वाटलें.

" कुणाही अनुभवी स्त्रीला तुझं कौमार्य ओळखतां येईल. विधवा झाली असलीस तरी तूं कुमारी आहेस. विधवा कुमारी आतां राजरोसपणं कुंकूं लावतात. स्त्री ही कुमारी, सधवा कीं विधवा हें पुरुषांना ओळखतां येऊं नये म्हणून जी स्त्रियांनीं, चांगल्या सुशिक्षित स्त्रियांनीं चळवळ करून सुधारणा घडवून आणली, त्यापासून सर्वच स्त्रियांनीं त्या कोणत्याही स्थितींत असल्या तरी कुंकूं लावावं असं आतां ठरवून टाकलं आहे. अजिबात कुंकूंच लावूं नये स्त्रियांनीं, असं जरी ठरविलं

असतं तरी कार्यभाग सिद्धीस गेला असता आणि उलट पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल टाकून अस्सल सुधारणा अमलांत आणण्याचं श्रेय समाजसुधारक पुढारी स्त्रियांना मिळवतां आलं असतं. पण आम्हां हिंदी स्त्रियांना कुंकू किती प्रिय आहे हें यावरून परकीय स्त्रियांना कळून आलं आहे. परदेशी स्त्री जेव्हां हिंदी पुरुषाशीं लग्न लावते तेव्हां ती हौसेनं साडी पातळ नेसते, बांगड्या घालते आणि कपाळाला कुंकुमतिलक लावते. तुला कुंकू लावायला ग कसली हरकत ? ”

असें म्हणून त्या नखरेल नारीनें पानसुपारीचें तबक पुढें केलें. त्या विधवा कुमारीचा चेहरा या भापणाने फारच कोमेजला. तिला मनापासून का कुंकुमतिलक नको होता ? तिला हवाच होता तो !

त्या विधवा कुमारीचं सौंदर्य पाहून नखरेल नारीला प्रथम प्रथम वैषम्य वाटलें. नंतर वैषम्याची भावना करुणेंत विलीन झाली. पण आतां बोलतां बोलतां तिच्या डोक्यांत ज्या अनेक कल्पना आल्या, त्यांतील कांहीं शब्दरूपांनीं बाहेर पडल्या. पण मुखांतून बाहेर न निघालेल्या अशा कितीतरी कल्पना तिच्या मस्तकांत कोलाहल माजवीत होत्या. ती तशीच विधवा कुमारीच्या चेहऱ्याकडे टकमक पहात कांहीं वेळ तटस्थ राहिली होती. एखाद्या मानवी प्राण्याच्या मनांत विशिष्ट प्रेरणा उत्पन्न करून त्याच्या हालचालींचीं सूत्रें चालविणारा अदृश्य नियंता विधि आपल्या हातांतल्या बाहुल्याकडे—त्या प्राण्याकडे अशाच नजरेनें पाहत असला पाहिजे. यापुढें जो प्रकार घडविण्याचा योग त्या नखरेल नारीनें जुळविला होता, तो कळसूत्री बाहुली बनलेल्या त्या बिचाऱ्या असहाय विधवा कुमारीला ठाऊकही नव्हता. ती घाबरत होती ती दुसऱ्याच संकटाला. निळसर बत्ती पेटत राहणें म्हणजे बखळींत मोटर येणें, मोटर येणें म्हणजे ते श्रीमंत शेटजी शृंगारलेल्या त्या खोलींत येणें, आणि त्यापुढें तेथें शृंगारविलास सुरू होणें. एवढेंच ज्ञान तिला थोड्याच दिवसांच्या संवयीनें झालें होतें. म्हणूनच ती तेथून पाय काढूं पहात होती.

“ तुझं काम लवकर झालं पाहिजे कीं थोडे दिवस जास्त लागले तरी

चालतील ?" पानसुपारीच्या तबकाकडे पाठ करून राहिलेल्या त्या विरक्त विधवा कुमारीला पाहून नखरेल नारीनें विचारलें. तिला तिचा खरा कस पहायचा होता. आपल्या ध्येयसाधनासाठीं ती पवित्र गुन्हा करणार कीं काय हें तिला समजून घ्यावयाचें होतें.

" माझं काम लवकर होईल तितकं मला हवं." विधवा कुमारीनें उत्तर दिलें, पण तें यांत्रिक स्वरूपाचें होतें. कारण तिनें ते शब्द उच्चारले तेव्हां मन एकीकडे आणि नजर दुसरीकडेच होती तिची. त्या शृंगारलेल्या खोलींत लहानशा टेबलावर जीं सुवासिक द्रव्यें चांदीच्या व कांचेच्या लहान मोठ्या बाटल्यांतून ठेवलेलीं होतीं त्यांच्या बाजूला एक चांदीची फोटोफ्रेम होती. त्या फोटोफ्रेमकडे तिची प्रथम नजर होती. त्यांत त्या नखरेल नारीच्या बरोबर एक पुरुषाचाही फोटो होता. पुरुष आरामांत बसलेला असून स्त्री त्याच्या हातांत पानपट्टी देत आहे व शृंगारभावदर्शक नजरेनं पाहत आहे असा तो फोटो होता. भिंतीवर त्याच नखरेल नारीची निरनिराळी पोझ् घेतलेलीं व निरनिराळ्या वेषांतलीं छायाचित्रें होतीं. त्या सर्वांवरून तिनें नजर फिरवली. तिचें मन तर मुळीं ताळ्या-वरच नव्हतें. अशा स्थितींतच तिनें तें उत्तर दिलें.

नखरेल नारी उठली व त्या विधवा कुमारीच्या हाताला धरून दुसऱ्या एका साधारणशा सजविलेल्या खोलीकडे चालली. विधवा कुमारी तिच्या-बरोबर कळसूत्री बाहुलीप्रमाणें विमनस्कपणें पावलें टाकीत होती. तिचें मन दुग्ध्यांत पडलें होतें. ही नखरेल नारी बोलते आणि दिसते तशीच चांगली आहे कीं स्वभावाची दुष्ट आहे? तिचा व्यवसाय सोडून दिला तर एरवीं स्वभावानें ती दुष्ट असल्याचें कांहीं त्या विधवा कुमारीला अद्याप दिसून आलें नव्हतें. वेश्याव्यवसाय आणि नटीचा व्यवसाय यासंबंधीं तिनें त्या नखरेल नारीच्या तोंडून आतांपर्यंत ज्या ज्या गोष्टी व त्यासंबंधींचीं तिचीं जीं जीं मतें तिनें ऐकलीं होतीं, त्यावरून तिचा अनुकूल ग्रहच झाला होता तिच्याबद्दल. म्हणूनच ती निमूटपणें ती सांगेल तसें ऐकत होती. आणि तसें पाहिलें तर ती विधवा कुमारी मुंबईत असहायच होती.

त्या साधारणशा खोलींत प्रवेश केल्यावर नखरेल नारी तेथील व्यव-

स्थित दिसणाऱ्या पलंगावर बसली व तिनें विधवा कुमारीलाही आपल्या बरोबर बसण्याचा आग्रह चालविला.

" आज तूं मला फारच छान दिसतेस. मला वाटतं कीं तुझ्यासाठीं तरी मला पुरुषजन्म दिला पाहिजे होता देवानं. आजपासून तूं त्या पलिकडच्या नोकर लोकांच्या खोलींत निजूं नकोस. इथंच नीज या पलंगावर."

विधवा कुमारीच्या अंगावर शहारे आले. ती भेदक नजरेनें नखरेल नारीच्या चेहेऱ्याकडे पाहूं लागली. त्या दोघींकडे जर कुणी सौंदर्यसमीक्षकानें पाहिलें असतें, तर त्याला वाटलें असतें कीं, नखरेल नारीच्या अनाच्छादित सौंदर्याचे कांहीं भाग आच्छादित होण्यानें, आणि त्या विधवा कुमारीच्या संपूर्णाच्छादित सौंदर्याचे कांहीं भाग अनाच्छादित होण्यानेंच खरें सौंदर्य प्रगट होईल.

खालीं मोटर वाजली. साहजिकपणेंच विधवा कुमारी खोलींतच राहिली. ती दाराकडे पाहत होती. कारण तिला दार लोटून घ्यावेसें वाटत होतें. नखरेल नारी खोलीच्या बाहेर पडली आणि तिनें बाहेरून कडी लावून घेतली. विधवा कुमारीला हवें होतें तसेंच झालें, म्हणून तिला बरें वाटलें. कारण बाहेरूनच कडी लावल्यावर आंत कोणी असेल अशी शंकादेखील बाहेरून बघणाऱ्या माणसास येणार नाहीं असे त्या भाबड्या जीवास वाटलें. विशेष सावधगिरी आपल्याकडून घेण्याकरितां तिनें आंतून कडी घालावयाचें ठरवलें आणि पहाते तों दाराला वरून आणि खालून असे जे फक्त दोन बोल्ट होते ते काढून घेतलेले दिसले. दरवाजा आंतून बंद करण्याचें कांहींच साधन तिला दिसलें नाहीं. दैवावर हवाला ठेवून ती राहिली होती. खरें म्हटलें तर अशी धडकी घेण्याचें कारण नव्हतें. कारण शेटजी येतील ते आपल्या त्या शृंगारलेल्या खोलीकडे जातील. मग हिनें कां भ्यावें ? पण ती भ्याली होती एवढें खरें. आज आपल्याला या ठाकठीक करून ठेवलेल्या खोलींत निजायला कां बरें सांगितलें मालकिणीनें ? हाच प्रश्न वारंवार तिच्या मनांत उचल घेत राहिला होता. त्याचें उत्तर तिला सांपडत नव्हतें आणि म्हणूनच भीति वाटत होती.

आपली सूत्रचालक ती नखरेल नारी आहे, तसा तिचाही सूत्रचालक कोणीतरी निराळा असेल, असें तात्पुरतें तिनें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

ज़िन्यांत एकाहून अधिक माणसांचे पाय वाजले. तीं पावलें शेटजींचीं खास नव्हतीं. शेटजी पायांत स्लिपर घालून येत असत. ही स्लिपरचीं टराविक पद्धतीचीं पावलें नव्हतीं.

विधवा कुमारीला आतां आणखी एक नवी शंका आली. दुपार-पासून ती आपण कुठें तरी गाण्याला जाणार आहे रात्रीं, असें जें म्हणाली होती, त्याचें काय ? बारा वाजून गेले, आणि आतां ही गायनाला केव्हां जाणार ? विधवा कुमारीच्या मनांला अनेक कुकल्पना भंडावून सोडूं लागल्या. बाहेरून कडी लावून घेण्यांत हेतु काय ? आपल्या संरक्षणाचा कीं आपल्याला बंदिस्त करण्याचा ? ह्या शेवटच्या शंकेनें तर ती फारच घाबरून गेली.

दादरवरून आलेले गृहस्थ शेटजी खास नव्हत, अशी तिच्या मनाची पक्की खात्री झाली. कारण शेटजींबरोबर त्यांचा आवडता अल्सेशियन डॉग् येतो. तो चोहींकडे वास घेत फिरतो आणि नंतर खोलीच्या दरवाजावर बसून राहतो. स्वस्थ बसण्यापूर्वीं जबडा उघडून तो मचकावल्यासारखा चमत्कारिक आवाज करतो. स्लिपरच्या आवाजामागून कुत्र्यांच्या पाव-लांचा आवाज यायचा. आज तसें कांहींच नाहीं. त्या कुत्र्याला नवख्या अपरिचित माणसाची चाहूल लागली तर तो ओरडल्याशिवाय राहतच नाहीं. तेव्हां शेटजी आले नाहींत, पण कुणी तरी आलें हें मात्र खास.

दिवाणखान्यांत कांहींतरी कुजबुज झाली. कोणीतरी त्या शृंगारलेल्या खोलींत गेलें. कोणीतरी त्या बाजूच्या दुसऱ्या खोलींत गेलें. कोणीतरी एक दिवाणखान्यांतच राहिले. विधवा कुमारीच्या खोलीच्या बाहेरच्या कडीला कोणाचा तरी हस्तस्पर्श झाला. पण कडी काढली गेली नाहीं. तिथें आलेलें माणूस मागें फिरलें असावें. आपली नाकेबंदी तर करीत नाहींत ? आपल्याला सांपळ्यांत तर अडकवीत नाहींत ना ? विधवा कुमा-रीनें खालीं, वर, बाजूंस, खिडक्यांकडे, चोहींकडं पाहिलें. खोलीच्या

खिडक्या बंद होत्या. खोलींतील बत्ती मालवली गेली. खोलींत गडप काळोख पडला. आंत पेटणाऱ्या दिव्याचा स्विच् बाहेरून होता तसा आंतूनही होता. पण आंतील स्विच् तिनें कुठें बघून ठेवला होता ? ती काळोखांत एकाकी राहिली. तिच्या पोटांत धस्स् झालें !

इतक्यांत कडी उघडली गेली आणि आंत एक व्यक्ति शिरली. लगेच बाहेरून पुन्हां कडी लागली. तिनें ओळखलें. तो पुरुष होता. ती एकदम पाठीमागें सरकली ! त्याच्या आंगाचा दर्प—हो जर्दाचाच तो दर्प !

---

# १३ : शृंगारलेल्या खोलींत—

त्या काळोख्या खोलींत शिरल्याबरोबर त्या पुरुषानें विधवा कुमारीवर हल्ला केला. पण ती पाठीमागें सरकल्याबरोबर तो पुरुष पलंगाच्या खुरावर आदळला ! त्याबरोबर त्याला फारच त्वेष आला. आपला हेतु काळोखांत साधतां आला तर तें त्याला हवें होतें. पण तसें होण्याची संभवनीयता दिसेना. त्या पुरुषानें आंतून दारावर टिचकी मारली. बाहेरून स्विच् उघडला गेला.

पण स्विच् उघडण्यापूर्वींच आंगाच्या दर्पावरून तो पुरुष कोण असावा हें तिनें ताडलें होतें. तो जर्दा तंबाकूचा ठराविक वास ! तो काका बामण होता हें ओळखणें अगदीं सोपें होतें तिला. तितक्यांत दिवा लागल्याबरोबर तर शंकाच राहिली नाहीं. तिला त्या स्थितीहून मरण आवडलें असतें.

भुंवया उंचावीत काका म्हणाले—

" हिरा, तुझ्यावरील संकट निवारण झालं पाहिजे तर तूं माझ्या इच्छेप्रमाणं वागायला तयार हो ! आपखुषीनं तयार झालीस तर तें आपणा

दोघांलाही चांगलं. नाहींतर दुसऱ्या उपायांची अंमलबजावणी करावी लागणार. ”

“ असं काय बोलतां बरं काका ? माझ्या बाबांप्रमाणं तुम्ही मला. ”

“ छी: असलीं बोलणीं काय कामाचीं ? फक्त एकदाच जरी तूं माझ्या इच्छेप्रमाणं वागलीस तरी पुरे. मग मी मुळींच तुझ्या वाटेला जाणार नाहीं, हे खात्रीनं समज. ”

“ तसलं कांहींच बडबडूं नका, काका ! मला भीति वाटते तुमची. तेवढं एक सोडून दुसरं काय सांगाल तें ऐकेन. ”

“ एकंदरींत सामोपचारानं ऐकायचं नाहीं तुला ! ऐक तर ! ज्याच्या-वर तुझा इतका विश्वास तो भाईसाहेब तुला विचारीत नाहीं. फक्त तुझ्याबरोबर आजपर्यंत मौज केली तेवढीच. त्याचं आतां लग्न ठरलं आहे इमानपूरच्या नानासाहेबांच्या वासंतीबरोबर. मग आतां कसं ? एरवीं तरी तूं त्याची लग्नाची बायको होऊं शकली नसतीस, फक्त रखेली झाली असतीस. पण आतां तुझ्या नशिबीं तेंही सुख नाहीं. त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाला तूं जवळ केला आहेस कीं काय आणखी ? ”

“ त्यांनीं लग्न केलं असलं किंवा करणार असले तर त्यांत मला आनंदच आहे. तुम्हांलाही तसंच वाटेल. कारण तुम्ही त्यांच्या वडिलांचे कारकून आहांत. ”

“ कोण कोणाचा कारकून ? दाजीसाहेबांचा मी कारकून ? दाजीसाहेब आतां लख्ख होण्याच्या मार्गाला लागले आहेत. शिवाय ते मुलाबरोबर भांडल्यामुळें मुलाला त्यांच्याकडून सध्यां कांहीं मिळण्याची आशा नाहीं. आंबेखोलचा सावकार आतां मीच होणार ! ”

“ चांगले उपकार जाणलेत तर धन्याचे ! ”

“ तुला पण त्याचा एवढा कैवार कां घ्यावासा वाटतो ? तुझ्या बापाला लाचार कुळ त्यानंच बनविलं ना ? ”

“ तें देखील तुमच्याच मदतीनं. ”

“ पण आतां तर मीच तुझ्या बापाचा सावकार बनलों आहें. मी लावलेल्या दाव्याचा आतां लवकरच निकाल होईल. येशाप्पाचं घरदार

शेत, गुरं सर्व कांहीं जप्तीला काढीन. बापाला सोडविणं तुझ्या हातांत आहे."

"माझ्या हातांत?"

"हो तुझ्या हातांत. त्याकरितांच तूं मुंबईला आलीस ना? बापाचं कर्ज फेडण्याकरितां लागणारी पांचसहाशेंची रक्कम ती कस्तुरी तुला देणार? ती नखरेल नायकीण? तूं ब-या बोलानं माझं ऐक. तुझ्या बापाला सोडवीन तर मीच. बापाला आणि कुटुंबाला सोडविण्याचं तुझ्या हातांत आहे. पण विचार करायला वेळ मिळणार नाहीं. तूं हो म्हणालीस तर दुधांत साखर. नाहीं तर साखर न घालतांच दूध प्यायची संवय मला आहे. पाणचट दुधांत साखर घालावी लागते. हें असलं दूध— "

यापुढें काकानें उच्चारलेले शब्द व त्यानें केलेला अभिनय पाहून हिराला पराकाष्ठेचा त्वेष आला. कस्तुरीनें आंबेखोलहून आपणाला इकडे आणून खाईंत लोटलें असें तिला वाटलें.

"हलकटा, चालता हो इथून." ती संतापानें म्हणाली.

"तर मग साखेरशिवायच दूध!" काकानें विकट हास्य केलें.

"पडवळांच्या मंडपाची आठवण माझी बुजालेली नाहीं. मी फुटक्या डोळ्यांचा नाहीं का? माझी दृष्ट लागून पडवळांचा मंडप मोडला? तुझी भावजय असं म्हणाली, आणि तिनं माझी पाठ फिरल्याबरोबर मला फडाफड शिव्या दिल्या. तूं फिदिफिदि हांसलीस! मोठी गंमत वाटली नाहीं तुम्हांला? या काकाला तुम्हीं ओळखलंत नाहीं अजून. चल ये अशी? असें म्हणून काकानें तिचा हात पकडला.

हिरानें सगळा आंगचा जोर एकवटून हाताला हिसडा देऊन आपली मुक्तता करून घेतली आणि तिनें खिडकी गांठली. खिडकीचीं दारें तिनें उघडलीं. उडी टाकण्याचा तिचा हेतु होता हें काकानें तत्क्षणींच ओळखलें. एक मिनिटच ती खिडकीवर चढण्याचा प्रयत्न करीत होती. इतक्यांत तिला काकानें खालीं ओढली.

पण तेवढ्या एकाच मिनिटांत एक अकल्पित प्रकार घडला. खिडकीच्या

खालीं अरुंद बोळ होता. त्यांत उष्टीं खरकटीं फेंकून दिलीं जात असत. कोणी निसर्गविधीलाही बसत. त्या बोळांत म्युनिसिपालिटीचा विजेचा कंदील होता. त्या कंदीलाखालील–दिव्याखालील, अंधेरांत एक व्यक्ति असाच प्रकार करीत होती. त्या कंदीलांतील दिव्याचा प्रकाश खिडकींत चढणाऱ्या हिराच्या तोंडावर पडला होता. खिडकींतली धडपड ऐकून काळोखांतल्या व्यक्तीनें सहज वर नजर फेंकली, आणि त्याबरोबर त्याच्या मनाची विलक्षण स्थिति झाली! त्या व्यक्तीच्या तोंडून आश्चर्याचा उद्गार निघाला. ती व्यक्ति हिराला नांवानें हांक मारायला तोंड उघडणार तोंच तिला बखळींत उभ्या असलेल्या, आतां नुकत्याच आलेल्या मोटरीच्या मालकानें हुकमी आवाजांत बोलावल्यामुळें, ती व्यक्ति लगतच्या घरांतून आंत मोटरीकडे वळली. हिराला आंत कोणी तरी ओढलें एवढें मात्र त्या व्यक्तीला तितक्यांतच दिसून आलें.

" कां रे, सावळ्या! घाबरलास कां असा ? "

" कांहीं नाहीं. "

" तिकडच्या बाजूच्या खिडकीकडे बघत बघत तूं दारांत शिरलास!" मालक हलक्या आवाजांत विचारीत होता.

सांवळया बोललाच नाहीं.

मालकाचा संशय वाढत चालला.

" काय दिसलं तुला ? सांग लवकर. मला कळलं पाहिजे." उतावीळपणानें मालकानें विचारलें. आतां सांवळ्याला टाळाटाळ करणें शक्य नव्हतें. पण काय सांगावयाचें हेंच त्याला सुचत नव्हतें. मालकाची दृष्टि सांवळ्याशीं बोलत असतांना बखळींत उभ्या असलेल्या त्या पूर्वींच आलेल्या टॅक्सीकडे होती. दादरांतून कांहीं माणसें उतरल्याचा आवाज येत होता. मालकाची घाई उडाली होती. सांवळ्याची बोबडी वळली!

" सांवळ्या बोल लवकर, नाहीं तर दांत पाडीन. कोण दिसलं तुला ? स्त्री कीं पुरुष ! "

" बायको माणूसच ! "

" काय करीत होतं तें बायको माणूस ! "

सांवळ्याचें त त-त—प-प-प होऊं लागलें.

" खिडकींतून बाहेर बघत होतं, "

" कोणाकडे—? " मालकाचा आवाज कांपूं लागला. शरीरही कांपूं लागलें. त्यानें ओंठ चावले !

" खालीं बोळांत बघत होतं ! "

" कोण होतं खालीं बोळांत ? "

" मी मी-मी ! "

" अक्कलशून्य—गाढव ! पाजी ! तुझ्याशिवाय दुसरा कोणी पुरुष होता काय एखादा उभा—नाटकी माणसासारखा ? "

" नाहीं—"

" ती बायको खूण करीत होती का कुणाला ? "

" नाहीं—नाहीं—ती खिडकींतून—"

सांवळ्याच्या तोंडांत मारण्याकरितां मालकानें हात उगारला. सांवळ्याचें मस्तक भणाणलें ! मालकानें मोटाच आत्मसंयम केला. मालकानें पाहिलें की टॅक्सींत कसला तरी मोठा बोजा घातला गेला व एकदोन माणसें मोटरींत बसलीं. मालकाची त्रेधा उडाली.

" अरे गाढवीच्या ! " दांत ओंठ चावून मालकानें खुलासा मागण्याकरितां विचारलें, ' खिडकींतून ' काय म्हणतोस ? "

" खिडकींतून उडी टाकायला बघत होतं तें बायको माणूस......! "

टॅक्सी स्टार्ट झाली.

" हें बघ ! " सांवळ्याच्या हातांत पांच रुपयांची नोट पडली.

" हें बघ, याच खळ्यांत, आंत किंवा बाहेर, अथवा बोळांत लपून रहा. पण दादरवर नजर ठेव. कोण येतं जातं बघ. पुरुष कीं बायको माणूस तें ओळख. दुसऱ्याला दिसेल असा राहूं नको. . . . हं . . . " मालक गोड शब्दांत बोलला.

टॅक्सी निघून गेली. मालक गाडींत बसले व त्यांनींही आपली मोटर पाठोपाठ बाहेर काढली.

टॅक्सी निघून जात असतां त्यांतील दोघेजण आपापसांत कांहीं बोलत

होते. त्यांच्या बोलण्याकडे सांवळयाच्या धन्याचे कान होते आणि डोळे तिसऱ्या मजल्यावरील शृंगारलेल्या खोलीकडे होते. त्याची मोटर आंत आली तेव्हां शृंगारलेल्या खोलींत निळसर बत्तीचा प्रकाश होता. पण मोटर आंत आल्यानंतर थोड्याच वेळांत तो प्रकाश जाऊन काळोख झाला होता. म्हणून त्या खोलीकडे त्याची नजर सारखी लागून राहिली होती.

टॅक्सी ठाकूरद्वारच्या दिशेनें निघाली. पण पाठीमागून जाणारी दुसरी मोटर पुन्हां मागें वळली. ही मोटर पुन्हां मागें वळेल अशी कोणाला शंका येणेंच शक्य नव्हतें. इतक्या जोगांत पाठलागावर ही मोटर सुटली होती. म्हणून एक व्यक्ति सांवळयाकडे येण्याच्या विचारांत होती. पण मोटर मागें वळलेली दिसतांच ती व्यक्ति पुन्हां बोळांत शिरली.

मोटर आंत आली. मालकानें सांवळयाला विचारलें. "ती टॅक्सी बाहेर पडतांना आंतील माणसें बोलत होतीं नाहीं ?"

"होय."

"एक शब्द बराच मोठ्यानें उमटला—सांग बघू काय तो ?"

"पोफळी !"

"शंख आहेस ! पोफळी ! फोफळी कीं नारळी ? कोंकण्या खराच !"

इतकेंच बोलून मालकानें मोटर पुन्हां बाहेर काढली. त्याला शंका आली कीं बोळांत कुणीतरी घुटमळत आहे. पण त्या मोटारवाल्याची मनःस्थिति द्विधा झाली होती. त्याला आतां पुन्हां मागें मोटर घ्यावयास अवकाशच राहिला नव्हता. पण त्याच्या मनाला थोडेंसें समाधान वाटलें होतें.

'पोफळी' तें पोकळी—तो आपल्या मनांत विचार करीत होता. मग आपण इकडे कशाला जावें ? आपणाला झुकांडी देण्याचा टॅक्सीचा विचार आहे. पण आपण दुसऱ्याच बाजूनें जावयास हरकत नाहीं. चॅन्सची गोष्ट आहे. अजमास खरा ठरला तर ठीकच. नाहींतर शिकार हुकलीच आहे.

असा विचार करीत त्यानें आपली मोटर मधल्या रस्त्यानें माधवबागेंतून डावीकडे वळविली.

प्रथम सुटलेली टॅक्सी भरधांव पळत होती. पाठीमागची मोटर मागें

वळली, त्याचवेळीं दुसरी एक मोटर तशीच भरवेगानें टॅक्सीच्या पाठोपाठ चालली होती.

टॅक्सी धोबीतलावावरून क्रॉफर्ड मार्केटच्या रस्त्याला वळली, तरी पाठीमागची मोटर पाठीवर असल्याचें आंतील लोकांना दिसलें. टॅक्सी मोतीबाजारांत शिरून मधल्या बोळांतून काळबादेवी रोडवर उमटली. तेव्हां मात्र पाठीमागची मोटर दिसली नाहीं. दिसणार कशी ? कारण पाठीमागची मोटर क्रॉफर्ड मार्केटकडून बोरीबंदरकडे वळली होती. टॅक्सींतील लोकांना समाधान वाटलें. तथापि त्यांना वेळ काढावयाचा नव्हता. पाठलागावर असलेल्या मोटरीला आपण चकवलें या आनंदानें टॅक्सी जोरांत चालत होती.

सांवळ्या ह्या सगळ्या प्रकाराकडे पाहून अचंबा करीत उभा होता. तो तिसऱ्या मजल्याकडे मात्र उंचावून पाहत होता. दादरवरून कांहीं माणसें उतरून टॅक्सींत चढलीं हें त्यानें पाहिलें होतें. त्याला शंका सारखी येत होती कीं खिडकींतून दिसलेलें माणूस तिसऱ्या मजल्यावरच राहिलें, कीं टॅक्सींतून गेलें. टॅक्सींतून गेलें असल्यास सुरक्षित राहिलें आहे कीं काय ? बरें ! आपला मालक तिसऱ्या मजल्यावरील शृंगारलेल्या खोलीकडे न जातां टॅक्सीच्या पाठलागावर गेला तो कशासाठीं ? कांहीं दगाधोपा आहे कीं काय ? खिडकींतून दिसलेल्या स्त्रीच्या जिवाला दगाफटका तर नाहींना ? आणि बोळांत तिथें आपल्याशिवाय आणखी कोणी दुसरा फॅशनेबल तरुण उभा होता कीं काय ? आपल्या धन्यानें तसा प्रश्न कां विचारला ? त्याचें मस्तक भोंवळूं लागलें. म्हणूनच त्याला आपल्या पाठीमागें कोणीतरी येऊन उभें राहिलें आहे याची दाद देखील लागली नव्हती.

भोंवळत असलेल्या मस्तकाला शांत करायचा उपाय सांवळ्याचा ठरलेला होता. त्याच उपायाचा अवलंब करण्यासाठीं तो आपली जागा सोडून बाहेर जाऊं पहात होता. बोळाच्या तोंडावरच दारूचें दुकान होतें. सांवळ्यानें तें प्रथमच टेहळून ठेवलेलें होतें.

दारूचें दुकान बोळाच्या तोंडावर उजवीकडे होतें. आणि डावीकडे

एक हॉटेल होतें. त्या चहाच्या दुकानांत एक रेकर्ड लागली होती. त्यांतील गाण्याचे सूर सांवळ्याच्या कानांत पडले आणि तो तेथल्या तेथेंच थबकला.

कराची मुमयचे चाकरमानी
केलो फुडो थडे मुल्लुख थोडो
म्हातारो म्हातारी घराकडे टकलीं
पगार थडेच नुको वाटंव रे
नोटी थडेच नुको वाटंव रे
ठेय झिला घराची आटव रे
पांच तरी रुपाये पाठव रे

हें गाणें ऐकून सांवळ्याला रागच आला. तो आपल्याशींच पुटपुटूं लागला. “ झक् मारता हो गातालो ! हेकां काय समाजता आमच्या चाकरमान्यांच्या जिवाचे हाल ! म्हातारो म्हातारीं काय धड आसतत् ? माझी म्हातारी नाय, पण म्हातारो आमा घराहारी ! सद्दीं उठान् तरास म्हाताऱ्याचो ! पैशे धाड हुंनुता. उटलो तो आपलो हुनता पैशे धाड ! खंयचे धाडूं पैशे हेकां ? मरना थडे तो म्हातारो ! . .

“ कां बाबा त्या बापड्या म्हाताऱ्याला मारतोस ? ” हे शब्द कानांत आणि थाप पाठीवर एकदमच पडल्यामुळें सांवळ्या असा कांहीं दचकला, कीं बोलून सोयच नाहीं !

“ अरे . . . . . कोण ? ” सांवळ्यानें दचकून विचारलें.

“ ओळखलंस नाहीं सांवळ्या ? ”

“ कोण ? बाळा ? ”

“ आहेस–आहेस–शुद्धीवर आहेस तर ? ”

“ म्हणजे रे ? ”

“ आम्ही गावांत ऐकलें कीं तूं दिवसांतून फारच थोडा वेळ शुद्धीवर असतोस म्हणून ? ”

“ कशावरून ? ”

“ हातच्या कांकणाला का आरसे लागतात ? ”

" म्हणजे ? "

" आतांच तुझे पाय दारूच्या दुकानाकडे वळत होते ! "

" तुझ्या मनांतलीच गोष्ट ! "

" पण काल मी तुला पाहिला होता—एका असल्याच दुकानांत— "

" चल, बोलूं नकोस ! पण आलास कधीं तूं गांवाहून ? "

" हल्लींच ! "

" खुशाल सगळीं ? "

" म्हाताऱ्याला तर आत्तांच मारीत होतास ! "

सांवळ्या ओशाळला. तो किंचित्काल गप्पच राहिला.

" तसं नव्हे रे ! पण रोज उठून पैशांची मागणी कसली करतात रे मुलकांतले रिकामटेकडे लोक ? मग येतो वैताग ! "

" पण तुला जर येशाप्पाची हकीगत समजेल तर तुझ्या काळजाला घरे पडतील घरे ! तें असूं दे ! मग सांगेन केव्हां तरी हकीगत ? पण आधीं मला सांग, तूं पॉलिश करण्याच्या कामावर असतोसना हल्लीं ? "

" होय. "

" तर मग आज रात्रौ मध्यरात्रीच्या वेळीं इकडे कसा ? आणि तो मोटरवाला कोण ? "

" ते गिरिधरलाल—तेच माझे शेट ! "

" आणि त्यांचं मध्यरात्रीं इथं काय ? "

" होतं त्यांचं कांहीं काम ! "

" पॉलिशकामाचा कारखाना इथं आहे ? "

" आमच्या शेटचे कारखाने का थोडे थोडके आहेत ? किती तरी ! सतराशें पंधरा कारखाने आमच्या शेटचे. छापखाना तर आहेच, न्यूजपेपर तर आहेच ! फिलम् कंपनी तर आहेच. पॉलिश काम तर आहेच ! फर्निचर तर आहेच ! त्यांचे दिवसाचे कारखाने निराळे, रात्रीचे कारखाने निराळे ! "

" तुझी कामगिरी रात्रीच्या कारखान्यावर वाटतं ? "

" शेटबरोबर इकडे मी आजच आलों—पण—पण—बाळ्या !— " सांवळ्या जीभ चावूं लागला.

" काय रे–असं काय करूं लागलास ? "

" तूं घराकडली हकीगत सगळी नीट नाहीं सांगितलीस. बाबा अड-चणींत आहे तें सांगितलंस–पण बाकीचीं माणसं ? "

" म्हणजे कोण तुझी बायको-मुलगा ? "

" होय. "

" खुशाल आहेत. "

" आणि हिरा ? "

" हिरा ! "

" असं काय रे ? "

" तुला आपल्या घरादाराची खरोखरच काळजी आहे काय रे? "

" म्हणजे ? "

" म्हाताऱ्याबद्दल तुझे शब्द ऐकून मला आलेली शंका अद्याप नाहींशी झालेली नाहीं. "

" इतका नादान नाहीं मी ? "

" हिरा नाहींशी झाली आंबेखोलांतून ? "

" ऑं ? "

" अरे होय बाबा ? "

" ती रे कशी ? "

" सगुणा भावीण, तिची ती बहीण कस्तुरी आणि तो काका बामण या तिघांनीं तिला मुंबईला आणली. "

शृंगारलेल्या खोलीच्या बाजूच्या खोलींतून कोणीतरी खिडकी उघडली. बाळा गावड्यानें वर पाहिलें.

" अरे तीच कस्तुरी ! " बाळानें आश्चर्यानें उद्गार काढला.

" अरे होय ! तीच कस्तुरी ! " सांवळ्या म्हणाला.

" तर मग आतां कसं ? "

" काय तें—कशाचं ? " बाळानें विचारलें.

" हिराला मघाशीं मी त्याच तिसऱ्या मजल्यावर पाहिलें. " सांवळ्या हलकेंच बोलला.

" म्हणतोस काय ? "

" अरे होय–होय ! पण ती जीव देण्याच्या विचारांत होती, कीं काय कळत नाहीं. तिला कोणी तरी खालीं ओढून घेतलें खोलींत ! "

" तर मग त्या टॅक्सींतून तिला कोणी नेलं नाहीं ना ? "

" ऑं ! असं होईल म्हणतोस ? ". काळजींत पडलेल्या सांवळ्यानें विचार करीत म्हटलें.

" पण तूं कधीं नाहीं तो आजच कां आलास ? "

" आमच्या शेटला कांहीं तरी अंदेशा आलीशी दिसते या बाइची. हिनं सांगितलं होतं कीं आज आपली कुठं तरी गाण्याची बैठक ठरलीय म्हणून. शेट येऊन बघतात तर बाई घरांत. तेव्हां ही खोटं बोलली हें तर ठरलंच. त्याच्या पुढचा प्रकार तुला ठाऊकच आहे. पण जा बाबा ! शेट येईल आणि तुला बघील तर मलाच त्रास होईल. आज शेटनं रोजचीं माणसं बरोबर न घेतां मला घेतला तें एकपरी बरंच झालं म्हणायचं. तुझी माझी गांठ पडली. कुठं उतरलायस तूं ? "

" तें तुला सांगतों—पण आतां तूं आणि मी हिराला सोडवायच्या खटपटीला लागलं पाहिजे. हिराला पळवून नेली खास; आणि ती त्या काका बामणानंच—"

बाळाचें बोलणें अर्ध्यावरच राहिलें. कारण मोटरीचा आवाज अगदींच जवळ ऐकूं आला. बाळा पळून जाऊं लागला. सांवळ्यादेखील बराच गडबडला. तो दादरच्या आसपास जाऊं लागला. आतांपर्यंत घडलेला सारा प्रकार गुपचुप घडत गेल्यामुळें कोणी जागें झालें नव्हतें. दुसऱ्या व पहिल्या मजल्यावर लहान लहान ऑफिसें व एखादें दुसरें बिऱ्हाड राहत असे. ती इमारत खुद्द सांवळ्याच्या शेटच्याच मालकीची होती.

पण ती मोटर सरळ आपल्या वाटेनें निघून गेली. त्या दोघांच्या जीवांत जीव आला.

" खरंच, बाळा ! आमचा शेट मघाशीं निघाला तेव्हां तूं आसपास इथंच कुठं तरी होतास ना ! "

" हूं. "

" त्या टॅक्सींतल्या माणसांनीं कायसं मोठ्यानं म्हटलेलं तूं ऐकलंस का रे ! "

" नाहीं ! "

" ' पोफळी-पोफळी '—असं कांहीं तरी म्हटलं त्यांनीं. आमचा शेट वेडपाच आहे तो. त्यानं तरी नीट ऐकलंय कीं नाहीं कुणास ठाऊक. उगाच माझ्यावर धांवला हात उगारून. "

" त्या टॅक्सींतल्या माणसांनीं कसं म्हटलं तें नीट आठवण करून सांग बरं. "

" वायूंच पोफळी " असं म्हटलं वाटतं. "

" हं. हं. आलं माझ्या लक्षांत ! आतां पहांटेला ट्रामगाड्या सुरू होतील ना ? "

" व्हों—पण कां रे ? कुठं जाणार तूं ट्राममधून ? "

" अरे मला आतां चिंचपोकळी गांठली पाहिजे. "

" मी येऊं का बरोबर ? "

" तुझी मदत आतां मला पाहिजेच नेहमीं. मी समजलों सगळं काय तें. तूं मुळींच घाबरूं नकोस. पण मला ह्या कस्तुरबद्दल बरंचस विचारायचं आहे. कदाचित् मला हिच्याकडे केव्हां तरी येऊनच गेलं पाहिजे. बहुधा आजच बघतों. जातों मी हं आतां— "

बाळ्या झटपट निघून गेला. सांवळ्या लगेच दारूच्या दुकानांत शिरला.

बाळ्यानं काढलेलं अनुमान बिनचूक होतें. गिरधरलालशेट चिंचपोकळीच्या नाक्यावर एका बाजूस मोटर उभी करून व मोटरीचे दिवे मालवून आंत बसले होते. थोड्याच वेळांत त्यांस विरुद्ध दिशेकडून मघांचीच टॅक्सी येऊन एका गल्लींत शिरत असलेली दिसली. ती एका चाळीसमोर उभी राहिली. गिरधरशेटनीं आपली मोटर आणखी पुढें घेतली. दिवे मालवून त्यांनीं आपली मोटर बाजूस टेविली. ते काळो-

खांत खालीं उतरले. पण इलेक्ट्रिक कंदीलाचा उजेड टाळणें अशक्य होतें. त्यांनीं दुरून चाळ पाहिली. चाळींतील एका खोलींत माणसें शिरलेली पाहिलीं. तें मागें फिरले.

टॅक्सी मागें परतली. शेठ पुढें आले. त्यांनीं भाडें ठरवलें. टॅक्सी-वाल्यानें दार उघडलें. पण शेठ आंत बसेनात. टॅक्सीवाल्याला आश्चर्य वाटलें. शेठच्या व त्याच्या कांहीं कानगोष्टी झाल्या. शेठ स्वतःच्या मोटरींत जाऊन बसले. शेठची मोटर व ती टॅक्सी एकामागून एक सावकाश चालूं लागल्या. दोन्ही मोटरी त्या तिमजली इमारतीकडे आल्या. सांवळ्या दादरजवळ जमिनींतच लोळत पडला होता. गिरधर-शेठनीं त्याच्यावर एक लाथ हाणली आणि ते माडीवर चढले !

---

# १४ : चोरावर मोर !

गांवदेवीवर नाना शंकरशेठनीं बांधलेल्या देवळाजवळील एका इमार-तींतल्या खोलींत एक साहेबी पोषाख केलेले गृहस्थ लिहीत बसले होते. त्यांचा हात सारखा झरझर चालला होता. मधूनमधून ते आपल्या मन-गटावरील रिस्टवॉचकडे पहात होते. अकरा वाजून गेले होते. त्यांची ऑफिसांत जाण्याची तयारी असावी.

कांहीं पानें लिहून झालेलीं बाजूला पडलींच होतीं व दुसरीकडे प्रुफांच्या गुंडाळ्या पडलेल्या होत्या. कांहीं वेळानें त्यांचें लेखन संपलें. त्यांनीं त्या कागदांना एक टांचणी लावली व प्रुफांच्या गुंडाळ्या उघडल्या. भराभर त्यांनीं प्रुफ करेक्शनवरून नजर फिरविली. नंतर त्यांनीं घरीं आणलेल्या कांहीं वर्तमानपत्रांकडे नजर वळविली.

तालुक्यांचीं अथवा जिल्ह्यांचीं मुखपत्रें असलेल्या किरकोळ वर्तमान-

पत्रांकडे विशेष तें काय पहावयाचें ? पण हल्लीं हे वसंतराव ' सागर '—वरून मात्र हमेश नजर फिरवीत असत. कारण हल्लींच्या दौऱ्यांत त्यांची ' सागर 'च्या संपादकांबरोबर ओळख झाली होती. शिवाय गेल्या अंकांत ' सागर 'मध्यें वसंतरावांच्या व्याख्यानाचा उत्कृष्ट रिपोर्ट आला असून शिवाय खुद्द वसंतरावांचा व्यक्तिपरिचयही आला होता. म्हणूनच वसंतरावांनीं ' सागर 'चा अंक उघडून त्यावरून नजर फिरवली.

वसंतराव हल्लीं कांहीं दिवस सटर–फटर वर्तमानपत्रांवरून देखील नजर फिरवीत असत. त्याला कारण निराळेंच होतें. मुंबईत परत यावयाच्या आधींच त्यांनीं ' मेदिनी 'त एक लेख प्रसिद्ध केला होता. त्या लेखानें अतिशय खळबळ उडवून दिली होती. " लेखक–प्रकाशक–संबंध " असा तो लेख होता. पण त्या लेखांत प्रकाशकांची व संपादकांची बाजू घेऊन लेखकवर्गावर यथेच्छ तोंडसुख घेण्यांत आलें होतें. जणू काय तें भाईसाहेबांच्या मुद्यांना उत्तरच होतें. पण हें उत्तर इतकें खरमरीत होतें कीं अभिनिवेशाच्या भरांत मनाचा समतोलपणा घसरला होता. एकादा लेखक प्रकाशकाला शिव्या कशा देतो, तर दुसरा एकादा थोबाडींत कसा लगावतो, तर तिसरा कराराच्या अटी मोडून मोबदल्याचा पैसा आधींच कसा मागतो, तर आणखी एकादा मोहबतीदाखल घेतलेल्या प्रती स्वतःच कशा विकतो वगैरे गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारांत घडलेल्या हुडकून काढून कोणाचा स्पष्ट नामनिर्देश न करतां वर्णिल्या होत्या.

तें स्फुट प्रसिद्ध झाल्याबरोबर लेखकवर्गांत खळबळ उडाली आणि ' मेदिनी 'वर बहिष्कार घालण्याच्या गप्पा लेखकवर्गांतून ऐकूं येऊं लागल्या. निषेधपर सभादेखील कांहीं साहित्यिक मंडळें भरविणार असल्याच्या बातम्या उठल्या. इतर नियतकालिकांतून या वादग्रस्त विषयावर तर्फेनें अथवा विरुद्ध अशीं स्फुटें व चर्चालेख येऊं लागले. निषेधाच्या सभांच्या वार्तांमुळें तर ' मेदिनी 'चा खप फार वाढूं लागला. पण त्या चर्चालेखांकरितांच हल्लीं वसंतराव बारीक सारीक नियतकालिकें लक्षपूर्वक चाळूं लागले होते.

'मालवण' चा 'सागर' चाळीत असतां त्यांत चर्चालेखाबरोबरच दुसरा एक लेख तितकाच चित्ताकर्षक त्यांना यावेळीं वाटला होता. तो लेख तसा चित्ताकर्षक नव्हता, पण त्यांतील मुद्दा त्यांना विचारप्रवृत्त करूं लागला होता. म्हणून त्या मजकुरावरून त्यांनीं पुनःपुनः नजर फिरविली होती.

हा लेख म्हणजे भाईसाहेबांनीं आंबेखोलच्या हरिजनांस मंदिरप्रवेशाची लायकी प्राप्त करून घेण्यासाठीं सांगितलेले उपाय उद्धृत केले असून त्यांवर केलेली संपादकीय चर्चा होय. यशवंतरावांनीं प्रथम भाईसाहेबांच्या व्याख्यानांतील उतारा दिलेला होता.

"मित्रांनो ! तुम्हांला सामाजिक समता मिळवावयाची आहे. तर ही समता दोन प्रकारांनीं साधतां येते. जे उंचीवर असतील त्यांना खालीं आपल्याकडे सखलांत ओढून घेऊन, अथवा जे सखलांत खालीं असतील त्यांनीं स्वत: उंचीवर चढून उंचीवरील लोकांना खालीं ओढणें याचें नांव उन्नति नव्हे, तर ती अधोगति होय. स्वत: वर चढून उंचीवर असलेल्या लोकांच्या तोलाचें आपण होणें ही खरी उन्नति. तुम्हांला जर पुढारलेल्या वर्गांचे हक्क मिळवावयाचे असतील, तर तुम्ही आधीं स्वतःची सुधारणा करा. आपल्या घाणेरड्या संवयी सोडा. शिकून जाणते व्हा. स्वच्छता घरीं दारीं आंत बाहेर चांगली राखा. तुम्ही स्वतः ओंगळ राहून गांवांतल्या पाणोठ्यावर जाऊन घाण करूं नका. असल्या कृत्यानें समाजाची अधोगति होईल. तुमच्या वाड्यांत तुम्हांला ज्या हल्लीं विहिरी पाडून दिल्या आहेत, त्यांच्या योगानें तुमची अडचण दूर झालेली आहे. त्यांचा उपयोग तुम्ही उत्तम प्रकारें करतां अशी सर्वांची खात्री करून द्या. मग तुम्ही गांवांतील सार्वजनिक पाणोठ्यावर गेलांत तरी हरकत नाहीं. तुमच्याहून खालच्या पायरीचे अस्पृश्य आहेत ते तुमच्या हाताचा आधार घेण्याची वाट पाहत आहेत. तुम्ही त्यांना जोंपर्यंत दूर लोटीत आहांत, तोंपर्यंत तुम्ही वरच्या वर्गांत मिसळण्याच्या गोष्टी कोणत्या तोंडानें बोलणार ? आणि त्या वायफळ वल्गना कोण ऐकून घेणार ? जितक्या सवलती तुम्ही आपल्या खालच्या पायरीवरील

लोकांना द्याल, तितक्याच सवलती तुम्हांला वरच्या पायरीवरील लोकां-कडून हिसकावून घेतां येतील. . . . येत्या विजयादशमीचें सीमोल्लंघन म्हणजे मंदिरप्रवेश होय. . . " वगैरे—वगैरे.

यापुढें भाईसाहेबांनीं मंदिरप्रवेशाची तयारी किती पायासूदपणें केली होती, त्याचें वर्णन दिलेलें होतें व शेवटीं संपादकीय विचार प्रगट केलेले होते.

त्या मजकुरावरून नजर फिरवीत असतां वसंतरावांना भाईसाहेबांची आठवण झाली. वसंतरावांनीं ' मेदिनीं ' तील भाईसाहेबांच्या लेखाचा मोबदला म. ऑ.नें पोचता केला होता. तसें प्रथम करून नंतरच त्यांनीं लेखकांविरुद्ध प्रकाशकांची तळी आपल्या पत्रांत उचलून धरिली होती.

वसंतरावांच्या दृष्टीनें भाईसाहेब सनातनी दिसत होते. भाईसाहेब इतके शिकलेले, समाजसुधारक असून प्रगतीच्या बाबतींत धांवत्या जगाच्या इतकें मागें रहावे, याचें त्यांना आश्चर्य वाटत होतें.

भाईसाहेबांची आठवण होतांच त्यांच्या विरुद्ध स्वभावाच्या वासंतीची आठवण झाल्याशिवाय त्यांना राहील तरी कशी ? किंचित्काल ते 'सागरां'-तील लेखावर विचार करीत असतां दारावर टिचकी वाजली. त्याचें टिचकीकडे लक्ष गेल्यावर खालीं रस्त्यावर मोटरीचा घर्रर्रर्र आवाज त्यांच्या कानीं आला. कोणीतरी आपल्याकडे मोटरींतून आलें असून मोटर निघूनहि गेली हें त्यांनीं पाहिलें. ते जाण्याच्या गडबडींत होते. खिडकींतून त्यांनीं सहज पाहिलें, तों मोटर दिसली तारका फिल्म कंप-नीची ! त्यांनीं लगेच " येस " म्हटलें.

दार उघडलें आणि आंत कोणी पाऊल टाकलें ? पण कल्पना कर-ण्याच्यापूर्वी वसंतरावांचेच उद्गार ऐका ना !

" ओ हो ! हा वेष कुठला ? फिल्ममधील रोलच्या उपयोगाचा कीं काय ? "

वसंतरावांना उत्तर मिळालें नाहीं. वासंतीही खुषींत दिसली नाहीं. वसंतराव उघड्या स्वभावाचे होते. वासंतीहि नवमतवादांत आपल्याही पुढें चार पावलें टाकणारी आहे, अशी त्यांची खात्री झाल्यापासून ते मोठ्या

पेचांत अडकले होते. आंबखोलांतून इमानपुरांत गेल्यावर त्या दोघांचा परिचय नानासाहेबांच्या घरीं वाढून ती वसंतरावांबरोबर मुंबईस यावयास निघाली. भाईसाहेबांचें अशिक्षित, हेंगाड्या, अस्वच्छ खेडवळांत मिळून मिसळून वावरणें तिला आवडलें नाहीं इतकेंच नव्हे, तर तिला त्याबद्दल त्यांचा तिटकाराही वाटूं लागला. वासंतीला प्रसिद्धीची अतिशय हांव होती. लेखिका म्हणून ती ओळखली जाऊं लागली होती. पण यापुढें आतां आपण वरच्या दर्जाची नटी म्हणून प्रसिद्धीला येणार, या महत्वाकांक्षेनें तिनें कॉलेजचें शिक्षणही अर्ध्यावरच सोडण्याचें ठरविलें होतें. पण मुंबईत येऊन 'तारका' फिल्म कंपनीच्या लोकांशीं आपला होत असलेला परिचय कांहीं ठराविक मर्यादेपलीकडे गेल्यास तो वसंतरावाला आवडत नाहीं असें तिला दिसून आलें. वसंतरावांनीं आपली नापसंती अप्रत्यक्षपणें वासंतीला सूचितही केली होती. पण त्यामुळें वसंतराव खरे नवमतवादी नसून त्यांचें मन बरेंच कोतें आहे असें वासंतीला वाटूं लागलें होतें. पण ती डरणारी मुलगी नव्हती.

वसंतरावांनीं स्वागत केलें तरी वासंती जागच्याजागींच उभी होती, तिच्या चेहऱ्यावर किंचित् चिंतेची छटा दिसत होती.

" कां? बसायचं नाहीं वाटतं ?" वसंतराव म्हणाले. बाहेर जाण्याची त्यांना घाई होती खरी. पण वासंतीच्या सहवासापुढें 'मेदिनी ऑफिस'च्या कामाची कसली मातब्बरी ! शिवाय वासंती वर आली आणि मोटर मुक्कामाला निघून गेली हें पाहिल्यावर वसंतरावांनीं साहजिकपणेंच अनुमान काढलें कीं, वासंती बराचसा वेळ थांबणार आहे. म्हणून त्यांनीं आपली बाहेर पडण्याची घाई लपविण्याचा प्रयत्न चालविला.

" तुम्ही तर ऑफिसला जायला निघालांतना ! "

" छे छे ! आमचं ऑफिस म्हणजे कांहीं सेक्रेटरीएट नव्हे. कुठूनहि काम नडून राहिलं नाहीं म्हणजे झालं. "

इतकें बोलत असतां वसंतराव सोत्कंठ नयनांनीं वासंतीच्या नवीन धर्तीच्या मेकप्‌चें दर्शनसुख आकंठ घेत होते. खरोखरच मुंबईत आल्यावर वासंतीच्या मेकपमध्यें बराच फरक प्रत्यहीं पडूं लागला होता.

" मला बसायला वेळ नाहीं फारसा," असें म्हणत वासंती वसंतरावांनीं पुढें केलेल्या खुर्चीवर बसली. " मी आज तुम्हांला कांहीं विचारायला आलें आहें. "

" कां? कंपनींत रहायची जागा मनासारखी नाहीं हीच तक्रार असेल बहुधा! पण तें, मला वाटलं, आपलं अनुभवानं ठरलं म्हणजे बरं! आमच्या सांगण्यानं खात्री पटायची नाहीं. स्वतंत्र विचारांचं असंच असतं. पण इकडे रहायला यायला हरकत नाहीं कांहीं. "

वसंतरावांच्या या उतावीळ उद्गारांचें वासंतीला तशा स्थितींतही थोडेसें हांसू आल्याशिवाय राहिलें नाहीं.

" अहो तें सारं खरं! पण मी म्हणतें काय, तें अगोदर ऐकून तरी घ्यायचं होतं. "

ओ हो हो! 'ऐकून घ्यायचं होतं' हे जे शब्द अथवा ही वाक्यपद्धति सहज वासंतीच्या मुखांतून निसटली, तिच्यायोगानें वसंतरावांच्या मनांत भावी सुखाचे मनोरे कुतुबमिनारहून देखील उंच उठले. हिंदूंमधील स्त्रीपुरुषांच्या वागणुकीच्या बाबतींत असे कांहीं मारपेंच आहेत, कीं बिचाऱ्या स्त्रियांना ते सांभाळतां सांभाळतां जीव पुरेसा होतो. स्त्रियांची मनमोकळेपणाची वागणूक उल्लूवृत्तीच्या पुरुषांच्या मनांत कसल्या कसल्या कल्पना भरून देईल याचा नेमच नाहीं. त्यांची वृत्ति, त्यांची नजर, त्यांची हालचाल, इतकेंचसें काय, पण त्यांच्या बोलण्यांतील शब्दयोजना, यांत देखील कांहीं पुरुष आपल्याला अनुकूल कांहीं आढळतें कीं काय, असें हुडकीत असतात, आणि चुकून बाहेर पडलेल्या शब्दाचें देखील आपल्याला हवे तसे अर्थ करून घेत असतात. वासंती नेहमीं 'तुम्ही–आम्ही' अशा तऱ्हेची अगदीं सरळ भाषा बोलणारी व रोखठोक जाबसाल करणारी. सहज तिच्या तोंडून गेलेल्या शब्दरचनेमुळें वसंतरावांच्या मनांत आशा उत्पन्न झाली. वासंतीच्या अंतरंगाचा ठाव आज लागला असें त्यांना वाटलें. आंबेखोलमध्यें वासंतीचा परिचय झाल्यापासूनच ते वासंतीच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करीत राहिले होते. वासंती भाईसाहेबांना अनुकूल नाहीं हें त्यांनीं पूर्वीच

ओळखलें होतें. आपण तिला अप्रिय नाहीं, हेंही त्यांनीं ताडलें होतें. म्हणूनच आपण भाईसाहेबांच्या मित्रत्वाला बाध आणण्यासारखें वर्तन करीत नाहीं, अशी त्यांनीं आपल्या मनाची समजूत चालविली होती. शिवाय विचारस्वातंत्र्य हें व्यक्तिमात्राला आहेच. या मतस्वातंत्र्याचा त्यांना भक्कम आधार होता. इतकें झालें तरी वासंती आपल्यालाच जोडीदार निवडील कीं काय याविषयींची त्यांना खात्री वाटत नव्हती. तिच्या हालचालींत, बोलण्याचालण्यांत आपल्याला अनुकूल असें अनुमान काढण्यास भरपूर पुरावा मिळण्याजोगे आधार ते बारकाईनें न्याहाळीत असत. आज " ऐकून घ्यायचं होतं " या शब्दांच्या काडीचा आधार बिचाऱ्या वसंतरावांच्या गटंगळ्या खाणाऱ्या मनाला सांपडला. त्यांना थोडासा हुरूप आला. ते शब्द त्यांना अतिशयच गोड लागले. तशा प्रकारची वाक्यरचना कानांला वारंवार ऐकायला मिळेल; तर आपण खरे सुखी होऊं असेंही त्यांच्या मनांत क्षणभर येऊन गेलें.

वासंतीला वाटत होतें कीं वसंतराव " काय तें ?" म्हणून विचारणार आणि मग आपण उत्तर देणार. पण वसंतराव किंचित्काल गोड विचारांत गुंगून गेले होते. स्वैर—स्त्रीपुरुष—व्यवहार विरुद्ध पतिपत्नी—कुटुंबपद्धति यांचीं चित्रें त्यांच्या नजरेसमोर नाचूं लागलीं. क्षणमात्र त्यांना असेंही वाटलें कीं, आपण विवाहबद्ध असून दोघेंही बिऱ्हाड करून एकत्र राहत आहोंत. नियतकालिकांचें संपादनकार्य आपण दोघेंही सहकारित्वानें चालवीत आहोंत. अहाहा ! काय पण मधुर स्वप्न !

पण किती रानटी ! नवराबायकोनें जन्मभर एकमेकांला चिकटून राहणें म्हणजे मागासलेपणा ! या पुढील जगांत ही गोष्ट शक्य तरी आहे का ? मनें बिनसल्यावर, मतभेद झाल्यावर पतिपत्नीनें एकत्र राहणें म्हणजे काय ? शुद्ध जंगलीपणा ! मग आपण सुधारक कसले ?

" काय तुम्ही बोलत नाहीं—मला जास्त वेळ नाहीं इथं उभं राहायला."

अरेरे ! वाक्यरचना बदलली ! वासंती आपल्या नेहमींच्या पद्धतीला-अनुसरून बोलली. वसंतराव तंद्रींतून जागे झाले. त्यांना वाटलें वासंती आपलें मन लपवीत आहे.

" कां ! काय घडलं असं विशेष ! "

" ' तारका ' फिल्म कंपनींत इतक्यांत एक नवीन नटी येत आहे म्हणे ! "

" अशक्य ! "

" समजेल. " रागीटपणानें वासंती म्हणाली.

" आणि आली तरी काय बिघडलं ! "

" मला बाकी कांहीं विचारायचं नाहीं. पण माझ्या कामाला भरपूर वाव मिळाला पाहिजे. "

" एवढंच ना ! तें सगळं पाहतां येईल. आज येतां का आमच्या ' मेदिनी ' ऑफिसांत ! तुमच्या लेखनाचे चहाते कोणकोण आहेत, ते तुम्हांला दाखवतों. "

इतकें म्हटल्याबरोबर वासंतीला वाटलें आपण जावें आज 'मेदिनी' ऑफिसांत. पण तितक्यांत खालून मोटरचा आवाज ऐकू आला. त्याबरोबर ती उठली. वसंतराव अगोदरच उठले होते. आपल्याबरोबर यायला वासंती उठली असें त्यांना वाटलें.

" वेळींच ही गोष्ट मी तुमच्या कानावर घालून ठेवली आहे हं ! " असें वासंतीनें बजावलें. " चला येतां तर आमच्या स्टूडिओंत, " ती पुढें म्हणाली.

वसंतरावांनीं दार ओढून घेऊन कुलूप केलें व दोघेंही खालीं उतरलीं. मोटर उभी होतीच. वसंतरावांना वासंतीबरोबर उघडपणें मोटरींतून अथवा पायांनीं फिरण्यांत परमानंद वाटे. तसली संधि ते सहसा चुकवीत नसत. मोठ्या हुरूपानें त्यांनीं वासंतीच्या मागोमाग मोटरींत पाय टाकला.

" जरा पुढं सरका हं ! " मोटरींतल्या माणसाला उद्देशून वासंती म्हणाली. मोटरींतला गृहस्थ सरकला व तो दोघांस बसावयास जागा मोकळी करून देऊं लागला. तितक्यांत वासंती मोटरच्या पाठीमागच्या बाजूनें दुसरीकडच्या दारानें मोटरींत जाऊन बसली. मधल्या सीटवर बसणाऱ्याच्या पायाखालीं कसला तरी बोजा येणार होता. कंपनींत न्यावयाचें कसलें तरी बंडल तेथें ठेवण्यांत आलें होतें. तें टाळण्या-

करितां म्हणून असो, किंवा बाजूला बसणें कोणालाही अधिक आवडतें म्हणून त्यासाठीं असो, पण ती मोटरींतल्या माणसाच्या उजवीकडे जाऊन बसली. त्यामुळें अर्थातच वसंतरावांना मोटरींत शिरल्यावर वासंतीच्या ऐवजीं त्या मोटरींतल्या माणसाच्या सांनिध्यांत बसावें लागलें! वसंतरावांना अतिशय वाईट वाटलें; आणि असें करण्यांत वासंतीचा कांहीं विशेष हेतु आहे कीं काय याबद्दल ते आपल्या मनांत तर्ककुतर्क लढवूं लागले.

वसंतराव विमनस्क स्थितींतच बसले होते. त्यांना 'तारका' फिल्म कंपनींत जावेंसें वाटेना. आपली धोबी तलावावरील 'मोहिनी' ऑफिसांत जावयाची इच्छा त्यांनीं दर्शविली. त्याप्रमाणें त्यांना त्यांच्या ऑफिसांत सोडून वासंती कंपनींत गेली.

'तारका' फिल्म कंपनीचा स्टूडिओ दादरला होता. भायखळा ब्रिजवरून मोटर चालली असतां एक व्हिक्टोरिया समोरून येतांना वासंतीला दिसली. त्यांत एक घाबरलेली सुस्वरूप स्त्री व तिच्याबरोबर दोन पुरुष होते. त्यांपैकीं एक कांदेबटाटेवाला होता. कांदेबटाट्यांची टोपली व त्यांत एक तागडी इतकें सामान त्याच्या पायाखालीं होतें. त्या कांदेबटाटेवाल्याकडे वासंतीचें लक्ष गेलें. तिला तो माणूस पूर्वी कुठें तरी पाहिल्यासारखा तर वाटलाच पण त्याला नीट पाहून घ्यावेंसेंही वाटलें. तिनें मोटर थांबवायलाही लावली. पण ती गोष्ट कांदेबटाटेवाल्याच्या लक्षांत येतांच त्यानें व्हिक्टोरिया पिटाळावयास लावली. वासंतीच्या मनांत व्हिक्टोरियामागें मोटर घालावयाची होती. पण तिच्या सोबत्यास तें आवडलें नसेल, किंवा तिला स्वतःलाच तें दुसऱ्याच क्षणीं अनुचित वाटलें असेल, पण ती मागें बघत असतां मोटर पुढें पळत होती आणि व्हिक्टोरिया आपल्या वाटेनें धांवत होती.

ती व्हिक्टोरिया के. इ. एम्. हॉस्पिटलकडे जाणाऱ्या आडव्या रस्त्याच्या समोरील दुसऱ्या कडेस असणाऱ्या बोळांत शिरली. त्या बोळांत पांच मजली एक फार मोठी चाळ होती. त्यांतील दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत ती मंडळी शिरली. ती खोली साधारण मानाचीच होती. पण त्या

खोलींत एक गृहस्थ बसलेला होता. हीं तिघें आंत शिरल्यावर तो उठून बाहेर आला. कांदेबटाटेवाल्यानें आपली टोपली व तागडी तिथें उतरून ठेवली व तो चटईवर बसून विश्रांति घेऊं लागला. बरोबरच्या दुसऱ्या इसमानें बाहेरच्या गृहस्थास खूण केली त्याबरोबर तो दादर उतरून निघून गेला. जातांना त्याची मुद्रा सुप्रसन्न व हास्यमुख झाली होती. तो निघून जात असतां त्याच्याकडे कांदेबटाटेवाला बघीत राहिला होता. डोकीचें मुंडासें फेंकून देऊन कांदेबटाटेवाला म्हणतो—

"सांवळ्या! आतां दुपार झाली आहे. तिघांना जेवणाकरितां दोन डबे घेऊन येतों. हिरादेखील भुकेवून गेली आहे. मात्र सावधच रहा. खालच्या दुकानदाराच्या गड्याला वर पाठवून देतों म्हणजे तो आपलं सामान घेऊन जाईल त्या टोपलींतलं."

"हं लवकरच ये." सांवळ्या म्हणाला, "पण हें बघ बाळा, येतांना दोन पैशांचीं भजीं घेऊन ये हं कांद्याचीं चुरचुरीतशीं."

"बरं!" बाळ्यानें म्हटलें; आणि तो धडधड दादर उतरूं लागला. पहिल्या मजल्यावर तो आला तर तो मघांचा खोलींत बसलेला माणूस तिथेंच घुटमळत असलेला बाळाला दिसला.

"कोणाची वाट बघतां?" बाळानें विचारलें.

"एका इसमाला भेटायला आलों होतों. त्याचीच वाट बघीत उभा राहिलों आहे," तो घुटमळणारा म्हणाला.

"पहिल्या मजल्यावर कीं दुसऱ्या मजल्यावर?"

"दुसऱ्या मजल्यावर."

"तर मग इथं कां?"

"तो आला तर त्याला इथं खालींच गांठीन–वेळ नको मग आणखी जास्त घालवायला." असें म्हणून तो सावकाश पावलें टाकींत गॅलरींत दुसऱ्या टोंकाकडे गेला.

बाळा गावडे जेव्हां जेवणाचे डबे घेऊन आला, तेव्हां तो घुटमळणारा माणूस तिथें नव्हता आणि दुसऱ्या मजल्यावर देखील बाळाला दिसल नाहीं.

त्या तिघांनीं जेवणें उरकलीं; आणि थोडीशी विश्रांति घ्यावयाचें त्यांनीं ठरविलें. बाळाला विडीपान कांहींच लागत नसे. पण सांवळ्यानें विडी ओढली व तोंडांत तो वेलचीचे दाणे टाकूं लागला.

" बाळा, अरे हें सगळं कसं जमवलंस तें नाहीं मला सांगितलंस ? ती मोटर जेव्हां थांबली कीं नाहीं, तेव्हां तर मी घाबरलोंच; पण तुझं काळीज सुपाएवढं खरं रे बाबा ! डरलास नाहीं तूं ! "

" ओळखलीस का ती कोण ती ? "

" उं हूं ! "

" नाहीं ? अरे ती नानासाहेबांची मुलगी. नानासाहेब इमानपूरकर ! ते तिकडे धाय मोकलून रडताहेत आणि ही इकडे सिनेमांत येऊन राहिली आहे. कांदेबटाटेवाल्याचा वेष मी घेतला तरी तिनं मला ओळखलं थोडसं. म्हणूनच तुला सांगतों कीं तूं सावध रहा. "

" बरं पण, मी येईपर्यंत तूं हें सगळं जुळवून कसं आणलंस रे ? "

" तुला मी थोडं थोडं सांगितलंच आहे पूर्वीचं आख्यान. त्या रात्रींच मी चिंचपोकळीला गेलों. रस्त्यावरचीच ती चाळ होती. त्या रात्रीं पहांटेपर्यंत सारी धडपड चालली असल्यामुळं हिराच्या जिवाला भीति नव्हती. दुसऱ्या दिवशीं मी अजमास काढण्याकरितां चाळींतून फिरण्याचें ठरविलें. दोन चाळींच्या मधून फिरत असतां माझ्या डोकीवर—"

" हां हां तें मला ठाऊक आहे—ती गंमत ! पत्रावळींत गुंडाळलेलें शेवग्याच्या शेंगांचे बुडखे आणि साली, आणखी काय तें ?—हं सुक्या बांगड्यांचीं टकलीं तुझ्या आंगावर पडलीं. तूं वर बघितलंस, तेव्हां हिराचं तोंड तुला दिसलं. "

" हो. मग हिरानं एक चिठी माझ्याकडे फेंकली. आंत एक कांचेचा तुकडा वजनासाठीं गुंडाळून. त्याप्रमाणें ठराविक वेळीं मी दुसऱ्या दिवशीं ज्योतिषी बनून त्या चाळींत हिंडलों. हिराचा हात बघितला. त्या खोलींतली बाई हिरावर पाळत ठेवून होती. तिची नजर चुकवून मला एक चिठी हिरानं दिली आणि मी एक चिठी हिराला दिली. त्यावरून मला सारा बेत समजला काका बामणाचा.

त्या रात्रीं कस्तुरीच्या घरून हिराला आणल्यापासून काका बामण हिराचा छळ करीत राहिला होता. पण तो आज आपली इच्छा पुरी करणार होता. ”

“ पण त्याच्याबरोबर तो दुसरा कोण ? ”

“ तो दाजीसाहेबांच्या घरांतल्या मावशीचा मुलगा. तो एक जुगारडा आहे. अगदीं भामट्या. तो रात्रौ कुठें तरी भटकत असतो. आज रात्रीं हिराला कुठें तरी दूर पळवून नेण्याचा त्याचा बेत होता. नाहीं ग हिरा ? ”

“ होय. रे दादा ! कस्तुरीनं मला मुंबईला आणली तेव्हां भाईसाहेबांना मी जें पत्र लिहिलं तें काकाच्या हातीं कसं लागलं बाबा कुणास ठाऊक. पण तें पत्र त्याला फारच लागलं. काकाबामण आणि मावशी दाजीसाहेबांचे कान फुसलावून तुम्हांस गोत्यांत आणण्याच्या विचारांत आहेत असा मजकूर मी त्या पत्रांत लिहिला होता. दाजीसाहेबांच्या घरीं मी धुणीं धुवायला केव्हां तरी जात असें. म्हणून मला त्या मावशीचे बेत थोडेसे कळले होते. तें पत्र काकाला मिळाल्यापासून काकानं माझ्यावर अधिकच दांत धरला. ”

“ आज ते दोघे बाहेर कसल्यातरी कामाला जाणार ते रात्रौ आठ वाजेपर्यंत येणार नाहींत, हें कळून आल्यावर मी कादेबटाटेवाला बनलों. आल्यापासून मी माझ्या ओळखीच्या एका गिरणभाईच्या घरीं राहिलों होतों; आज तुझ्याकडे आलों. पण आता तुझा काय बेत आहे हिरा ? ” बाळानें विचारलें.

“ नाहीं. बाळा, मला इथंच काहीं तरी कामधाम मिळालं पाहिजे. मला बाबांना पैसे पाठवायला मिळाले पाहिजेत. घरदार जप्त होऊन गेलं तर बाबा प्राण नाहीं ठेवणार ! मला कोणाचेंही कामधाम करून बाबाला कांहीं तरी धाडलंच पाहिजे. ”

चाळींत कोणी तरी गुणगुणत होता—

“ ठय झिला घराची आठव रे ।
पांच तरी रुपाये पाठव रे ॥

कापल्यापासुन भात खावूनच सरलां
खंडाक धनि येता । दारांत आराडता
पैशे होये घालुंक हातिर त्याच्या
गरज कशी तरि गांठव रे
ठेय झिला घराची आठव रे
पांच तरी रुपाये पाठव रे

सांवळ्या सद्गदित झाला. त्याला आपलें घर आठवलें. खरोखरच आपण नोकरीला लागल्यापासून बापाला घरीं एक पैसा देखील कसा पाठवला नाहीं, दारूच्या पायीं पगार कसा खलास करूं लागलों, हें सारें लक्षांत येऊन सांवळ्याच्या मनाला पश्चात्ताप झाला. त्यानें मनांतल्या मनांत ठरवलें कीं, हिराला कामधाम मिळवून देण्यांत मदत करायची आणि कसें तरी करून चार पैसे घरीं बापाला पाठवायचेच. नशीब त्या गाण्याच्या रचनाकाराची कीं या खेपेला सांवळ्यानें त्याला शिव्या दिल्या नाहींत !

हिरानें तर घरांतून पाऊल काढतांनाच निर्धार केला होता कीं, बापाला पैसा पाठविल्याशिवाय पुन्हां मागें म्हणून परतायचें नाहीं. घराबाहेर पाऊल काढल्यापासून तिच्यावर सारखी संकटपरंपरा कोसळत राहिली होती. पण कस्तुरीच्या वर्तनाचा मात्र तिला उलगडा होत नव्हता. कस्तुरीची भलाईच तिला दिसून आली होती, पण ऐन वेळीं तिनें आपणाला त्या काकाच्या हातीं कसें दिलें हें गूढ तिला उकलेना. कस्तुरनें आपल्या स्वतःच्या आयुष्यांतलीं रहस्यें देखील तिला बहिणीच्या आपुलकीनें सांगितलीं होतीं. पण कस्तुरवर विश्वास यापुढें तरी कसा ठेवावा असा तिला विचार पडला होता.

बाळाला समजून चुकलें कीं हिराचा निश्चय अढळ आहे. झुणकाभाकर संमेलनाची हकीगत ऐकतांना मात्र तिच्या मनांत कसली तरी खळबळ उडत असल्याचें बाळाच्या शोधक दृष्टीला दिसून आलें होतें. तरीही तिला माघारी घेऊन जावें असेंच बाळाला वाटत होतें.

“ बरं, मी चार दिवस आणखी राहिलों तर मग तरी येशील का ? ”

" अं हं ! " हिरानें मानेनें नकार दर्शवीत म्हटलें.

" इकडच्या हकीगतीचें पत्र मी भाईसाहेबांस पाठविलेंच आहे. पण तिकडे मंदिरप्रवेशाचं काय चाललं आहे समजलं नाहीं. "

" हो–तेंच तर कळलं पाहिजे होतं. " हिरा काळजींत पडली.

" म्हणूनच तूंही चल म्हणतों मी. "

" नाहीं–बाबांची ती दशा माझ्यानं बघवत नाहीं;–आणि—त्या–" तिनें जीभ चावली.

" बोल—बोल तरी काय तें उघड. "

त्या किशाचे आणि वहिनीचे ते हालही माझ्यानं बघवत नाहींत–" हिरानं आपलं वाक्य बदलून व्यक्त होऊं पाहणारा मनोभाव मोठ्या खुबीनें लपवला.

" भाईसाहेबांच्या पत्राची मी वाट पहात आहें—" बाळानें आपलें बोलणें स्वतःच मधल्यामध्यें थांबविलें. कारण पत्राची गोष्ट निघतांच हिराला कसलीशी आठवण झाली होती व तिनें आपल्या ओटींतून चार पांच पत्रांची गुंडाळी बाहेर काढून ती बाळाच्या पुढ्यांत टाकली.

बाळानें त्या पत्रांवरून नजर फिरवली.

" हिरा तुला ज्या खोलींत ठेविली होती ती बाई कोण ? "

" ती मावशीची कोणी तरी नातलग आहेशी दिसते, " हिरानें उत्तर दिलें. बाळा पत्रांवरून नजर फिरवीत राहिला होता.

" आणि हीं पत्रें तुला कुठं सांपडलीं ? " तीं पत्रें अरतून परतून पहात व भुंवया फिरवीत बाळानें विचारलें.

" ती बाई निजते तेथील कोनाड्यांत. "

" काकाच्या बरोबर असतो तो— "

" हो ! तो मावशीचाच मुलगा. "

" अरेच्चा ! ओ हो ! हा बेत फारच भयंकर दिसतो आहे— " बाळा बोलून गेला. तो पत्रांकडे बघीत हे शब्द बोलला होता.

" भयंकर ? भयंकर म्हणजे कसला बाळा ? " हिरानें भिऊन विचा

रलें. सांवळ्या तोंड उघडें टाकून ऐकतच होता. तोही चपापून गेला होता. दुपारची डुलकी त्याला डुलवूं पहात होती!

" वेडी कुठली! तसं भयंकर कांहीं नाहीं ग. हिरा! म्हणजे कोणाच्या जिवाला अपघात नाहीं. पण फसवाफसवीचा बेत! काकाचं आणि मावशीचं मोठंच कारस्थान चाललं आहे. मी जाऊं कीं इथंच राहूं चार दिवस?" बाळा विचार करीत अर्धवट स्वतःशीं हें शेवटचें वाक्य बोलत होता.

" मग जाईनास तर आंबेखोलला " हिरानें म्हटलें.

झोंपेंत डुलक्या घेऊं लागलेला सांवळ्या मोठ्यानें उच्चारलेल्या बाळाच्या एखाद्या उद्गारानें मधून मधून डोळे उघडून आपण झोंपेंत नसून सावधपणें सर्व कांहीं ऐकत आहों असें दाखविण्याचा प्रयत्न करीत होता.

" नाहीं, हिरा! मला इथंच आणखी चार दिवस राहिलं पाहिजे. काका इथून जाईल तेव्हांच मी जाईन. " बाळानें म्हटलें.

---

# १५: चिकट आंबील!

माघ महिन्याचे दिवस. सकाळींच येशाप्पा गुरांना सोडण्यासाठीं गोठ्यांत गेला. आधल्या दिवशीं माळल्यामुळें सुकून गेलेल्या सुरंगाच्या वळेसराच्या वेटोळ्याबरोबर किशा खेळत स्वतःशींच गुणगुणत बसला होता. आज्याला गोठ्यांत जातांना पाहून तो उठला; आणि येशाप्पाच्या पाठीमागून गेला.

ते दोघे गोठ्यांत गेले.

" आज्या! मियां जोत बांधतलंय्! " किशा सांगत होता.

" हां. थोर जाल्यार मगे हां—" येशाप्पा किशाची समजूत करण्यासाठीं सांगत होता.

" नाय तर नाय. हो तरी आपलो माजो बैल आसा—माजो धाकलो बैल " असें म्हणून किशानें पाड्याच्या गळ्याभोंवती मिठी घातली. पाडा किशाला चाटूं लागला. येशाप्पाला तें दृश्य मजेदार दिसलें. इतक्यांत रात्रीच्या उरलेल्या अन्नाखरकट्याचें, पेजे-कोंड्याचें आंबोण आणून किशाच्या आईनें गाईच्या पुढ्यांत टेवलें.

" भायर कोन दोन तीन बापये येऊन हुबे आसत. तुमकां इचार-ल्यानीं तेनीं " किशाची आई आपल्या सासऱ्याला म्हणाली.

इतक्यांत त्याच्या कानांत पुढील शब्द पडले—

" हा बघा. गुरांना सोडून घालतो आहे. त्या ताब्यांत तीं गुरं ! " काका बामण म्हणाले.

" किती आहेत मोजा !" दुसरा इसम म्हणाला.

" सटव्या ! गुरांकडे लक्ष ठेव ! दोन बैल, एक गाय, एक म्हैस आणि तें एक वासरूं !" काकांनीं शेपट्या मोजून म्हटलें. येशाप्पा नुसता टकमक पहातच राहिला. सटव्या गोठ्यात शिरला. येशाप्पानें कपाळावर हात घेतले.

" चल ! माजो बैल हो—तुजो न्हय जा ! " किशा म्हणाला.

" थोबाडींत मार त्या कारट्याच्या !" काका डोळे वटारून म्हणाले व नंतर ते येशाप्पाकडे वळले ; " येसग्या ! चल घरातल्या मुद्या दाखव बेलिफसाहेबांना ! "

" कित्याक् बाबानु हो माजो छळवाद माडल्यात ? घरांत मुद्यो आसत त्यो फक्त बियाच्यो ! माकां करज टकवंचा नाय आसा. खरा आसलां तरी नाय् , नीं खोटां आसलां तरी नाय्. पण माझ्या घरांतल्या वीं भाइर काडूं नकात."

" अरे जा ! शेतकीचे प्रयोग आहेत ना मुरं ! त्या प्रयोगानीं कुड-वाच्या जागीं खंडीभर पीक येत असेल. आतां काय तोटा पडला आहे ? कशाला कांगावा करतोस ? लोकांचें देणें देण्याची वासनाच नाहीं. कोटांत

जाऊन साचेपणाचे आव आणतोस नाहीं!" असें म्हणून मग काका आपल्या गड्याला म्हणाले, "सटव्या, बेलिफ साहेबांना घेऊन घरांत चल आणि मुड्या मोज."

सटव्यानें मुड्या मोजल्या. त्या फक्त पांचच भरल्या. सटव्यानें त्या ढकलीत ढकलीत बाहेरच्या पडवींत आणल्या. येशाप्पा कपाळावर हात घेऊन खोंगीं घालून बसला होता.

काका आणि बेलीफ यांनीं किंमतीची आकारणी केली. काकांनीं गुरांची आणि मुड्यांची मिळून किंमत सरासरी पाउणशें रुपये ठरविली. बेलीफ शंभर रुपये लिहिणार होता, पण त्यानें काकाच्या डोळ्यांकडे पाहून काकांच्याच शब्दाला मान दिला.

पण आतां बाकीच्या रकमेचें काय?

"असतील ना घरांत भांडींकुंडीं?" काका म्हणाले.

"फुटलीं तुज्या कपालार!" घरांतून कर्कश आवाज आला. किशाची आई दणदणत होती.

"ऑं?" काकानें संतापानें उद्गार काढला.

"मियां दारातल्या रेड्याक हुनतंय्—मियां काय दुसऱ्या कोनाक हुननय् नाय!"

बेलीफाला आणि सटव्याला हांसूं आवरत नव्हतें. काका मात्र त्यामुळें अतिशय चिडले.

"सटव्या! गाडगीं मडकीं काढ बाहेर!" काका गर्जून म्हणाले.

"आसा रे बाबा, मडक्यां घरांत याक वळसावल्याशिवाय. तां तुयां घेऊन जा. मावो माजो घेयत शेळकुंड पेटवून मातर आर्दी निरडी बांधा!"

काकानें अभद्र शिवी हांसडली, आणि ते घरात भांडींकुंडीं पाहूं लागले. एक दोन भांडीं त्यांनीं बाहेर स्वतःच्या हातांनीं नेलीं. घरांतून तणतणण्याचा आवाज त्यांच्या कानांवर आदळत होता. त्याला उत्तरादाखल कांकानीं एक इरसाल शिवी हांसडली. अभद्र शिवी किशाच्या आईला सहन होण्यासारखी नव्हती.

सटव्यानें बैलांच्या व गाईच्या दावणीला हात घातला होता. त्याबरो-

वर वांसरूं हंबरूं लागलें. किशानें वांसराला सोडलें. त्यावेळीं गाईनें हंबरडा फोडला कारण वासराला सटव्यानें पकडले होतें. गाईचा व बैलांचा हंबरडा ऐकून येशाप्पाच्या डोळ्यांतून धारा वाहूं लागल्या.

" सायबांनुं! तुमी करतात ह्यां बऱ्याचा न्हय. पाया पडतंय तुमच्या!" येशाप्पानें खरोखरच हात जोडले. " कुळवाडयाचो जलम अगर्दी वायट्. जो कुळवाडयाचो तोच कुणगो करताल्याचो. मगे तो बामन आसो नायतर कुळवाडी आसो. कुळवाडयाक बगा पोरापेक्षां ढोर अधिक वाटता! गोठ्यांतला गोरूं ओढून काढलांलां कुळवाड्याच्या डोळ्यांनीं बगवाणा नाय. हडे बगा." पोटावर हात मारून येशाप्पा म्हणाला, " सायबांनूं, हडे बगा! आंतडीं माजीं तटातटा तुटतत. माकां ठकवंची वाखा नाय! हो नाय!"

" तर—तर! अगदीं धर्माचा अवतार! मुलगा नोकरीला आहे! मुलगीला तीन चार प्रकारांनीं मिळकत आहे. आणि अझून पैसे भरीत नाहींस!"

" एक हासो भरलो मा मियां!"

" पण त्या एका हप्त्यानं काय होणार!"

" ढोरां ओढणारे आतां म्हार नकोत तर! दुसरेच तयार जाले!" घरांतून शब्द ऐकूं येऊं लागले. आतां बेलीफाला देखील राग येऊं लागला.

" कुळवाडी कोन वापडे ठकवनारे आसतीत ते ठकवीत आसतीत, पन मियां तेतुलो न्हय. आजवर मियां धन्याचो, कोनाचो खंड ठकवलंय नाय. सरकारानं दस्ताची सूट दिली, पन कोनी कोनी धन्यांनीं कुळांक दिली नाय. सरकाराक वापडया कसां समाजतालां ह्यां आमचां कराम? पन मियां कद्दीं बाकी टेवलंय तर सांगा. ह्यां कराज देवंक गावला नाय. पन हातींत पैसोच नाय. त्येकां मियां काय बरां करूं? धरूं नकात माजीं गोरवां! मियां हासो भरतंय—हात जोडतंय, पायां पडतंय. आतां महिन्या भरयान भिजवाणेक बीं होयां! बींच न्हेलात, तर मियां उपां कसो आणि कुणगो पिकंव कसो!"

" कशाला वटवट लावली आहेस ? रडण्याचं ढोंग करतोस ? सटव्या ! चल घेऊन त्या गुरांना ! "

" काका ! बैलाचो गळो सोडा आणि माजो गळो धरा. कुळवाड्याक गोरवांपरिस काय थोर नाय ? माज्या गोठयांतलां गोरूं भायर काढूं नकात हो ! " येशाप्पानें गाईच्याहीपेक्षां हंबरडा फोडला !

सटव्याचा हात नरमला ! बेलीफ हळहळला.

" असां काय तां ? पुरूस तुमि न्हय ? अगेऽबाये ! अशे काय ते पडले ? वांदर मेलो ! " शेवटचे दोन शब्द तिनें उघड उघड काकालाच म्हटले होते. ती घरांत गेली. ती चुलीकडे कायसें करीत होती.

रागाच्या सपाट्यांत भांडीं बाहेर काढण्याकरितां काका घरांत घुसले. मुंबईंत पराकाष्ठेचे प्रयत्न करून देखील हिरावर सूड घ्यावयास मिळाला नाहीं, म्हणून गेले चार महिने धुमसत राहिलेल्या या निखाऱ्यानें पेट घेतला होता. त्यानें एक तांब्या घरांतूनच बाहेर फेंकून दिला. काकानें बेलिफाला आंत येण्याची सवड दिली नाहीं. बेलीफ वगैरे सारीं माणसें बाहेरच होतीं. काका माजघरांतल्या काळोखांत पाऊल टाकतात तोंच त्यांच्या सर्वांगावर अर्धवट गरम असा चिकट पदार्थ पसरला व त्यांत ते न्हाऊन निघाले !

किशाची आई बाहेर दारांत येऊन ऊर बडवून ओरडूं लागली—

" अरे धावां रे ! रे माकां सोडवा रे ! माज्या हातिंतलां आंबलीचां मडक्यां घेऊन काकान् फोडल्यान् ! माजी आंबील उपडी केल्यान् ! रे ! हो सरकारांतलो मानुस दिखील असो कसो ? रे ! माज्यो गाडग्यो मडक्यो फोडल्यानीं ! रे धांवा रे धांवा. "

असें ओरडत किशाची आई घराबाहेर पडली ! शेजारचीं माणसें धांवून येऊं लागलीं. येशाप्पा बाहेरच होता. घरांत शिरलेले काका बाहेर येईनात. बेलीफाला भीति वाटूं लागली. गैरकायदा वर्तनाचें स्वरूप आपल्यावर येण्याचा संभव बेलीफास दिसूं लागला. त्यानें काकास हांका मारल्या. पण आंतून ' ओ ' देखील येईना.

येशाप्पाला मूर्च्छा आल्यासारखीच झाली होती. माणसें जमूं लागलीं

होती. बाळा गावडे धांवून आला. त्याला दम लागला होता. तो धांवून धांवून दमला होता.

" बेलीफ साहेब ! काका कुठें आहेत ? येशाप्पाचा एक हप्ता जमा करून घ्या आणि त्याचीं गुरं सोडा ! " बाळा अडखळत अडखळत म्हणाला.

चार पांच असामी व बेलीफ घरांत रिघले. त्यांनीं पाहिलें तों काका डोळे चोळीत होते ! त्यांच्या नाका डोळ्यांत चिकट आंबील भरली होती ! सर्व कपडे आंबलींत रंगले होते फुटलेल्या मडक्याच्या खापऱ्या सभों-वतीं पडल्या होत्या. आणि मागच्या दारीं कोपरापर्यंत हात आंबलींत भरलेले अशी किशाची आई " माजां आंबलीचां मडक्यां फोडल्यान् रे ! " म्हणून ओरड करीत होती !

---

# १६ : हरिजनांचा देवालय-प्रवेश.

विजयादशमीचा आंबखोलचा मंदिरप्रवेश सर्व महाराष्ट्रभर गाजला होता. देवालयाच्या गाभाऱ्यापर्यंत अस्पृश्य लोक दांडगाईनें घुसणार अशी बातमी पसरल्यामुळें गांवकरी लोक आपल्या देवालयाचें पावित्र्य राखण्या-साठीं जमले होते. राजाभाऊ हे त्यांचे म्होरके होते. सरकारांत अर्ज करून त्यांनीं पोलीसांची मदत घेतली होती. ह्या गोष्टी आगाऊच प्रसिद्ध झाल्या-मुळें गांवोगांवची मंडळी देखील आंबेखोलच्या जगदीशाच्या जत्रेला जमली होती.

भाईसाहेबांनीं आपल्या लोकांना लावलेली शिस्त फार वाखाणण्यासारखी होती. अत्याचार करण्याचा त्यांचा विचार नव्हता. पण प्रचंड समु-दायाचा तोल आयत्यावेळीं ताब्यांत राहत नाहीं. अत्याचारानें महत्कार्य साधण्यासारखें असलें तरी तें टाकून अनत्याचारानें साध्य होणारें अल्प यशच अधिक महत्वाचें असें भाईसाहेब मानीत असत. पोलीस

लोकांची भीति भाईसाहेब व त्यांचे अनुयायी यांस वाटत नव्हती. कारण गांवांतून आजवर सरकारांत जे नांवानें अथवा निनावी अर्ज गेले होते, त्यांच्या आधारानें सरकारनें आजवर जी कसून गुप्तपणें चौकशी चालविली होती, त्यावरून आपण हे अत्याचारी चळवळ्ये नसून सनदशीरपणें ग्रामोद्धार करणारे आहों, ही खात्री कोणाचीही झाल्याशिवाय रहाणार नाहीं, असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. अस्पृश्य जनता तर बेफाट जमली होती, पण देवालयांत जाणारे जे लोक निवडले होते, ते फक्त भाईसाहेबांच्या शिकवणींत तयार झालेले तेवढेच घेतले होते.

मंदिरप्रवेशाच्या वेळीं जेव्हां विरोधीपक्षानें उचल केली तेव्हां सर्वांसमोर उभे राहून भाईसाहेबांनीं सर्व लोकांना उद्देशून " ग्रामसंस्थेंत ग्रामदेवतेचें कार्य " या विषयावर व्याख्यान दिलें. गांवांतील देवालयें हीं ग्राम-संघटना सुदृढ करण्याकारितां स्थापिलीं गेलीं आहेत, गांवांत बखेडे उत्पन्न करण्याकारितां नव्हेत. त्या देवालयांत जाण्याचा हक्क अखिल जनतेला आहे, तो कोणत्याही विशिष्ट वर्गालाच फक्त आहे असें नाहीं. देवालयाचा शुचिर्भूतपणा नष्ट होत असेल, तर तो जसा अस्पृश्याकडून तसाच अपवित्र स्पृश्याकडूनही नष्ट होत असतो. अशा प्रकारचे अनेक मुद्दे विशद कर-णारें व्याख्यान झाल्यानंतर दृढ निश्चयानें जेव्हां सर्व अस्पृश्य भाईसाहे-बांच्या नेतृत्वाखालीं मंदिरप्रवेशास निघाले, तेव्हां प्रतिपक्ष, आपला जमाव कमी आहे असें पाहून व नैतिकबळ आपल्या बाजूला नाहीं असें जाणून सामोपचाराचें बोलणें लावण्यास तयार झाला. त्याच संधीचा फायदा घेऊन भाईसाहेबांनीं आपल्या अनुयायांस एकदम गाभाऱ्यापर्यंत न नेतां गाभाऱ्याच्या अलीकडील दरवाजापर्यंतच नेऊन देवदर्शन करविलें, आणि मोठ्या शिताफीनें दंग्याचा प्रसंग टाळला. पण त्यामुळें भाईसाहेबांच्या शत्रूंचा अगदींच नाइलाज झाला. कारण ह्या मुत्सद्दीपणामुळें भाईसाहेब सर्वच पक्षांना अत्यंत प्रिय झाले आणि हरिजनांचा व भूमिजनांचा त्यांच्यावर अधिकच विश्वास बसला. साक्षरता-प्रसाराच्या कार्यांत त्यांना अधिकाधिक अनुयायी मिळूं लागले व त्यांच्या प्रचाराचें जाळें लांबवर पसरूं लागलें.

या महत्वाच्या समाजकार्यामुळें त्यांना आंबेखोलमधून हालतां येत नव्हतें, पण तरी देखील त्यांना हिराबद्दल चिंता वाटत असे. विशेषतः दिपवाळींतल्या सामुदायिक पोहेभक्षण-प्रसंगीं तर त्यांना हिराच्या सह-कार्याची फारच तीव्र जाणीव झाली. प्रथम बाळाकडून येणाऱ्या पत्रां-वर त्यांनीं वेळ काढला. नंतर त्यांना हिराचें पत्र येऊं लागलें.

विजयादशमीच्या मंदिरप्रवेशानंतर मुंबईहून काका पुन्हां आंबे-खोलास आले. ते सर्वच बाबतींत पूर्ण निराश झाले होते. मुंबईत हिरा त्यांच्या हातची निसटली होती. मंदिरप्रवेशाच्या दंग्यांत भाईसाहेबांचीं हाडें खिळखिळीं होतील व त्यांचा अवतार संपेल, निदान त्यांना भयंकर दुखापत होऊन ते जन्माचे अधु होतील, अशी त्यांना मोठी आशा होती. पण तीही सफल झाली नाहीं. पोलीस खात्याकडे केलेल्या निनांवी अर्जांचा परिणाम होऊन भाईसाहेबांच्या चळवळीस आळा पडेल म्हणून त्यांनीं वाट पाहिली, तर जत्रेच्या दिवशीं ज्या जुगारच्या टोळीस पकडण्यांत आलें त्यांत काकाच्या पक्षाचीच कांहीं मंडळी पकडली गेली होती. या सर्व उलटलेल्या डावामुळें संतप्त होऊन त्यांनीं सगळ्याचें उट्टें येशाप्पावर काढावयाचें ठरविलें आणि वकीलांच्या सहाय्यानें घाई करून कोर्टाकडून दाव्यांचा निकाल शक्य तितका लवकर करून घेतला.

काका आंबेखोलास आल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ कांहीं दिवसांनीं बाळा गावडे देखील आंबेखोलास येऊन भाईसाहेबांस पूर्ववत् मदत करूं लागला. तो येऊन दाखल झाल्यावर भाईसाहेब कोल्हापुरास जाऊन आठ दिवस राहून आले. कोल्हापुरांत मुक्काम असतांना त्यांना फिल्म कंपनीच्या जगांत वावरावयास मिळालें. त्या ठिकाणीं त्यांना ज्या इतर कंपन्यांच्या हालचाली कळल्या त्यावरून त्यांना कस्तुर, वासंती व हिरा यांचीही खरी खोटी माहिती कळूं लागली.

आंबेखोलांत प्रौढ साक्षरांची साक्षरता कायम टिकविण्यासाटीं त्यांनीं छोटेंसें वाचनालय लहान प्रमाणावर सुरू केलेंच होतें. त्यांत जीं वर्त-मानपत्रें येत असत, त्यांत फिल्म कंपन्यांच्या जाहिराती व त्यांच्या हाल-चालींच्या हकीगती प्रसिद्ध होत असत. असल्या हकीगती वाचण्याकडे भाईसाहेबांचा कल पूर्वी नव्हता आणि त्यांना तितका वेळही नसे. पण

मराठी साहित्य व साहित्यिक यांच्या कामगिरीचाही त्यांत ठावठिकाणा लागत असल्यामुळें, ते केव्हां तरी त्या मजकुरावरून नजर फिरवीत असत. त्यानंतर ते स्वतः कथानक लिहिण्याचा प्रयत्न करूं लागल्यामुळें त्यांचें तसल्या मजकुराकडे लक्ष जाऊं लागलें. कस्तूर ही फिल्म कंपनींत जाणार असल्याची गोष्ट बाळाकडून भाईसाहेबांस समजली होती. कस्तुरनेंच हिराला आपल्याबरोबर मुंबईस नेली हेंही त्यांना ठाऊक होतें. तेव्हां हिराच्या जीवनाला कोणतें वळण आतां लागतें, हें जाणून घेण्याची त्यांची जबर इच्छा होती. मुंबईसारख्या शहरांत दारूबाज भावाशिवाय तिला रक्षणकर्ता कोणी नसल्यामुळें ती मायावी लोकांच्या जाळ्यांत केव्हां कशी अडकेल याचा नेम नाहीं, अशी धुगधुगी त्यांस लागून राहिली होती. येशाप्पाचा मुलगा सांवळ्या, चांगला नोकरीला लागलेला. त्याच्याकडून कसलीच मदत बापाला होत नाहीं अथवा त्याला घराची ओढही नाहीं. पण खेडेगांवांत वाढलेली अल्पशिक्षित हिरा आपल्या बापाला संकटांतून सोडविण्यासाठीं सुखदुःखाची पर्वा न करितां घराबाहेर पडते ही एकच गोष्ट भाईसाहेबांना तिच्याबद्दलचा आदर वाढविण्यास पुरेशी होती. पण तिच्याबद्दल अत्यंत जिव्हाळा, एक प्रकारचें जें भाईसाहेबांस वाटे, तें मात्र तेवढ्याच कारणामुळें नव्हे. त्याला दुसरेंच कारण होतें. एक शिक्षणांतील फरक तेवढा जर वजा केला, तर इतर बाबतींत तिच्या आवडीचे विषय सगळेच भाईसाहेबांसारखे होते. इतक्या अल्पशिक्षित कुमारीच्या ठिकाणीं असे सुसंस्कृत विचार आले कोठून? आपणाला जी समाज-कार्याची आवड, तीच तिला कशी वाटूं लागली. आपल्या मित्रानें किंवा पाठच्या भावानें जसें आपणास सहकार्य केलें असतें, तसें यथा-शक्ति सहकार्य करण्यास ती कां उत्सुक व्हावी? ज्या गोष्टी वासंतीसारख्या मुलीनें कराव्या त्याच गोष्टी करण्यांत हिराला कशी आवड उत्पन्न झाली? हिराचे उदात्त विचार वासंतीच्या ठिकाणीं असते तर किती बरें झालें असतें! तिनें कितीतरी समाजकार्य केलें असतें. बिचाऱ्या हिरालां वासंतीइतकें शिक्षण लाभलें नाहीं. तेवढी जोड जर तिला मिळाली असती तर—?

न जाणो, तीही शिक्षित झाल्यावर वासंतीच्या वळणावर गेली असती तर? मग तिचा उपयोग काय होणार होता कुटुंबास अथवा समाजास? पण—पण शिक्षित न होतांदेखील मुंबईच्या वातावरणांत हिरा वासंतीसारखीच चंचल होणार नाहीं कशावरून? ती कस्तुरच्या बरोबर निघून गेली. कस्तुरच्याच सहवासांत वागणारी. मतांत व वर्तनांत परिवर्तन व्हावयास कांहीं वेळ लागत नाहीं. आतां आंबेखोलची हिरा मुंबईची रहिवासी झाली. पण ती आतां पार बदलून गेली असेल काय?

असल्या शंका भाईसाहेबांस येत असत. कारण 'तारका' फिल्म कंपनींतून फुटून निघालेल्या 'कुवलय' फिल्म कंपनीच्या जाहिरातींत सौ. देशपांडे या नवख्या नटीचे फक्त बस्ट फोटो व तेही फक्त नटी वेषांतलेच प्रसिद्ध होत असत; व तो चेहरा भाईसाहेबांना थेट हिरासारखा दिसे. त्या फोटोवर नजर गेल्यानंतरच भाईसाहेबांच्या मनःसागरांत वरीलसारखे विचारतरंग हेलकावूं लागत असत.

पण पुनः त्यांचें दुसरें मन त्यांच्या शंका निरसन करूं लागे. हिराचें पत्र जें येई त्यांत ग्रामोद्धार चळवळीच्या कार्याची विचारणा अत्यंत कळकळीनें केलेली असे. साक्षरताप्रसार, शेतीचे प्रयोग, वाचनालय, मंदिर-प्रवेश, पण या सर्वांहूनही अधिक म्हणजे आरोग्यरक्षण व रोगनिवारण या गोष्टींबद्दल ती आस्थापूर्वक चौकशी करीत असे. तिचें येणारें लहानसें पत्र या व असल्याच प्रश्नांनीं भरलेलें असे; पण स्वतःच्या व्यवसायधंद्याची त्यांत कांहींच माहिती दिलेली नसे.

पण या सर्वांवर ताण करणारी व भाईसाहेबांना कुतूहलास्पद वाटणारी अशी आणखी एक गोष्ट होती. आंबेखोलमधील गरीब परिचितांची चौकशी करीत असतांना येशाप्पा व त्याच्यावरील संकटपरंपरा या संबंधींचा ती कधीं एका अक्षरानें देखील उल्लेख करीत नसे. ज्या पत्रांत ती छोट्या किशाची किंवा त्याच्या आईची चौकशी क्वचित् त्या प्रसंगीं करी, पत्रांत येशाप्पाचें नांव देखील तिनें कां लिहूं नये बरें? या बाबतींत तिचा उदात्तपणा भाईसाहेबांस पटून येई. आपल्या बापाला आर्थिक मदत करण्याकरितां गेलेली ही मुलगी. पण आपल्या बापाच्या विपन्नावस्थेची काळजी प्रद-

शित केल्यास अप्रत्यक्षपणें मदतीची याचना केल्यासारखी कदाचित् होईल या भावनेनें ती स्वाभिमानी मुलगी पत्रांत चुकून देखील येशाप्पाचें नांव घेत नाहीं, हें न कळण्याइतके भाईसाहेब लेचेपेचे नव्हते. या सर्व गोष्टींमुळें हिराही खरोखरच आंबेखोलचा कोहिनूर आहे असें त्यांस नेहमीं वाटे.

हिराच्या मनांत आपल्याबद्दल कोणती भावना वसत असेल या विषयींची कल्पना ते आपल्या मनाशीं केव्हां केव्हां खेळवीत असत. पण तसें करतांना एकच गोष्ट प्रामुख्यानें त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राही. काकाच्या तावडींत ती मुंबईस सांपडली असतांना आंबेखोलहून मुंबईस गेलेल्या पत्रांची पुरचुंडी तिनें कशी हस्तगत केली, आणि प्रतिपक्षाच्या कारस्थानांचा सुगावा तिनें कसा चतुराईनें लावला, हें त्यांच्या मनांत वारंवार येई. एकाद्या पत्नीनें जशी पतीच्या कल्याणाची जागरूकता दाखवावी, तशी हिरा आपल्या बाबतींत दाखवित असें भाईसाहेबांस वाटे. दुसरें असें कीं ज्या हकीगती तिला बाळा गावड्याला पत्र पाठविलें असतां सहज कळण्यासारख्या होत्या, त्या हकीगतींची माहिती हिरा आपणाकडूनच कां घेते ? बाळा सालस माणूस व तिच्या पूर्ण परिचयाचा. तरी-देखील ती बाळा गावड्याला कधीं चुकूनसुद्धा का पत्र लिहीत नाहीं ? लोकापवादाला भिऊन ती असें करीत असेल असें मानण्याशिवाय गत्यं-तरच नाहीं. आणि तसें जर मानलें, तर आपणाला पत्रें पाठविण्यांत तोच लोकापवाद आड येत नाहीं काय ? तसें पाहूं गेल्यास आपल्याबद्दलचा लोकापवाद गांवांत होताच. पण बाळाबद्दलचा मात्र नव्हता. तर वास्त-विकपणें आपल्याशीं संबंध तोडून बाळाला पत्र पाठविणेंच तिला जास्त श्रेयस्कर होतें. तसें केल्यानें तिचा सोंवळेपणा थोडा तरी अबाधित राहिला असता. पण तसें न करितां लोकापवाद सहन करण्याचेंही धाडस पत्क-रून हिरा आपल्याला पत्र लिहिते ! आणि सौ. देशपांडे ! तीच तर हिरासारखी दिसते !

भाईसाहेबांच्या विचारपरंपरेची दिशा अशासारखी होती, पण हे विचार घोळवीत राहण्यास त्यांच्या मनाला फुरसत तरी कोठें होती ?

ग्रामोद्धाराचें कार्य हातीं घेणाऱ्यास स्वतःच्या कामाकडे लक्ष देण्यास वावच मिळत नाहीं. वर्षाचे बाराही महिने कांहींना कांहीं पाटीशीं असावयाचेंच.

आपल्या घरांत भाईसाहेब आज माडीवर बसले होते. त्यांची मेहनत करून झाली होती. दूध पिऊन ते क्षणभर बागेंत फिरले. नंतर माडीवरील आपल्या खोलींतील टेबलाजवळ बसले. संध्याकाळीं फुलणाऱ्या मोगऱ्याची एकच टपोरी कळी त्यांनीं खुडून आणलेली टेबलावर ठेवली होती. मोगऱ्याच्या त्या डहाळीवर ती एकच कळी होती. काल पाणी घालतांना गड्याला कसली लहर आली कोणास ठाऊक! पण त्यानें त्या कळीपाशीं नाक नेलें होतें. वास्तविकपणें गडी माणसांत असलें वर्तन दिसणें म्हणजेच एक महदाश्चर्य! कारण सरळ धोपटधडा त्यांचा. न फुललेली कळी तोडावीशी वाटली, तर तीं माणसें ती पटकन् खुडून घेतील. त्यांचे बिचाऱ्यांचे काय काव्यमय विचार असतात? पण माडीवरील खिडकींतून असा प्रकार घडलेला त्यांनीं पाहिला होता. तो प्रकार पाहून त्यांना आश्चर्यही वाटलें होतें. गडी दुसरीकडे गेल्यावर भाईसाहेबांनीं मुद्दाम बागेंत जाऊन ती कळी पाहिली होती. इतर आजूबाजूच्या कळ्यांपेक्षां ती कळी आकारानें व सौंदर्यानें बरीच मोठी व टकटकीत दिसली होती. त्यावरून ही आजच फुलणारी आहे कीं काय अशी शंका गड्याच्या मनांत येऊन त्यानें आपली संशयनिवृत्ति करून घेतली असली पाहिजे असें भाईसाहेबांनीं ताडलें. त्यांची स्वतःची वास घेण्याची पद्धत तशीच होती. जें फूल त्यांना तोडावेसें वाटत नसे, झाडावरच राखावयाचें असे, त्याचा वास घ्यावयाचा झाल्यास तें फूल तोडून नाकापाशीं न आणतां आपलें मस्तक लववून नाक फुलापाशीं नेऊन त्याचा सुवास घेत असत. ही त्यांची पद्धत वारंवार त्या गड्याच्या नजरेस पडल्यामुळें त्यालाही तसें करून पाहण्याची लहर आली असावी. आज ती कळी भाईसाहेबांनीं आपल्या हातानें खुडून आणून आपल्या लिहिण्याच्या टेबलावर ठेवली होती.

त्या कळीकडे ते पहात होते. मस्तकांत विचार कोणते घोळत अस-

तील कोणास ठाऊक. पण त्या फुलाकडे त्यांची नजर होती. काल हीच कळी लहान असतांना जरी गड्यानें नाकानें स्पर्शिली असली, तरी ती पूर्वाघ्रात असें म्हणतां येईल काय? आतां ही उमलणारी कळी आपण हुंगीत आहोंत, तर हिला अनाघ्रात म्हणतां येणार नाहीं काय? किती सुंदर ती कळी? त्यांनीं तिला उचलून हातांत घेतलें!

ती कळी जणूं काय आपल्याशीं बोलत आहे असें त्यांना वाटत असावें. आणि कळी तरी काय बोलणार?

" पाकळ्यांच्या आवरणांत माझं गंधभांडार सुरक्षित आणि पवित्र राहिलेलं आहे. दुर्गंधाची झुळूकही त्याला लागलेली नाहीं. त्याला कसल्याही स्पर्शानं मलीनता आलेली नाहीं. आणि आतांच उमलूं लागणाऱ्या पाकळ्यांतून बाहेर पडणारा सुवास हा अगदीं अभिनव आणि अनुपभुक्त नाहीं काय? मग संशय कशाला घेतां? बाहेर उगवलेलं फूल घरांतील पुष्पपात्रांत आणून ठेवण्यांत शंका कशाला म्हणून घ्यावी कोणी? "

आणि तितक्यांत एक पाकळी किंचित् अलग होत असलेली दिसली. भाईसाहेबांनीं कळी टेबलावर ठेवली आणि त्यांनीं डोळे झांकले.

गडी खालीं वावरत होता. खालीं दुसरा कोणी तरी आला असून तो गड्यापाशीं आपली चौकशी करीत असावासें त्यांना वाटलें. पण तिकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. उद्यांच फाल्गुन पौर्णिमा होती. शिमग्याच्या पांच दिवसांत मद्यपानबंदी आणि बीभत्स शब्द न उच्चारणें याबद्दल त्यांनीं जो उपदेश खेडुतांस केला होता, व जो अमलांत आणण्याचें खेडुतांनीं कबूल केलें होतें, त्याचें प्रत्यंतर पहाण्याचा उद्यांचा दिवस होता. त्यांनीं शेजारच्या खोलीकडे दरवाजांतून पाहिलें.

त्या खोलींतील धुणीं वाळत टाकण्याच्या दांडीवर दाजीसाहेबांचा डोकीचें तेल पुसण्याचा पंचा लटकत होता. गड्यानें तो वाळत टाकला असावा. दाजीसाहेब मालवणास जातांना तो न्यावयास विसरले असावे.

त्या पंचाकडे दृष्टि वळतांच तें फडकें ज्या मस्तकाचें तेल पुसून टाकीत असे, तें मस्तक आणि नंतर दाजीसाहेबांची ती सगळीच देहयष्टि भाईसाहेबांच्या नजरेसमोर आली.

चार दिवसांपूर्वींच दाजीसाहेब मालवणास मावशीसह गेले. पण तत्पूर्वी आपण त्यांची सेवा करावयास गेलों असतां ती त्यांनीं कां बरें स्वीकारूं नये? मस्तक चेपूं लागलों, त्यानीं प्रथम चेपून घेतलें, पण मावशी आंत आल्यावर त्यांनीं नको म्हटलें. दुसऱ्या दिवशीं औषध दिल्यावर पाय चेपावयास बसलों असतां त्यांनीं पाय झाडून आंखडून घेतले. मालवणला त्यांना पोंचवायला गेलों असतां त्यानीं जवळही येऊं दिलें नाहीं!

भाईसाहेब असे विचार स्वतःशीं करीत असतां त्यांचा कंठ गहिंवरून आला. डोळे पाण्यानें डबडबले! इतक्यांत जिन्यांत पावलें वाजलीं. भाईसाहेबांनीं आपले डोळे पुसले. बाळा गावडे त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला.

त्याचें भाईसाहेबांच्या चेहऱ्याकडे लक्ष नव्हतें.

"आत्तांच मला हकीगत समजली—" तो किंचित् थांबला.

"हुं!"

"तरी मी तुम्हांला सांगत होतों कीं तुम्ही इतके गाफील राहूं नका म्हणून!"

"पण झालं काय असं?" भाईसाहेबांनीं विचारलें.

"दाजीसाहेब मालवणास जाण्यापूर्वींच काका तिकडे जाऊन राहिले होते ना?"

"बरं मग?"

"त्यांनीं कांहींतरी कागद रजिस्टर केले!"

"उं:! त्यांत काय मोठं झालं?"

"दाजीसाहेबांनीं आपली इस्टेट मावशीला, किंवा तिच्या जुगारड्या मुलाला किंवा काकाला देऊन टाकली असली तर कसं बरं होईल?"

"दाजीसाहेबांची मर्जी! व्हायचं असेल तसं होईल."

"पण हिरानं माझ्याकडे दिलेली पत्रांची पुरचुंडी मी तुम्हांला दाखविली असतां तुम्ही कांहींच उपाययोजना न करतां स्वस्थ राहून आपला तोटा करून घेतां आहांत!"

" बाळा ! तूं वेडा तर नाहींस ? कर्तबगार जो कोणी असेल तो बापाच्या इस्टेटीवर कशाला अवलंबून राहील ? त्यानं आपल्या पोटापुरतं तरी स्वतःच्या कर्तबगारीनं मिळवलंच पाहिजे, तरच त्याच्या पुरुषत्वाचं सार्थक. मला त्या भानगडी नकोत. उद्यांच्या शिमग्याच्या सणांत काय काय करावयाचं त्याची आंखणी मी करून ठेवलेली आहे. त्याची अमंलबजावणी कशी करावयाची तो विचार आधीं केला पाहिजे."

असें बोलत भाईसाहेब उठले व ते आपली टोपी शोधूं लागले. बाळा आश्चर्यचकित झाला.

" दुसरं एक लक्ष्यांत घ्या भाईसाहेब ! "

" काय तें ? "

" काका हल्लीं सांवळ्याशीं पत्रव्यवहार करूं लागल्याचा मला संशय येत आहे. "

" तें मात्र आश्चर्य खरं बुवा ! "

" आश्चर्यच का ? मला तर त्याबद्दल भीतिच वाटते ! "

" भीति वाटायला काय कारण ? "

" कारण तो सांवळ्या अविचारी अन् मूर्ख आहे. आणि हिराला त्याच्या आधारावर मी मुंबईला ठेवून आलों आहें. दारुड्या सांवळ्याचा काय नेम ? हिराचं पत्र आलं होतं का ? "

" हो ! आठ दिवसांपूर्वी एकदां आली होती एक चिठी. खुशाल आहे ती."

" काय करते काम ? "

" कांहीं कळवीत नाहीं ती ! "

यानंतर दोघेही थोडा वेळ स्तब्ध राहिले.

" बरं उद्यां राधा नाचविण्याचे खेळ बंद करायचे कां ? "

" नको. फक्त मद्यपान आणि बोंबा मारून अभद्र शब्द उच्चारणं एवढंच सध्यां बंद करायचं आहे. बाकीच्या सुधारणा मागाहून. अशिक्षित समाजाला चुचकारून सज्ञान केला पाहिजे.

भाईसाहेबांनीं असें म्हणून टेबलावर पडलेले कांहीं कागद घेऊन त्यांचें

बुकपोस्ट केलें व त्यावर पत्ता लिहिला. बाळाकडे त्यांनीं तें बुकपोस्ट पोस्टांत टाकावयास दिलें.

बाळाला वाटलें इतकी प्रक्षोभ उत्पन्न करणारी सांसारिक परिस्थिति असून हा गृहस्थ ग्रामोद्धाराचें व लेखनाचें कार्य सतत चालूं ठेवूं शकतो तरी कसा ?

त्यानें ती शंका उघडपणें भाईसाहेबांस बोलून देखील दाखविली. त्यावर भाईसाहेब एवढेंच बोलले.

" सांसारिक दुःखं गिळून टाकण्याकरितां एखादा अविचारी माणूस जसा ' एकच प्याला ' घेतो, एखादा साधुसंत जसा भगवन्नामस्मरणांत रंगून जातो, तसाच मी साहित्यसेवेचा अवलंब करितों. साहित्यसेवा ही आपल्या आवडत्या मतांच्या प्रचाराकरितां असते, थांबून न राहणाऱ्या आपल्या ऊर्मींना वाव देण्याकरितांही असते, आर्थिक अडचण भागविण्याकरितांसुद्धां असूं शकते, कदाचित् एकमेव कीर्ति मिळविण्याकरितां असते, तशीच ऐहिक आपत्तीच्या आंचेला किंचित्काल आड करून शीतलता प्राप्त करून घेण्याकरितां देखील असते. "

बाळा भाईसाहेबांच्या गंभीर चेहऱ्याकडे सादर पहात उभा राहिला होता. आपल्या आंबेखोल गांवांतला हा तरुण ही एक खरोखरच थोर विभूति आहे व त्याचें सान्निध्य आपणास लाभलें याबद्दल मनांत वाटणारा एक प्रकारचा अभिमान त्याच्या मुद्रेवर देखील उमटलेला होता. त्यानें आपल्या हातांतील बुकपोस्टाकडे सहज पाहिलें, तों तें सहज खालींवर-खालींवर परतीत राहिला होता. त्यावरील पत्त्याकडे त्याची नजर गेली व त्याला आश्चर्य वाटलें. यावर हिराचें नांव असून पत्ता सांवळ्याच्या खोलीचा होता.

भाईसाहेबांनीं बाळाच्या मनांतील आश्चर्य ओळखलें.

" बाळा ! " भाईसाहेब म्हणाले, " हे कागद म्हणजे माझे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेख आहेत. प्रसिद्ध झालेल्या लेखांचीं कात्रणं व परतून आलेला लेख हे मी हिराकरितां पाठविले आहेत. ती आपणाला वाचायला कांहीं तरी पाठवायला लिहीत असते मला. मी तिला पुस्तकांचीं

नावं सुचवीत असतों. पण माझे प्रसिद्ध झालेले लेख जेव्हां ती मागते, तेव्हां प्रसिद्ध झालेल्या लेखांबरोबरच ‘ साभार परत ’ आलेलं लिखाण देखील मी तिला वाचण्यासाठीं पाठवीत असतों. माझी प्रसिद्ध झालेली तेवढींच नव्हेत, तर सगळींच मतं तिला कळावीत अशी मी खबरदारी घेत आहें. तुमच्याशीं मला इथं प्रत्यक्ष बोलायला मिळतं, पण तिच्याशीं बोलायला मिळत नाहीं. बाळा, मला वाटतं पुढं मागं हिरा चांगली—कांहीं तरी करून दाखविणारी होईल, नाहीं ? ”

“ होय, पण बिचारीला अद्याप कुठंच नोकरी नाहीं मिळत. ”

“ मला वाटतं तिला कांहीं तरी काम लागलं असलं पाहिजे. नाहींतर ती एके जागीं अशी बसून राहिली नसती. शिवाय तिला वेळही फारसा मिळत नसावा. आतांच्या ह्या पुडक्यांत माझा परतून आलेला एक लेख पाठविला आहे. आणि हा लेख ‘ मेदिनी ’ ऑफिसांतून परतून आलेला आहे.”

“ आश्चर्यच ! ”

“ त्यांत कसलं आश्चर्य ? लेख परतण्याची कांहीं कारणं असतात. त्यांतलं एक म्हणजे मतभेद. लेखकाचं मतप्रतिपादन जर वर्तमान-पत्राच्या धोरणाशीं जुळण्यासारखं नसलं, तर संपादक लोक लेखन परत करितात. त्या ठिकाणीं संपादकाला स्वतःचं व्यक्तित्व विसरावं लागतं व पत्राचं धोरण अखंडित चालवावयाचं असतं. माझ्या लेखांतील मतं वसंतरावांच्या व त्यांच्या पत्राच्या धोरणाला न जुळणारीं अशीं आहेत; समोरासमोर वाद करतांना कदाचित् माझीं मतं ते कबूलही करतील. पण जाहीरपणं वर्तमानपत्रांतून तीं ते प्रसिद्ध करूं शकणार नाहींत. ”

“ अस्सं ! ” बाळा हें विवरण पटल्याचें दर्शवीत उद्गारला.

“ होय. शिवाय लेख पसंत असून देखील मोबदला द्यावयाचा नस-ल्यास देखील संपादक लोक लेख परत करीत असतात. पण हा नियम ह्या लेख परतून येण्याला लागूं नाहीं. ”

“ वसंतरावाला हा लेख पसंत कां पडला नसेल ? ” बाळानें उत्सुक-तेनें विचारलें.

" तें समजून सांगायला फारच वेळ लागेल. केव्हां तरी सांगेन. पण हे वसंतराव ज्या रशियन लोकांच्या बोल्शेविक मतांचा उदोउदो करतात, तो कसा अर्धकच्चेपणाचा आहे, हें मी त्यांत दाखवून दिलेलं आहे. बोल्शेविक लोकांनीं समाजोद्धाराची कशी पूर्व तयारी केली, समाजाला ते कसा सुबुद्ध करीत असतात, त्यानंतरही ते कोणकोणती दक्षता कशा प्रकारें घेत असतात, तें न पाहतां नुसता उथळ नवमतवाद हे उधळीत आहेत एवढंच मी यांत दाखवून दिलं आहे. पण जाच तूं आतां. "

" बरं. " बाळा निघून गेला. माईसाहेबांच्या कानांत घुंगटांचा आवाज आला.

---

# १७ : खास अंकाचें मुखपृष्ठ !

" सौ. देशपांडे फारच छान काम करतें हं ! "

अशा प्रकारचे उद्गार मुंबईकरांच्या मुखांतून आताशा दरदिवस बाहेर पडूं लागले होते. ' तारका ' कंपनींतून जी मंडळी निघाली, त्यांनीं ' कुवलय ' कंपनी स्थापन करून झपाट्यानें उद्योगास सुरवात केली. ' तारका ' कंपनीचा चित्रपट निघायच्यापूर्वी आपला चित्रपट बाहेर काढावयाचा अशी प्रतिज्ञा करूनच ही मंडळी स्थापन झाली होती. ' तारका ' कंपनीला दुसरी नटी मिळाली, पण शेट गमावले. आपल्या प्रियपात्रानें चित्रपटांत काम करूं नये अशी शेटची इच्छा होती. पण खुद्द नटीच काम करावयास तयार असल्यामुळें कंपनीनें नटी मिळविली आणि शेट गमावला !

' कुवलय ' कंपनीला भांडवलवाला मिळाला असल्यामुळें त्यांनीं एक सामाजिक चित्रपट तावडतोब काढला. त्या कथानकांत दोन नटींना

साधारण्याच दर्जाचें काम होतें. एक मुख्य व दुसरी दुय्यम अशी कथानकाची रचना नव्हती. सौ. देशपांडे यांचें काम मुख्य नायिकेचें नसूनही लोकांना फार पसंत पडलें होतें. त्यांतही दवाखान्यांतील नर्सचा वेष व रुग्णशुश्रूषेंतील बारीकसारीक गोष्टी व त्यांतील करुण प्रसंगाचा उठाव परिणामकारक व्हावयाला कारणभूत झालेला सौ. देशपांडे यांचा स्वभावसहज अभिनय लोकांच्या मनात कायमचा ठाणें देऊन बसलेला होता. तिचें सौंदर्यदेखील प्रेक्षकांच्या हृदयाची पकड घेणारें पण मनांत सोज्वळ, सात्विक भावना उत्पन्न करणारें होतें.

'कुवलय' कंपनीनें आपल्या या नटीला हरकिसनदास हॉस्पिटलमधील मेट्रनच्या हाताखालीं कांहीं दिवस हॉस्पिटलमधील नर्सच्या धंद्यांतील एकूणएक गोष्टी प्रत्यक्ष शिकून आत्मसात करण्याकरितां ठेविलें होतें. तो चित्रपट निघाल्यानंतर सौ. देशपांडे यांना दुसऱ्या चित्रपटांत मुख्य भूमिका देण्याची तयारी चालली होती, व तसा मजकूर वर्तमानपत्रांतून प्रसिद्धही होऊं लागला होता. परंतु एके दिवशीं अशी बातमी एका वर्तमानपत्रानें प्रसिद्ध केली कीं सौ. देशपांडे, नटी या नात्यानें लाभलेल्या प्रसिद्धीचा फायदा घेऊन पुढील चित्रपटांत यशोमंदिराचा कळस गांठण्याची महत्वाकांक्षा बाळगण्याऐवजीं ज्या हॉस्पिटलमध्यें ती चित्रपटांतील नाटकी नर्सची भूमिका शिकण्याकरितां कांहीं दिवस राहिली होती, त्याच हॉस्पिटलांत त्याच मेट्रनच्या हाताखालीं कायमचीच रुग्णशुश्रूषेचें काम शिकण्यास राहिली.

हा मजकूर प्रसिद्ध झाल्यानंतर वर्तमानपत्रांत व नवे समाजांत तीच चर्चा सुरू झाली. त्या हॉस्पिटलांत त्या नटीच्या मुलाखती घेण्याकरितां सहसंपादकांची व बातमीदारांची येरझार सुरू झाली. हरकिसनदास हॉस्पिटलमुळें त्या नर्सला रुग्णशुश्रूषेचा फायदा मिळाला म्हणण्यापेक्षां तेथील डॉक्टर व नर्स यांना खासगी प्रॅक्टिस फार मिळूं लागली. खाजगी बैठकींत व गप्पागोष्टींत उल्लू तरुण म्हणूं लागले कीं, कसलीही जखम करून घ्यावी, कसलाही रोग जडवून घ्यावा, पण हरकिसनदास हॉस्पिटलमध्यें चार दिवस तरी इन्डोअर पेशंट होऊन पडावें. त्या सौ. देशपांडे या

नर्सकडून मलमपट्टी बसवून घेणें म्हणजे केवढें भाग्य ! तिच्याकडून औष- धाचा एकच डोस घेणें म्हणजे काय नशीब ! तिच्या मधुर कंठांतून नुसतं “ कसं आहे आपलं ? ” असा कुशल प्रश्न सकाळच्या प्रहरीं ऐकणं म्हणजे केवढी पुण्याई !

कोणी म्हणूं लागले कीं फिल्म कंपनी सोडून हरकिसनदास हॉस्पिटलमध्यें राहण्यांत त्या नटीचा कांहीं हेतु आहे; तिचा प्रियकर त्या हॉस्पिटलमध्यें डॉक्टर आहे. कोणी म्हणत तिचा प्रियकर त्या हॉस्पिटल- मध्यें आहे खरा, पण तो डॉक्टर नसून एक पेशंटच आहे. कोणी म्हणत ‘ कुवलय ’ कंपनीला अशी अडवून धरून जास्त पैसा उक- ळण्याकरितां तिनें हें ढोंग केलें आहे. तर कोणी म्हणत, तिनें नऊ महि न्यांचीच फक्त रजा घेतली असून मग ती पुन्हां फिल्म कंपनींत जाणार आहे.

पण जो तो एकाच बाबतींत अडून बसे. ह्या सौभाग्यवती देशपांडे ना ? तर त्यांचे मिस्तर देशपांडे म्हणजे कोण राजेश्री ? जसजशी सौ. देशपांडे यांची चर्चा समाजांत अधिकाअधिक फैलावूं लागली; तसतशी मिस्टर देशपांड्यांना पाहण्याची लोकांची उत्कंठा वाढूं लागली, इतकेंच नव्हे तर मिस्टर देशपांडे यांचा पत्ता कळविण्याबद्दलचीं निनांवीं पत्रें सौ. देशपांडे यांना अधिकाधिक येऊं लागलीं.

हरिकिसनदास हॉस्पिटलचे मुख्य डॉक्टर फार प्रसिद्ध होते. त्या दवाखान्यांत मॅटर्निटी होमची देखील स्पेशल सोय होती. सौ. देशपांडे मेट्रनच्या आवडत्या झाल्या होत्या. जेव्हां त्यांना आपल्या बंधूकडे जावयाचें नसे, तेव्हां त्या मेट्रनकडेच राहत असत.

वैशाख महिन्यांतले रखरखाटाचे दिवस. आंगांतून घामाच्या धारा सुरू असावयाच्या या दिवसांत. मुंबईत उठल्याबसल्या कोल्डड्रिंक घेण्याची इच्छा होते. हरकिसनदास हॉस्पिटलमध्यें मुख्य मेट्रनकडे एक गृहस्थ बोलत बसले होते. बर्फ घातलेला पाण्याचा ग्लास ते मधून मधून तोंडाला लावीत होते. मधून मधून ते घेतलेलीं टिपणें ताडून पहात होते. डॉक्टरच्या कडून कांहीतरी माहिती घेऊन ते आले होते, व ती माहितीच पुन्हां पड-

ताळून पहात होते. एक श्रीमंत रोगी टिटॅनसच्या विकारानें निवर्तल्याची ती हकीगत होती. त्या हकीगतींत यांना इतकी बारीक माहिती कां पाहिजे तें गूढ मेट्रनला उकलत नव्हतें. त्यांनीं सौ. देशपांडे यांचीही चौकशी केली. पण ती बाहेर गेली असल्याचें त्यांना समजलें. कदाचित् कस्तुरकडे ती गेली असेल असेंही मेट्रनबाई म्हणाली. गृहस्थ बाहेर आले व मोटारींत बसले.

कस्तुर क्वीन्सरोडवरील एका इमारतीच्या तळमजल्यावर रहात असे. तिनें फणसवाडींतील आपली जुनी जागा सोडली होती. कारण गिरिधर-लालशेटशीं तिचें बिनसलें होतें. कस्तुर प्रथम युगप्रवर्तक नाट्यमंडळांत गेली, तेंच गिरधरलालनां आवडलें नव्हतें. पण ती जेव्हां फिल्म कंप-नींत जाण्याचा हव्यास धरूं लागली तेव्हां तर गिरधरलालनां तिचा फार राग आला.

कस्तुर कलाप्रिय होती. तिला तिच्या व्यवसायाचा जो कांहीं अनु-भव मिळाला, त्यावरून तिला एकंदर पुरुषजातीबद्दल चीड उत्पन्न झाली होती. स्त्री हें एक पुरुषांच्या वासनापूर्तीचें यंत्र होऊन बसलें आहे, अशी तिच्या मनाची दिवसेंदिवस खात्री होऊं लागली, आणि म्हणून ती आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट करूं लागली.

विवाहित स्त्रीपेक्षां स्वतंत्र कलावंतपेशा पत्करणाऱ्या गायिकासारख्या स्त्रियांना विशेष स्वातंत्र्य असतें, अशी लोकांची कल्पना असते. पण तीही खरी नाहीं. वेश्यावृत्ति स्वच्छंदीपणाची अशी वाटते, पण वेश्या ही तर गुलामाहून गुलाम बनलेली असते. वेश्या एकाच पुरुषाशीं निष्ठेनें राहूं लागली तर ती सत्तेची गुलामच हळूहळू बनत जाते. त्याचा आश्रय तुटला तर आर्थिक अडचणी उत्पन्न होतात. त्यापेक्षां कलेच्या बळावर आर्थिक स्वातंत्र्य मिळविणेंच परिणामीं हितकारक आहे असें कस्तुरला पटूं लागलें.

कस्तुरला एका गोष्टीबद्दल पश्चात्ताप झाला होता. सगुणानें हिराला तिच्या स्वाधीन केली होती ती नीच हेतूनेंच. काकाला आपली पाशवी पिपासा तृप्त करावयाची होती आणि सगुणाला काकाचा आश्रय कायमचा

लागला पाहिजे होता. हिराच्या नादाला लागलेला काका आपल्या हातचा सुटेल अशी व्यावसायिक अंदेशा सगुणाच्या मनाला खात राहिली होती. म्हणून त्यांनीं संगनमत करून हिराला मुंबईला पळविली. पण सगुणा आणि कस्तुर या दोघी बहिणींच्या स्वभावांत फारच अंतर होतें. कस्तुर सगुणापेक्षां स्वभावानें फार चांगली होती. तिला प्रथम हिराच्या स्वभावाची पुरी ओळख झाली नव्हती. म्हणून सगुणाला कबूल केल्याप्रमाणें तिनें हिराला काकाच्या तावडींत द्यावयाचें ठरवलें. पण त्याच वेळीं तिनें असाही निश्चय केला होता, कीं हिरा जर या गोष्टीला नाकबूल असेल व तिचे विचार उदात्त असतील तर हिराला कसेंही करून बचावून घ्यावयाची. म्हणूनच तिनें आपण गाण्याच्या बैठकीला जाणार म्हणून सांगून आपण निर्धास्त राहिली होती. पण संशयीवृत्तीचे बनलेले गिरधरशेट पाळत राखण्याकरितां अकस्मात् आलेच.

त्यांनीं आपल्या त्या नेहमींच्या शृंगारलेल्या खोलींत निळसर बत्ती पाहून ठरविलें कीं, कस्तुरनें आपल्याशीं प्रतारणा केली. तशांत खालीं दुसरी मोटर. कोणीतरी माणसें उतरून पळाली. हा सर्व प्रकार पाहून त्यांना भयंकर राग आला. पण त्या टॅक्सीच्या ड्रायव्हरकडून खरा प्रकार कळल्यावर त्यांचें मन फारच बुचकळ्यांत पडलें. कस्तुरला तरी गिरधरशेटच्या असल्या संशयी, अप्राणिक वर्तनाचा त्वेष आलाच होता. तिनें त्यांची मुर्वत धरली नाहीं. दोघांचा त्या दिवसापासून बेबनाव झाला. आणि हिराला आपण कसायाच्या तोंडांत दिली त्या पापाचें परिमार्जन कसें तरी केलें पाहिजे अशी रुखरुख कस्तुरच्या मनाला लागून राहिली. पण हिरा आतां आपल्यावर विश्वासच कधीं ठेवणार नाहीं असें कस्तुरला वाटूं लागलें. खेडवळ हिरा सुधारलेल्या फॅशनचा पवित्र गुन्हा करावयास तयार नाहीं हें पाहून तिला शक्य ती निराळी मदत देण्याचें कस्तुरनें ठरविलें. बाळा जेव्हां तिला भेटावयाला आला, तेव्हां त्यानें हिराची सर्व परिस्थिति तिला सांगितली व हिराचें मन कस्तुरविषयीं साफ करण्याचें त्यानें कस्तुरजवळ कबूल केलें. त्याचा तरी एकट्या सांवळ्यावर भरंवसा नव्हताच. तेव्हां कस्तुरसारखें कोणी तरी परिचयाचें सालस माणूस हिराला पाठीराखें असावें असें बाळाला वाटलें.

बाळानें त्याचप्रमाणें हिराची व कस्तुरची दिलसफाई करून दिली; व तो काकाच्या मागोमाग आंबेखोलला गेला. जातांना त्यानें हिराकडची पत्रांची पुरचुंडी बरोबर घेतली. ती भाईसाहेबांकडे देऊन पहावयाची व त्यांतील कांहीं पत्रांचा उपयोग मग आपल्याला हवा तसा करून घ्यावयाचा हेंही बाळानें आपल्या मनाशीं नक्की करून ठेवलें. बाळाच्या मध्यस्थीनें दोघींची दिलसफाई झाल्यानंतर त्या एकमेकींच्या विचारानें वागूं लागल्या. कस्तुर हिराला स्वावलंबी बनविण्याला शक्य ती मदत करूं लागली.

पण गिरधरशेटचा आश्रय सुटल्यामुळें तिलाच प्रथम प्रथम निराधार पडल्यासारखें वाटूं लागलें. पुरुषाच्या नांवाची ढाल इतर ऊल्लू पुरुषांना दूर राखण्याकरितां तरी अवश्य आहे असें तिला वाटूं लागलें. तिनें आपणाला आलेले अनेक अनुभव हिराला सांगून शहाणी केली होती. म्हणूनच स्वतंत्रपणें धंदा करतांना कुंकूं व मंगळसूत्र घालणें आपणाला आवश्यक आहे असें हिराला वाटूं लागलें. हिराला सांस्कृतिक ज्ञानाचें शिक्षण भाईसाहेबांकडून व व्यावहारिक चतुरपणा कस्तुरकडून एकसारखें मिळूं लागलें होतें.

पण पुढें कांहीं दिवसांनीं तिला आपल्या भावाचाच फार त्रास होऊं लागला. भाईसाहेबांच्या शत्रूंकडून सांवळ्याला पत्रें येत असल्याचा व त्याला कोणीतरी त्या पक्षांतलीं माणसें भेटत असल्याचा हिराला संशय येऊं लागला. बरें तिला कधीं कांहीं कमाई झालीच, तर ती सांवळ्याच्या दारूच्या लहरी भागविण्यासच अपुरी पडूं लागली. अशा स्थितींत तिला आपल्या भावाबरोबर राहणें देखील धोक्याचें वाटूं लागलें. एकदां साठवितां आली ती रक्कम तिनें येशाप्पाला देण्यासाठीं बाळाच्या नावें पाठविली व ती गोष्ट तिनें भाईसाहेबांसही कळविली होती. व्यावहारिक चतुरपणाची कस्तुरनें दिलेली शिकवण मात्र तिच्या फार उपयोगीं पडत होती.

सांवळ्या दाजीसाहेबांच्या द्वेषाचे उद्गार हल्लीं केव्हां तरी काढीत असे. नंतर पुढें पुढें तो भाईसाहेबांसही शिव्या देऊं लागला. सावकारी पाश

यांसारखे चित्रपट अथवा नाटकें पाहून त्याचें मस्तक भणाणूं लागलें आणि तो अद्वातद्वा बडबड करूं लागला. तशांत भाईसाहेबांचें पत्र हिराला आल्याचा जेव्हां त्याला सुगावा लागे, तेव्हां तर तो तिच्यावर फारच चिडून जाई. त्यामुळें हिराला आपल्या भावाकडे राहणें अशक्य झालें. पण पुरुषाच्या आश्रयाशिवाय ती तरी काय करणार? तिला भाईसाहेबांकडून खाजगी मजकूर बहुधा येतच नसे. येत तीं सारीं लिखाणें. सांवळ्यानें ती एकदोनदां उघडून पाहिलीं, पण खासगी मजकूर नसल्यामुळें ती हिराला बिनचूक मिळत. सांवळ्याला तसल्या लिखाणाचें कांहींच विशेष वाटत नसे.

कस्तुर 'तारका' फिल्म कंपनींत राहिली होती. 'कुवलय' कंपनीचा चित्रपट अगोदर बाहेर पडला. पण त्याच्या लागोपाठ 'तारका' कंपनीच्याही जाहिराती फडकूं लागल्या, आणि कस्तुरचें नांव लोकांच्या नजरेसमोर येऊं लागलें. याचमुळें कस्तुरचा व वसंतरावांचाही परिचय झाला. 'तारका' कंपनींत वासंतीला वसंतरावांनीं आणून दाखल केलेंच होतें. ती कस्तुरपेक्षां सुशिक्षित होती. पण पहिल्या चित्रपटांत तिला दुय्यम भूमिका करावी लागल्यामुळें तिचा वसंतरावांशीं बेबनाव होऊं लागला होता. त्या कंपनींतील प्रमुख नटाबरोबर तिची मैत्री जमली व ती त्याच्याबरोबर हिंडाफिरावयास जाऊं लागली, हें पाहून वसंतरावांना ती हळूहळू आवडेनाशी झाली.

'तारका' कंपनींत कस्तुरचा प्रवेश झाल्यापासून गिरधरशेटनीं 'तारका' कंपनीचा संबंध तोडला, पण 'मेदिनी' ऑफिसशीं त्यांचा संबंध होताच. त्यामुळें ऑफिसांत त्यांची व वसंतरावांची भेट होत असे. 'मेदिनी' चे मुख्य संपादक हे गिरधरशेठच्या विश्वासांतले असे एक गृहस्थ होते. मुख्य कामाचा भर वसंतरावांवरच पडत असे. मुख्य संपादकाची जागा पटकावण्याची वसंतरावांची खटपट सुरू होती. त्यासाठीं त्यांना 'मेदिनी' शक्य तितक्या थोड्या अवधींत शक्य तितकी जास्त लोकप्रिय करून दाखविणें इष्ट होतें.

वसंतराव आपल्या 'मेदिनी' साप्ताहिकांत कलावंत स्त्रीपुरुषांचे

चरित्रलेख व त्यांचीं मतें त्यांच्या छायाचित्रांसह व त्यांच्या निरनिराळ्या भूमिकांतील नाट्यवेषांसह देत असत. अर्धनग्न व नग्नावस्थेंतील चित्रें मुखपृष्ठावर देण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळें त्यांच्या नियतकालिकाचा प्रसार सारखा वाढत चालला होता. प्रचलित धर्मविषयक समजुतींस धक्का देणारें वाङ्मय वाचावयास देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. नवमतवाद समाजाला इष्ट असून मतस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य सर्रास चालू झालें पाहिजे अशीं त्यांचीं मतें असत. त्या मतांचा प्रचार करण्याची त्यांनीं शिकस्त चालविली होती. रशियन लोकांची समाजसुधारणा हिंदुस्तानांत लवकर आली पाहिजे असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. साम्यवाद व समाजसत्तावाद या विषयांवर त्यांच्या नियतकालिकांत लेख येत असत, पण त्यांच्या मताच्या खंडनात्मक लेख कोणी पाठविल्यास तो साभार परत केला जात असे. त्यांच्या साप्ताहिकांत विरुद्ध मत मांडण्याचा उदारपणा दाखविला जात नसे. एक विशिष्ट बाजू तेवढीच मांडावयाची व तीही तरुणांच्या उल्लू मनोवृत्ति उच्छृंखल करण्याच्या हेतूनें. या धोरणानें ‘ मेदिनी ’ चा प्रसार वाढत चालला होता.

कस्तुर दिलरुबा मांडीवर घेऊन एक गत वाजवीत बसली होती. वर विजेचा पंखा सुरू होता. पण हालचाल न करतां स्वस्थ बसलें असता देखील ज्या दिवसांत घाम येतो, त्या दिवसांत दिलरुबा वाजविण्यानें तरी तो आल्याशिवाय कसा राहील ? तिच्या मस्तकावर घर्मबिंदू सारखे थब-थबल्यामुळें मोकळे रुळणारे चार दोन चिकुट निढळावरच चिकटून राहिले होते. तिनें मोगऱ्यांचा गजरा माळला होता. मोतिया रंगाचें तलम पातळ ती नेसली होती व पदर अर्ध्या केंसांवरून घेतल्यामुळें झिर-झिरीत पदरा आडून जसा मोगऱ्यांचा गजरा, तशीच गुलाबी रंगाची चोळी आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणें किंचित् अस्पष्ट पण अशी दिसत होती कीं अस्पष्ट दिसणाऱ्या आकृति कल्पनेनें स्पष्टपणें पूर्ण करण्याची उत्सुकता जागृत व्हावी.

तितक्यांत तिचा साथीदार तबलजी आला होता. ती स्वयंस्फूर्तीनें गाणें म्हणत असतां तबलजीनें ठेका धरला. उद्यां म्युझिकसर्कलमध्यें

तिचें गाणें ठरलें होतें. तबलजीनें ठेका धरलेला बघतांच तिला वाटलें कीं, आपण आतां उद्यां काय म्हणावयाचीं गाणीं असतील त्यांची आतांच तालीम घ्यावी.

तिचीं दोन तीन गाणीं म्हणून झालीं. इतक्यांत सौ. देशपांडे तिला भेटावयाला आल्याची वर्दी नोकरानें दिली. कस्तुरला आनंद झाला. तिनें तबलजीला जावयाला खूण केली. तो निघून गेला. सौ. देशपांडे आंत आल्या.

पण त्याना पाहिल्याबरोबर कस्तुरनें दिलरुबा बाजूस ठेवला. सौ. देशपांडे यांची मुद्रा अतिशय म्लान दिसत होती.

"का? तोंड कां उतरलेलं दिसतं तुमचं, चारु?"

सौ. देशपांडे यांना कस्तुर 'चारु' म्हणून हांक मारी. कारण 'कुवलय' कंपनीच्या चित्रपटांत तिनें जी भूमिका केली होती, त्या भूमिकेचें नांव 'चारुशीला' असें होतें. म्हणून कस्तुर त्यांना 'चारु' म्हणे.

"हॉस्पिटलांत ज्यांची शुश्रूषा मला करावी लागत असे, तो रोगी आज गेला! संपला त्यांचा अवतार!"

"मग त्याचं तुम्हांला इतकं कां वाईट वाटावं?"

"त्याचं सगळं चरित्र आठवलं कीं जरा खिन्नता येते खरी अशी—काय त्याला करणार!"

"डॉक्टर आणि परिचारिका जर मरणाऱ्या प्रत्येक रोग्याबद्दल खिन्न होऊन शोक करूं लागल्या, तर त्यांना उभ्या आयुष्यांत हंसायला एकही दिवस, एकही क्षण लाभायचा नाहीं, नाहीं कां?" असें म्हणून कस्तुर किंचित् हांसली.

"तसं नव्हे, या रोग्याचं सगळंच चमत्कारिक हो! तुम्हांला सांगितलंच होतं मी—सांगितलंच आहे त्यांतलं थोडंथोडं तुम्हांला. पायाला जखम म्हणून झाली सुरवातीला. कानांनीं त्यांना कमी ऐकूं येऊं लागलं होतं, मुंबईला येण्यापूर्वीच. दृष्टिही अधूच होती. पण पैसा खर्च होतो म्हणून त्यांनीं आपल्या गांवीं कसलेच उपचार करून घेतले नाहींत. कोणाला आपला आजारीपणा कळूं दिला नाहीं. मालवणला त्यांच्या

मंडळींनीं त्यांना आणलं. तिथं कसले तरी कागदपत्र रजिस्टर करण्यां-पुरता उद्योग तेवढा त्यांच्या बरोबरच्या मंडळींनीं साधून घेतला. पण औषधाची उपेक्षाच. मालवणच्या एका प्रसिद्ध व अनुभवी डॉक्टराचं म्हणे औषध चालू होतें. पण बरोबरची मंडळी शुश्रूषा चांगली करीनात व डॉक्टराच्या माथीं मात्र विनाकारण अपयश येणार म्हणून डॉक्टरांनीं त्यांना मुंबईस जाण्याची सल्ला दिली व आमच्या येथील डॉक्टरास पत्र दिलें. शेवटीं जिवाला भिऊन ते— ”

कस्तुरनें ही हकीगत ऐकतांना तोंडावर पदर घेतला व ती स्मित करूं लागली. चारु तें पाहून किंचित् मध्येंच थबकली.

“ ते आमच्या हॉस्पिटलांत आले. त्यांना शुश्रूषेला चांगलीशी नर्स पाहिजे होती. त्यांची कोणीतरी अगत्यपूर्वक काळजी घ्यावयाला पाहिजे होती. मुंबईत आल्यापासून त्यांनीं आपल्या बरोबरच्या मंडळीला रजा दिली. मी त्यांची सेवाशुश्रूषा माझं पवित्र कर्तव्य म्हणून मनापासून करूं लागलें. त्यापासून त्यांच्या जिवाला सुख होऊं लागलं.” चारु बोलतां बोलतां खिन्न होऊन पुन्हा थांबली. त्या रोग्याच्या वेदना जणूं तिला स्वतःला प्रतीत होत होत्या.

“ बरं मग पुढं ? ” कस्तुरनें विचारलें.

“ त्यांनीं एके दिवशीं मला विचारलं— ”

“ हं ! कुणी विचारलं ? ”

“ त्या रोग्यानीं— ”

“ म्हणजे दाजीसाहेब आंबेखोलकरांनीं ”

“ हो—विचारलं कीं—म्हणजे माझं नांव विचारलं ” चारु जराशी अडखळत म्हणाली.

“ अग बाई ! असं का ? अन् मग ? ”

“ मी म्हटलं, सौ. देशपांडे ”

“ हं ! ”

“ पण म्हणाले, ‘ तें आडनांव झालं—पण नांव काय ? ’ तेव्हां मग

मी माझं नांव चारुशीला म्हणून सांगितलं. लग्न झालं, तर मग नवरा कुठं आहे असं त्यांनीं विचारलं."

"मग काय म्हणालांत चारुबाई आपण?"

"मी म्हटलं माझा नवरा इथंच असतो. पण ते आपलं जेमतेम पोट भरतात आणि लोकांच्या उपयोगी पडत असतात. त्याला बोलावायला त्यांनीं सांगितलं, तेव्हां मात्र माझा नाइलाज झाला! मी मग म्हटलं कीं ते गांवाला गेले आहेत. मग त्यांनीं माझ्या पगाराची चौकशी केली. तेव्हां मी सांगितलं कीं मला रुग्णशुश्रूषा शिकण्याची हौस असल्यामुळं पोटापुरतं वेतन घेऊन मी काम करीत असतें व शिल्लक कांहीं उरलं तर नवऱ्याकडे पाठवतें."

"खरंच चारुताई, तुम्ही आपल्याकडचं कांहीं आपल्या नवऱ्याला दिलं आहे का हो?" असें विचारून कस्तुर खुदकन् हांसली.

त्या चेष्टेचा अर्थ चारुशीलेला समजला तरी तिकडे तिनें मुद्दाम दुर्लक्ष करून पुढं बोलणार तोंच कस्तुरीनें पुन्हां विचारलें.

"बरं, चारुताई लोकांच्या उपयोगी पडणारा तुमचा नवरा तुमच्या थोडासा तरी उपयोगी पडला आहे का हो कधीं?"

"अशा खिन्नतेंत देखील तुम्हांला थट्टा सुचते, या तुमच्या स्वभावाला म्हणावं तरी काय बाई?"

"बरं बाई, आमचं राहिलं. बोला पुढं. 'माझ्याकडे काय असतं तें नवऱ्याला देतें' इथपर्यंत आली होती गोष्ट तुमची."

"मग त्यांनीं विचारलं कीं हें हॉस्पिटलांतलं काम शिकून पुढं काय करायचं आहे तुम्हांला दोघांला? तेव्हां मी म्हटलं, गरीब गुरिबांची सेवा. त्यावर ते दुसरे दिवशीं एकदा म्हणाले, तुझ्यासारखी सून मला पाहिजे होती."

"अय्या! आणि आपल्या मुलाला मात्र सारखा शिव्यांचा भडिमार करीत असत ना?"

"तें तर सारखं सुरुं! शेवटीं ते खंगत गेले. त्यांचं आंग सारं झटके

येऊन वांकड होऊं लागलं. डॉक्टर व मेट्रन यांना बोलावून घेऊन ते कांहींतरी सांगत असत."

"तुम्हांला नाहीं कांहीं सांगितलं त्यांनीं?"

"आज सकाळीं त्यांनीं मला जवळ घेऊन माझ्या मस्तकावरून त्यांनीं हात फिरवला आणि कांहींतरी पुटपुटून मला त्यांनीं आशीर्वाद दिला. मला इतकंच ऐकूं आलं——"

"काय—काय ऐकूं आलं?"

"ते म्हणाले, 'तूं फारच चांगली आहेस, इथलं शिकून झालं कीं आपल्या नवऱ्याजवळ जाऊन रहा. इथं राहूं नकोस' असं म्हणाले."

"सनातनी दिसतात, आमच्या वसंतरावांसारखे नाहींत" कस्तुरनें शेरा मारला.

"हो जुन्या वळणाचीं माणसं तीं—" चारुशीला म्हणत होती. पण तिच्या मुखावरील खिन्नतेची छटा अद्याप नष्ट झाली नव्हती. तिची खिन्नता घालविण्याकरितां, तिला हंसविण्याकरितां तिनें खूप प्रयत्न केला, पण तो फुकट गेलेला पाहून तिनें तो प्रयत्न सोडून दिला व पुन्हां परिचारिकेच्या कर्तव्याबद्दल ती बोलूं लागली. रुग्णशुश्रूषा करणाऱ्या माणसानं आपलं मन थोडंसं कठिण बनविणं हें त्या पेशालाच कसं इष्ट आहे हें ती पटवून देत होती, इतक्यांत हॉस्पिटलांतून कस्तुरकडे यावयास निघालेले गृहस्थ येऊन टेपले. कस्तुर व चारुशीला यांना एकत्रच बसलेल्या पाहून त्यांना बरं वाटलें, व त्या गृहस्थांना आलेले पाहून कस्तुरलाही बरें वाटलें, पण तें निराळ्या कारणासाठीं. त्या वादविवादप्रिय गृहस्थांना थोडेसें डिवचून व त्या वादांत चारुशीलेला ओढून तिच्या मनावरची खिन्नता थोडा वेळ तरी उडवितां आल्यास पहावी अशी युक्ति कस्तुरला सुचली होती. ते गृहस्थ आपल्याकडे कां आले असावेत याची कल्पना कस्तुरला आलेली होती. नियतकालिकांचीं मुखपृष्ठें आकर्षक करण्यासाठीं झटणारे नवमतवादी संपादक ज्या हेतूनें नटींच्या घरीं खेपा घालतात, त्याच हेतूनें ते आले असावेत हें कस्तुरनें ताडलें, व ती उठली.

"या संपादक महाराज, बसा" कस्तुरनें म्हटलें.

चारुशीलाही उठून पुन्हां आपल्या जागीं बसली.

“ बसतों, पण खास अंकाची फारच घाई आहे. थोडंसं काम आहे, म्हणून आलों. दोघीही एकाच ठिकाणीं मिळालांत, बरं झालं. या सौ. देशपांडे ना ? ”

“ हो, त्यांच्याही कडे काम आहे कां आपलं ? ” कस्तुरनें संपादकांची नजर चुकवून चारूला डोळे मिचकावीत म्हटलें,

“ हे मेदिनीचे संपादक, वसंतराव, ” कस्तुरनें चारुशीलेची ओळख वसंतरावांशीं करून दिली. दोघांनींही परस्परांस नमस्कार केले. खरं म्हटलं तर नमस्कार करणें वसंतरावांस भाग पडलें. कारण त्यांनीं हस्तांदोलनाकरितां हात पुढें केला होता, पण तत्पूर्वीच सौ. देशपांडे यांनीं नमस्कार केल्यामुळें अर्ध्यावर पुढें गेलेला हात दुसऱ्या हाताच्या साथीसह वर करून जोडावाच लागला.

सौ. चारुशीला देशपांडे या सुधारलेल्या नाहींत अशी वसंतरावांची खात्री झाली. पण त्यांना मनांतून असेंही वाटूं लागलें कीं, इतक्या सुंदर स्त्रीची रीतिरिवाजांतली लहानसहान नजरचूक कुणाही पुरुषानें क्षम्य मानावयास हरकत नाहीं.

यापुढील प्रस्ताव आतां कसा करावा या विचारांत वसंतराव होते. सौंदर्याचे दोन उत्कृष्ट नमुने दोन बाजूंस असल्यामुळें त्यांचें मन क्षणभर त्या दोन नमुन्यांची तुलना करावयास लागलें. सौ. देशपांडे यांचा साधा वेप व गंभीर मुद्रा आणि कस्तुरचा नटवा वेप व खेळकर मुद्रा यातील अधिक सरस नमुना कोणता हें ठरविणें सोपें नव्हतें. दोघींचेंही सौंदर्य मनोहर खरें पण त्यांच्यांत फरक होता. तो फरक शोधून काढावासा वसंतरावांना वाटलें. लगेच त्यांच्या ध्यानांत आलें कीं, कस्तुरच्या भुवयांचे केस जर किंचित् कमी जाड असते तर ती थोडीशी सौंदर्यहानीही झाली नसती. सौ. देशपांडे यांचें सौंदर्य मोहक खरें, पण त्यांत भारदस्तपणाची छाप आणि उदात्तपणाची झांक होती. त्यामुळें वसंतरावांना त्यांच्याकडे आपल्या कामाची गोष्ट काढण्याचें धैर्यच झालें नाहीं.

त्यांनीं कस्तुरकडे रोंख धरिला. त्यांनीं ‘ मेदिनी ’ च्या खास अंकांत घालावयाचीं कांहीं चित्रें व फोटो कस्तुरसमोर ठेवले.

“ तुमचंही एक छायाचित्र खास अंकाकरितां पाहिजे. ” त्यांनीं उपक्रम केला. “ सौ. देशपांडे यांना देखील मी तीच विनंती करावयास आलों आहें. ” चित्रांचे व लेखांचे कांहीं कागद त्यांनीं लगेच सौ. देशपांडे यांच्यासमोर ठेविले.

“ आमचीं दोघींचींही छायाचित्रें ‘ मेदिनी ’त देऊन झालीं आहेत.”

“ तसं नव्हे, कलापूर्ण व विशिष्ट प्रसंग खुलवून दाखविणाऱ्या अशा कांहीं पोझिस् घ्यावयाच्या आहेत. आपण म्हणाल त्यावेळीं आमच्या आर्टिस्टनां घेऊन येतां येईल. साहित्यसेवा आहे ही. आपण हातभार लावला पाहिजे असल्या कलापूर्ण साहित्यसेवेला. ”

असें म्हणत असतां वसंतरावांनीं एक अर्धनग्न स्थितींतलें चित्र काढून कस्तुरच्या हातांत दिलें. तें देत असतां कस्तुरच्या तुळतुळीत, सुकुमार मऊ हाताचा स्पर्श वसंतरावांना झाला. वसंतरावाची वृत्ति क्षण– अर्ध क्षणच बेभान झाली. तो प्रकार कस्तुर तेव्हांच समजून चुकली.

सौ. देशपांडे हातांतल्या कागदांकडेच अजूनही पहात राहिल्या होत्या.

“ कोणाचं छायाचित्र हें ! ”

“ कसं आहे ? ”

“ वासंतीचं का ? ”

“ चटकन् ओळखतां येण्यासारखं नाहींच तें. आमच्या आर्टिस्टची ती कुशलता वाखाणण्यासारखी आहे. ” वसंतराव थोडेसे अडखळून म्हणत होते.

त्या दोघांच्या चर्चेचा विषय झालेलें तें चित्र सौ. देशपांडे यांनांही पहावेसें वाटलें. तिच्या मनांतील भाव ओळखून कस्तुरनें तें पुढे केलें, व वसंतरावांनीं तें मध्येंच घेऊन सौ. देशपांडे यांच्यापुढे केलें. पण सौ. देशपांडे यांनीं त्याच्यावरून नजर फिरवितांक्षणींच कपाळाला आठ्या घातल्या व तें चित्र त्यांनीं एका बाजूस ठेवून दिलें.

त्यानंतर मुखपृष्ठासाठीं ‘ ओलेती ’ या चित्रावरही ताण करणारें एक चित्र वसंतरावांनीं काढून कस्तुरच्या हातांत दिलें.

“ याच्याहूनही सरस चित्र—म्हणजे मनोभावना प्रदीप्त करणारें असें आम्हांला पाहिजे आहे. आपण मात्र आपल्या इच्छेला येईल ती पोझ द्यावी. अगदीं आत्तां आपण बसलां आहांत तशी दिली तरी चालेल. याच वेषांतली. मला छान नांव सुचलं आहे. ”

“ काय बरं तें ? ”

“ पण पोझ द्यायचं ठरलं कां ? ”

“ ही मी बसलें आहे अशीचना ?

“ हो. ”

“ ठरलं तर मग. काय नांव देणार आपण ? ”

“ निदाघ–बाधा. ”

“ छान आहे नांव ! ”

“ आपला हा अभिप्राय ऐकून मला खरोखरच समाधान वाटलं. तेव्हां ही एक पोझ ठरलीच. दुसरी एखादी पोझ, आमचे आर्टिस्ट सुचवितील तशी द्याल तर......”

“ म्हणजे ह्या धर्तीवर—खरंच या चित्राला काय नांव देणार आहांत आपण ? ”

“ त्याचं नांव शृंगार ! ”

“ चुंबन–विधि वाटतं ? ”

वसंतराव कांहींतरी उत्तर देणार इतक्यांत सौ. देशपांडे मध्येंच बोलल्या–

“ चुंबनविधीला वक्षस्थल उघडं दाखविण्याचं कारण ? ”

“ या बाबतींत अगदीं उघड व निर्भीड चर्चा करण्याची आपली तयारी असेल तर—”

“ हो–हो ! त्याला काय हरकत ? ”

“ नुसत्या चुंबन–विधीशिवाय आणखी कांहींतरी जास्त भावना प्रगट झालेल्या दिसतात म्हणूनच त्याला शृंगार हें नांव दिलं. नाहीं तर नुसतं– “ चुंबन ” इतकंच म्हटलं असतं.”

" पण यांत कला असते म्हणतां ? "

" आपणाला नाहीं दिसत यांत कलापरिपोष ? "

" पण असलीच कला निवडण्यांत हेतु कोणता ? "

" कला ही हेतु–निरपेक्ष असते—कला ही कलेसाठींच मानावयाची. दुसरं कोणतं ध्येय जर का कलेसाठीं ठेवलं, तरी त्याला तितका कमीपणाच येतो. रंगभूमीवर व रुपेरी पडद्यावर काम केलेलं आहे, आपण दोघींनीं. तेव्हां आंगचोरपणा अथवा फाजील सोंवळेपणा केला असतां कशी कलाहानि होते हें आपणाला सांगायला नकोच."

" हो–हो. तो आम्हांला पुरता अनुभव आला आहे. "

सौ. देशपांडे वसंतरावांच्या बोलण्यांतील टोमणा कुणाला आहे तें ओळखून म्हणाल्या. ' चारुशीला ' ही भूमिका वठवतांना त्यांनीं कांहीं अभिनय व कांहीं वेषांतील अवयवांचा अनावृतपणा व्यक्त करण्यास घेतलेले आक्षेप व धरलेला हेका सिनेमासृष्टींत सर्वांस ठाऊक झाला होता. " मालक, चालक, डायरेक्टर, किंवा प्रमुख नट यांपैकीं कोणाचाच आधार नसला तर चित्रपटांतील काम कसं अयशस्वी ठरतं हें आम्हांला ऐकून ठाऊक झालं आहे. "

" तसंच, " कस्तुर म्हणाली, " नटीच्या निटिलावर हक्काचा शिक्का नसला, अथवा गळयांत मालकीची माळ नसली, तर सारे पुरुप तिला बिनवारशी अथवा समाईक मिळकतीप्रमाणं कसं लेखतात याचा मला स्वतः चांगलांच अनुभव आहे, बरं. "

" म्हणजे कसा ? " किंचित् गोंधळून वसंतरावांनीं विचारलें.

" म्हणजे गिरधरशेठचा हक्क माझ्यावर होता तोंपर्यंत त्यांना मी दुसऱ्या पुरुषाशीं नुसतं बोललेलं देखील सहन होत नसे. तथापि माझा त्यांच्याशीं संबंध सुटल्यावर देखील तो तसाच पूर्ववत् आहे असें मी कांहीं दिवस भासविलं तोंपर्यंत ठीक चाललें. पण खरी गोष्ट गिरधरशेठनींच प्रगट केल्यावर मला जो पुरुषजातीचा अनुभव नवाच मिळाला तो तर अगदींच चमत्कारिक ! "

" स्त्रीपुरुपसंबंधाची अनिर्बंधता एकदा मान्य केल्यावर मग असले आक्षेप राहतच नाहींत. "

" म्हणजे रशियांतल्या प्रमाणं ना ? " सौ. देशपांडे यांनीं विचारलें.

" हो. त्यांचींच समाजसुधारणेचीं मतं आम्हांला ग्राह्य वाटतात. "

" तर मग जनतेला सुशिक्षित करीत असतां आरोग्याचं व शारीरशास्त्राचं ज्ञान देण्याच्या वेळीं लिंगकार्याची चर्चा तिकडे किती विकाररहितपणें, किती शास्त्रशुद्धतेनं मिश्रसमाजांत केली जाते हें आपणाला ठाऊक असेलच ? "

" छानच बोललात, अगदीं माझ्या बाजूनं. मी हाच मुद्दा आपणासमोर मांडणार होतों. " विजयानंदानें व चारुशीलेच्या भोळेपणाची मनांत कींव करीत वसंतराव म्हणाले.

" आधीं साक्षरता–प्रसार व तदनंतर हा ज्ञानप्रसार, तसेंच आर्थिक संपन्नता साध्य करण्याचे उपाय; इतकी पूर्व तयारी झाल्याशिवाय कांहीं स्त्री-पुरुषसंबंधाची अनिर्बंधता रूढ केली गेली नाहीं. ही अनिर्बंधता कुटुंबसंस्थेला नाहींशी करणारी आहे. तेव्हां जनतेला सुबुद्ध केल्याशिवाय स्त्रीपुरुषसंबंध अनिर्बंध करणारे लेख व चित्रं आपण कां बरं प्रसिद्ध करावींत ? मी आपणाला असं विचारतें, खुद्द रशियांत लिंगकार्याची चर्चा इतकी शास्त्रशुद्ध केली जात असूनहि मासिक पुस्तकांच्या मलपृष्ठांवर उघडींनागडीं चित्रं छापण्यास मनाई आहे कीं नाहीं ? चित्रकला व शिल्पकला रशियांत अर्धनग्न स्त्रीदेहाच्या आविष्करणाला मान्यता देत नाहीं. अर्धनग्न अथवा नग्न स्त्रीदेहाचीं चित्रें प्रसिद्ध केल्यास रशियांतील स्त्रिया तो आपला अक्षम्य अपराध समजतात व त्याविरुद्ध चळवळ करितात हें आपणाला ठाऊक नाहीं काय ? " सौ. चारुशीला देशपांडे हा वाद करीत असतां विलक्षण सौम्यपणा धारण करीत होत्या.

" अहो चारुशीला ! " कस्तुर म्हणाली, " ही यांची कला कलेसाठीं नव्हे, आणि जीवनासाठींही नव्हे. ही त्याची कला म्हणजे जीवनकलहाची कला ! चार लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकून धंदा चालविण्याची कला. थोडक्यांत सांगायचं तर ही यांची पोटासाठीं कला ! "

आधींच उन्हाळा होत होता. तशांत वसंतरावांनीं सूटसूट चढविला होता. नेकटाय् त्यांनीं सैल केली होती. उन्हाळ्यामुळें असो कीं आणखी

कशानें असो, पण त्यांच्या आंगाचा फारच दाह झाला. आणि शेवटीं तर ते फार गारठून गेले. त्यांनीं नेकटाय् सावरली, हॅट चढवली, व जाण्याच्या तयारींत उठले.

" काय निघालांत ? थोडा चहा तरी ? " कस्तुरनें विचारलें.

" कांहीं नको ! " असें म्हणत ते झटकन् आपले कागद घेऊन निघून गेले. चारुशीलेनें नमस्कार केला. तेव्हां कांहींतरी बोलायचं म्हणून त्यांनीं म्हटलें——

" आपलं वाचन बरंच दिसतं—एखादा लेख—"

" कां ? आपल्या ' मेदिनी ' त कांहीं लेख फार उत्कृष्ट येतात. विशेषतः कलावंतांचीं चरित्रं, किंवा कृषिविषयक माहिती फार चांगली असते. मीही नवमतवादीच आहे. आपण ज्या नवमतवादाचा प्रसार करीत आहांत, तें लेखन वाचल्यावर त्यांची उलट बाजू मी पहात असतें, इतकेंच—"

" उलट बाजूचे लेख ? ते कुठं मिळतात आपणाला ? " जातां जातां थबकून त्यांनीं हटकलें.

" हं ! असे उलट बाजूचे तुम्ही स्वतः काय थोडे परत करीत असाल ? तेच किंवा दुसरे इतर नियतकालिकांत प्रसिद्ध होतात ते मिळतात ना वाचायला ? "

वसंतराव निघून गेले. ते मनांत चरकले होते.

" कशी झाली गंमत ? " कस्तुरनें विचारलें.

" आहे झालं कांहींतरी — यांना बायका अगदींच दुधखुळ्या वाटतात. "

" आणि कलावंत स्त्रियांबद्दल त्यांची अशीच कांहीं तरी खोटी समजूत असते. " कस्तुर म्हणाली. सौ. देशपांडेही निरोप घेऊन गेली आणि कस्तुरनें आपली गाण्याची तालीम सुरू केली.

---

हरकिसनदास हॉस्पिटलांत दाजीसाहेब वारले, तेव्हां त्यांची चौकशी करावयास सांवळ्या गेलेला होता. त्यानंतर राजाभाऊ हे मुंबईस आले असतां त्याला भेटले होते. घराकडून येशाप्पाचीं पत्रें पैसे पाठविण्याविषयीं येत असत. त्यामुळें त्याच्या मनाचा संताप होई. आपलें कुटुंब भयंकर अडचणींत पडलें आहे आणि पैशाची मदत तर आपल्याकडून होत नाहीं, याचा त्याला खेद वाटे. त्याच्या मनांत राजाभाऊ आणि काका यांनीं दाजीसाहेब व भाईसाहेबांबद्दल फार भयंकर संताप उत्पन्न केला होता. सावकाराविरुद्ध कुळाला उठवण्याचें हें काम त्या दोघांनींच स्वतः केलेलें होतें. दारुड्या सांवळ्याला त्यांनीं चांगलाच तयार केला. शेवटीं बोटी बंद होण्याच्या सुमारास सांवळ्या आंबेखोलला आला.

हिरानें पाठवितां आले तितके पैसे एकदां येशाप्पाला पाठविले होते. 'कुवलय' कंपनीनें तिला देऊं केलेला मोबदला भरपूर दिलाच नाहीं, व दिला तो देखील फार थोडा आणि हप्त्या हप्त्यांनीं! शेवटीं ती फिल्म कंपनींतून निघून परिचारिका झाल्यावर तर तिची येणें राहिलेली बाकी बुडलीच.

त्यामुळें तिला आपल्या बापाला पुरेसा पैसा पाठवितां आला नाहीं. दरम्यान बाळानें कस्तुरशीं पत्रव्यवहार करून स्वतः हिराबद्दल माहिती मिळविण्याची खटपट केली होती. पण अखेरी अखेरीस त्याला वेळच्यावेळीं उत्तरें मिळेनात. दाजीसाहेब वारल्यावर भाईसाहेब एकदा मुंबईस जाऊन आले होते तेव्हां त्यांना रहाण्यास फारशी सवड नसल्यामुळें ते लवकरच आंबेखोलला आले. त्यांना हिराची चवकशी करावीशी वाटली

नाहीं. कारण ती स्वतः जर आपल्याबद्दल कांहींच माहिती लिहीत नाहीं, तर आपण तिची चौकशी तरी कां करावी ? असें त्यांस वाटलें. मात्र तिनें वाचावयास पुस्तकें अगर लेख मागितले तर ते तिची मागणी तितकी पोस्टमार्गें अगदीं तिऱ्हाईतपणें पुरी करीत असत. त्यांत खासगी पत्र देखील घालीत नसत.

मालवण मुंबईत खेप घातल्यानंतर त्यांना बऱ्याचशा हकीगती कळून आल्या होत्या. मालवणच्याच मुक्कामांत मावशीनें दाजीसाहेबांचें मन वळवून मृत्युपत्र करावयास लावलें होतें. त्यांत दाजीसाहेबांनीं आपला इस्टेटींतला हिस्सा मावशीच्या मुलास देऊन टाकला होता. कारण आपल्या आजारांत व तत्पूर्वी मावशीनें जी सेवा केली त्याचा मोबदला म्हणून आपण अशी व्यवस्था करीत आहोंत असें त्या मृत्युपत्रांत त्यांनीं नमूद करून ठेविलें होतें. यांत सारी कारवाई काकाची होती. जुगारड्याला पैशाची नेहमींचीच निकड असते. तेव्हां थोडासा पैसा मावशीच्या मुलास देऊन ती सारी इस्टेट त्याच्याकडून खरेदी घ्यावयाचा त्यांचा हेतु होता व आतांपर्यंत तो साध्य होतही आला होता.

त्यांनीं मालवणास खेपा घालून एका कायदेपंडिताचा सल्ला घेतला होता. दाजीसाहेबांना इस्टेटीची विनाकारण विल्हेवाट लावतां येणें शक्य नव्हतें. फार तर त्यांना आपल्या हिशाची व्यवस्था हवी तशी करतां येईल, पण ती देखील मुलाला फसवण्याकरितां केल्यास तो प्रयत्न यशस्वी होणें कठीण जाईल, असा त्यांना सल्ला मिळाला. असें असूनही मावशी व काका या दोघांनीं दाजीसाहेबांस तें मृत्युपत्र करण्याचा तगादा लावला. दाजीसाहेब हे चिक्कू तसेच हेकेखोर होते. आपण सव्यापसव्य करून वाढविलेली इस्टेट उधळून टाकणारा मुलगा त्यांना डोळ्यासमोर देखील नकोसा झाला होता. तशांत मुलगा बरा व बाप वाईट अशी तुलना करणाऱ्या कांहीं कुळाचे उद्गार काकानें दाजीसाहेबांस ऐकविल्यापासून तर ते अतिशय चिडले व त्या रागाच्या भरांत त्यांनीं मृत्युपत्र करून टाकलें.

भाईसाहेब आपल्या अनुयायांस कोर्टांत जाऊन भांडणें भांडूं नयेत

असा उपदेश करीत असत. कर्जेदलालांस ते फार दोष देत असत. तो त्यांचा उपदेश ऐकल्यावर भाईसाहेबांनीं जरी कोणाच्या नांवाचा प्रत्यक्ष उच्चार केलेला नसला तरी अट्टल कर्जेदलाल म्हणजे ‘ काका बामण ’ असें भूमिजनांस वाटत असे व तसा ध्वनि त्यांच्या बोलण्यांतून निघे. काकानें येशाप्पाच्या पाटीस लागून त्याचा कसा नाश करण्याचा घाट घातला हें तर सर्वांच्या डोळ्यांसमोरच होतें. त्यांचीं तीं निंदाव्यंजक बोलणीं ऐकून काकानें जानव्यांत हात घालून प्रतिज्ञा केली होती कीं ज्या कोर्टाचा धिक्कार भाईसाहेब करितो, त्याच कोर्टाच्या पायऱ्या झिजविण्यास भाईसाहेबांस लावावयाचें. काकांचा तो बेत दाजीसाहेबांच्या मृत्युपत्रानें उत्तमप्रकारें जुळून आला. मृत्युपत्र झाल्यानंतर काकाला पराकाष्ठेचा आनंद झाला.

मावशीला तर परमावधीचा हर्ष झाला. दाजीसाहेबांची रोकड बँकेंत होती. पण कांहीं रोकड घरांत होती. दाजीसाहेब आजारी पडल्यानंतर वसुलीचा तगादा सुरू केला त्यामुळें आठ दहा हजारांची रक्कम घरांत आली होती. किल्ल्यांवर लक्ष ठेवून व संधि साधून ती रक्कम मावशीनें अचानक लांबविली आणि ती मुंबईस पळाली. काका तर मावशीच्याच पक्षाचे. शिवाय ते होते आंबेखोलास. ते जाऊन येऊन मालवणास असत. मालवणास आल्यावर ते पोलीस अधिकाऱ्यांस मात्र वारंवार भेटत असत.

आपल्याकडील औषध सांगितल्याप्रमाणें देण्याची व रोग्याची शुश्रूषा योग्य प्रकारें होण्याची सोय नाहीं असें पाहून व मुलाची मदत घेण्याची दाजीसाहेबांची इच्छा नाहीं असें दिसून आल्यावरून मालवणच्या डॉक्टरांनीं हरकिसनदासच्या डॉक्टरांकडे दाजीसाहेबांस सुरक्षित पोंचतें केलें.

तेथें त्यांना औषधोपचार चांगले झाले. विशेषत: सौ. देशपांडे या परिचारिकेनें त्यांची फारच चांगली शुश्रूषा केली. आपला अंतकाळ ओळखून दाजीसाहेबांनीं हरीकिसनदास हॉस्पिटलला एक हजाराची देणगी दिली. डॉक्टर, मेट्रन वगैरे मंडळीलाही चांगलीं बक्षिसें दिलीं व त्याच वेळीं त्यांनीं आपलें मृत्युपत्र रद्द करून इस्टेटीची नवीन व्यवस्था केली. मावशी ही पूतनामावशी असल्याचे त्यांच्या चांगलेंच अनुभवास आलें होतें.

त्यांनीं इस्टेटींतला आपला हिस्सा मुलास न मिळतां सौ. चारुशीला देशपांडे हिला मिळावा असें ठरवून त्याप्रमाणें व्यवस्था करून टाकली. लोकसेवेचें जें कोणतें कार्य सौ. चारुशीला देशपांडे हिनें व तिच्या नवऱ्यानें अंगिकारलें असेल त्या कार्याला मदत म्हणून आपण ही देणगी दिलेली आहे अशी आपली इच्छा असल्याचें दाजीसाहेबांनीं नमूद करून ठेविलें होतें. मात्र ही गोष्ट सौ. देशपांडे यांना आगाऊ न कळवितां तिनें तें कार्य हातीं घेतल्याची पूर्ण खात्री झाल्यावरच तशी व्यवस्था व्हावयाची होती. म्हणून डॉक्टर, मेट्रन वगैरे कोणी ती गोष्ट सौ. देशपांडे यांना कळूं दिली नाहीं.

मुंबईस खेप घातल्यावेळीं एकदां भाईसाहेब वेळात वेळ काढून सांवळ्याच्या बिऱ्हाडीं गेले होते. पण त्याच्या खोलीस कुलूप! त्यांनीं आजूबाजूस चौकशी केली. तेव्हां त्यांना समजून आलें कीं, तो केव्हां केव्हां खोलीवर येतो. त्याची बहीण पूर्वी त्याच्याबरोबर राहत असे. पण हल्लीं ती त्याला सोडून गेली. बहीणभावंडांचें भांडण झालें. तिच्या नांवचीं आलेलीं पत्रें अथवा बुकपोस्टें आपण घेऊन ठेवतों व ती येऊन मागेल तेव्हां देतों. आपला राहण्याचा ठावठिकाणा ती कोणास सांगत नाहीं.

हें वर्तमान ऐकल्यावर भाईसाहेब निराश झाले होते. त्यांनीं मुंबईतील साहित्यिकांच्या चळवळी ज्या ऐकल्या त्याही जराशा गमतीच्याच होत्या. ‘ मेदिनी ’तील वसंतरावांच्या लेखांनीं संतप्त झालेल्या लेखकांनीं निषेधपर सभा भरविण्याचा निश्चय केला होता. पण वसंतराव व गिरिधरशेठ यांनीं त्यांतील चारदोन पुढाऱ्यांस चांगलाच मलिदा चारला. एकाला संपादकवर्गांत दाखल करून घेतलें. तेव्हां ऐन सभेच्या वेळीं कांहींजण गैरहजर राहिले. कांहींनीं ठरावास विरोध केला. कांहीं तटस्थ राहिले. त्या सभेंत इतका भयंकर गोंधळ माजला कीं, शेवटीं कसलाच ठराव न होतां सभा उधळून लावली गेली. ‘ मेदिनी ’ पत्राला दुप्पट जोर चढला. तितक्यांत ‘ मेदिनी ’नें तरुणांना खूप करण्याचें धोरण पत्करिलें. नवमतवादाच्या पुरस्काराच्या ढोंगाखालीं हवा तसा धिंगाण

घालावयास ‘ मेदिनी ’ नें सुरवात केली. जाहीर पत्रकावर निषेधपर सभेंत ठराव आणणारीं जीं नांवें प्रसिद्ध झालीं होतीं, त्यांचेच लेख ‘ मेदिनीं ’ त प्रसिद्ध होऊं लागले! यापलीकडे साहित्यिकांच्या स्वभावाचा चमत्कार तो आणखी कोणता राहिला?

आंबेखोलचा मंदिरप्रवेश वर्तमानपत्रांत आल्यापासून भाईसाहेबांची महाराष्ट्रांत ग्रामोद्धारक म्हणून बरीच प्रसिद्धी झाली होती. त्यांनीं आपली संस्था पुण्याच्या साक्षरताप्रसारक मंडळास जोडली. ‘ सागर ’ संपादक यशवंतराव हे भाईसाहेबांस वारंवार भेटत असत. ते मालवण म्युनिसिपालिटीचे व रत्नागिरी जिल्हा बोर्डाचे सभासद होते. शाळांतील मुलांचा पोषाख एका ठराविक पद्धतीचा असणें किती इष्ट आहे हें इतर सभासदांस पटवून तशा प्रकारचा ठराव ते आणणार असल्याचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें होतें. भाईसाहेबांचे शेतीचे प्रयोगही ‘ सागर ’ मधून व इतर नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असत. कोंकणची भूमि निकृष्ट खरी, पण त्या निकृष्ट भूमींतूनदेखील कांहीं उत्पन्न काढतां येण्यासारखें आहे हें ते सिद्ध करून दाखवीत होते.

एकदा मालवणास ते यशवंतरावांच्या घरीं बसले असतां त्यांस समजलें कीं, कोर्टांत एक मुकादमा चालू असून त्यांतील कांहीं दस्तऐवजांचा बनावटपणा कोर्टाच्या नजरेस आला होता व त्यामुळें हस्ताक्षराच्या निष्णाताचा सल्ला घेण्याकरितां कागदपत्र रवाना झाले होते. बनावटपणाबद्दल झालेली ओरड यापूर्वी देखील कुळांच्या तोंडून त्यांना खुद्द आंबेखोलांत देखील ऐकूं आली होतीच. काकाच्या मांगरांतील कागदांचे व ब्लॉटिंग पेपरचे तुकडे देखील गुप्त पोलिसांना सांपडले असून त्यांवरून छडा लावीत पोलीसांचे प्रयत्न दूरवर पोंचले असून, आतां त्यामुळें बनावट कागदपत्रांच्या कारखान्याचा सुगावा लागण्याची खात्री आहे, व कदाचित् ती केस सरकारमार्फत चालविली जाण्याचा संभव असल्याबद्दलची चर्चा मालवणच्या बाररूममध्यें चालली असल्याचें आपण ऐकिलें आहे, असें देखील यशवंतरावांनीं भाईसाहेबांस सांगितलें होतें.

एकदा यशवंतराव व भाईसाहेब आंबेखोलजवळच्याच गांवांत एक

लहानसें वाचनालय चालू करण्याकरितां गेले होते. दिवस पावसाळ्याचे. कोंकणांत पावसाळ्याच्या आरंभीं शेतकऱ्यांना फारच कामगत असते. म्हणूनच ग्रामोद्धाराच्या कार्यकर्त्यांना रात्रौ आठ नऊ वाजतांना लोकांना जमवावें लागतें. त्यावेळीं त्यांना थोडीशी सवड असते खरी, पण दिवसभर राबल्यामुळें त्यांना झोंप येऊं लागते.

यशवंतरावांना सभा लवकर आटोपावयाची होती. म्हणून त्यांनीं त्या गांवच्या देवळांत लवकर चलण्याचा आग्रह भाईसाहेबांस केला. देवळाकडे आल्यावर ते दिडीदरवाजानेंच देवळांत शिरले. यशवंतराव पुढें होते व भाईसाहेब पाठीमागून येत होते. यशवंतराव देवदर्शनासाठीं देवासमोर उभे राहिले. ते घंटा वाजविण्याच्या विचारांत होते. इतक्यांत त्यांच्या कानांत कांहीं बोलणें आलें. म्हणून त्यांनीं घंटा वाजविलीच नाहीं व देवाला साष्टांग नमस्कार न घालतां त्यांनीं फक्त हात जोडले आणि घाईघाईनें तें दिडीदरवाजांत येऊन छत्री झांकून ठेवून, येत असलेल्या भाईसाहेबांना त्यांनीं जिथल्या तिथें थोपवून धरलें. इतकेंच नव्हे तर पुढें पाऊल न टाकण्याबद्दल व तोंड न उघडण्याबद्दल त्यांनीं त्यांस खूण केली. त्यांच्या खुणेचा अर्थ लगेच भाईसाहेबांस समजला. बाहेरच्या बाजूस देवालयाच्या एका बाजूच्या पडवींत कांहीं शेतकरी जमून ते आपसांत गप्पा करीत होते. त्यांनीं एक शेकोटी पेटविली असून तिच्यावर ते आपली घोंगडी सुकवीत होते. त्यांच्या गोष्टी भाईसाहेबांच्याबद्दलच चालल्या होत्या. त्या कोंकणी भाषेंत चालल्या असल्या तरी त्यांत ते मधून मधून शुद्ध भाषेचा शब्द बोलण्याचा प्रयत्न करीत. यशवंतरावांनीं कांहीं महत्वाच्या गोष्टी ऐकावयास मिळतात म्हणून भाईसाहेबांस ती तसली संधि आणून दिली होती. आपल्या मागें आपल्यासंबंधीं भूमिजन काय म्हणत असतात तें ऐकणें भाईसाहेबांस महत्वाचें वाटेल अशी त्यांची समजूत होती. पण प्रथम भाईसाहेबांचें जें तिकडे लक्ष वेधलें तें आपल्या साक्षरताप्रसाराचा भूमिजनांच्या मनावर कितीसा परिणाम झाला आहे हें ऐकण्याच्या उद्देशानेंच. त्यांतील एकाद्या दुसऱ्याचा एकादा दुसरा शब्द व भारदस्त असा पुस्तकी भाषेंतला शब्द येत असलेला

ऐकून प्रथमच बोबडे बोल मुलाच्या तोंडून ऐकणाऱ्या पित्याच्या हृदयास जशा आनंदाच्या गुदगुल्या व्हाव्यात, तशा भाईसाहेबांच्या हृदयास होऊं लागल्या.

एकजण सांगत होता कीं भाईसाहेबांनीं एका कुळास केळींचे रोप देऊन व त्याची मशागत कशी करावयाची तें शिकवून नंतर एका वर्षाचें सगळें उत्पन्न त्याच कुळास दिलें. फक्त रोपांचा व खताचा पैसा व सरकारदस्ताचा पैसा तितकाच घेतला; व दुसऱ्या वर्षापासून निमें उत्पन्न दरसाल देण्याचें कबूल केलें.

दुसरा इसम म्हणाला कीं कांहीं झालें तरी कुळांच्या मालकीच्या जमिनी झाल्याशिवाय शेती सुधारणारच नाहीं.

त्यावर पहिला इसम म्हणाला, शेतकरी लोक सुशिक्षित होईपर्यंत त्यांना धन्याचें पाठबळच पाहिजे. धनी लोक शेतकऱ्याला मदत करतात व सरकारदस्ताला जबाबदार असतात. ते जर कुळास पिळून काढणारे नसतील व मशागतीच्या कामांत कुळाशीं सहकार्य करतील तर ते शेतकऱ्यांस उपकारकच होतील. भाईसाहेबांसारखे धनी लाभले तर कुळांना आणखी काय पाहिजे ?

तिसरा इसम बोलला कीं, भाईसाहेबांच्या पोटीं जन्मास येईल तो मुलगा भाईसाहेबांसारखा न होतां दाजीसाहेबांसारखा होणार नाहीं म्हणून कशावरून ? धनी स्वतः मशागत करीत नाहींत. त्या अर्थी असला परपुष्ट, रिकामटेकडा, आयतखाऊ, मध्यस्थवर्ग हवाच कशाला मध्यें ? सरकार आणि शेतकरी यांचेच संबंध असावेत. ह्या मध्यमवर्गानें जमिनी पाहिजेत असतील तर शेतकरी पेशा पतकरावा अथवा जमिनीवरचा हक्क कुळांना कायम देऊन टाकावा.

त्यावर तो पहिला इसम उठून उभा राहून म्हणाला कीं, या बोलण्यांत अर्थ आहे खरा, पण सध्यां कुळें कशीं बरें वागताहेत ? आपला कुणबी वर्ग कुणबीपेशा टाकून पांढरपेशा पतकरूं लागला आहे. शेतीचें काम सोडून नोकरी पेशांतच शिरूं लागला आहे. खेडें सोडून शहरांत राहून नोकरपेशांच्या लोकांच्या संवयी जडवून घेऊं लागला आहे. त्याचें

तर शेतीकडे लक्षच नाहीं. बामणां–भटांनां नांवें ठेवायचीं आणि आपण मात्र त्या बामणां–भटांसारखेंच व्हावयाचें. मिळून जमिनी निकृष्ट होतात, आणि शेती ओस पडते.

ह्यावर तो मघांचा तिसरा इसम म्हणाला कीं, कांहीं झालें तरी भाई-साहेबांसारखे जर धनी होणार नाहींत, तर शेतकऱ्यांची धडगत नाहीं. भाईसाहेबांसारखे धनी होतील तर शेतकऱ्यांना चांगलें सुख मिळेल. धन्याकडे जमा होणारा पैसा हा धन्याकडे एकप्रकारची ठेव आहे. धन्याची पैशांची पेटी ही कुळांची बँक अथवा पेढी आहे. सरकार-दस्त व आपला धनीभाग वजा जातां बाकीचा पैसा हा कुळांच्या मदती-साठीं खर्च करणारा धनी असेल तर मग ठीक आहे. पण तसें होणें अशक्य.

त्यावर एक इसम म्हणाला कीं काका बामण केव्हांतरी रात्रौ ह्या देव-ळांत येतो व कांहीं माणसांना काळोखांतच जमवून कसले तरी बेत करीत असतो.

यापुढील बोलणें ऐकूं येणें बंद झालें. कारण पावसाची फार मोटी सर आली. छपरावर त्यामुळें मोठा आवाज होऊं लागला. वाव-टळही मोठी आली. यशवंतराव भाईसाहेब पुढें येऊन त्यांनीं घंटा वाजवून देवास साष्टांग नमस्कार घातले. इतक्यांत गांवांतून जाणारीं इतर माणसेंही जमलीं.

पावसाची सर लागून गेली. वाचनालय उघडण्याचा समारंभ झाला. भाईसाहेबांचें व यशवंरावांचें भाषण झालें. माणसें घरोघर निघून जाऊं लागलीं. यशवंतरावांना त्याच गांवांत आपल्या स्नेह्याच्या घरीं रहावयाचें होतें. भाईसाहेबांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं आंबेखोलांत कांहीं महत्वाचें काम असल्यामुळें, ते रातोरातच जावयास निघाले. आंबेखोल अवघें दोन मैलांवर होतें. एका भूमिजनाला सोबतीला घेऊन ते रात्रौ साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आंबेखोलास जावयास निघाले.

वाटेंत एक ओढा होता. त्याच्या आजूबाजूस दाट झाडी होती. घरेंही बरींच दूर अंतरावर होतीं. तो भूमिजन आणि भाईसाहेब बोलत चालले होते. इकडच्या तिकडच्या गोष्टी त्या दोघांमध्यें चालल्या होत्या.

वाटेवर एक माड होता व त्याच्या कांडावर मध्येंच शेणांत रुतवलेल्या शिपा पावसानें घळून पडूं लागलेल्या त्यांना दिसल्या. त्या पाहून काका बामणाची दृष्ट लागूं नये म्हणून माडाच्या मालकानें तो तोडगा केला आहे असें तो भूमिजन सांगत होता. भाईसाहेबांना पडवळांच्या मंडपाची आठवण झाली. त्याच जागीं पुन्हां पडवळच लावावयास याही खेपेस येशाप्पास भाईसाहेबांनीं सांगितलें होतें. येशाप्पासंबंधीं बोलणें निघतांच तो भूमिजन म्हणाला होता कीं येशाप्पाची हिरा मुंबईत कुटल्या कुठेंच नाहींशीं झाली. कोणाच्या मतें तिनें जीव दिला. पण ती नाहींशी झाली हेंच खरें असें सगळेजण म्हणतात. ती अपघातानें मेली असें देखील कोणी कोणी म्हणतात. आणि एक कोणसा म्हणे म्हणत होता कीं सांवळ्यानेंच तिला ठार मारून टाकली !

मे महिन्यांत मुंबईस गेल्यावेळीं भाईसाहेबांस हिरा कुठेंच दिसली नव्हती. आज एक महिनाभर तिचें एकही पत्र नव्हतें आणि कांहीं दिवसांपूर्वीं तिला पाठविलेलें बुकपोस्टही परतून आलेलें भाईसाहेबांना आठवलें.

झाडींत कांहीं तरी सरसरलें. पण भाईसाहेबांचें तिकडे लक्षच नव्हतें. ते किंचित् थांबून त्या भूमिजनाला विशेष माहिती विचारीत होते. पुनः ते चालूं लागले. तोंच त्यांच्यावर पाठीमागून हल्ला चढला. सपासप बांबूचे सोटे त्यांच्यावर बसूं लागले. भूमिजनाच्या हातचा कंदील पहिल्याच तडाख्याला फुटला आणि काळोख पडला. भाईसाहेब लगेच सरसावले. त्यांनीं आपल्या हातांतला सोटा लाटीप्रमाणें फिरवावयास सुरवात केली. सोबतीचा भूमिजन मोटमोठ्यानें ओरडून लोकांना बोलावूं लागला. भाईसाहेबांनीं स्वतःचें रक्षण बराच वेळपर्यंत केलें. पण चारपांच असामींच्या विरुद्ध त्यांचा टिकाव लागेना. ते पडणार तोंच आजूबाजूचे लोक धांवले. त्यांना पाहून हल्ला करणारे लोक पार पळून गेले. यशवंतरावांस ही गोष्ट समजली तेव्हां ते म्हणाले, “ फुरशानें शेवटीं भाईसाहेबांस दंश केलाच ! ”

भाईसाहेब हल्ला परतविण्याची तयारी करीपर्यंत त्यांना मार लागलाच

होता. त्यांच्या उजव्या कुशीला व पाटीला मार लागला होता. मोठ्या शिकस्तीनें त्यांनीं घर गांठलें. त्यांच्या घरांत फक्त त्यांचा प्रामाणिक गडी होता. तो धन्याच्या जिवास जिवापाड जपत असे. धन्याला त्या स्थितींत आलेला पाहून त्याला फार दुःख झालें. त्यानें व बरोबरच्या भूमिजनानें मिळून भाईसाहेबांना शेकणें रगडणें सुरू केलें.

दुसऱ्या दिवशीं बाळा गावंड आणि येशाप्पा हेही मदतीला आले. चार सहा दिवसांत भाईसाहेबांना बरें वाटलें व त्याना हिंडतां फिरतां येऊं लागलें. नवीन सुरू असलेल्या शेतीच्या प्रयोगाकडे त्यांचें लक्ष वेधलेलें होतें. पडवळांचा वेल त्यांनीं पाहिला. चांगले वेल सुटले हो‍ा.. अजून मंडप उभारला नव्हता. तो उभारावयास येशाप्पास सांगून भाईसाहेब कोळंब्याच्या भाताची रोपलावणी पहावयास गेले. गेल्या चार दिवसांत त्यांचें मन बेचैन झालें होतें. शेतीच्या प्रयोगाच्या कामात तें इरलें घेऊन हिरा कामाला सर्वांच्या पुढें कशी असे हें त्यांच्या ध्यानांत आलें. बाळा हल्लीं हिराची कांहींच गोष्ट बोलत नसे. भाईसाहेबांनीं हिराबद्दल बाळाला एकदां विचारून पाहिलें. पण त्यानें उडवाउडवीचेंच उत्तर दिलें होतें.

भाईसाहेब त्यानंतर कवाथे पहावयास गेले. ते एका भागेल्याच्या घरीं बसले. त्यानें त्यांना पेलाभर दूध प्यावयाला दिलें. त्याच्या घरांत तापानें एक माणूस आजारी होतें. त्याची विचारपूस करून व त्याला धीर देऊन ते घरीं यावयाला परतले. त्यांची छत्री विसरून दुसरीकडे राहिली होती व तितक्यांत एक पावसाची सर मध्येंच आली ती त्यांना आंगावर घ्यावी लागली. भाईसाहेबांना त्याचे कांहींच वाटत नसे. सारे भूमिजन पावसांत भिजून शेती करतात हें त्यांनीं पाहिलें होतें.

दुपारीं घरीं गेल्यावर त्यांनीं थंड पाण्याची आंघोळ केली आणि दुपारीं ते जरा आंगांत कसर आल्यासारखी वाटते असें गड्यास म्हणून माडीवर जाऊन आपल्या खोलींत पांघरूण घेऊन निजले. गडी डोकें चेपीत बसला होता. मग तो उठून खालीं गेला.

भाईसाहेबांना दुपारीं वामकुक्षी करण्याची रोजची संवय नव्हती. कधीं त्यांनीं दुपारची विश्रांति घेतलीच तर फक्त एक तासभर. पण दोन तीन

तास झाले तरी भाईसाहेब उठले नाहींत असें पाहून गडी माडीवर गेला. त्यानें भाईसाहेबांना हाका मारल्या, पण ' ओ ' नाहीं. गड्यानें त्यांना ढळवून पाहिलें. त्यावेळीं पांघरूण त्याला गरमसें वाटलें. हात लावून पहातो तर भाईसाहेबांना फणफणून ताप भरला होता !

एक दोन दिवस त्यांनीं साधे उपाय करून पाहिले. कारण तो साधा सर्दीचा ताप आहे असें भाईसाहेब म्हणाले होते. शेवटीं ताप न उतरतां रोज वाढतच चालला. तेव्हां बाळा गावडे मालवणास जाऊन डॉक्टरांस घेऊन आला. डॉक्टरनीं येऊन केस तपासली व औषधयोजना सुरू केली. त्यांनीं दोन दिवसांनीं फिरून आलें पाहिजे असें सांगितलें. रोग्याची चांगली काळजी घेण्यास ते बजावून गेले.

पण डॉक्टरनां दोन दिवसांनीं यावयास झालें नाहीं. त्यांना दुसरीकडे जाणें भाग पडलें. चार दिवसांनीं ते आले व त्यांनीं भाईसाहेबांचा ताप विषमज्वराचा आहे असें खात्रीपूर्वक सांगून टाकलें. यापुढें मात्र त्यांची शुश्रूषा एखाद्या निष्णात परिचारिकेकडून झाली तरच औषध देण्याचा उपयोग, नाहीं तर अवस्था कठीण असें डॉक्टरांनीं सांगितल्यानंतर सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें.

बाळानें आपल्या बायकोला आणून तेथें ठेविलें व आपणही त्या गड्याबरोबर भाईसाहेबांच्या शुश्रूषेस राहिला व त्यानें मुंबईस एका परिचयाच्या परिचारिकेसाठीं तार केली. त्यानें एकदोन पत्रेंही पाठविलीं.

तार केल्याच्या तिसऱ्या दिवशीं नर्स मुंबईहून आली व आजूबाजूच्या सर्व मंडळीस थोडें हायसें वाटलें. तोच तापाचा नववा दिवस होता. डॉक्टरही त्यादिवशीं आले होते. त्यांनीं नर्सला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. त्या दिवसापासून भाईसाहेबांची शुश्रूषा यथायुक्त होऊं लागली.

तो दिवस कसाबसा निभावला. पण भाईसाहेबांचा ताप हटला नाहीं. सर्वांनाच फार काळजी वाटूं लागली. येशाप्पा दम्यानें आजारी झाल्यामुळें त्याला भाईसाहेबांकडे येववत नसे. भाईसाहेबांनीं बाळाकडून सर्वांस विनवून सांगवलें होतें कीं आपलें शेतीचें काम टाकून कोणीही भूमिजनानें

आपल्याकडे वारंवार येऊं नये. पाऊसपाण्याचें संधान राखून वेळच्या वेळीं शेतीचें काम केलें तरच शेती करण्याचा उपयोग. थोडेसें चुकलें तर उभ्या वर्षाच्या पोटगीचें तितकें नुकसान होतें. जेव्हां ज्याची जरूर लागेल, तेव्हां त्याला आपण बोलावून घेऊं. असें सांगितल्यामुळें वारी न चुकवणाऱ्या वारकरी भक्तास 'असशील तिथंच माझं स्मरण कर, पंढरीस येण्याचे श्रम घेऊं नकोस, आपलं कर्तव्य करीत रहा' असें पांडुरंगानें सांगितलें असतां जसें वाटेल तसेंच सर्व आंबेखोलच्या भूमिजनांस वाटलें. भाईसाहेबांच्या इच्छेविरुद्ध वागल्यास तें त्यांना आवडणार नाहीं हें सर्व त्यांच्या अनुयायांस ठाऊक होतें. रोग्याच्या भोंवती शुश्रूषेच्या माणसां-शिवाय इतरांची गर्दी अथवा ये, जा नको असा डॉक्टरांचा हुकूमही बाळानें सर्वांस फर्माविला होता. तेव्हां ते लोक बाळाकडूनच भाईसाहेबांच्या आजाराची हकीगत विचारून घेत असत. बाळा, बाळाची बायको, घरचा गडी आणि मुंबईहून आणविलेली नर्स इतकीं माणसें भाईसाहे-बांच्या दिमतीला होतीं. पण ताप उतरत नव्हता. नॉर्मल टेंपरेचर अद्याप होत नव्हतें. भाईसाहेबांची देहयष्टि अस्थिपंजरवत् होऊन राहिली होती. सर्व लोक एकविसाव्या दिवसाची वाट पाहत राहिले होते.

भाईसाहेबांनीं विसाव्या दिवशीं बाळाला जवळ बोलावलें. डॉक्टर नुकतेंच येऊन गेले होते. त्यांनीं भोंवतालच्या लोकांस धीर दिला असला तरी ते स्वतः निराश झाले होते, हें इतरांस नाहीं तरी डॉक्टर लोकांच्या वागणुकीला सरावलेल्या त्या चाणाक्ष नर्सला समजून चुकलें होतें. आजू-बाजूच्या माणसांस धीर देण्यांत येत असला तरी स्वतः परिचारक भिऊन गेले होते. नर्सच्या मनाची अवस्था एकट्या बाळाला, त्याच्या बाय-कोला व घरच्या गड्यालाच तेवढी कळली होती. ती सारखीं जागरणें करीत होती. त्यांना ताप कमी असेल तेव्हां वाचून दाखविणें, वर्तमान-पत्रांतल्या बातम्या कळविणें, वगैरे कामें ती करीत असे. अष्टौप्रहर ती भाई-साहेबांच्या सेवेला सारखी हजर राही.

भाईसाहेबांनीं मुंबईस असतांना 'कुवलय' कंपनीचा चित्रपट पाहिला होता. त्यांतील चारुशीलेची भूमिका पाहून त्यांचीं खात्री झाली होती

कीं, सौ. देशपांडे ही हिराच असली पाहिजे. जाहिरातींतील छाया-चित्रावरून त्यांना जो संशय आला, तो प्रत्यक्ष चित्रपट पाहून दृढ झाला. विधवाकुमारी हिरा ही सौ. देशपांडे होऊन विवाहित झाली हें त्यांनीं ओळखलें. त्यांना एकप्रकारचें समाधान वाटलें. फक्त किंचित् विषाद त्यांना इतकाच वाटला कीं आपल्या कार्यांत सहभागी होणारी हिरा आपल्यापासून दूर गेली. आपल्या ग्रामोद्धार कार्याचा जिला अभिमान वाटे व आपल्या लौकिकामुळें जिच्या जिवाला आनंद होई अशा एका प्रेमळ जिवाच्या सहवासाला आपण अंतरलों असें त्यांना वाटलें. पण या स्वार्थी विचाराबद्दल त्यांनीं स्वतःचा स्वतःच धिःकार केला. तिनें आजन्म वैधव्यांत रहावें अशी दुष्ट इच्छा तरी आपण कां करावी ?

पण आपली शुश्रूषा करावयास आलेली नर्स सौ. चारुशीला देशपांडे हीच कशी आली ? ती सर्व्हिसची मोटर सोडून स्पेशल मोटर करून रात्रौ कां आली ? खोलीबाहेर ती फारशी जातच नाहीं व लोकांच्या नजरेस पडण्याचें कां टाळते ? आणि अष्टौप्रहर आपल्याच भोंवतीं गुरफटून कां राहते ? परिचारिका कितीही कर्तव्यजागृत, कितीही भावनाशील, कितीही हळव्या मनाची असली तरी तिच्या शरीरावर, आणि शरीराप्रमाणेंच मनावर रोग्याच्या आजारीपणाचा असा परिणाम होणें शक्य आहे काय ?

ही हिराच आहे तर आपली ओळख पुरती न देतां परकीपणानें कां वागते ? डोळ्यांत आलेलें पाणी पुसतांना आपली नजर कां चुकवते ? असेल—कदाचित् परक्याची झाली म्हणून असेल. पण आपलें मन तिच्याकडे कां ओढ घेतें ? आजारीपणाचा परिणाम शरीराप्रमाणेंच मनालाही दुबळें बनवीत असेल काय ?

आपलें कार्य अपुरें राहिलें, आपले प्रयोग अपुरे राहिले, आपलें घराणें अर्ध्यावर तुटलें ! वडिलांनीं केलेल्या पापाचा घडा भरला. पापाची निष्कृति करण्याला आपणाला परमेश्वरानें पुरती संधि दिली नाहीं. धनीभागेल्यांचा सलोखा आपणाला घडवून आणतां आला नाहीं. मंदिरप्रवेश अर्ध्या देवालयापर्यंत झाला. देवालयाच्या गाभाऱ्यापर्यंत हरिजनांला नेतां

आलें नाहीं. शेतीचे प्रयोग पुरे करितां आले नाहींत. क्षीणता पराकाष्ठेची आलेली. आंथरुणांतून हालचाल देखील करवत नाहीं.

हातीं घेतलेलें ग्रामोद्धाराचें कार्य अपुरें राहिलें. वाचनालयें स्थापन करतां आलीं नाहींत. भूमिजनांत सहकारिता स्थापन करावयाचे बेत तसेच राहिले. हाय हाय. . . ! सारखी तळमळ !

आपले प्रयोग—आपले विचार लिहूनही ठेवावयास मिळाले नाहींत. आतां आपली जीवितयात्रा संपली खास.

परिचारिकेच्या डोळ्यांत, हालचालींत आपल्याबद्दल जो प्रेमळपणा दिसतो तो—तो हिराच्या डोळ्यांतील प्रेमळपणा—तोच या सौ. देशपांडे यांच्या डोळ्यांत कां दिसावा ? हिराला पळवून मुंबईस नेल्यावर कस्तुरच्या घरांत तिच्यावर काकानें जेव्हां हात टाकला, तेव्हां तिनें आपलें शीलरक्षण कसें केलें होतें, तें बाळाकडून भाईसाहेबांस कळलें होतें. तेव्हां व त्यानंतर बापाला संकटमुक्त करण्याची तिची उदात्त इच्छा असूनही तिनें ‘ पवित्र गुन्हा ’ केला नाहीं. कधींच घसरली नसलेली हिरा आतांच घसरूं पहाते काय ? इतकी खंबीर हिरा अशी कशी चळेल ?

कीं हा आपणाला नुसता भासच होतो आहे ? माणसांसारखीं माणसें का आपणाला दिसत नाहींत कधीं जगांत ? बाळा देखील आपणाला तिच्याबद्दल कधींच कांहीं कां बोलत नाहीं ? आणि आपण तरी कां विचाराव्यात असल्या खासगी गोष्टी ?

आणि आपले आतां राहिलें आहे तरी काय जगांत ? हिरा बिचारी सुखी असो. एका दिवसाची वस्ती ! उद्यांच एकविसावा दिवस. नववा दिवस चुकला. एकविसावा दिवस चुकणेंच शक्य नाहीं. सौ. देशपांडे कुशल परिचारिका. डॉक्टरप्रमाणेंच तीही निराश झालेली दिसते ! मात्र आपणालाच चकवूं पाहतात, वडिलांचें मन अखेरपर्यंत बदललें नाहीं. ज्या परिचारिकेनें आपल्या वडिलांची सेवा केली, त्याच परिचारिकेनें आपलीही शुश्रूषा करावी हा काय विचित्र योगायोग ?

आपल्या वडिलांनीं तिला आपला मिळकतीचा भाग दिला. आणि आतां आपण काय देणार ? दार्जीसाहेबांसारखा कमालीचा कृपण, हेकट

स्वभावाचा व कोपिष्ठ माणूस जिच्या प्रेमळ शुश्रूषेनें इतका उदार झाला तिच्या आंगचे गुण किती अमोल असले पाहिजेत ?

पण या सौ. देशपांडेबाईंनीं लोकसेवेचें व्रत पतकरिलें आहे तरी कोणतें ? आणि श्रीयुत देशपांडे राहतात तरी कोठें ? आपलाही हिस्सा त्यांच्याच लोककार्याला कां देऊन टाकूं नये ? आपलेंच कार्य त्यांना पुढें चालविण्यास संधि कां देऊं नये ? बस्स् ! . . .

भाईसाहेबांच्या मनांत असे विचार घोळत होते. त्यांच्या खोल गेलेल्या डोळ्यांत आनंद उमटलेला चोरट्या नजरेनें पाहणाऱ्या परिचारिकेला दिसला. त्यांची मुद्रा प्रसन्न आणि किंचित् उल्हसित दिसली. तिनें स्टोव्हवर पाणी ठेविलें होतें. पण तिची नजर भाईसाहेबांकडे होती.

त्या दिवशीं भाईसाहेबांनीं आपल्या मनांतल्या इच्छा आकांक्षा बाळास सांगितल्या. ज्यांना भेटावयाचें होतें, त्यांना भेटावयास बोलावलें. ज्यांच्याशीं कांहीं बोलावयाचें होतें, त्यांच्याशीं बोलून घेतलें. त्यांना भेटावयाला जे लोक आले ते किंचित् आनंदी व पुष्कळसे दुःखी झालेले होते.

त्याच दिवशीं सरकारचें धरणें येऊन काकास तालुक्यांत पोलीसांनीं नेलें होतें. बहुरूपी झालेला इसम त्या पोलिसांबरोबर होता. गांवच्या लोकांनीं त्याला चांगलाच ओळखला होता. पापाचें प्रायश्चित्त पाप्यास मिळेल; पण जो तो आकाशाकडे नजर लावून एवढेंच म्हणे—

"देवा ! तुझ्या दरबारीं पुण्यात्म्याला सुखी करण्याइतका न्याय नाहीं का रे ?"

तो दिवस श्रावण महिन्यांतला पहिला मंगळवार होता. आंबेखोल गांवच्या मुली पहाटें फुलपत्रीं जमवीत फिरत होत्या. त्यानंतर त्यांनीं मंगळागौरी घरोघर पुजल्या होत्या. रात्रौ त्या फुगड्या घालून मंगळागौर जागविणार होत्या. बागेंतली तगरांचीं व अनंताचीं झाडें फुलून सुवास सुटला होता. पारिजातकानें सडा पसरण्याची कमाल केली होती. पडलेलीं फुलें वेंचणार कोण आणि कशाला ? मंगळागौरीला हवीं तितकीं फुलें मुलींनीं वेंचून नेलीं होतीं.

बटमोगरा आणि जुई यांच्या फुलांचे गुच्छ करून परिचारिकेनें संध्याकाळींच भाईसाहेबांच्या बिछान्याजवळ ठेवले होते, त्यांचा परिमळ पसरून राहिला होता.

सर्व निरवानिरव भाईसाहेबांनीं केली होती. संध्याकाळपासून त्यांची नजर परिचारिकेच्या मुखाकडे लागली होती. परिचारिकेला हें कळून चुकलें. बाहेर पावसाळीला पावसाच्या धारा ! घरांत दोघांच्याही डोळ्यांना अश्रूंच्या धारा ! कोण कोणाशीं बोलत नव्हतें. पण—

पण भाईसाहेबांच्या मनांत परिचारिकेशीं कांहीं तरी बोलायचें होतें. दिवालावणीची वेळ झाली. तिनिसांजची ती कातरवेळा. उद्यांच्या दिवशीं यावेळीं कसला क्षण येणार कोणास ठाऊक ! परिचारिका उपोषित होती. ती मंगळवारचीं उपोषणें करीत असे. गाळवाच्या बाजूस पाण्याचे लोंढे धो धो वाहत होते. त्यांचा आवाज या शांत वेळीं सागरगर्जनेसारखा येत होता. बोंडगीच्या बेटांतून कुवांकोंबड्याच्या ओरडण्याचा आवाज येत होता.

परिचारिकेनें खिडकींतून बाहेर नजर फेंकली. तिला स्वतःबद्दल उद्वेग आलेला स्पष्ट दिसत होता. आपल्या हातून शुश्रूषेला गुण न येतां एक रोगी मृत्युमुखीं गेला आणि आतां या पुण्यात्म्याची गत तशीच होणार काय ?

विचारांच्या भाराखालीं तिचें हृदय जड व मस्तक हलकें झालें होतें. भाईसाहेबांच्या डोळ्यांतून प्रतीत होणारी त्यांच्या चित्ताची चलबिचल तिच्यानें पहावेना. आपण केलेलें कपटनाटक, आपण स्वीकारलेला कठोरपणा—सर्व कांहीं मूर्खपणाचें ठरलें. भाईसाहेबांच्या अंताला कारण आपणच तर होत नाहींना ?

मध्यरात्र होत आली. सर्व माणसें झोंपलीं. परिचारिकेनें भाईसाहेबांच्या तापाचा चार्ट डॉक्टरांस दाखविण्याकरितां तयार केला होता तो काढून पाहिला. ती थर्मामिटर घेऊन भाईसाहेबांकडे हलक्या पावलांनीं गेली. त्यांना झोंप लागली होती.

परिचारिकेनें हळूच थर्मामिटर लावलें. ती भाईसाबांच्या चेहऱ्याकडे

पहात राहिली होती. तिनें थर्मामिटर काढून घेऊन पाहिलें. ताप नॉर्मलवर आलेला नव्हता. ती निराश झाली. तिनें डोळयांतले अश्रु पुसले, पण दुप्पट जोरानें ते येऊं लागले, आणि हुंदक्यांचा आवेग कांहीं केल्या आवरेना. पावसाची मुसळधार सुरू होती.

उशीकडच्या बाजूस बिछान्याबाहेर उभी राहिलेली परिचारिका खालीं वांकली व तिनें आपलें मस्तक भाईसाहेबांच्या मस्तकाकडे नेलें, आणि गाल गालाजवळ नेला. अर्धाच क्षण ! ती आपलें मस्तक उचलून घेत होती. भाईसाहेबांनीं क्षीण नजरेनें तिच्याकडे पाहिलें. ती शरमली. त्यांनीं तिला जवळ बसावयास खूण केली. ती बसली.

" तुम्ही कसलें लोककार्य पतकरलं आहे दोघांनीं ? "

" ग्रामोद्धाराचं ! " ती डोळे पुशीत म्हणाली.

" तुमचे पति कुठं आहेत ? "

" माझ्या डोळयांसमोर ! "

" त्यांना बोलावून घ्याल कां ? "

" कां ... ? "

" मला तुम्हांला दोघांला देणगी द्यायची आहे. "

" कशाबद्दल — ? "

" माझं कार्य तुम्ही दोघांनीं चालवलं पाहिजे ! मला तळमळ लागली आहे. "

" देवाच्या मनांत असलं तर ! "

" आहे–खात्रीनं आहे–देव इतका निर्दय नाहीं–पण— "

" काय ? "

" पण शुश्रूषा करतांना तुम्ही आपल्या पतीशीं प्रतारणा कां केली ? माझ्या गालांजवळ गाल कां आणला ? "

" लग्नापूर्वी मी पत्नीभावानं वागण्याचा अपराध केला खरा ! क्षमा असावी. पण माझे मनानं वरलेले पति मला उद्यां मिळतील म्हणून कशावरून ? " तिच्या डोळयांतून ओघळ वाहूं लागले.

" म्हणजे ? "

" आपणच—"

" काय ? "

" या मंगळसूत्रांतील ही सोन्याची पेटी उघडून दाखवतें जरा थांबा ! हं."

परिचारिकेनें दिव्याची वात मोठी केली. मंगळसूत्रांतली पेटी तिनें उघडली, आणि त्यांतील अत्यंत लहान फोटो काढून भाईसाहेबांस दाखविला. तो त्यांचाच फोटो होता आणि त्यांचेंच आडनांव देशपांडे होतें.

भाईसाहेबांनीं आपला अशक्त हात हिराच्या गळ्याभोंवतीं घातला.

" हिरा—माझ्या जीवा ! तूं आत्मघात करून घेतलास ! तूं पुन्हां दुसऱ्यांदा विधवा व्हायचं पत्करलंस अं ! " त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

" असं नाहींच व्हायचं ! भलतंच नये बोलूं ! "

" दोघांनींही गालांवर गाल ठेवले. चार अश्रुधारा एकवटल्या !

" मी मरेपर्यंत कुंकूं लावणार ! " परिचारिकेनें म्हटलें आणि तिनें कुंकवाचा करंडा उघडून भाईसाहेबांसमोर धरला. त्यांनीं आपल्या क्षीण बोटानें हिराच्या मस्तकीं कुंकुमतिलक लावला. मंगळसूत्रासही हात लावला.

मध्यरात्रीला काळरात्र म्हणतात. त्याच वेळेला पाऊस सारखा मुसळधारांनीं पडत होता. बेडुकांचें डरांव डरांव चाललें होतें. जवळचा पुष्पगुच्छ घेऊन तो परिचारिकेनें भाईसाहेबांच्या हातांत दिला ! आकाशाचें बंध तोडून पर्जन्यधारा वहात होत्या. हृदयाचे दरवाजे खोलून भावना वहात होत्या. पापण्यांच्या मिटण्यास न जुमानतां अश्रुधारा वहात होत्या. अशा जलाभिषेकांत दोन जीवांचें मीलन होत होतें.

एकाद्यानें म्हटलें असतें, कीं तिनें प्रेताशींच लग्न लावलें.

* * * *

एकविसाव्या दिवशीं भाईसाहेबांचा ताप उतरला व ते आस्ते आस्ते बरे झाले.

समाप्त

# कोंकणी शब्दांचे अर्थ.

| शब्द | अर्थ |
|---|---|
| **प्रकरण १ लें:—** | |
| भोंवाडा . . . . . | सभोंवार फिरण्याचा फेर. |
| ओफळी . . . . . | सकाळचें कोवळें ऊन. |
| शेगूल . . . . . | शेवग्याचें झाड. |
| म्हणी . . . . . . | लहानगा पाट. |
| धका . . . . . . | गुडघ्याएवढी भिंत उभारून तिला बसाय-याच्या बांकाची आकृति देणें. |
| खळें . . . . . . | आंगण. |
| पेळ . . . . . . | आंगणाचा उंच उभारलल्या कांठ. |
| वास्कुट . . . . . | Waist Coat बंडीवजा आंगडें. |
| केंस निटावणें . . . | फणीनें केंस नीट करणें. |
| धाव . . . . . . | ओढ्यांत सांपडणारा एकप्रकारचा तांबड्या रंगाचा दगड. |
| चुचळा . . . . . | दिव्याच्या जळणाऱ्या वातीवर येणारा बारीक निखारा. |
| तरंग . . . . . . | देव काढतांना ज्यांच्यावर वारें उभें रहातें ते लोक खांद्यावर तरंग घेतात. तरंग म्हणजे लांकडी रंगीत मुसळासारख्या दांड्यावर टोंकाला कापडें कौशल्यानें गुंडाळलेलीं अस-तात व वरतीं रुप्याचा तळहात किंवा रुपडें अथवा कळस बसविलेला असतो. |
| कुळवाडी . . . . | कुणबी. |
| नको माकां असां इचारूं . | नको मला असें विचारूं. |
| बेडो . . . . . . | न सोललेली सुपारी. |
| थडे गणपति हा . . . | तिकडे गणपति आहे. |
| बसा हंय . . . . | बसा इथं. |
| हडे काय सोदतास ? . . | इकडे काय शोधतां ? |

ओशाड . . . . . ओसाड. ( ओशट )

**प्रकरण ३ रें —**

डाळी . . . . . बांबूच्या बेळांची विणलेली हांतरी.

कुकारा . . . . . मोठ्यानें मारलेली सांकेतिक निनांवी पण सशब्द हांक. ही “ऊSSSहुहुहु” अशा ध्वनीची असते.

गडगा . . . . . दगडावर दगड रचून उभारलेलें कुंपण.

**प्रकरण ५ वें:—**

बसका . . . . . खेडेगांवांत देवतेला संतुष्ट करण्याकरितां दरसाल आराधना करतात ती.

**प्रकरण ६ वें:—**

कांबळेकार . . . . देवचार.

**प्रकरण ७ वें:—**

चेडूं . . . . . . मुलगी.

तेतुलें . . . . . . त्यांतील.

बायल माणूस . . . बायकोमाणूस.

कित्या . . . . . . कां ? कशाला ?

आवस . . . . . . आई.

दादले माणूस . . . पुरुष.

झाळी . . . . . . जाळी.

हुतल्यार . . . . . म्हटल्यावर.

जायसर . . . . . जाईपर्यंत.

आकवार . . . . . कुमारी.

रवतत . . . . . . राहतात.

ढकाल . . . . . . म्हातारी, खूप वर्षांच्या वयाची.

**प्रकरण ९ वें:—**

चिटक्या . . . . . बावच्या, गवऱ्या.

पडोळीं . . . . . पडवळ.

**प्रकरण ११ वें:—**

गजालिन . . . . गोष्टीनें.

भातेकरी . . . . वसूलदार.

**प्रकरण १२ वें:—**

भिजवण . . . . उन्हाळ्यांत भाताचें रोप रुजवून काढण्याकरितां जमीन नांगर ण्यासाठीं पाण्यानें भिजवणें.

**प्रकरण १५ वें:—**

वळेसर . . . . . . वेणी.

बापये . . . . . . पुरुष.

जलम . . . . . . जन्म.

बगवाणा नाय . . . बघवत नाहीं.

हुभे . . . . . . उभे.

आमचां कराम . . . आमचें कर्म.

मुड्या . . . . . . भात गवतांत गुंडाळून घट्ट बांधलेलें असतें तें.

मांवो . . . . . . सासरा.

कराज . . . . . . कर्ज.

उपां कसो ? . . . . पेरणी कशी करूं ?

हुननय नाय . . . . म्हणत नाहीं.

खोंगी घालणें . . . गुडघ्यांत मान हातांवर घेऊन बसणें.

मडके वळसावणें . . . मातीचें भांडें घरांत उपयोगास आणण्यासाठीं त्यांत पाणी घालून तापविणें वगैरे.

**प्रकरण १६ वें:—**

राधा नाचविणें . . . शिमग्यांत पोऱ्याला स्त्रीवेष देऊन घुमटांच्या तालावर गाणें गात नाचावयास लावतात. त्या स्त्रीवेषधारी पोऱ्याला राधा म्हणतात.

**प्रकरण १८ वें:—**

पासगळ . . . . पाऊस गळण्यासाठीं कवलांच्या कडेला नारळीचीं झांपें विणून त्यांची झडी बांधलेली असते.

कुवा कोंबडी . . . रानकोंबडीची एक ज़ात.